वेगवेगळ्या धर्ममतांतील आचाराचे नियम प्रादेशिक परिस्थिती-प्रमाणं वेगवेगळे असले तरी साऱ्या धर्मांचं ध्येय समाजधारणा हेंच आहे. आपल्या आसपास अस्तांव्यस्त पसरलेल्या समाजाला शिकवण देऊन, विस्कळित व्यक्तींचा एकत्र समाज बनवून, त्या समाजाची संघटना करून, त्याला सुखी करावं हाच साऱ्या धर्मपंथांचा मूळ उद्देश. ह्या वेगवेगळ्या धर्ममतांतून पुढं कडवेपणा निर्माण होईल आणि धार्मिक भावनांतून संकुचित मनोवृत्तींचे समाज उदयाला येऊन जगाच्या पाठीवर धर्मांच्या नांवाखालीं निष्पाप रक्ताचे सडे शिंपले जातील ह्याची ह्या धर्म-प्रणेत्यांना अंधुक जरी कल्पना असती तरी ह्या वेगवेगळ्या धर्म-प्रणाली कदाचित् पृथ्वीच्या पाठीवर निर्माण झाल्या नसत्या. ज्या वेळीं ह्या धर्मप्रणेत्यांचे पृथ्वीच्या पाठीवर अवतार झाले त्यावेळीं हल्लींचीं यांत्रिक साधनं अस्तित्वांत नसल्यानं साऱ्या पृथ्वीवरील मानवजात आजच्यासारखी एक झालेली नव्हती. म्हणून प्रत्येक धर्म त्या त्या प्रदेशांतील समाजापुरताच मर्यादित झाला. साऱ्या धर्मप्रणालींचं ध्येय समाजधारणा नी समाजहित हेंच असल्यानं आजच्या जगावरील धर्ममतां-तून वितुष्ट वाढीला लावत बसण्यापेक्षां धार्मिक आचारापुरतं व्यक्तीचं स्वातंत्र्य अबाधित ठेवून पृथ्वीवरील अखिल मानवजातीच्या सुखस्वास्थ्या-करितां समाजाची अगदीं अभिनव पद्धतीनं उभारणी करण्याचा महात्माजींनीं प्रयत्न केला. हल्लींच्या जगांतील युद्धं धर्ममतांच्या श्रेष्ठ-कनिष्ठतेवर आधारलीं नसून राष्ट्रीय वादावर नी आर्थिक विषमतेवर आधारलीं आहेत. समाजधारणेचं ध्येय यांत्रिक सुधारणेच्या अधिष्ठाना-वरून साध्य होत नसल्यानं रशियांतील समाजवाद सुद्धां आज राष्ट्रीय वादांतच विलीन होत आहे.

आज समाजधारणेचं धार्मिक अधिष्ठान मागं पडलं, यांत्रिक अधिष्ठान निकामी ठरलं, राष्ट्रवादाचं दिवाळं निघालं. ह्या साऱ्या कटु अनुभवांच्या अभ्यासानं महात्माजींनीं स्वयंपूर्ण राष्ट्रवादाच्या अधिष्ठानावरून मानवी-समाजाच्या संघटनेला गवसणी घालण्याचा विश्वप्रयत्न आरंभिला. प्रय-त्नाला सुरवात केल्यापासून मार्गांतील अडीअडचणींना बाजूला सारून त्यांनीं समाजमनाच्या सामर्थ्यावर सत्य–अहिंसेच्या मार्गानीं

आपला अनत्याचारी प्रेमाचा मार्ग जगाला पटवून दिला ही त्यांच्या यशाची पहिली पायरी आहे. आपापसांतील धार्मिक भेद, उच्चनीच भाव, जातिभेद, धनविषमता ही नाहींशी करण्यांत यश मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न ही दुसरी पायरी गांठल्यानंतरच त्यांची यशाची पुढली पायरी म्हणजे स्वयंपूर्ण आर्यावर्ताची उभारणी ही आहे. त्यानंतरची चौथी यशाची पायरी म्हणजे अखिल जागतिक मानवजातींतील समाजाची सुसंवादी घटना ही आहे. ह्या आपल्या यशाच्या पायऱ्या गांठण्याचा महात्माजींचा धीमा प्रयत्न आमरण चालू होता.

'तुझ्या मनाचं प्रेम मला दे' ही त्यांची अखिल मानवजातींतील प्रत्येक व्यक्तीला आग्रहाची पण नम्र विनंति आहे. हिंदु, मुसलमान, बौद्ध, पारशी, ख्रिश्चन वगैरे सर्व धर्मांचे अनुयायी हे अखिल मानवजातीचे समाजाच्या एकीकरितां नी सुव्यवस्थेकरितां पाडलेले वेगवेगळे गट आहेत. ह्या साऱ्या धर्मप्रणालींच्या गटनायकांनीं एकीचा पुकारा केल्यास मानवजात एक होईल असा त्यांचा विश्वास आहे. हा विश्वबंधुत्वाचा ध्येयतारा गाठण्याकरितां त्यांनीं प्रथम आपल्या लगतच्या, चोवीस तास आपल्या खांद्याला खांदा लावून वावरत असलेल्या इस्लामी समाजाला आपल्या विचारांची सत्यता पटवून देण्याचा प्रयत्न चालविला. शेजाऱ्याचं मन वळवितां येत नसेल तर दूरच्या समाजावर छाप पाडतां येणं अशक्य आहे ह्या कल्पनेनं त्यांनीं आधीं आपल्या शेजाऱ्यापासूनच सुरवात केली. हिंदवी समाजांत ज्या अठरापगड जाती आहेत त्या जातीजातींतील भेदभाव नाहींसा करणं हाहि त्यांचा प्रयत्न होता. विशेषतः हिंदी समासमाजांत अस्पृश्यांवर आज हजारों वर्षें भयंकर अन्याय होत आले असल्यानं अस्पृश्यतानिवारणासाठीं त्यांचे भगीरथ प्रयत्न चालू होते. आपण अस्पृश्यांवर उपकार करतों आहोंत ही भावना त्यांच्या ठिकाणीं नसून अखिल मानवजातीच्या ह्या मागसलेल्या विभागाचं समाजांत आपल्या बरोबरीचं स्थान आहे हें त्यांनीं स्वतःच्या आचरणानं सिद्ध केलं. हिंदूंचे वेगळे मतदारसंघ, शिया, सुनी, बोहरी, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र ह्या पोटजातींचे वेगळे मतदारसंघ. त्यांत पुन्हा मराठे, लिंगायत, साळी, कोष्टी, सुतार, लोहार ह्या वेगवेगळ्या पोटविभागांचे वेगळे मतदारसंघ; प्रौढांचे वेगळे, तरुणांचे

वेगळे, टोपी घालणाऱ्यांचे वेगळे, टोपी न वापरणाऱ्यांचे वेगळे संघ असे जर असंख्य संघ तयार होऊं लागले तर अखेर एका व्यक्तीला एक संघ देण्यापर्यंत पाळी येईल. अखिल मानवजातीच्या उत्कर्षाकरितां राष्ट्रीय वादांना सुद्धां मूठमाती देण्याची जिथं आज गरज भासूं लागली आहे तिथं हे भेद, पोटभेद, उपपोटभेद नाहींसे करणं हें आपलं आद्य कर्तव्य आहे अशी गांधीवादाची निर्मळ मांडणी आहे.

हे सारे पोटभेद नाहींसे करून खेडं स्वयंपूर्ण बनविलं पाहिजे. भेद नाहीं, तंटा नाहीं, जात नाहीं अशा प्रवृत्तीचे लोक खेड्यांत वावरूं लागले म्हणजे खेड्यांतील समाजाला लागणाऱ्या साऱ्या आवश्यक वस्तूंची पैदास समाजाच्या संघटित शक्तीच्या साहाय्यानं खेड्यांतच करितां येईल. प्रथम प्रथम कांहीं बाबतींत परिपूर्ण असलेलं खेडं पंचवार्षिक योजनेंत स्वयंपूर्ण होईल आणि मग पंचवीस खेड्यांचे, पन्नास खेड्यांचे अगर शंभर खेड्यांचे असे स्वयंपूर्ण गट एकत्र होतांच एका स्वयंपूर्ण राष्ट्राची आपोआपच उभारणी होईल आणि जगाच्या पाठीवर अशीं स्वयंपूर्ण राष्ट्रं स्थापन झालीं म्हणजे अखिल मानवजात स्वयंपूर्ण होऊन सुखासमाधानानं नांदूं लागेल हें गांधीजींच्या आयुष्यांतील एक गोड सुखस्वप्न आहे.

खेडं स्वयंपूर्ण करण्याकरितां मुख्यतः ग्रामोद्योगावर भर दिला पाहिजे. खेड्यांत लागणाऱ्या सर्व रोजच्या वस्तू खेड्यांतच झाल्या पाहिजेत, आपल्याला लागणाऱ्या कोणत्याहि नित्योपयोगी वस्तूकरितां आपल्याला दुसऱ्याच्या तोंडाकडं पहावं लागूं नये, त्याचप्रमाणं आपल्या खेड्यांत आपल्या जरुरीपेक्षां उत्पादनहि जास्त होऊं नये. उत्पादन जास्त होत असेल तर यांत्रिक सुधारणा कमी करावी आणि उत्पादन कमी होत असेल तर यंत्रांत अधिक सुधारणा करावी. थोडक्यांत सांगायचं म्हणजे मनुष्याचं यंत्रावर नियंत्रण असावं, यंत्रामागं मनुष्यानं धावूं नये ह्या तत्त्वावर गांधीवादाची उभारणी आहे. यंत्र नको असं गांधीवाद सांगत नसून वाजवीपेक्षां जास्त भर यंत्रावर नको अशी गांधीवादाची मांडणी आहे. कलावान सुतारानं आपली कला पूर्णतेला नेण्याच्या प्रयत्नांत असावं, लोहारानं घणाचे घाव आत्मीयतेनं मारावे, म्हशीच्या आचळांना यंत्र लावून धारा काढतांना, म्हैस यंत्र बनते;

यंत्राचा उपयोग करणारा गवळी यंत्रासारखा तटस्थ असतो आणि यंत्र तर बोलून चालून यंत्रच असतं. त्यापेक्षां धार काढतांना म्हशीच्या अगर गाईच्या पाठीवर प्रेमानं थाप मारणं, म्हशीनं मध्येंच पाय उचलणं, तिला तिच्या नांवानं हाक मारुन गवळ्यानं चुचकारणं ह्या सर्व घटनांतून मानव्याचा आविष्कार होत असतो, मनाला कलेचं समाधान वाटत असतं, क्षणोक्षणीं जिवंतपणाचा अनुभव येत असतो. शाळांतून शिक्षण देतांना सुद्धां रोजचे यांत्रिक पाठ कायमचे तयार करुन ठेवणं ह्या विसाव्या शतकांत अशक्य नाहीं. पण अशा यांत्रिक शिक्षणांतून व्यक्तिमत्वाचं महत्त्व नाहींसं होतं आणि जीवनांतील जिव्हाळ्याचा लोप होऊन सारं शिक्षण शुष्क नी नीरस बनण्याची भीति वाटते.

हातसडीचे तांदूळ, जात्यावर दळलेलं पीठ, बैलांच्या सहाय्यानं नांगरलं जाणारं शेत अगर ओढली जाणारी मोट, चरख्यावर काढलेलं सूत आणि हातविणीचं वस्त्र. किती रम्य नी जिवंत कल्पना आहेत ह्या! चरखा नी हातमाग ह्यांचं नांव काढलं कीं ह्या विसाव्या शतकांतील समाजाचं पित्तच खवळतं. पण ह्या चरख्यांतूनच साऱ्या मानवजातीला एकत्र आणणारा प्रेमाचा धागा तयार होणार आहे. अखिल मानवजातीला शांततेचा निवारा ह्या हातमागावरील वस्त्रांतच आहे. मानवी-जीवनांतून अनवश्यक यंत्रांचं उच्चाटण होतांच अखिल जगांतील मानवजात सुखाचं माहेरघर गांठणार आहे हा गांधीवादाचा सिद्धान्त आहे. सारं जग ह्या गांधीवादाकडं आत्मीयतेनं पाहण्याच्या मनःस्थितींत आज आलेलं आहे. यांत्रिक सुधारणेनं एकादं मागासलेलं राष्ट्र कांहीं काळ सुस्थितींत राहिलेलं दिसत असलं तरी जगाच्या पाठीवरील साऱ्या राष्ट्रांची सुस्थिति टिकविण्याचं सामर्थ्य यांत्रिक सुधारणेंत नाहीं ह्याचा प्रत्यय जगांतील साऱ्या यंत्रवादी राष्ट्रांना आतां पुरेपूर आला आहे. अशा वेळीं गांधीवादाचा जागतिक प्रयोग करून पाहण्याची सुसंधि आपल्याकडं चालत आलेली आहे. ह्या संधीचा फायदा घेऊन हिंदुस्थानापुरता गांधीवाद यशस्वी झाला कीं सारं जग स्वेच्छेनं गांधीवादाला पाठिंबा देईल. महात्माजींनीं स्वतःची मानसिक उन्नति पूर्णतया साधलेली होती. हिंदवीसमाजाची उत्क्रान्ति साधण्याकरितां सत्य-

अहिंसेचं निशाण हातीं घेऊन ते खेड्यापाड्यांतील हिंदवीजनतेची उठावणी करीत फिरत होते. त्यांच्या ह्या बहुमोल प्रयत्नांत त्यांना यश मिळावं अशी आपणा सर्वांची इच्छा होती. पण मानवी मनाच्या सामर्थ्याची ओळख विसरून आपल्याला हजारों वर्षे लोटल्यानं महात्माजींना ह्या प्रयत्नांत यश मिळणार नाहीं अशी आपल्याला सतत भीति वाटत होती. ज्या समाजाला महात्माजी उपदेश करीत, तो प्रौढ समाज होय. गुलामगिरीचीं, असत्याचीं, स्वार्थाचीं पुटंच्या पुटं चढलेल्या समाजमनांत पालट घडवून आणण्याचा धर्मप्रवर्तकी प्रयत्न महात्माजी करीत होते. त्यांच्या पश्चात् त्यांनीं आरंभिलेलं कार्य पूर्ण करण्याकरितां आपण सुद्धां बालमनांची उभारणी करण्याच्या प्रयत्नाला लागूं या. महात्माजींचा त्याग, महात्माजींची तपश्चर्या, महात्माजींचं ध्येय ह्या साऱ्याच गोष्टी जरी लोकोत्तर असल्या तरी गोवर्धन पर्वत उचलण्याच्या महात्माजींच्या विश्वप्रयत्नांत होईल ती मदत करण्याचा आपण चंग बांधूं या. ह्या दृष्टीनं समाजांतील बालमनांना शिकवण देण्याचे अगदीं साधे प्रयत्न आपण करीत राहिलों तर महात्माजींनीं तयार केलेल्या प्रौढ मनांशीं आपण तयार केलेल्या बालमनांचा आणखी दहापांच वर्षांनीं मिलाफ झाल्यास सारं हिंदवी राष्ट्र खात्रीनं स्वयंपूर्ण होईल; आणि ह्या स्वयंपूर्ण हिंदवी राष्ट्रांतून उद्यांच्या अखिल जागतिक स्वयंपूर्ण मानवतेचं उत्थापन होईल.

हिंदुस्थान देश दरिद्री आहे. हिंदुस्थानांतील जनतेचं सरासरी उत्पन्न इतर देशांतील सरासरी उत्पन्नाच्या मानानं फारच कमी आहे. अखिल आर्यावर्ताचं वार्षिक बजेट हें न्यूयॉर्क शहराच्या कार्पोरेशनच्या वार्षिक बजेटपेक्षां सुद्धां कमी आहे. अशा तऱ्हेनं हिंदुस्थानची कंगाल परिस्थिति जगाच्या निदर्शनाला आणली जाते. हिंदुस्थानांतील एकमेव नेत्याच्या अंगावर पुरेसं वस्त्र देखील नव्हतं हें सुद्धां निर्भेळ सत्य आहे. पण ह्या विभूतीच्या मनांत जें शांततेचं समाधान होतं, तें समाधान जगांतील अत्यंत सधन व्यक्तींच्या ठिकाणीं सुद्धां नाहीं हें त्याहिपेक्षां कटु सत्य आहे. आपण आहोंत त्यापेक्षां जगाला अधिक दरिद्री दिसलों तरी चालेल, आपल्या राष्ट्राचं बजेट तीनशें कोटींवरून दोनशें कोटींवर, दोनशें कोटींवरून शंभर कोटींवर आलं तरी हरकत नाहीं, खेड्यांतील आवक-

जावक शून्यावर आली तरी हरकत नाहीं, पण त्यानं जर समाजाला सुख नी शांतता मिळत असेल तर सारीं बजेटं, सारी आवक–जावक, सारी संपत्ति शून्यावर आली तरी आम्हांला उलट आनंदच होईल. खेडीं आणि खेड्यांचे गट स्वयंपूर्ण झाले म्हणजे आवक–जावक आणि बजेटं शून्यावरच आलीं पाहिजेत. माझा देश दरिद्री आहे, मी दरिद्रीनारायणाचा सेवक आहे असं म्हणतांना महात्माजींना अभिमान वाटत असे. ज्या देशांतील श्रीमंत समाजाचे हात आकाशाला पोंचले आहेत पण ज्या देशांतील आगपेट्यांची विक्री करून पोट भरणाऱ्या गरीब मुलीला थंडीचं निवारण करण्याकरितां आपल्याजवळील काड्याच्या पेट्यांतील काड्या ओढतां ओढतां मरण पत्करावं लागतं असा पाश्चात्य देश घ्या अगर ज्या देशांतले भांडवलवाले लढाईच्या काळांत खोऱ्यानं पैसा ओढीत असतांना त्यांचेच देशबांधव अन्नाविना तडफडून प्राण सोडीत असा आपला देश घ्या, ह्या दोन्ही देशांपेक्षां ज्या देशाला दुसऱ्याचं कर्ज नाहीं, ज्या देशांतील प्रत्येक व्यक्ति अन्नवस्त्राच्या बाबतींत परिपूर्ण आहे, ज्या देशांतील गरीब नी श्रीमंत ह्यांच्यांतील फरक जवळ जवळ शून्यावर आला आहे असा देशच गांधीवादाच्या दृष्टीनं आदर्श देश आहे. अशा आदर्श देशाची उठावणी करण्याकरितां ज्या बालमनांची आणि प्रौढमनांची आपल्याला तयारी करावयाची आहे तीं हिंदुस्थानांतील बालमनं नी प्रौढमनं आज कोणत्या अवस्थेत आहेत, त्यांना गांधीवादाची शिकवण रुचण्याकरितां आणि पचण्याकरितां कोणते प्रयत्न करणं आवश्यक आहे ह्याचा विचार करणं ह्यापुढं ओघानंच येतं.

—*—

# ११ : आजचा समाज

गांधीवादांतून अखिलजगांतील मानवजातीची उभारणी करून साऱ्या जगांत समतेचं नी शांततेचं वातावरण प्रस्थापित करण्याचं ध्येय साधण्याचा आजच्या भारतीय नेत्यांचा उद्देश आहे हें आपण मागल्या प्रकरणांत पाहिलंच आहे. महात्माजींचं हें ध्येय खरोखर अतुलनीय नी आदरणीय आहे. महात्माजी स्वतः पराकोटीला पोचलेले होते आणि आर्यावर्तातील समाजावर त्यांनीं आपल्या विचारसरणीची पुरेपूर छाप पण पाडली आहे. गांधीवादाची विचारसरणी आज हिंदुस्थानांतल्या खालच्या थरापर्यंत पोहोंचली आहे. 'महात्मा गांधीकी जय' हा जयघोष हिंदवी राष्ट्राच्या कोपऱ्याकोपऱ्यांतून दुमदुमतो आहे. हिंदुस्थानांतील बरेच बुद्धिवादी गांधीजींच्या शब्दावर मानवतेच्या सेवेंत आपली बुद्धि वेचायला तयार झाले. हिंदुस्थानांतील भांडवलवाले महात्माजींच्या शब्दावर आपल्या मालकीच्या साऱ्या संपत्तीची दर्शनी हुंडी महात्माजींच्या नांवानं द्यायला एका पायावर तयार झाले होते. शेतकरी, मजूर, हिंदुस्थानांतील वरपासून खालपर्यंत सारा समाज गांधीवादाच्या भजनीं लागल्यासारखा दिसतो आहे. नौखालींतील महात्माजींच्या पायीं प्रवासानं इस्लामीयांच्या मनावर सुद्धां महात्माजींच्या निर्मळ चारित्र्याचा ठसा उमटूं लागला; असं असून सुद्धां एक आवाज, एक कर्तव्य, एक ध्येय अशी एकीची जागृति मात्र नजरेच्या टापूंत अद्याप आलेली नाहीं. आधिभौतिक उन्नतीवर खिळलेली समाजाची नजर अद्याप तिथून पूर्णपणें परतली नाहीं. महात्माजींच्या नवचैतन्ययुक्त विचारसरणीनं तसे प्रयत्न होत असले तरी त्यांचा व्हावा तितका परिणाम अद्याप समाजमनावर झालेला नाहीं. शारीरिक जागृति झालेली आहे, पण अद्याप मानसिक जागृति दूर आहे.

राष्ट्रीय सभेनं निवडणुका लढवायच्या ठरवितांच सारा समाज राष्ट्रीय सभेला पाठिंबा द्यायला उभा राहिला, पण तो शरीरानं, मनानं

नव्हे. अद्याप आम्ही आपलीं मनं राष्ट्रीय सभेला वाहिलेलीं नाहींत. निवडणुकांच्या वेळीं व्याख्यानं झालीं, मोठमोठ्या नेत्यांनीं विमानांतून दौरे काढले, जिकडं तिकडं कॉंग्रेसच्या नांवाचा पुकारा केला, कांहीं कांहीं नेत्यांनीं तर रात्रींचा दिवस करून अविश्रांत मेहनत घेतली, रोज दहा, वीस, तीस जितक्या घेतां येतील तितक्या सभा घेतल्या, राष्ट्रसभेच्या उमेदवारांना निवडून देण्यानं हिंदवीराष्ट्राचं पुनरुत्थापन होणार आहे ही गोष्ट समाजाला पटवून दिली आणि अखेर जिकडं तिकडं राष्ट्रीय सभेचे उमेदवार प्रचंड बहुमतानं निवडून पण आले. हिटलर सुद्धां जर्मनींत अशाच जोरदार निवडणुका लढवीत असे. संगिनींच्या जोरावर शेंकडा जवळ जवळ शंभर मतांनीं हिटलर निवडणुकींत यशस्वी होत असे. अमेरिकेचे अध्यक्ष अमेरिकेंतील कॉंग्रेसच्या नियमाविरुद्ध तीन वेळां प्रचंड बहुमतानं अध्यक्ष म्हणून निवडून आले. स्टॅलिन हा निवडणुकीच्याच जोरावर आमरण रशियाचा झार झाला आहे हें आपण आज प्रत्यक्ष पाहतों आहोंत. मुसोलिनीनं इटलींतील सारी सत्ता आपल्या हातीं घेतली तीसुद्धां लोकमताच्या आज्ञेला अनुसरूनच असं त्याचं देखील म्हणणं असे.

पण जगाच्या पाठीवरील ह्या सार्‍या पाश्चात्यछाप निवडणुका मानसिक सामर्थ्यावर आधारलेल्या नसतात. कॉंग्रेसनं आणि मुस्लीम लीगनं निवणुका लढवून समाजावरील आपलं वर्चस्व सिद्ध केलं. दोघांच्याहि यशामागं सरकारी संगिनी नव्हत्या. हुल्लड मात्र होती. कॉंग्रेसकडं अगर लीगकडं पाहण्याची समाजाची दृष्टि ऐहिक उत्कर्षाची होती. व्यक्तींच्या मोठेपणावर, व्यक्तींच्या सांपत्तिक स्थितीवर, व्यक्तींच्या हुल्लडबाजीवर ह्या निवडणुका आधारलेल्या होत्या हें सत्य आपल्याला दृष्टीआड करितां येणार नाहीं. महात्माजींच्या कल्पनेप्रमाणं ह्या निवडणुका व्हायच्या असत्या तर कोणीहि कोणत्याहि प्रकारची खटपट न करितां कॉंग्रेसच्या उमेदवाराचं नांव ऐकतांच बिनविरोध निवडणूक व्हायला पाहिजे होती. कांहीं कांहीं ठिकाणीं विरोध नव्हता. तरी पण त्याचं कारण कॉंग्रेसच्या विचारसरणीचं सामर्थ्य नसून त्या व्यक्तीच्या सभोंवतीं असलेलं व्यक्तिनिष्ठ मोठेपणाचं वलय हेंच होय. ज्या ज्या ठिकाणीं विरोध झाला

त्या त्या ठिकाणीं 'शठं प्रति शाठ्यं' 'ठोशास ठोसा' अशा पाश्चात्य विचारसरणीच्या धोरणानं निवडणुका लढविल्या गेल्या. उमेदवाराला परवाना देण्यापासून तों तहत उमेदवार निवडून येईपर्यंत संस्थाचालकांना निरनिराळ्या तऱ्हेच्या पाश्चात्य छापाच्या कारवाया कराव्या लागल्या. परवाना देतांना उमेदवार किती कर्तव्यनिष्ठुर आहे, किती तळमळीचा आहे, किती समाजहितवादी आहे ह्याची छाननी करण्याकरितां कांहीं प्रांतमुख्यांच्याकडे ही कामगिरी सोपविली होती. पण त्यांनीं ज्या धोरणानं ही छाननी केली किंवा नाइलाजानं कॉंग्रेसचं संख्याबल सिद्ध करण्याकरितां त्यांना जें धोरण राखावं लागलं, तें धोरण मात्र तितकंसं उज्ज्वल, ध्येयनिष्ठ आणि निःपक्षपाती नव्हतं असं म्हणावं लागतं. खादीची अट पाळली गेली, हें अंगावरच्या खादीच्या कपड्यांवरून न ठरवितां खादीचं गांधीवादांतील मूळ तत्त्व त्या व्यक्तीला कितपत पटलं आहे ह्यावरून ठरवायला पाहिजे होतं. सूत कातणाऱ्या लोकांकडून सूतगुंड्या विकत घेऊन निवडणुकीपुरतं आपलं खादीवरील प्रेम सिद्ध करणारे उपरे खादीधारी कोण ह्याची छाननी होणं जरूर होतं. राष्ट्राकरितां स्वार्थत्याग करणाऱ्या लोकांची निवड त्यांच्या तुरुंगांत जाण्याच्या अभिनिवेशावरून न करितां त्यांच्या मानसिक निष्ठेवरून करायला पाहिजे होती. निवडणुकीच्या वेळीं कोणती व्यक्ति अधिक पैसा खर्च करूं शकेल हा विचार डोळ्यापुढं ठेवून त्या व्यक्तीला कॉंग्रेसचा परवाना देणं म्हणजे भांडवलशाहीचं भूत आपल्या मानेवर जाणून बुजून बसवून घेणं होय. हें परवान्यांचं धोरण गांधीवादांतील मूळ तत्त्वांशीं किती विसंगत आहे ह्याचा जाणत्यांनींच विचार करावा. भरमसाट व्याख्यानं द्यावीं, वाटतील तीं खोटींनाटीं वचनं द्यावीं, व्यासपीठावर उभं राहून प्रतिपक्षावर अयोग्य असं तोंडसुख घ्यावं नी 'येन केन प्रकारेण' स्वतःचं श्रेष्ठत्व निवडणुकींत सिद्ध करावं हें पाश्चात्य धोरण टाकाऊ ठरविण्याइतकी समाजमनाची तयारी नव्हती, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. निवडणूक-प्रचाराकरितां राष्ट्रसभेनं पैसा ओतला, अयोग्य, पण बलवान व्यक्तीवर कॉंग्रेसचा शिक्का मारला नी अखेर कॉंग्रेसचं संख्याबल सिद्ध केलं.

निवडून आलेल्या आमदारांनीं प्रांतांचा कारभार आपल्या हातीं घेतला. किसानमजुरांचं राज्य आपल्याला स्थापन करायचं आहे असं म्हणणाऱ्या कॉंग्रेसवाद्यांनीं हें आपलं म्हणणं प्रत्यक्ष परिस्थितीशीं पडताळून पहावं. खांद्यावर कांबळं टाकून तमाखूची चिलीम भरीत भरीत सभागृहांत प्रवेश करणारे किती किसान आज आमदार आहेत? गिरण्यांमधून काम करतां करतां हाताला घट्टे पडलेले किती मजूर आज सभागृहांत बसताहेत? स्वतःला किसानमजुरांचे वाली म्हणविणारे कैक आमदार सभागृह दणाणून सोडीताहेत. किसान मजुरांच्या नांवाखालीं सारी सत्ता आपल्या हातीं घेण्याचा हा बुद्धिवाद्यांचा नेहमींचाच डाव आहे.

नव्या हंगामी सरकारांत हिंदुस्थानचा अनभिषिक्त राजा होण्याचा मान महात्माजींचा होता. पण महात्मा स्वतः राजे न होतां बाजूला राहिले. कारण त्यांच्या नजरेपुढं खरंखुरं किसान–मजुरांचं राज्य होतं. ते एक श्रेष्ठ बुद्धिवादी असल्यानं त्यांनीं जुन्या वैदिक परंपरेप्रमाणं निःस्वार्थी सल्लागाराचं स्थान घेतलं. हीच परिस्थिति प्रांताप्रांतांतून निर्माण व्हायला पाहिजे होती. हिंदुस्थानांतील सारे बुद्धिवान नेते अधिकाराच्या स्थानीं विराजमान झाले; त्यांनीं सुद्धां महात्माजींप्रमाणं सल्लागाराचं स्थान घेऊन किसानमजुरांचं खरंखुरं संघराज्य अस्तित्वांत आणायला पाहिजे होतं. पण पाश्चात्य संस्कृतीनं पछाडलेल्या ह्या बुद्धिवाद्यांना महात्माजींचं वैदिक धोरण पटलं नाहीं. त्यामुळं जगांत हिंदुस्थानची नालायकी सिद्ध होईल अशी त्यांना भीति वाटली. म्हणून हिंदवी राष्ट्रांतील सारे बुद्धिवान हिरे राष्ट्राचे सल्लागार होण्याऐवजीं राष्ट्राचे शास्ते झाले.

ह्याचे परिणाम मात्र अनिष्ट होताहेत असं आपल्याला रोजच्या अनुभवानं अधिकाधिक स्पष्टपणानं दिसतं आहे. युद्धकाळांत हिंदुस्थानांतील समाजाची पाश्चात्य अमलाखालीं विस्कटलेली घडी आज अधिकच विस्कटत चालली आहे. प्रत्येक खेडं, प्रत्येक तालुका, प्रत्येक जिल्हा, प्रत्येक प्रांत, निदान अन्नवस्त्राच्या बाबतींत तरी स्वयंपूर्ण व्हावा हें धोरण नाहींसं होऊन अन्नवस्त्राच्या बाबतींत आज हिंदुस्थानची परिस्थिति अधिकाधिक असमाधानकारक होत चालली आहे. जितकीं जितकीं नवीं नवीं नियं-

त्रणं जारी होताहेत त्या प्रमाणांत अन्याय अधिकाधिक भेसुर थैमान घालूं लागला आहे. ज्या पाश्चात्य देशांत ह्या लढाईचा उगम नी शेवट झाला त्या राष्ट्रांतील अन्नवस्त्रापेक्षां हिंदुस्थानांतील अन्नवस्त्राची परिस्थिति अधिक शोचनीय आहे. लांचलुचपतीच्या प्रकारांना आळा घालण्याचा जों जों अधिकाधिक प्रयत्न होतो आहे तों तों हे अनिष्ट प्रकार अधिकच उग्र स्वरूप धारण करताहेत. ज्या गोष्टींचा समाजहिताच्या दृष्टीनं आधीं विचार व्हायला पाहिजे त्या गोष्टी मागं पडून, नसत्या गोष्टींना मात्र अवास्तव महत्त्व येत चाललं आहे. परकीय सरकारच्या वेळीं सरकार परकी म्हणून व्यापारी समाजाला नाडीत होते. आज आपलं सरकार प्रस्थापित झालं असूनसुद्धां व्यापारीवर्गाकडून समाजाच्या होणाऱ्या पिळणुकीला बिलकुल आळा पडलेला नाहीं. ह्या साऱ्या अनर्थांना आपण म्हणजे सारे समाजघटकच जबाबदार आहोंत. आपणां सर्वांच्या भोंवतीं व्यक्तिनिष्ठ स्वार्थाचं जें एक काळं वलय निर्माण झालं आहे त्याचेच हे दुष्परिणाम आहेत.

आजकालच्या समाजांतील साऱ्या व्यक्ती सत्तेच्या मागं लागलेल्या आहेत. बुद्धिवादी लोक समाजांत आपलं वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. बुद्धिवान व्यक्ती आपल्या बुद्धीच्या जोरावर आपल्यामध्यें कर्तुमकर्तुं अन्यथाकर्तुं सामर्थ्य निर्माण करूं शकतात असा मानवी परंपरेचा इतिहास आहे. बुद्धिवान माणूस, आपल्या गोड भाषणानं, आपल्या अचूक विचारसरणीनं, आपल्या समाजहिताच्या कळकळीच्या देखाव्यानं समाजावर आपली हुकमत नेहमींच गाजवूं शकतो. व्यक्तिव्यक्तींत तेढ निर्माण करणं, एकाला जवळ करून दुसऱ्याला दूर लोटणं, प्रत्येकाच्या मनाचा कयास घेऊन ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणं ज्याला त्याला निरनिराळीं आमिषं दाखविणं, गोडगोड भुलथापा देऊन योग्य वेळ येतांच एकाद्याचा नकळत कांटा काढणं ह्या गोष्टी बुद्धिवान माणसाखेरीज इतर कोणालाच साधत नाहींत. बुद्धिवान माणूस जगाच्या कोणत्याहि चाकोरींत चमकल्याशिवाय रहात नाहीं. तो लेखणी जितक्या भारदस्तपणानं पेलतो तितक्याच सफाईनं तलवार पेलणं त्याला सहजसाध्य असतं. त्याच्या हातीं तराजू द्या, भल्याभल्या व्यापाऱ्यांना देखील

तो आपल्या कौशल्यानं खालीं पहायला लावील. त्याला नोकरी करायला सांगा, ती नोकरी करतांना सुद्धां तो इतक्या शिताफीनं करील कीं, आपला स्वार्थ साधीत असतांना आपल्या इमानदारीचा नी प्रामाणिकपणाचा यशस्वी आभास तो सतत मालकाच्या मनावर निर्माण करीत राहील. त्याला मजुरी करायला सांगा, मजुरी करतांना सुद्धां थोड्या श्रमांत अधिक काम करण्याची तो एकादी युक्ति शोधून काढील. बुद्धिवादी माणूस हा असा सर्वगामी असल्यानं जगाच्या सुरवातीपासून आतांपर्यंत ह्या बुद्धिवाद्याचा, सारा समाज हेवा करीत आला, इतकंच नव्हे तर बुद्धिवाद्याचा द्वेष करणं ही गोष्ट सर्वमान्य होऊन बसली आहे. असं असून सुद्धां समाजाच्या प्रत्येक अवस्थेंत त्याचं स्थान अढळ राहिलं आहे. ह्या बुद्धिवाद्याचा समूळ नायनाट करणं अशक्य आहे. शिवाय बुद्धीचं समाजांतून कायमचं उच्चाटन झाल्यानं मानवीसमाजाचं अकल्याणच होईल. आज जगाच्या प्रत्येक कोपऱ्यांत बुद्धिवाद्यांची सत्ता आहे. आणि प्रत्येक राष्ट्रांतील प्रमुख बुद्धिवादी साऱ्या जगांत आपल्या बुद्धीची श्रेष्ठता सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहेत. स्वतःच्या बुद्धिवादी सत्तेला कुणी लोकशाही म्हणतो, कुणी साम्राज्यशाही म्हणतो, कुणी भांडवलशाही म्हणतो, कुणी हुकूमशाही म्हणतो, कुणी समाजशाही म्हणतो. पण ह्या निरनिराळ्या तत्त्वांचा पुरस्कार करणारे आजचे सारे राष्ट्रधुरीण निर्भेळ बुद्धिवादी आहेत ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. ज्या वृत्तीच्या समाजाच्या साहाय्यानं ही बुद्धिवादी सत्ता प्रस्थापित होते त्या समाजाचं नांव त्या सत्तेला दिलं जातं इतकंच. बुद्धिवाद्यांच्या सत्तेखालीं मानवीसमाज सुखानं नांदत नाहीं हा मात्र जगाचा अनुभव आहे. हिंदुस्थानांत स्थापन झालेल्या ह्या बुद्धिवाद्यांच्या सत्तेनं जगाच्या पाठीवरील आधिभौतिकतावादांत इतर देशांप्रमाणंच हिंदुस्थान देश सुद्धां वहावतच जाईल.

आपण समाजांत सर्वश्रेष्ठ आहोंत हा जसा बुद्धिवाद्यांचा दावा आहे त्याचप्रमाणं सारं सामर्थ्य भांडवलांत सांठवलेलं आहे हा भांडवलदारांचा गुरुमंत्र आहे. ह्या विसाव्या शतकांतील समाजाचा पैसा हा आत्मा झाला आहे हें निर्विवाद आहे. ज्याच्याजवळ पैसा आहे त्याला जगांतील सारीं सुखं सुगम आहेत. उत्तम कपडा, स्वादिष्ट अन्न, हवेशीर बंगले,

गाड्याघोडे, चाकरनोकर, सारीं ऐहिक सुखं पैशाच्या पायीं लोळण घेतात हें आपण प्रत्यहीं पाहतों. म्हणून संपत्ति मिळविणं हें समाजांतील प्रत्येक व्यक्तीचं आज ध्येय होऊंन बसलं आहे. पैसा मिळविण्याचा आपला मार्ग न्याय्य आहे कां अन्याय्य आहे ह्याचा सारासार विचार आजच्या समाजांत नाहींसा झाला आहे. पैसा मिळविण्याच्या आपल्या ह्या अनिवार लालसेनं आपण वर्गविग्रह अधिक तीव्र करतों आहोंत, ह्याची जाणीव असून सुद्धां पैसा मिळविण्याच्या प्रयत्नापासून कुणीच परावृत्त होत नाहीं. पैसा मिळविल्यानंतर जे लोक आपल्याला दुरून सुखी दिसतात ते लोक खरोखर सुखी होतात का नाहीं, हा प्रश्नच आहे. पण पैशांत सुख आहे, पैशांत सामर्थ्य आहे, पैशांत अधिकार आहे असा आभास साऱ्या जगांत निर्माण झाला असल्यानं अखिल मानव-जात पैशामागं धावत सुटली आहे. हा पैसा मिळविण्याच्या प्रयत्नांतच राष्ट्राराष्ट्रांत युद्धं सुरूं होतात. युद्धाच्या वेळीं सुद्धां एका बाजूला राष्ट्राच्या संपत्तीची होळी होत असतां दुसऱ्या बाजूला साऱ्या राष्ट्रांतील युद्धप्रणेते आपली व्यक्तिगत संपत्ति वाढवीतच असतात. पैसा मिळविणं हाच समाजाचा ध्येयतारा ठरला असल्यानं जगांतील यांत्रिक सुधारणा आज कोसळून पडण्याइतक्या उत्तुंग कळसाला पोहोंचलेली आहे. तरी सुद्धां अद्याप समाजाचे डोळे उघडत नाहींत ह्याचं कारण भांडवलवाल्यांची नजर बुद्धिवाद्यांच्या नजरेप्रमाणंच सत्तेवर खिळलेली आहे.

प्रत्यक्ष काम करणाऱ्या समाजाचा दावा तर याहिपेक्षां अधिक तीव्र आहे. जगांतील साऱ्या वस्तूंचं उत्पादन म्हणजे पर्यायानं जगांतील सर्व प्रकारची संपत्ति हें ह्या कामकऱ्यांच्या श्रमाचं दृश्य फल आहे. कामकऱ्यांच्या रक्ताचं रूपांतर राष्ट्राच्या धनांत होत असतं. श्रमजीवी वर्गांतील लोकांना बुद्धि असते. भांडवलदारांनीं सांठविलेली संपत्ती सुद्धां श्रमजीवी समाजांतूनच त्यांना पिळून एकत्र केलेली असते. म्हणजे बुद्धिवाद्यांची बुद्धि आणि भांडवलवाल्यांचं भांडवल कांहीं प्रमाणांत कामगारांच्या मालकीचं असून धनोत्पादनाला लागणारे कष्ट मात्र सर्वस्वी त्यांच्याच रक्ताचे आहेत. असं असतांना बुद्धिवादी माणसापेक्षां, भांडवलवाल्या मालकापेक्षां श्रमजीवी जनतेची राहणी अधिक दारिद्र्याची, अधिक हलक्या दर्जाची, अधिक

हलाखीची आहे. हा श्रमजीवी समाज संख्याबलानं इतरांच्यापेक्षां कितीतरी पटीनं अधिक असून सुद्धां आजवर त्याच्यावर बुद्धिवाद्यांचं व भांडवलवाल्यांचं वर्चस्व अबाधित चालत आलेलं आहे. हें वर्चस्व झुगारून देण्याचा ह्या श्रमजीवी समाजाचा प्रयत्न आहे. समाजसत्तावादाचं मूळ ह्या समाजाच्या विषमतेंत आहे. आम्ही राष्ट्राचे आधारस्तंभ आहोंत, संख्याबलानं आम्ही सर्वांपेक्षां अधिक आहोंत, जगांतील धनोत्पादनाचं संपूर्ण श्रेय आमचं आहे, म्हणून आम्हा कामकऱ्यांना सुखी करणं हाच समाजाचा प्रयत्न असला पाहिजे, असं त्यांचं म्हणणं आहे. समाजांतील जास्तींत जास्त घटकांचं जास्तींत जास्त हित हेंच जर समाजाचं धोरण असेल तर अखिल जागतिक कामकऱ्यांची सुस्थिति हीच घोषणा राष्ट्राराष्ट्रांतून उफाळली पाहिजे.

आजची प्रत्यक्ष परिस्थिति मात्र ह्याच्या अगदीं उलट आहे. जगांतील कोणत्याहि राष्ट्राकडं नजर टाका. प्रत्येक राष्ट्रांतील बुद्धिवादी नी भांडवलवाले ह्यांच्यापासून सारा बहुसंख्य समाज विषमतेनं विलग झालेलाच आपल्याला दिसून येईल. विशेषत: आपल्या ह्या आर्यावर्तांतील ही विषमता अधिकच भयाण नी भेसूर आहे. सर्व सुखसोयींनी सुसज्ज अशा बंगल्यांतून राहणारा अल्पसंख्य समाज एकीकडं, तर कुणी झोपड्यांतून, कुणी गलिच्छ चाळींतून, कुणी पायरस्त्यावर उभा जन्म काढणारे कामकरी एकीकडं. सुग्रास अन्नावर यथेच्छ ताव मारून विनासायासानं मिळालेल्या संपत्तीचा उपभोग घेत असलेला मूठभर समाज एकीकडं, तर वाळल्या तुकड्यावर कशीबशी स्वत:ची गुजराण करून सकाळपासून संध्याकाळपर्यंत स्वत:च्या रक्ताचं पाणी करीत काबाडकष्ट करणारा समाज दुसरीकडं. अनवश्यक अशा चार चार पांच पांच कपड्यांनीं शरीर विभूषित करून आपल्या संपत्तीचं व मोठेपणाचं प्रदर्शन करीत रस्त्यानं पिसारा पसरलेल्या मोराप्रमाणं नाचत जाणारा समाज एकीकडं, तर अंगावर कधीं एकादं फाटकं कुडतं आहे, कधीं नाहीं अशा वेषांत लाज राखण्यापुरता कपडा अंगावर घेऊन राष्ट्राची संपत्ति वाढविण्याकरितां उन्हातान्हांतून हातांनीं कपाळावरील घाम निथळीत काबाडकष्ट करणारा कामकरी एकीकडं. उंचर पलंगावर टाकलेल्या परांच्या गाद्यागिरद्यांवर ऐषआरामांत

लोळत असलेला समाज एकीकडं, तर कधीं एकाद्या रकट्यावर, कधीं एकाद्या कांबळ्यावर, कधीं नुसत्या जमिनीवर अंग टाकून घोरत असलेला श्रमजीवी वर्ग दुसरीकडं. एकाचीं मुलं सांभाळायला ओल्या दायांपासून कोरड्या दायांपर्यंत चौवीस तास तैनातींत असलेल्या नोकरांची रेलचेल, तर दिवसभर काबाडकष्ट करून घरीं आल्यावर पोरट्यांच्या किरकिरीनं कामकऱ्यांची झोंपमोड होऊं नये म्हणून मुलांना आपल्या मांडीवर झोंपविणाऱ्या अफूमातेची रेलचेल. प्रवास करण्याकरितां साऱ्या सुखसोयींनीं सज्ज अशा पहिल्या वर्गाच्या डब्यांची व्यवस्था एकाकरितां, तर बसायला सुद्धां पुरेशी जागा ज्या डब्यांत मिळणार नाहीं असे घाणेरडे डबे दुसऱ्याकरितां. अशा ह्या सामाजिक विषमतेनं गांजल्या गेलेल्या बहुसंख्य कामगार वर्गाला, सुखाकरितां सत्तेची हाव वाटणं स्वाभाविक आहे.

चवथा वर्ग म्हणजे समाजांत सुव्यवस्था राखण्याकरितां, समाजाचं संरक्षण करण्याकरितां, समाजानंच उत्पन्न केलेला बलिष्ठांचा वर्ग. ह्यांच्या हातीं समाजानंच सत्ता दिलेली असते. परचक्रापासून राष्ट्राचं संरक्षण करण्याकरितां, समाजांतील चोर, लुटारू, डाकू ह्यांचं शासन करण्याकरितां, समाजांतील अन्यायाला आळा घालण्याकरितां, समाजाच्या खर्चानं पट्टाडगला चढविलेले हे समाजाचे सेवक समाजाचे मालक—नव्हे, समाजाचे स्वतंत्र शास्ते होऊं पाहताहेत. व्यसनानं पछाडलेले, अधिकारमदानं धुंद झालेले, हे समाजाचे बारगीर समाजाला सळो कीं पळो करून सोडताहेत. समाजाला ज्यांच्याबद्दल विश्वास वाटावा त्यांच्या भयानं समाज त्यांच्यापासून दूर पळतो आहे.

हें पोलिसखातं अकाळविकाळपणानं समाजांतील घटकांच्यापुढं हातीं दंडुका घेऊन उभं आहे. दीनदुबळ्या, सालस आणि भित्र्या समाजाला निरनिराळ्या तऱ्हेची दहशत बसवून त्यानं निढळाच्या घामानं मिळविलेला त्याचा घांस गिळंकृत करायला हें लष्करी खातं टपून बसलेलं आहे. ह्या बंदूकवाल्या बारगिरांच्या कारभारांत दयामाया नाहीं, नम्रता नाहीं, सभ्यपणा नाहीं. न्यायनिष्ठुरतेचा अधिकार हातीं असल्यानं ह्यांना कुणाचीच कदर वाटत नाहीं. समाजाच्या सुस्थितीकरितां समाजानंच आपल्याला

अधिकारदान केलेलं आहे ह्या शुद्ध भूमिकेचा विसर पडल्यानं समाजावर अनन्वित अन्याय, समाजाचा निष्ठुर छळ, समाजाची बेफाम नाडणूक करून, समाजाला वठणीवर आणण्याची बेमुर्वतखोर कल्पना उराशीं बाळगून ते आपल्या हातांतील सामर्थ्याचा आपल्याच मालकावर अनिर्बंध अत्याचार करताहेत. याहिपुढं जाऊन स्वतःचा वेगळा वर्ग आहे अशा भ्रामक भावनेनं समाजावर आपली अप्रतिहत सत्ता असावी अशा दृष्टीनं हातीं असलेली सत्ता बळकाविण्याचा त्यांचा अट्टाहास आहे.

ह्या चार वर्गांत अशा तऱ्हेनं सत्ता बळकावण्याची अनिष्ट अहमहमिका चालू असतांना समाजांतील व्यक्ती आधिभौतिक विकासानं भारल्या गेलेल्या दिसताहेत. जगाच्या पाठीवर निरनिराळ्या धर्मांचीं नांवं सांगणारे समाज फक्त नांवापुरताच धर्मधारणेचा विचार करताहेत. आपण ख्रिस्ती आहोंत, आपण यहुदी आहोंत, आपण पारशी आहोंत, आपण हिंदु आहोंत, आपण बौद्ध आहोंत, आपण इस्लामी आहोंत, असं सांगतांना आपल्या धर्माचं अखिल मानवीसमाजधारणेंत कोणतं स्थान आहे, ह्याचा विचारच समाजांतून नाहींसा झाला आहे. प्रार्थनालयांतून प्रार्थनेला जातांना किंवा परमेश्वराची प्रार्थना करतांना आपल्या धर्माची उच्च भूमिका कोणती ह्याचा विचार न करतां प्रार्थनेच्या आचारालाच अवास्तव महत्त्व आलेलं आहे. एका धर्माच्या अनुयायांनीं दुसऱ्या धर्माच्या अनुयायांना समानतेनं वागवावं आणि अखिल मानवजातीनं जगांत गुण्यागोविंदानं नांदावं ही जगांतील साऱ्या धर्मप्रणेत्यांची मूळ भावना असूनसुद्धां, दुसऱ्याचा धर्म तुच्छ मानणं, परधर्मीयांवर आक्रमण करणं, जुलूमजबरदस्तीनं त्यांना धर्मांतर करायला लावणं ह्यालाच प्रत्येक धर्माच्या समाजांत प्राधान्य येत चाललं आहे. आचारविचारांवरील धार्मिक निर्बंध शिथिल झाले आहेत. समाजमनांतून नीतीची हकालपट्टी झाली आहे. 'ऋणं कृत्वा घृतं पिबेत्' ह्या चार्वाक मताचा सार्वत्रिक फैलाव झाला आहे.

ज्या धर्माची प्रतिष्ठापना मूळ समाजधारणेकरितां झाली तो धर्म समाजकारणापासून वेगळा झाला आहे. धर्माचे सुटे सुटे भाग झाले आहेत. राजकारण, अर्थशास्त्र, न्यायमीमांसा, समाजव्यवस्था, नीति-

निर्बंध हीं सारीं तत्त्वं मूळ मानवी धर्मांतूनच निर्माण झालीं असून आज धर्माच्या ह्या अलग झालेल्या शकलांचे स्वतंत्र संघ झाले आहेत. समाजव्यवस्था, अर्थशास्त्र वगैरे आज जरी स्वतंत्र शास्त्रं गणलीं गेलीं असलीं तरी ह्या अगर धर्माच्या इतर कोणत्याहि उपांगांना स्वतंत्र अस्तित्वच असणं शक्य नाहीं, ही गोष्ट आजच्या समाजाच्या नजरेआड झाली आहे. ह्या सर्व उपशास्त्रांना एकत्र आणणारा जो मानवीसमाजधर्म तो आज जगांतून नष्ट झाला असल्यानं, गतप्राण झालेल्या रूपसंपन्न कलेवराप्रमाणं आज समाजाची अवस्था झाली आहे. प्रजेनं निवडून दिलेल्या प्रतिनिधींनीं राज्य चालविल्यानं समाजाचं हित होईल का? अर्थशास्त्राच्या तत्त्वाप्रमाणं मागणीपुरवठ्याचा मेळ बसावा म्हणून जादा उत्पादनाचा नाश केल्यानं समाज सुखी होईल का? नवे नवे कायदे बनविल्यानं समाजांतील असत्प्रवृत्तींना आळा बसेल का? नुसत्या नीतितत्त्वांचं बोधामृत पाजून मानवीसमाज फिरून प्रगतीच्या मार्गावर येऊं शकेल का? प्रत्येक शास्त्र एकलकोंडेपणानं स्वतंत्र विचार करीत आहे. त्या त्या वैयक्तिक शास्त्राच्या दृष्टीनं प्रत्येक शास्त्र बरंच प्रगत झालेलं आहे. पण समाजधारणा ही ह्यापैकीं कोणत्याहि एका सुट्या शास्त्रावर अवलंबून नसून ह्या साऱ्या शास्त्रांच्या सुसंवादी संगीतानंच मानवीमनाच्या प्रगतीची लय गांठली जाऊन समाजधारणेचा ठेका समेवर पडत असतो. आज तबला षड्जांत लागलेला असला तर तंबोऱ्याच्या तारा धैवतावर स्थिरावल्या आहेत. सारंगीचे सूर तारसप्तकांत डोकावताहेत, सतारीचे बोल खर्जावर घुटमळताहेत आणि गायकाचे आलाप मात्र मंद्र सप्तकांत कलेची कमाल करताहेत. प्रत्येक सुरावट आपापल्या परीनं पूर्णतेची पराकाष्ठा करीत असून सुद्धां त्यांचा मिलाफ मात्र बेसुर, बेताल नी विसंवादीच होत आहे. सारीं शास्त्रं आज जय्यत आहेत. फक्त एका सुरावटींत तीं सुसंवादी झालीं कीं मानवीमनाच्या समेवर उत्कर्षाचा ठेका स्थिरावलाच म्हणून समजावं.

समाजांतील कुटुंबव्यवस्था तर आज नामशेष होण्याच्या पंथाला लागली आहे. सगळी कुटुंबीयता मुळांतून उखडून निघाली आहे. मित्र, शेजारी किंवा एकादी समव्यवसायी व्यक्ती ह्यांच्यापेक्षांहि कमी जिव्हाळा

ह्या एकरक्तीय कुटुंबीयांतून शिल्लक राहिला आहे. अणूप्रमाणं समाजांतील व्यक्तीन् व्यक्ति अलग केली जात आहे. जगांतील पतिपत्नीचं नातं तर इतक्या विचित्र नवलाईचं बनलं आहे कीं, ह्या दोन व्यक्ती पतिपत्नी आहेत, कां मित्रमैत्रिणी आहेत, कां बहीणभाऊ आहेत, कां दोन परक्या व्यक्ती आहेत, कांहींच कल्पना करतां येत नाहीं. पति हा पत्नीचा आधार; ती पत्नी ही पतीची सावली ही आज नुस्ती वेड्या कवींच्या काव्यांतील कल्पनाच झाली आहे. पतिपत्नी नोकऱ्या करितात. पत्नीचे मित्र वेगळे, पतीच्या मैत्रिणी वेगळ्या. पति आपला जीव रमवीत असतो, पत्नी आपल्याच व्यवसायांत गढलेली असते. दोघंहि एकाच खुराड्यांत राहतात, पत्नीला मुलं होतात आणि तीं मुलं मोठीं झाल्यावर बापाचं नांव सांगतात म्हणूनच ह्यांना पतिपत्नी म्हणायचं. कायमचं विवाहबंधन नाहीं, कौटुंबिक जिव्हाळा नाहीं, एकतानतेचा ओलावा नाहीं. पटेल तोपर्यंत एकत्र रहायचं, नाहीं त्या दिवशीं कायदेशीर फारकत घ्यायची. एक नातं मोडून दुसरं नातं जोडणं हें एकादी निर्जीव वस्तु चढ्या भावांत विकून दुसरी वस्तु विकत घेण्याइतकं सोपं झालं आहे. मूल होणं हें विवाहांतील पवित्र ध्येय नाहींसं होऊन भोगलालसेची तृप्ति करण्याचा अनिष्ट परिणाम म्हणजे मूल इतक्या हीन थराला आज ही विवाहसंस्था येऊन पोहोचली आहे.

जगांतील मानवीजीवनाची घडण आज प्रत्येक दृष्टीनं व्यापारी बनली आहे. अमेरिका व यूरोप ह्या खंडांतील बुद्धिवाद्यांनीं मानवीसमाजाला दिलेली ऐहिकतेची शिकवण जगांतील साऱ्या अनर्थांची गोमुखी झाली आहे. मानवतेच्या सुस्थितीकरितां लावलेल्या साऱ्या शोधांचा उपयोग मानवतेची दुःस्थिति साधण्याकडं होऊं लागला आहे. आपल्या देशांतील लोकांना सुखी करण्याकरितां होणारे प्रयत्न इतर देशांतील मानवतेला जाचक करण्याची प्रवृत्ति साऱ्या राष्ट्रांतून निर्माण झाली आहे. आपल्या राष्ट्राच्या सामर्थ्याच्या जोरावर दुसऱ्या राष्ट्रांतील मानवतेवर आक्रमण करण्यांतच आपल्या राष्ट्राची इतिकर्तव्यता आहे, असा आत्मघातकी विचारच सगळीकडं प्रामुख्यानं पुढं येत आहे. आपलं सामाजिक उन्नतीचं तत्त्वज्ञान श्रेष्ठ आहे असं सिद्ध करण्याच्या प्रयत्नांत इतर तत्त्वज्ञानांचा

आपल्यापेक्षां कनिष्ठ ठरविण्याची सैतानी बुद्धीच प्रबळ होत असलेली दिसते आहे. आपल्या राष्ट्रांतील व्यक्तींनीं सुखी व्हावं म्हणून इतर राष्ट्रांतील व्यक्तींनीं आपल्या राष्ट्राची गुलामगिरी पत्करावी एक, किंवा आपल्याशीं लढायला तयार व्हावं एक, अशी जयिष्णुवृत्ति प्रबल राष्ट्रांतील समाजांत अधिष्ठित होऊन बसली आहे. दुसऱ्याला आपला गुलाम बनविणं, दुसऱ्यावर आपली संस्कृति लादणं, आपल्या हिताकरितां दुसऱ्याचं अनहित करणं, आपल्या गरजा भागविण्याकरितां दुसऱ्याला गरजवंत बनविणं, ह्या साऱ्या कल्पनांचं संमेलन म्हणजेच आजकालच्या राष्ट्रीय भावना. ह्या राष्ट्रीय वादांतूनच एक संस्कृतीच्या वेगवेगळ्या राष्ट्रांच्या भावना दुखावल्या जातात. ह्यामुळंच जगांतील लहान लहान राष्ट्रांना आसपासच्या बड्या राष्ट्रांचे तडाखे सतत सहन करावे लागतात. स्वसामर्थ्याची प्रतिष्ठापना करतांना आधिभौतिक अमानुष संहाराचा बीजमंत्रच वापरावा लागतो आणि त्यामुळं इतरांची व त्यांच्याच बरोबर स्वतःची सुद्धां होळी पत्करावी लागते, हा साऱ्या आधुनिक राष्ट्रवाद्यांना पुरेपूर अनुभव आलेला आहे. ह्या कटु अनुभवानंतर सुद्धां मानवजात अद्याप जागी होत नाहीं असं दिसतं आहे. कदाचित् अपमानाची माघार कुणी घ्यावी हाच प्रश्न जाचक होत असावा. अमेरिकेनं जपानवर अणु बॉम्बचा प्रयोग करून एक युद्ध थांबवलं ह्याबद्दल अमेरिकेला धन्यवाद द्यावे कां ह्या आणुबॉम्बच्या उपयोगानं जगाच्या पाठीवरील सारीं प्रबल राष्ट्रं ह्या अणु-बॉम्बच्या शोधापेक्षांहि अधिक जालीम शोध लावण्याच्या प्रयत्नाला लागल्यानं लवकरच होऊं घातलेल्या तिसऱ्या महायुद्धाचं कारण अमेरिकेच्या माथीं मारावं, कांहींच समजत नाहीं.

जगांतील सर्व प्रबल राष्ट्रांची आज शर्यतीच्या घोड्यांप्रमाणं स्थिति झाली आहे. आधिभौतिक सामर्थ्यांत पहिला नंबर पटकाविण्याच्या ह्या राष्ट्राराष्ट्रांच्या शर्यतींत कोणत्या राष्ट्राला केव्हां रक्ताची गुळणी येईल ह्याचा नेमच राहिला नाहीं. एका युद्धांत अपमान झालेलं राष्ट्र आपला अपमान करणाऱ्या राष्ट्रावर अंतर्बाह्य जळत राहतं आणि ह्या असह्य तळमळींतून उत्पन्न झालेल्या सूडाच्या भावनांतूनच फिरून दुसऱ्या युद्धाचा जन्म होत असतो. आज एक लढाई नुक्तीच संपली आहे. दुसरी

लढाई सुरू होण्यापूर्वी जितांनीं व जेत्यांनीं एकत्र येऊन 'विसरून जा व क्षमा करा' ह्या तत्त्वावर मानवीसमाजाची पुनर्घटना करणंच मानवतेच्या कल्याणाचं होणार आहे. एका राष्ट्रांतील निरनिराळ्या प्रांतांतील आर्थिक विषमता देवाणघेवाणीच्या तत्त्वावर जशी नाहींशी करितां येते त्याच तत्त्वावर पृथ्वीवरील राष्ट्राराष्ट्रांतील विषमता दूर करून समाज समतेच्या चौथऱ्यावर उभा करणं मानवी सामर्थ्याच्या कक्षेबाहेर खास नाहीं. ह्या नव्या विचारसरणीची मांडणी कुणीं करायची हाच प्रश्न आहे. जेते सामर्थ्याच्या धुंदीनं बेहोष झाले असल्यानं ही कल्पना मांडणं आज त्यांच्या मनांत देखील येणं शक्य नाहीं. जित राष्ट्रं तर अपमानाच्या इंगळ्यांनीं डसलीं गेल्यानं आत्मनाशाचा कडेलोट झाला तरी मानवतेच्या मैत्रीचा हात पुढं करण्याला धजणार नाहींत. अशा ह्या जित-जेत्यांच्या अटीतटींच्या सामन्यांत स्वयंपूर्णतावादाच्या संधिप्रकाशानं स्वातंत्र्याच्या दिशा उजळूं लागलेल्या आर्यावर्तांतील नेत्यांना ही सुवर्णसंधि साधण्याचा मान मिळण्याचा संभव आहे. सत्य आणि अहिंसेवर आधारलेल्या तत्त्वांनीं आज हिंदुस्थाननं यशाची पहिली पायरी गांठली आहे. प्रबळ साम्राज्याशीं असहकारितेनं झुंज देऊन मानवीमनाची उठावणी यशस्वी करितां येते ह्या नव्या विचारसरणीचं सामर्थ्य हिंदवासीयांच्या प्रत्ययाला आलेलं आहे. आपण उपयोगिलेल्या ह्या नव्या शास्त्राची शिकवण जगांतील दुर्बल व लहान राष्ट्रांना नवचैतन्य देऊं शकेल अशी आर्यावर्तांतील नेत्यांची खात्री आहे. आपली ही निःशस्त्र प्रतिकाराची विचारसरणी पुढं मांडतांना हिंदुस्थानला कमीपणा वाटण्याचं कारणच नाहीं. कारण ह्याच विचारसरणीच्या जोरावर हिंदुस्थानची मान आज जगांत उंचावली गेली आहे. आधिभौतिक उन्नतीवर आधारलेली पाश्चिमात्य राष्ट्रांतील सुधारणा आज कळसाला पोहोंचलेली असली तरी आपल्या विचारसरणीनं मानवीसमाज सुखी होईल किंवा नाहीं ह्याबद्दल जगांतील सारे आधिभौतिकवादी नेते साशंक आहेत. नव्या तेजोमय विचारसरणीचा धडाक्यानं प्रसार करण्याची हीच वेळ आहे.

पण वेळ आली असली तरी अद्याप काळ आलेला नाहीं असं नाइलाजानं म्हणावं लागतं. आर्यावर्तानं साऱ्या जगाला समाजहिताचे धडे आजे

असं आपण म्हणत असतांना, हिंदुस्थानांतील चाळीस कोटि समाजाला खरी हें तत्त्व पटलं आहे का असा प्रश्न साहजिकच उभा राहतो. राष्ट्रीय सरकारला इस्लामीयांचा उघड उघड विरोध. राष्ट्रीय सरकारच्या अधिकारग्रहणानं शेतकऱ्यांना व कामकऱ्यांना एकदम उठून* दिसेल असा कोणताच फायदा झाला नसल्यानं, ते सुद्धां ह्या सरकारवर नाखूषच आहेत. ह्या राष्ट्रीय सरकारचे दोष जनतेच्या नजरेपुढं प्रामुख्यानं आणण्याचं कार्य समाजवादी पुढारी करीतच आहेत. संपांच्या वावटळी इतक्या बेफामपणानं उसळल्या आहेत कीं, हिंदुस्थानची भावी पिढी निर्माण करणारे बालमनाचे नेते जे शिक्षक ते मजूरकिसानांप्रमाणं लालबावट्याच्या निशाणाखालीं येऊन सरकारला संपाची दटावणी देत आहेत. काँग्रेसच्या उमेदवारांना निवडून देण्यांत आपण काँग्रेसवर भयंकर उपकाराचं ओझं करून ठेवलं आहे अशा मानभावीपणानं सारे मतदार काँग्रेसकडं उपकारकर्त्यांच्या नजरेनं पहात मंत्रिमंडळावर अनिष्ट दडपण आणीत आहेत. माझ्या घरासमोरील मुतारी हलवा, माझी हेडमास्तरनीं केलेली बदली रद्द करा, माझ्या मुलीच्या नवऱ्याला धाकदपटशा दाखवून तिला परत नांदवून घ्यायला तिच्या नवऱ्याला भाग पाडा अशा तऱ्हेच्या निरुपयोगी अर्जांचीं भेंडोळीं आज राष्ट्रीय सरकारच्या मुख्य प्रधानांच्या पत्त्यावर पाठविलीं जात आहेत. आजवर परकी-सरकारच्या अमलाखालीं एका गांवांत, एका गल्लींत, गुण्यागोविंदानें नांदणारे शेजारी परस्परांच्या जिवावर उदार झाले आहेत. पंचवीस रुपये पगारापासून तों पंचवीसशे रुपये पगारापर्यंतचे सर्व नोकर एकमुखी पगारवाढीच्या मागणीनं राष्ट्रीय सरकारला बेजारून सोडताहेत. निवडून दिलेले आमदार आपली कार्यक्षमता सिद्ध करण्याकरितां नवे नवे कायदे पसार करून घेण्याची घिसाडघाई करताहेत. अशा हिंदवासीयांच्या स्वराज्याबद्दलच्या विचित्र विचारसरणींतून मानव्याच्या उत्क्रान्तीचे आदर्श पाठ निर्माण करण्याचा अट्टाहास करणं हास्यास्पदच होणार आहे. आजचा समाज मूळ मानवजातीपासून फार दूर गेलेला आहे. आजच्या मानवीसमाजांत मनाचं महत्त्व थोडं सुद्धां शिल्लक राहिलेलं नाहीं. इतकेंच नव्हे तर आजच्या समाजांतून शुद्ध मनाचं पूर्णतया उच्चाटनच

झालं आहे असं म्हटल्यास तें अतिशयोक्तीचं होणार नाहीं. वारा प्यालेल्या वासराप्रमाणं समाजमन मोकाट धावत सुटलं आहे. ऐहिक सुधारणांच्या दडपणाखालीं मानवीमनाचा कोंडमारा झाला आहे.

मानवीमनाच्या अशा ह्या निराश परिस्थितींत आजचं उद्दिष्ट जर खरोखरच आपल्याला साध्य करून घ्यायचं असेल तर आजची समाजमनाची घटना आमूलाग्र बदलली पाहिजे. एका पुरुषानं दोन अगर अधिक पत्न्यांचा संसार थाटावा, का एका स्त्रीनं द्रौपदीप्रमाणं पांच पतींची सेवा करावी; सावकारशाहीचं उच्चाटन करून कुळकायदा जारी करावा, का भांडवलशाहीचं सामर्थ्य वाढीला लावावं; साऱ्या कारखानदारांची मालमत्ता मजूरांत वाटून द्यावी, कां सारे कारखाने सरकारजमा करावे; गरीब रयतेवर नवे कर लादून सरकारी खजिन्यांची भर करावी, कां श्रीमंत भांडवलदारांचे पैसे सरकारी तिजोरींत भरावे; देशांत शांतता प्रस्थापित करण्याकरितां आपल्याच देशबांधवांना गोळीबाराची दहशत बसवावी, कां मोकाट सुटलेल्या समाजावरचीं सर्व बंधनं शिथिल करून समाजाला स्वैर स्वातंत्र्य द्यावं; ज्या भाषणमुद्रण-स्वातंत्र्याकरितां आजवर आपण परकी सत्तेशीं झुंजलों त्या स्वातंत्र्याची आपण मुस्कटदाबी करावी, कां भाषणमुद्रणावरील सारे निर्बंध दूर करून त्यांनीं सुचविलेले आजच्या सरकारांतील दोष दूर करण्याकडं त्यांच्या सूचनांचा उपयोग करावा; ह्या सर्व गोष्टींना आपल्या नेत्यांकडून जें अवास्तव महत्त्व दिलं जात आहे त्यापेक्षां समाजमनाचं सामर्थ्य वाढविण्याकडं नेत्यांनीं लक्ष पुरविलं तर आजच्या हिंदवीसमाजांतील सगळे पेचप्रसंग आपोआप सुटून जगाला स्वातंत्र्याचे, सुखाचे आणि विश्वबंधुत्वाचे पाठ देणारा तेजस्वी हिंदुस्थान अवघ्या दहा वर्षांत निर्माण होईल. देवीवर लस टोंचा, प्लेगप्रतिबंधाकरितां टोचून घ्या, जखमेवर मलमपट्टी बांधा, हिंवतापावर कोयनेलचा मारा करा, अशा तऱ्हेनं निरनिराळ्या रोगांवर निरनिराळ्या औषधांचा मारा करीत बसण्यापेक्षां ह्या साऱ्या रोगांचं आत्यंतिक टोंक जें मरण, त्या मरणावर अमृतासारखा एकच तालीम इलाज केल्यानं समाजांतील साऱ्या रोगांचं कायमचं उच्चाटन होईल.

ह्या अमृताचा सांठा बालमनांत आहे. ह्या बालमनाच्या कोऱ्याकरकरीत पाटीवर कोणत्याच रेघोट्या उमटलेल्या नसतात. ह्या शुद्ध बालमनावर प्राचीन आर्यसंस्कृतीचे पवित्र ठसे उमटविणं आजच्या राष्ट्रधुरीणांच्या हातीं आहे. समाजाला फक्त एकच विनंति करा, आम्हाला फक्त दहा वर्षांची मुदत द्या, ह्या दहा वर्षांत आम्हाला तुम्ही एका शब्दानंहि विचारूं नका. तुमच्या साऱ्या प्रश्नांचीं उत्तरं आम्ही तुम्हांला आमच्या ह्या दहा वर्षांच्या मुदतीनंतर खात्रीनं देऊं. आजवर कित्येक वर्षे आपणांतील दुहीनं आपण आपलीं मनं विटाळलेलीं आहेत. गुलामगिरीच्या शृंखलांनीं आपण गेलीं कित्येक वर्षे जखडलों गेलों. परकी सत्तेचं जडजोखड मानेवर वाहतां वाहतां आपणां सर्वांच्या मानांवर घट्टे पडलेले आहेत. इतकीं वर्षे ज्याप्रमाणं आपण दारिद्य, दुर्बलता, गुलामगिरी ह्यांचे असह्य तडाखे निमूटपणें सहन केले आहेत, त्याचप्रमाणं आणखी दहा वर्षं ह्या आपल्या स्वराज्यांत सुद्धां असे तडाखे सहन करावे लागत आहेत, असं कांहीं काल समजा. अद्याप आपण परकी सत्तेखालींच रखडतों आहोंत अशी आपली समजूत करून घ्या; पण आम्हांला फक्त दहा वर्षांची भिक्षा घाला. ह्या दहा वर्षांच्या मुदतींत आपल्या आर्यावर्ताचं आम्ही नंदनवन बनवूं शकलों नाहीं, तर तुम्ही सांगाल तें आम्ही ऐकूं अशी जनताजनार्दनाच्या चरणीं मागणी मागा आणि कामाला लागा. ह्या दहा वर्षांत वाटेल तितकं कर्ज काढा, उमाप पैसा खर्च करा, पण हिंदुस्थानांतील एकूण एक बालमन तयार करा.

ही बालमनाची उभारणी कशा तऱ्हेनं करायची याचा साकल्यानं विचार करण्यापूर्वी, आजचा विद्यार्थी कसा आहे, त्याला दिलं जाणारं शिक्षण कोणत्या दर्जाचं आहे, आजचा शिक्षक कोणत्या परिस्थितींत आहे ह्याचा संपूर्ण विचार करूनच ह्या बालमनाच्या उठावणीबाबत आपल्याला कोणत्या आदर्श संस्था कोणत्या धर्तीवर निर्माण कराव्या लागतील आणि अशा संस्थांतून बालमनं तयार झाल्यानंतर आपलं ध्येय कसं साध्य करितां येईल ह्याचा आराखडा आपण तयार करूं या. ह्या आराखड्याबरहुकूम कार्यक्रम आखून आपल्या आर्यावर्ताला आणि आर्यावर्ताबरोबरच अखिल जागतिक मानवजातीला सुखशांतीच्या अहेव चौथऱ्यावर बसविण्याचं ध्येय ठेवून कार्याला लागूं या.

# १२ : आजचा विद्यार्थी

वाघाला जोपर्यंत स्वतःमधील सुप्तशक्तीची जाणीव नसते तोपर्यंत तो गाईहूनहि गरीब असतो. त्याचप्रमाणं जोपर्यंत आर्यावर्तातील बालमनांची जागृति झालेली नाहीं, तोपर्यंतच आर्यावर्तातील सुप्त समाज आपल्या अचाट सामर्थ्याची फिरून जगाला जाणीव देऊं शकत नाहीं. एकदां कां ही सुप्तशक्ति जागृत झाली कीं ती आपल्या अलौकिक सामर्थ्यानं साऱ्या जगांतील मानवीसमाजाला अगदीं थोड्या कालांत आपल्या तेजानं दिपवून सोडील. वैदिक तत्त्वज्ञानानं सारा समाज परिपूर्ण सुखाच्या अत्युच्च शिखरावर नेऊन बसविला होता असं आपल्याला गतकालाच्या इतिहासावरून दिसून येतं. गौतमबुद्धाचं सामाजिक आंदोलन आपणा सर्वांच्या परिचयाचं आहे. शिवछत्रपतींनीं अवघ्या पंचवीस वर्षांत साऱ्या महाराष्ट्राला आत्मतेजाची जाणीव देऊन समाजांतील सुप्तशक्ति जागृत केल्याला उणींपुरीं तीन शतकंच लोटलीं आहेत. ह्या सगळ्या मानवीमनांच्या आंदोलनांचा अभ्यास करण्याचं कारण एवढंच कीं आम्हां हिंदवासीयांना उज्ज्वल मानसिक परंपरा आहे, वेदकालांतील शासनसंस्थेची तिला पूर्वपीठिका आहे; समतेनं, प्रेमानं नी व्यक्तिमत्व विसरून समाजमनाचा मोठेपणा निर्माण करण्याची शक्ति आहे. पाश्चात्य देशांतील समाज आपल्याला कितीहि तुच्छ लेखीत असला तरी आपली असामान्य परंपरा आपल्याला स्पष्ट बजावते आहे कीं, जें पाश्चात्यांजवळ नाहीं, जें पाश्चात्यांजवळ कधींहि सांपडणार नाहीं, कळसाला पोंचलेल्या पाश्चात्यांच्या आधिभौतिक सुधारणांना जें कधींहि आकलन करितां येणार नाहीं असं एक चिरंतन सत्तत्त्व आर्यावर्तांतील समाजांत परंपरागत वास करीत आहे. त्याच सत्तत्त्वाचा विजय होण्याचा काल अगदीं जवळ आलेला आहे.

साऱ्या पाश्चात्य राष्ट्रांतून आज बालमनाला जी शिकवण दिली जाते ती शिकवण स्वराष्ट्रीयांच्या सुस्थितीपुरतीच मर्यादित असते. ह्यामुळं साहजिकच एका राष्ट्रांतील बालमनांना दुसऱ्या राष्ट्रांतील बालमनांबद्दल

आदर वाटत नाहीं. आणि ह्यांतूनच राष्ट्राराष्ट्रांतील श्रेष्ठकनिष्ठभाव, अहमहमिका, अनादर वगैरे विघातक भावनांना चालना दिली जाते. अशा तऱ्हेचे जे आघात बालमनांवर केले जातात, त्या आघातांमुळं आपापसांत सुद्धां ह्या भावनांचा नकळत फैलाव होत असतो. जी स्थिति पाश्चात्य बालमनांची तीच किंवा त्याहूनहि अधिक संकुचित स्थिति आर्यावर्तातील बालमनांची झालेली आहे.

आज हिंदुस्थानांतील विद्यार्थ्यांचे शहरी विद्यार्थी व खेडेगांवी विद्यार्थी असे मुख्यतः दोन भाग पडतात. हिंदुस्थानांतील बहुसंख्य विद्यार्थी खेडेगांवांतूनच रहात असल्यानं ह्याच विद्यार्थ्यांचा प्रथमतः विचार करणं क्रमप्राप्त आहे. ह्या खेड्यांतील बालमनांची चोहोकडून आबाळ झालेली आहे. ओसाड नी झोंपडीवजा घर, पाऊल बुडेल इतकी धूळ असलेले किंवा पावलागणिक ठेंचा लागतील असे गोटे असलेले खाचखळग्यांचे रस्ते, घराघराच्या कोपऱ्याकोपऱ्यावर खतवजा केर साचलेला, गांवांत थोडीशी बरी दिसणारी इमारत म्हणजे देशमुख नाहीं तर देशपांडे ह्यांचा पुराणवस्तुसंशोधनांत जमा झालेला चोहोंबाजूंनीं तटबंदी असलेला पडीक वाडा, नाहींतर पाटीलकुलकर्ण्यांची चावडी. पाटील हा खेड्याचा राजा, कुलकर्णी किंवा तलाटी हा त्याचा प्रधान, आणि सावकार हा खेड्याचा भांडवलवाला. ह्या तीन व्यक्ती सर्वसाधारण खेड्यांतील बालमनांच्या पुढं आदर्श म्हणून उभ्या रहातात. आजच्या खेड्यांतील पाटील, कुलकर्ण्यांच्या वाईटावर असतो; कुलकर्णी, पाटलाच्या वाईटावर असतो; आणि दोघं मिळून गरीब रयतेवर जुलूम करायला टपलेले असतात. पाटील येणाऱ्याजाणाऱ्याची कुचेष्टा करीत चावडींत बसलेला असतो, तर कुलकर्णी 'क' 'ड' पत्रकाचे उतारे काढतां काढतां कोणत्या कुळाला दम द्यायचा ह्याचा विचार करीत असतो. राम्याला शिव्या दे, सोम्याला दम दे, गोम्याचा काटा काढ अशा नसत्या उठाठेवी करीत करीत साऱ्या गांवाची गांजणूक करायला दोघांची हयात पुरी पडत नाहीं. खेड्यांतील कोणत्याहि खेडुताशीं बोलतांना प्रथम दहापांच इरसाल शिव्या हसडल्याशिवाय ही खेडेगांवांतली जुलूम रयतेशीं बोलायला तयारच होत नाहीं. आपल्या गांवांत दुफळी

असल्याशिवाय ह्यांना चैनच पडत नाहीं. आपापसांत भांडणं लागणं, कोर्टकचेऱ्यांतून फिर्यादी होणं, खून पडणं अशा तऱ्हेच्या कलागतींच्या गांवांतील बहुतेक कारवाया ह्यांच्याच असतात.

गांवांतील बालगोपाल आपल्या गांवच्या ह्या अधिकाऱ्यांच्याकडं मोठ्या आदरानं पहात असतात. ह्या बालगोपालांच्या देखत गांवांतील लोक चावडीवर बसून अचकट विचकट चकाट्या पिटीत असतात. पाटलांच्या तोंडच्या शिव्या साऱ्यांच्याच नित्यपरिचयाच्या असतात. चावडींत बसून पाटील एखाद्या गावगंगेची टवाळी करीत असतांना हे अजाण बाळगोपाळ केवळ पाटलांना खूष करण्याकरितां त्या टवाळींत भाग घेत असतात. मानव हा मुख्यतः अनुकरणशील प्राणि असल्यानं मोठ्यांचं अनुकरण करण्याचा ह्या लहान मनांना मोह झाल्यास तें निसर्गाला धरूनच आहे.

खेड्यांत राहणारा समाज आपापसांत भांडून कोर्टकचेऱ्यांची धन करतो आहे. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा बेहद्द वाढला आहे. धरतीमातेचे भाऊबंदकीमुळं बारीक बारीक तुकडे पडल्यानं दारिद्र्याचा कहर उसळला आहे. चहा, चंची, चिलीम, अस्तुरी नी दारू इत्यादि व्यसनांनीं खेडेगांवी समाजाची धूळदाण झाली आहे. दारिद्र्यानं गांजलेला खेडुत ताडीच्या अमलांत घरीं येऊन रोज तमाशा करीत असतो. बायकोच्या मंगळसूत्राला हात घालणं, मुलाबाळांना बेहद्द पिटून काढणं, शेजाऱ्यापाजाऱ्यांचा बेसुमार उद्धार करणं ह्या गोष्टी नित्याच्याच झालेल्या आहेत. अशा परिस्थितींत बालमनाला आपल्या मातापित्यांबद्दल किती आदर वाटत असेल बरं ! घर गहाण, शेत गहाण, जवळचं किडूक मिडूक सुद्धां सावकाराच्या तिजोरींत अशी शेंकडा नव्वद खेडुतांची परिस्थिति असते. कर्ज काढून पोराबाळांना बाशिंग बांधणं हा रोजचा व्यवहारच होऊन बसला आहे. मुलाच्या लग्नांत गांवजेवण दिल्यानं, त्या कर्जांत घरादाराला मुकावं लागल्यानं तोच मुलगा अन्नाला मोताद झाल्याचीं कित्येक उदाहरणं खेडुतांच्या इतिहासांत सांपडतात.

फिरत्या नजरेच्या परस्त्रीवर फिदा होऊन आपल्या कारभारणीचा पाणउतारा करणं, तिला मारणं, तिला घराबाहेर घालवणं हे सारे अनिष्ट

प्रकार कालमानाप्रमाणेच चाललेले असतात. वर्षातून जेमतेम चार तीन महिने शेतांत काम करायचं आणि वर्षांतील राहिलेले दिवस बेजबाबदार वागणुकींत घालवायचे हा तर साऱ्याच खेडुतांचा आजकालचा शिरस्ता आहे. दुसऱ्याच्या शेतांत आपलीं जनावरं घालणं, दुसऱ्याच्या गंजींतून वैरण चोरणं, इतरांच्या चुगल्या करून पाटलांचे कान भरणं हाच खेडुतांचा नेहमींचा कार्यक्रम असतो. कांहीं खेडूत जसे पट्टीचे बिलंदर असतात त्याप्रमाणं कांहीं अतिशयच साधे असतात. अशा भोळसट शेतकऱ्यांना पावलोपावलीं फसवून त्यांच्याच जिवावर गबर होऊन पुन्हां त्यांचेच धन्यवाद घेणारे गोडबोले सावकार खेड्यांतून कित्येक असतात. जगांतून मांडवलशाहीचं उच्चाटन करण्याचे आजवर जितके प्रयत्न झाले त्यांहूनहि अधिक प्रयत्न ह्या खेडेगावांतल्या सावकारशाही-विरुद्ध झाले आहेत. सरकारनं शेतकऱ्यांना कर्जे देऊं केलीं, खेड्या-खेड्यांतून पतपेढ्या काढल्या, सावकारी व्याजापेक्षां कमी व्याजानं कुळांना पैसे देऊं केले पण ही खेड्यांतील मांडवलशाही नष्ट होण्या-ऐवजीं अधिकच वाढीला लागली आहे.

साऱ्या खेड्याचा सावकार हा मायबाप असतो. केव्हांहि सावकारा-कडून पैसे उसने घ्यावे आणि व्याजासुद्धां त्या पैशाची फेड करून दुसरं कर्ज उभारावं. असं करितां करितां घरादारासुद्धां सारी मालमत्ता साव-काराच्या घरांत घालून आपल्या एके काळच्या मालकीच्या जमिनीवर सावकाराचं कुळ म्हणून काम करणारे कैक शेतकरी आहेत. ह्या खेड्यां-तील सावकाराला कशाचीच दधात नसते. त्या त्या खेड्यापुरता हा लोकशाहींतला राजा असल्यासारखा असतो. महिन्याच्या महिन्याला गांवच्या सावकाराला भेटणं, त्याच्याबरोबर दहा पांच मिनिटं इकडच्या तिकडच्या गप्पा मारणं, आपल्या शेतांतील मालाच्या लहानमोठ्या भेटी सावकाराला देणं, हें खेडुताचं भूषण मानलं जातं. ह्या सावकाराला गांवांत जवळजवळ कसलाच खर्च नसतो. धान्य, भाजीपाला, दूधदुभतं, कापड-चोपड, सगळं कांहीं भागून दरसाल रोख व्याजाच्या रकमा सावकाराच्या तिजोरींत बेमालूम जमा होत असतात. ह्या मांडवलशाहीला टक्कर देत, गांवच्या अधिकाऱ्यांना टक्कर देत, आपला दमदार शेतकरी समाजाला

आपल्या निढळाच्या घामानं आज पिढ्यानुपिढ्या अन्नधान्य पुरवीत आला आहे.

ह्याच चाकोरींत लहान पिढ्या वयांत येतात, वयांत आलेल्या पिढ्या म्हाताऱ्या होतात आणि म्हाताऱ्या पिढ्या नामशेष होतात. खेडुतांच्या-प्रमाणंच त्यांच्या मुलाबाळांची स्थितीहि केविलवाणी असते. अन्न आहे तर वस्त्र नाहीं, वस्त्र आहे तर शिक्षण नाहीं. वेशीबाहेर पडक्या देवळांत ठाण मांडून बसलेल्या मारुतीची तर आठवणहि नाहीं. चावडीपुढं गोट्या खेळत खेळत एकमेकांशीं भांडतांना खूप शिवीगाळ करावी, गुरं घेऊन रानांत जावं, बापाला शेतावर शिदोरी नेऊन द्यावी, विहिरींत मनमुराद डुंबावं, संध्याकाळीं घरीं परत यावं, वेळ पडल्यास आईबापांच्या हातचा मार खावा, रडावं ओरडावं, पुन्हां दुसऱ्या दिवशीं तोच कार्यक्रम चालू ठेवावा. ह्या खेड्यांतल्या मुलांना मनं आहेत किंवा नाहींत ह्याची सुद्धां शंका येते. मुलांनीं शाळेंत चार अक्षरं शिकावीं असं प्रत्येक शेतकऱ्याला वाटत असतं पण आपण शाळेंत जाऊन शिकावं असं एकाहि मुलाला वाटत नाहीं. शाळा म्हणजे एक कैदखाना आहे, असंच प्रत्येक मुलाला वाटत असतं. मास्तर म्हणजे एक राक्षस आणि त्या राक्षसाच्या ताब्यांतून केव्हां एकदां आपली सुटका होईल ह्याची प्रत्येक विद्यार्थी वाट पहात असतो. त्याला शाळेचं वातावरण असह्य होतं. तो मास्तरांचा खडबडीत आवाज, ती मास्तरांच्या हातांतील छडी, शाळेला न येण्या-बद्दल मुलांची होणारी उचलबांगडी, खोडाबेडीसारख्या होणाऱ्या असह्य शिक्षा, कधींहि ज्याच्याबद्दल आपलेपणा वाटणं शक्य नाहीं असं तें शिक्षण, ह्यान्याच गोष्टी बिचाऱ्या बालमनाला असह्य झालेल्या असतात. प्राण गेला तरी शाळेंत जाऊं नये अशी खूणगांठ प्रत्येक विद्यार्थी आपल्या मनाशीं बांधीत असला पाहिजे. विद्यार्थी म्हणजे एक गुन्हेगार आणि शिक्षक म्हणजे शाळेच्या वेळांत आपल्यावर अम्मल गाजविणारा यमधर्म अशी जियं शिक्षक व विद्यार्थी ह्यांच्यामधील परस्पर भावना असते तिथं शिक्षकांबद्दल विद्यार्थ्यांना आदर, अभिमान नी आपलेपणा वाटावा कसा?

शाळेच्या वेळांत कर्दनकाळ भासणारा हाच शिक्षक इतर वेळीं गांवच्या पाटीलकुळकर्ण्यांपुढं, गांवच्या सावकारापुढं, गांवच्या पुढाऱ्यांपुढं लांगूल-

घोलून करीत त्यांची थुंकी झेलत असलेला पाहून त्या शिक्षकाबद्दल विद्यार्थ्यांच्या मनांत पूज्यभाव उत्पन्न होण्याऐवजीं तुच्छभाव मात्र निर्माण होत असतो. लालघोडीवर स्वार होऊन आपल्या मळीकडून चावडींत येणारा रुबाबदार पाटील त्यांना आदर्श वाटतो. ज्याला गांवांतील सारे शेतकरी नी बलुतेदार लवून नमस्कार करितात त्या कुलकर्ण्याबद्दल त्यांना अभिमान वाटतो. गांवचा सावकार तर त्यांना प्रतिपरमेश्वर वाटतो. आखाड्यांत तालीम करून, तांबड्या मातीनं लाल झालेला मुंडेछाट सदरा घालून, आपल्या गळ्यांतील काळ्या गंड्याचं प्रदर्शन करीत बेगुमानपणें झुलत जाणाऱ्या तयार पेहेलवानासारखं आपण व्हावं असं त्याला वाटत असतं. तालुक्याच्या गांवाहून येणाऱ्या पोलिसाची ऐट पाहून त्याच्या अधिकाराबद्दल बालमनाला हेवा वाटतो. पण शिक्षकाबद्दल, शाळेबद्दल, शाळेंत मिळणाऱ्या शिक्षणाबद्दल मात्र त्याला बिलकुल आपलेपणा वाटत नाहीं. शिक्षण हें, आयुष्यांतील एक अनावश्यक, लहान मुलांच्या गळ्यांत जुलमानं अडकवलेलं लोढणं आहे अशीच विद्यार्थ्यांची समजूत असते. 'क' कमळाचा नी 'म' मगरीचा शिकून उपयोग काय ह्याचा बालमनं विचार करीत असतात. शेत नांगरणं, कुळवणं, बी पेरणं, पिकं राखणं, कापणी करणं, मळणी करणं, कडब्याच्या गंजी रचणं, गाई-म्हशींच्या धारा काढणं, ह्या सर्व नित्याच्या व्यवहारांत ह्या कमळाचा नी मगरीचा कुठंच उपयोग होत नसतांना, आपल्याकडून ह्या अनावश्यक गोष्टींचीं कंटाळवाणीं पारायणं करून घेणाऱ्या शाळांचा त्यांना मनापासून तिटकारा वाटत असतो. अशा ह्या ध्येयशून्य शाळा हजारों, नाहीं लाखों जरी निर्माण होत राहिल्या तरी शाळांतून मिळणाऱ्या शिक्षणाची आपल्या रोजच्या व्यवहाराशीं विद्यार्थ्यांना जोपर्यंत सांगड घालतां येत नाहीं तोपर्यंत प्रत्येक खेड्यांत शाळा असली काय नी नसली काय एकच.

एक अत्यंत बुद्धिवान विद्यार्थी होता. गणित विषयांत त्याची बुद्धि असामान्य होती. इतिहास, भूगोल, सृष्टिशास्त्र, मातृभाषा, सान्या विषयांत त्याची तैलबुद्धि अलौकिक प्रगति दाखवीत असे. प्रत्येक विषयांत शेकडा नव्वद टक्क्याच्या वर हटकून गुण मिळविणारा हा विद्यार्थी संस्कृत भाषेंत मात्र कच्चा होता. प्रत्येक परीक्षेंत ह्या विद्यार्थ्याला

संस्कृत विषयांत मात्र शून्य मार्क मिळे. त्याला लेख लिहिण्याचा नाद असे. आपण मोठा कादंबरीकार व्हावं, सुप्रसिद्ध नाटककार व्हावं, प्रतिभावान लेखक व्हावं असं त्याला सतत वाटत असे. तो उत्कृष्ट लेख लिहीत असे. एका कादंबरीचीं एकदोन प्रकरणं लिहून त्यानं तीं आपल्या गुरुजींना दाखविलीं. त्यानं लिहिलेलीं तीं प्रकरणं वाचून त्याच्या गुरुजींनासुद्धां त्याच्या लेखनशैलीबद्दल अचंबा वाटला. त्यांनीं त्या विद्यार्थ्याला बोलावून घेतलं नी त्याला विचारलं, 'बाळ, तुझं संस्कृतचं वाचन काय काय झालं आहे?' त्या विद्यार्थ्यानं खालच्या मानेनंच उत्तर दिलं, 'गुरुजी मला संस्कृत मुळींच येत नाहीं हें तुम्हांला माहीत असून सुद्धां तुम्ही मला असं कां बरं विचारतां?' 'अरे खरंच. मी अगदींच विसरलों. पण बाळ, तुझीं हीं प्रकरणं वाचून प्राचीन संस्कृत लेखकांची आठवण झाली. तुझी लेखनशैली अगदीं कविकुलगुरु कालिदासासारखी प्रतिभासंपन्न आहे. कालिदासानं संस्कृत वाङ्मयांत क्रान्ति करून सोडलेली आहे.' तो मुलगा तीं प्रकरणं घेऊन गेला आणि आश्चर्य हें कीं त्या दिवसापासून त्यानं संस्कृत भाषेचा अभ्यास केला, आणि अवघ्या दोन तीन महिन्यांच्या प्रयत्नानं त्यानं संस्कृत भाषेवर इतकं प्रभुत्व मिळवलं कीं इतर सर्व विषयांप्रमाणं संस्कृतांतसुद्धां त्याला नव्वद टक्क्यावर मार्क मिळू लागले. जोपर्यंत त्या विद्यार्थ्याला संस्कृत भाषेची जरुरी वाटत नव्हती तोपर्यंत त्याला संस्कृत भाषेबद्दल तिटकारा वाटत होता. तो शून्य मार्क मिळवीत होता. पण संस्कृत भाषेची आपल्या ध्येयाला जरुरी आहे असं पटतांच त्यानं त्याच संस्कृत भाषेवर अवघ्या दोन महिन्यांच्या अवधींत प्रभुत्व मिळविलं.

कोणत्याहि ध्येयनिष्ठेचं असंच आहे. शिक्षणाचं ध्येय जोपर्यंत निश्चित नाहीं, तोपर्यंत बालमनामध्यें ध्येयनिर्मिति होणंच शक्य नाहीं. पण शिक्षणाची जरुरी आहे, शिक्षणापुढं ध्येय आहे, अशी बालमनाची खात्री झाल्यावर छडी, खोडाबेडी, उपासमार कोणत्याहि गोष्टींना तोंड देण्याची बालमनाची तयारी होऊ शकते. कॉंग्रेसपुढं स्वराज्याचं ध्येय होतं म्हणून कॉंग्रेसमधील निष्ठावान पुढारी अनन्यसाधारण त्यागाला तयार झाले. महिना लाखो रुपये मिळविणारे, परांच्या गाद्यागिरद्यांवर लोळणारे श्रीमं-

पती यांच्या सुखसंपत्तीवर लाथ मारून ध्येयाकरितां आमरण कारावास पत्करायला तयार झाले. क्रान्तीचं ध्येय डोळ्यांपुढं असलेल्या क्रांतिकारकांनी वाटेल ते अनन्वित पोलिस अत्याचार सहन करून ध्येयावर नजर ठेवून अखेर हंसतमुखानं प्राणावर पाणी सोडलं.

ध्येयाचा महिमा हा असा अगाध आणि अगम्य आहे. ह्याच खेडे-गांवांतील विद्यार्थ्यांच्यापुढं हिंदुपदपातशाहीचा ध्येयतारा ठेविला गेला त्यावेळीं महाराष्ट्रधर्माची उठावणी झाली. इस्लामीधर्मप्रसाराचं ध्येय इस्लामी यांच्या नजरेपुढं ठेविलं गेलं त्याचवेळीं एका हातीं तलवार नी एका हातीं कुराण घेऊन अखिल इस्लामजात प्राणांच्या आहुती द्यायलीं तयार झाली. आपल्या पराजित आणि अपमानित राष्ट्राचा गेलेला मान परत मिळवून देण्याच्या हिटलरच्या आश्वासनावर सारी जर्मन जनता एकमुखानं 'हेर हिटलेर' असा प्रचंड जयघोष करीत आपल्या सर्व-स्वाची होळी करायला तयार झाली. पण नजरेपुढं ध्येयसूर्याची चमक नसल्यामुळं साक्षरतेचा प्रचंड आरडाओरडा करून सुद्धां आज हिंदु-स्थानांत शेंकडा नव्वद टक्के मानवीजात निरक्षरच राहिली आहे. सक्तीच्या शिक्षणाचं निशाण गांवोगांवीं आणि गल्लोगल्लीं जरी आपण फडकवीत राहिलों तरी शाळांच्या इमारतींत विद्यार्थ्यांची हजेरी दाख-वितांना शिक्षकांना असत्याचाच अवलंब करावा लागेल.

आज शहरांतून नी खेडेगांवांतून कॉंग्रेस, लीग, महात्मा गांधी, कायदेआझम जीना ह्यांची माहिती सर्व आबालवृद्धांना आहे. मतं देतांना कॉंग्रेसच्या उमेदवारांनाच मतं देणं जरूर आहे असं सर्वांनाच वाटतं. पण ज्या कॉंग्रेसला मत द्यायचं त्या कॉंग्रेसचीं तत्त्वं आचरणांत आण-ण्याचा आपण कसोशीनं प्रयत्न केला पाहिजे हें तत्त्व पटलं असलं तरी तें आचरणांत आणणं मात्र अद्याप शक्य झालेलं नाहीं. तेवढ्याचकरितां बालमनाची जोपासना करणं जरूर आहे. कॉंग्रेसचीं तत्त्वं एकदां समाज-मनाच्या हृदयाशीं जाऊन भिडलीं कीं मग प्रत्येकाला मानवीसमाजाच्या उत्कर्षाखेरीज कोणतीच गोष्ट दिसणार नाहीं. खेड्यापाड्यांतून कॉंग्रेसचं लोण पोचलेलं असलं तरी आपापसांतील भेद नाहींसे झालेले नाहींत. ब्राह्मणा-विरुद्ध मराठ्यांचा दावा आहे; लिंगायत मराठ्यांना विरोध करितात;

आणि सारे त्रैवर्णिक हरिजनांना पाण्यांत पहातात. ह्या जातिभेदाचं खेड्यांतील वर्चस्व अद्याप बिलकुल कमी झालेलं नाहीं. हे भेद मूळ जन्मावर आधारलेले नसून माणसाच्या कर्तबगारीवर आधारलेले आहेत ही गोष्ट बालमनाला पटवून देऊन जातीजातींतील मतभेद गाडून टाकण्याची सार्वत्रिक विचारसरणी समाजांत फैलावल्याशिवाय आपलं ध्येय साधणं अशक्य होणार आहे.

शहरी विद्यार्थ्यांची संख्या कमी असली तरी शहरी वातावरणाचे त्यांच्यावर होणारे परिणाम अधिकच भेसुर आहेत. शहरांतील प्राथमिक शाळांतील विद्यार्थी घ्या, दुय्यम शाळांतील विद्यार्थी घ्या, नाहींतर कॉलेजांतला प्रौढ विद्यार्थी घ्या, सर्वांचीच विचारसरणी बेजबाबदार झाली आहे. शहरी प्रौढसमाजांतील जीवनकलह अतिशय तीव्र झाला आहे. रोजच्या कौटुंबिक खर्चाची तोंडमिळवणी करितां करितां प्रत्येकाच्या नाकीं नऊ येऊं लागले आहेत. अधिकांत अधिक लोकांचे खिसे कसे कातरतां येतील ह्या विचारांत चोवीस तास गढून गेलेल्या भांडवलवाल्याला बालमनाची आठवणच होत नाहीं. अधिकारी वर्ग सदासर्वदा आपल्याच तोऱ्यांत असतो. अशा ह्या भयाण अवस्थेंत बालमनांची काळजी कोणालाच नाहीं. आपल्या मुलांना आपण शाळेंत पाठवितो हीच साऱ्या प्रौढांना समाधानाची जागा आहे. ज्याप्रमाणं आपल्या कुटुंबांतील एकादी व्यक्ति आजारी पडली असतांना तिला डॉक्टरच्या हवालीं करण्यापलीकडं आपलं कांहींच कर्तव्य रहात नाहीं असं घरांतील कर्त्यांना वाटत असतं. त्याचप्रमाणं मुलं शाळेंत राजरोसपणं घातलीं आणि महिन्याच्या महिन्याला त्यांची फी दिली म्हणजे त्यांच्या बाबतींतील आपलं कर्तव्यकर्म संपलं असंच प्रत्येकाला वाटतं.

शहरांतील वातावरण आज इतकं गढूळलेलं आहे कीं जिकडं पहावं तिकडं समाजांत खांचखळगेच दिसताहेत. समाजाला आडमार्गाला नेणारीं सारीं साधनं आज शहरांतून सज्ज आहेत. रस्तोरस्तीं थाटलेलीं चहाफराळाचीं दुकानं समाजाला आपल्याकडं खेचण्याचा प्रयत्न करताहेत. सिनेमाचीं व नाटकाचीं थिएटरं समाजाला आपल्याकडं ओढताहेत. रस्तोरस्तीं दुकानांतल्या पोषाखाच्या वस्तू, वासाचीं तेलं, स्नो, पावडरी,

सिनेमा, गंगावनं, त्यांना अनैसर्गिक सौंदर्योपासनेचं आमिष दाखवताहेत. मोटरी, ट्रॅम्स, बसेस समाजाच्या सुखसोयीकरितां इतस्ततः धावताहेत. धूम्रपानसाहित्याचीं दुकानं, समोर निरनिराळे आरसे नी निरनिराळ्या नटनटींचे फोटो लटकावून समाजाला व्यसनाधीन करण्याच्या प्रयत्नांत आहेत. गल्लोगल्लीं असलेले दारूगुत्ते समाजाला धुंद करताहेत. सरकारी परवाने काढून सुसज्ज माडयांवर गॅलरींत उभ्या राहून नायकिणी आपल्या देहाचा सवाल पुकारताहेत. वकील लोक आपण मिळविलेल्या कायदेबाजीच्या सनदांच्या जोरावर समाजांतील कज्जेदलालीला प्रोत्साहन देताहेत. समाजस्वास्थ्य, अनंगरंग, कामसूत्र वगैरेसारख्या उद्दीपक पुस्तकांचा चोरटा प्रसार वाचनालयांच्या मार्फत होतोच आहे. अशा ह्या भयाण वातावरणांत आजचा शहरांतला विद्यार्थी वावरतो आहे. विश्वामित्रासारखा तपस्वी मेनकेच्या सौंदर्यानं घायाळ झाला. शुक्राचार्यासारखा संजीवनी विद्येचा प्रणेता मद्याच्या मोहानं वाया गेला. तिथं आजकालचीं बालमनं ह्या आसुरी आकर्षणांपुढं किती वेळ टिकाव धरणार?

शिवाय ह्या साऱ्या बालमनांवर आज कोणाचंच नियंत्रण, बंधन, अगर धाक राहिलेला नाहीं. लहानपणीं जे बाळ मातेच्या पंखाखालीं निर्भय नी शुद्ध वातावरणांत आनंदानं बागडायला पाहिजेत त्यांना आजच्या समाजांत मातेचा निवारा नी शिकवण पारखीं झालीं आहेत. अगदीं दारिद्र्यावस्थेंत असलेल्या तळच्या समाजांतील मातापित्यांना आणि त्यांच्याच बरोबर दहापंधरा वर्षांपर्यंतच्या वडील मुलांमुलींना रोजचा जीवनसंग्राम लढविण्याकरितां सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत काबाडकष्ट करावे लागताहेत. गिरणींतील मजूर सकाळीं उठतांच गिरणीकडं धांवत सुटताहेत. रोजची मोलमजुरी करून पोट भरणारे कामकरी मजूर—मैदानावर कामाची वाट पहात तिष्ठत राहण्याकरितां घरांतून बाहेर पडताहेत. नऊ साडेनऊला आपापल्या कचेऱ्यांतून हजर राहण्याकरितां मध्यमवर्गीय नोकरांना वेळेवर चार घास मिळावे म्हणून त्यांच्या बायका पहांटे उठल्यापासून जिवाची धावपळ करीत अन्नपूर्णादेवीची आराधना करताहेत, आणि पुरुष संसाराच्या रोजच्या विवंचना भागविण्याकरितां, अगर राहिलेलं कचेरींतील काम पुरं करण्याकरितां जिवाची धावपळ करताहेत.

भांडवलवाल्यांना पैशाखेरीज जगांत दुसरं कांहींच दिसत नसल्यानं मागला पुढला विचार न करितां ते आपापल्या दुकानाकडं, कारखान्यांकडं अगर गिरण्यांकडं धाव घेताहेत आणि त्यांच्या बायका आपापल्या श्रीमंतीच्या तोऱ्यांत, आपल्या स्वतःच्या व्यक्तिनिष्ठेंत, अगर सौंदर्योपासनेंत गुंतून पडल्यानं बालजीवांच्या आपल्या कर्तव्याकडं बेगुमानपणानं डोळेझाक करताहेत. खालच्या दर्जाच्या मोलमजुरांना पोटाची विवंचना म्हणून, मध्यमवर्गीय नोकरवर्गाला नोकरीची ओढ म्हणून आणि सधन शेठसावकारांना धनाची अनिवार हांव म्हणून सारा समाज आज बालमनांकडं दुर्लक्ष करतो आहे. अशा तऱ्हेनं आबाळ होत असलेल्या बालमनांनीं आज कुणाच्या तोंडाकडं पहावं ! आई शिव्या हासडते आहे, बाप चौदावं रत्न दाखवतो आहे आणि इतर समाज उदासीनतेंत वावरतो आहे अशा बेफिकीर वातावरणांत बालमनांची कुतरओढ होत असल्यास नवल नाहीं. आईचे ममतेचे शब्द, बापाचा निवांत आसरा नी समाजाचं हार्दिक प्रोत्साहन ह्यांच्या अभावीं आईबाप जिवंत असून सुद्धां सारीं बालमनं पोरकीं नी बापुडवाणीं झालीं आहेत.

'आई' ह्या एका प्रेमळ हाकेंत जगांतील परमोच्च सुखं सामावलेलीं आहेत. पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याहि जातींतील, कोणत्याहि धर्मांतील, कोणत्याहि परिस्थितींतील मानवजात आईच्या ठिकाणीं विलीन होते इतका आईचा महिमा मोठा आहे. आई आपल्या शरीरांतील रक्ताचा थेंबन्‌थेंब देऊन नऊ महिने मुलाचा गर्भपिंड पोसते. असह्य आणि प्राणांतिक प्रसववेदना सहन करून अपत्याला जन्म देते. मूल जन्मल्यानंतर सुद्धां तें मूल कार्यक्षम होईपर्यंत आपण खाल्लेल्या अन्नाचं, आपल्या शरीरांतील रक्तामांसाचं दूध बनवून त्या दुधावर त्या अपत्याची जोपासना करते. आपल्याच रक्तामांसाच्या ह्या पुतळ्याच्या रक्षणाकरितां ती आपल्या सर्वस्वाचा त्याग करायला तयार असते. आपल्या अपत्याला बोलायला शिकविणं, त्याला चालायला शिकविणं, त्याला खायप्यायला शिकविणं, साऱ्या साऱ्या गोष्टी ही माता निःस्वार्थीपणानं आपल्या गोजिरवाण्या बालकासंबंधींच्या आंतरिक प्रेमानं अष्टौप्रहर फळाची आशा न धरितां

करीत असते. पण आजकालच्या ह्या यंत्रयुगांत माता सुद्धां यंत्रच बनूं लागल्या आहेत. खालच्या वर्गांतील माता जीवनकलहाकरितां, मध्यमवर्गीय माता आपल्या पतिदेवाच्या सुखस्वास्थ्याकरितां आणि उच्चवर्गीय माता आपल्या मोठेपणाचा दिमाख दाखविण्याकरितां आपल्या बालकांना उघड्या डोळ्यांनीं मोलकरणींच्या, गडीमाणसांच्या आणि दायांच्या स्वाधीन करीत असतात. त्यामुळं हे बाळगोपाळ आईच्या प्रेमाच्या अवलीला, तिच्या अनुकाराला, तिच्या अमृततुल्य उपदेशाला पारखे झालेले असतात. आजकाल मुलं आईचं ऐकत नाहींत, तिला उलट उत्तरं देतात, तिच्याबद्दल त्यांना आदर नसतो अशी ओरड ऐकूं येते याचं एकच एक कारण म्हणजे मुलांना आईत आईपणा दिसेनासा झाला आहे.

आईबापांनंतरचा मुलांचा आधार म्हणजे त्यांचा शिक्षक. विद्यार्थी प्रथम शाळेंत पाऊल टाकतो त्या वेळीं त्याचं मन आपल्या शिक्षकांबद्दल आदर, भीति व नवीनपणा ह्या भावनांनीं भारून गेल्यामुळं पहिले कांहीं दिवस तो शाळेच्या आवारांतील गोष्टींकडं नुसता अभ्यासू वृत्तीनं पहातच राहतो. पण शाळेंतील आपल्या गुरुजींच्या स्थानाबद्दल जसजसा त्याच्या मनांत प्रकाश पडत जातो तसतसा त्याचा गुरुजींच्याबद्दलचा आदर कमी कमी होत जातो. मुख्याध्यापक ही व्यक्ति आपल्या गुरुजीपेक्षां श्रेष्ठ आहे आणि आपले गुरुजी ह्या व्यक्तीला भीत असतात हें त्याच्या रोज प्रत्ययाला येऊं लागतं. विद्यार्थ्यांविद्यार्थ्यांमध्यें श्रीमंत विद्यार्थ्याबद्दल पक्षपात करणारा हा शिक्षक त्याच्या मनांतून उतरतो. गरिबीनं गांजलेल्या, पैशाला हपापलेल्या, नोकरीकरितां गुलामीवृत्ति पत्करलेल्या ह्या शिक्षकाकडं तो तुच्छतेनं पाहूं लागतो. आपल्याला ज्ञान देणारे गुरुजी आपल्याला जे निरनिराळे विषय शिकवितात ते विषय आपण कशाकरितां शिकायचे ह्याचा थांगपत्ताच न लागल्यानं ह्या शाळांतील अभ्यासक्रमाबद्दल तो मनानं निरुत्साही असतो. गुरुजींचा तो कर्णकटु आवाज, ती करडी नजर, नेमून दिलेला अभ्यास न केल्याबद्दल आपल्याला गुरुजींकडून होत असलेली शिक्षा, ह्यामुळं त्याच्या मनांत शिक्षकाबद्दल आणि शाळेबद्दलची भीति उत्पन्न होते त्यामुळं ह्या शाळेपासून कुठं तरी दूर निघून जावं

असं त्याला सतत वाटत असतं. शाळेतील शिस्त अंतःस्फूर्त नसल्यानं त्या शिस्तीविरुद्ध बंड पुकारायला तो सदासर्वदा एका पायावर तयार असतो. वास्तविक मुलांनीं शाळेकडं धाव घ्यावी, त्यांच्या जिज्ञासू बालमनांना शाळेची ओढ लागावी, घरच्या वातावरणापेक्षां शालेय वातावरणांत त्यांना अधिक आनंद व्हावा ह्याच्याऐवजीं शाळा केव्हां एकदां सुटेल, ह्या कैदखान्यांतून आपली केव्हां एकदां सुटका होईल अशा विवंचनेनं हीं बालमनं सदासर्वकाळ पिचत असतात. एखाद्या दिवशीं एखाद्या बड्या अधिकाऱ्याच्या किंवा एखाद्या सुप्रसिद्ध व्यक्तीच्या मृत्युमुळं शाळेला अचानक सुटी मिळण्याचा योग आला कीं ह्या बालमनांच्या आनंदाला पारावार नसतो. ह्या बड्या व्यक्तीच्या मरणाचं दुःख घटकाभर सोडून दिलं तरी शाळेला सुटी मिळाल्यामुळं आपला अभ्यास कमी झाला, गुरुजींच्याकडून आपल्याला मिळणाऱ्या ज्ञानांत अकारण अडथळा आला म्हणून तरी विद्यार्थ्यांना वास्तविक वाईट वाटावं! उलट सुटी मिळाल्यामुळं त्यांना आनंदच होतो. एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षक घरीं खासगी शिकवायला जात असले तर त्या शिक्षकाची होत असलेली त्रेधा तर विचारायलाच नको. शिकवणीच्या वेळीं लाचार शिक्षक जवळ जवळ स्वतःच अभ्यास करीत असतो. महिन्याच्या कांठीं मिळणाऱ्या जादा वेतनामुळं मिंधा झालेला शिक्षक त्या मुलाचे नाहीं नाहीं ते लाड करीत असतो. शाळेंत, घरीं, रस्त्यावर, जिथं जिथं हा विद्यार्थी भेटेल तिथं तिथं त्या विशिष्ट विद्यार्थ्याकडून वाटेल तो अपमान सहन करायला हा शिक्षक तयार असतो. अशा ह्या स्वाभिमानशून्य, लाचार नी लोभी शिक्षकाबद्दल आजकालच्या विद्यार्थ्यांच्या मनांत पूज्यभाव निर्माण होणं कालत्रयींही शक्य नाहीं.

जी स्थिति शिक्षकांची तीच स्थिति अभ्यासक्रमाची. शाळेंत शिकविला जाणारा प्रत्येक विषय विद्यार्थ्याला आवडत नाहीं. आपण हें कां शिकायचं ह्याचा विचार सतत बालमनांच्यापुढं उभा असतो. ह्या प्रश्नाबद्दल त्याचं समाधान कधींच कुणी करीत नसल्यानं [illegible] होऊन विद्यार्थी आपल्यापुढं ठेवलेला अभ्यास कसाबसा रेटीत असतो. वर्षाखेरीस परीक्षा असतात. ही परीक्षेची ओढ तर विद्यार्थ्यांना

सतत बेचैन करीत असते. परीक्षा पास होणं हेंच ह्या शाळें-तील अभ्यासक्रमाचं ध्येय अशी खोटी समजूत झाल्यानं परीक्षा पास होण्याकरितां विद्यार्थी अनिच्छेनं धडपड करूं लागतो. ही परीक्षा उत्तीर्ण होण्याकरितां अभ्यास करणं, निरनिराळ्या मार्गांनीं प्रश्नपत्रिका परीक्षेआधींच कळवून घेण्याचा यत्न करणं, प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळीं इतर चांगल्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांची नक्कल करणं अशा योग्य अयोग्य कोणत्याहि मार्गांनीं ह्या अवजड नी अनावश्यक परीक्षांतून पार पडण्याचं एकच एक ध्येय आजकालच्या विद्यार्थ्यांच्या नजरेपुढं असतं. सर्वसाधारण प्रौढमनाची आजकालच्या बालमनाशीं तुलना केली तर आपल्याला असं दिसून येईल कीं बालमनं प्रौढमनांपेक्षां अधिक प्रामाणिक, अधिक दिलदार, अधिक ध्येयनिष्ठ नी अधिक कार्यक्षम असतात. पण ह्या परीक्षांच्या पायीं मात्र विद्यार्थी खोटं बोलूं लागतो, अप्रामाणिकपणा करूं लागतो. शिक्षकांच्या डोळ्यांत धूळ टाकून परीक्षा पास होण्याच्या प्रयत्नाला लागतो. जी गोष्ट परीक्षांची तीच गोष्ट शिक्षांची. आपण केलेल्या अपराधाबद्दल आपल्याला होणारी शिक्षा टाळण्याकरितां विद्यार्थी प्रथम खोटं बोलूं लागतो. आपण केलेला अपराध दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न करितो. पुढं पुढं साऱ्या विद्यार्थ्यांची एकजूट करून अपराध्याला पाठीशीं घालण्याचा अयोग्य प्रयत्नहि होऊं लागतो. ह्या कोंवळ्या वयांत सुरू झालेली ही अप्रामाणिकपणाची इमारत उंचावतां उंचावतां तिच्याखालीं साऱ्या मानवीमनाच्या सामर्थ्याचा चुराडा होऊन जातो.

विद्यार्थी जसजसा मोठा होत जातो तसतसा शाळेबद्दल, शिक्षकांबद्दल, शाळेंतील अभ्यासक्रमाबद्दल त्याचा अनादर वाढतच जातो. दुय्यम शाळांतील तरुण विद्यार्थी ह्या शालेय वातावरणांत आपली प्रतिष्ठा वाढविण्याच्या उद्योगाला लागतो. कुणी सौंदर्यसाधनानं, कुणी खेळांतील दणकेबाजीनं, कुणी आपल्या अभ्यासांतील प्रगतीनं, कुणी आपल्या कलानैपुण्यानं, कुणी आपल्या सभाधीटपणाच्या जोरावर विद्यार्थीसृष्टींत पुढं येण्याचा प्रयत्न करीत असतो. विद्यार्थ्याविद्यार्थ्यांत तट निर्माण करणं, विद्यार्थ्यांच्या निवडणुका होणं, निवडणुकांच्या वेळीं लाच देणं व लाच घेणं ह्या साऱ्या अनिष्ट गोष्टींना विद्यार्थीदशेंतच सुरवात होते. अमका शिक्षक

पक्षपाती आहे, तमक्या शिक्षकाला शिकवितां येत नाहीं, आम्हाला अमुक शिक्षक नको अशा तऱ्हेचे विद्यार्थ्यांच्या कक्षेबाहेरचे विचार आजकालच्या विद्यार्थीसृष्टींत रूढ झाले आहेत. आपण फी देतो ह्याचा अर्थ आपण शाळाचालकांच्यावर उपकार करतो, ह्या फीच्या मोबदल्यांत आपण शिक्षण विकत घेतो, शिक्षण घेणं म्हणजे व्यवहारांत अनावश्यक अशा विषयांचा, विद्यार्थीदशेचा काळ घालविण्याचा दुसरा कोणताहि मार्ग नसल्यानं, अभ्यास करणं इतकीच आजकालची रूढ कल्पना असल्यानं विद्यार्थी-दशेचं महत्त्वच नाहींसं झालेलं आहे.

कॉलेजचा विद्यार्थी तर याहिपलीकडं गेलेला असतो. मनमुराद टेनिस, बॅडमिंटन वगैरे खर्चाचे खेळ खेळावे, पालकांकडून महिन्याच्या महि-न्याला मनीऑर्डरी मागवाव्या, बेसुमार कपडा वापरावा, चैन करावी, जमल्यास कॉलेजच्या आवारांत प्रेमाचे खेळ खेळावे, वाटल्यास प्राध्या-पकांच्या तासाला हजर राहून त्यांना मनमुराद त्रास द्यावा, सम्मेलना-सारख्या प्रसंगीं मन मानेल तसा धुडगूस घालावा, आणि नेमलेला अभ्यास कसाबसा उरकून विश्वविद्यालयीन पदवी मिळाल्यास मिळवावी असा त्यांचा कार्यक्रम असतो. ह्यांतील कांहीं ध्येयनिष्ठ विद्यार्थी, आपल्याला राजकारण समजतं असा वृथाभास निर्माण झाल्यानं, ह्याच कालांत, म्हणजे पालकाकडून अविरत पैशाचा पुरवठा होत असलेल्या कालांत, आपल्या राष्ट्रभक्तीचा देखावा करीत असतात. मजुरांचीं दुःखं दूर करण्याकरितां शाळाकॉलेजांतून संप पुकारावे, अर्ध्या-कच्च्या मिळालेल्या राजकारणाच्या अभ्यासाच्या जोरावर व्यासपीठावर चढून व्याख्यानबाजी करावी, कॉलेजच्या आवारांत नी कॉलेजच्याबाहेर कैकवेळां आपापसांत मारामाऱ्या कराव्या आणि उरल्यासुरल्या वेळांत अभ्यास करून परीक्षा पदरांत पाडून घ्यावी, हेंच आपल्या विद्यार्थी-दशेचं ध्येयं मानीत असतात. मजुरांच्या संपांना पाठिंबा देणारे ह्यांतलेच कांहीं ध्येयवीर वंशपरंपरेनं भांडवलवाले असल्यानं आपल्या कॉलेजशिक्षणानंतर ह्याच मजुरांची, स्वतःच्या अरेरावी वर्तनानं उपासमार करीत असलेले आढळतात. ह्यांतलेच कांहीं कर्मवीर कामगारांच्या संपाच्या वेळीं त्यांना हार्दिक सहानुभूति दाखवून पुढीक

आयुष्यांत नोकरशाहीच्या गळ्यांतले ताईत झाल्यानं अशाच तऱ्हेच्या संपांत संपवाल्यांवर लाठीमार, अश्रुवायु आणि वेळीं गोळीबार करीत असलेले आढळतात. शिक्षकांच्या संपाच्या वेळीं शिक्षकांना सहानुभूति दाखविणारे हेच कॉलेजकुमार पुढील आयुष्यांत म्युनिसिपॅलिट्या आणि लोकलबोर्ड ह्यांच्यांत सभासद म्हणून निवडून येऊन ह्याच शिक्षकांना अधिकारवाणीनं संपाबद्दल जाब विचारतांना दृष्टीस पडतात. अशा दृष्टीनं विचार केल्यास आजकालचा बहुसंख्य विद्यार्थी बेजबाबदार, ध्येयशून्य आणि विसंगत विचाराचाच झालेला आपल्याला आढळून येईल.

त्यांतल्या त्यांत हिंदुस्थानसारख्या गुलामगिरींत डांबलेल्या राष्ट्रांतील धुरीणांच्या शिकवणुकीनं ह्या राष्ट्रांतील विद्यार्थी अधिकच बेजबाबदार झाला आहे. जनमनाची उठावणी करण्याकरितां ह्या नेत्यांनीं जे कार्यक्रम हातीं घेतले त्या कार्यक्रमांत नोकऱ्या व पदव्या सोडणं, सामुदायिक संप, कोर्टकचेऱ्यांवर बहिष्कार पुकारणं, कर न देणं असे जे वेगवेगळे कार्यक्रम होते त्यांनीं व्हावी तितकी उठावणी झाली नाहीं. अधिकाराला लालचावलेला बुद्धिवादी वर्ग आपला दर्जा सोडायला तयार नव्हता. कोर्टकचेऱ्यांवर बहिष्कार पुकारल्यानं आपला संसार चालविण्याची विवंचना वकिलांना वाटत होती. करबंदीच्या चळवळीनं आपल्या मालकीच्या मालमत्तेला आपल्याला मुकावं लागेल ह्या भीतीनं बहुजन समाजाचीं मनं सामुदायिक करबंदीला तयार नव्हतीं. संप करून आपल्या अन्नाला मुकायची मजूर मनांची तयारी नव्हती. अशा वेळीं ह्या राष्ट्रधुरीणांच्या कार्यक्रमाचा मुख्य भर ह्या विद्यार्थ्यांवर होता. मागली पुढली काळजी नाहीं, अन्नवस्त्राची दघात नाहीं, शिक्षणाबद्दल आस्था नाहीं, अशा तऱ्हेचा आपल्या राष्ट्रांतील विद्यार्थी मात्र नेत्यांच्या आदेशाबरोबर शाळाकॉलेजांतून बाहेर पडायला सदैव एका पायावर तयार होता. यामुळं बालमनांमध्यें शाळा कॉलेजांतील पवित्र विचारसरणीबद्दल मात्र अनादर उत्पन्न झाला. शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक हे सारे लोक आपलं अनहित करीत आहेत, आपल्याला गुलामगिरींत डांबून ठेवण्याचे प्रयत्न करीत आहेत, राष्ट्राच्या स्वातंत्र्याआड येणारे हे अस्तनींतले निखारे आहेत अशा तऱ्हेच्या विचारांची प्रचंड लाट बालमनावरून वाहूं लागल्यानं आधींच बेजबाबदार

बनलेल्या विसाव्या शतकांतील विद्यार्थी त्या पवित्र शिक्षणसंस्थांना गुलामगिरीचे कारखाने मानूं लागला. शिस्त नाहीं, पावित्र्य नाहीं, आदर नाहीं, शिक्षण तर नाहींच नाहीं. अशीं हीं विद्यामंदिरं ध्येयशून्य बनलीं. हीं उसळलेलीं बालमनं पुन्हा ताळ्यावर आणणं आज राष्ट्रीय सरकारला देखील अवघड जाऊं लागलं आहे. बिचाऱ्या शिक्षकांची किती शोचनीय स्थिती झाली आहे हें फक्त त्या शिक्षकांनाच माहीत !

पाश्चात्य विद्यार्थी व आजचा हिंदुस्थानांतील विद्यार्थी ह्यांची तुलना केल्यास ध्येयवादाच्या दृष्टीनं दोघांत जमीन अस्मानाचा फरक आहे. हिंदुस्थानांतला आजचा विद्यार्थी ध्येयशून्य झाला आहे. पाश्चात्य देशांतील प्रत्येक विद्यार्थ्याच्या नजरेपुढं ध्येय आहे. आपल्या राष्ट्राची संपत्ति वाढावी, आपलं राष्ट्र सामर्थ्यवान व्हावं, आपल्या राष्ट्राचा परकी राष्ट्रांना दरारा वाटावा, आपल्या राष्ट्रांतील व्यक्तींचं सुख परमोच्च बिंदूला पोचावं ह्या ध्येयानं प्रत्येक पाश्चात्य विद्यार्थी पूर्णपणें गुंगलेला असतो. शाळेत, कॉलेजांत, कुठंहि शिकत असतांना नजरेपुढं सतत ध्येयतारा दिसत असल्यानं सुकाणू नसलेल्या जहाजाप्रमाणं तो येईल त्या वाऱ्याबरोबर वाहवत जात नाहीं. धंदेशिक्षणाकरितां तो जिवापाड मेहनत करीत असतो. आपल्या शरीरसंवर्धनाची शक्य ती खबरदारी घेण्याचा त्यानं चंग बांधलेला असतो. युद्धाचा वणवा पेटल्यावेळीं त्या वणव्यांत निधड्या छातीनं उडी घ्यायला तो तयार असतो. पण ह्या सर्व गोष्टी आपल्याला दुरून कितीहि साजिऱ्या गोजिऱ्या दिसत असल्या तरी आधिभौतिक ध्येयानं प्रेरित झालेल्या त्या विद्यार्थ्यांना आवरतां आवरतां तेथील शिक्षण संस्थांची चिकाटी देखील कसाला लागण्याची वेळ येते. त्यांच्यांत शिस्त आहे, पण ती धाकाची. त्यांच्या नजरेपुढं ध्येय आहे, पण तें फक्त आपल्या राष्ट्राच्या उन्नतीचं. ते शिक्षण घेण्याकरितां धडपडत असतात, पण तें फक्त आपल्याच आधिभौतिक सुखाकरितां. यामुळं दुरून उठावदार दिसणारा हा पाश्चात्य संस्कृतींत वाढलेला विद्यार्थी मानसिक उन्नतीच्या दृष्टीनं हिंदवी विद्यार्थ्याइतकाच किंवा त्याहूनहि अधिक पोखरलेला आहे. हिंदवी विद्यार्थी आज पूर्ण अनवस्थेत वावरत असल्यानं त्याच्या मनावर योग्य मार्गानं आघात केल्यास त्याला

फाकून थोड्या श्रमांत देवपण येईल. म्हणून हिंदवी विद्यार्थ्यांपुढं नवा ध्येयतारा ठेवणं इष्ट आहे. आधिभौतिक ध्येयानं पछाडलेल्या पाश्चात्य विद्यार्थ्याला वळणीवर आणण्याकरितां पाशवी सामर्थ्याचा उपयोग या विसाव्या शतकांत देखील साऱ्या सुसंस्कृत म्हणविल्या जाणाऱ्या पाश्चिमात्य राष्ट्रांत केला जातो. पण आमचा हिंदुस्थानांतील विद्यार्थी मानसिक संस्कार-परंपरेनं मुळांत शुद्ध नी पवित्र असल्यानं त्याच्या मनावरील राखेचं आवरण एका फुंकरानं दूर केल्यानंतर स्वयंतेजानं प्रकाशित होणारा अंतःस्फुल्लिंग प्रज्वलित व्हायला बिलकुल वेळ लागणार नाहीं. आमच्या देशांतील आजच्या विद्यार्थ्यांची डावी बाजू रंगवितांना त्यांच्या पवित्र मनाचा उजवा कंगोरा केव्हांहि दृष्टिआड झालेला नाहीं.

ध्येयनिष्ठेनं प्रेरित होऊन स्वयंस्फूर्तीनं संघस्थानांवर नी दलस्थानांवर नियमितपणें हजर राहून गाजावाजा न करितां आपली मानसिक उन्नति साधण्याच्या मार्गाला कैक विद्यार्थी नी विद्यार्थिनी लागल्या. रोज संघ-स्थानावर जावं, तिथं आपापल्या ध्वजाला वंदन करावं, कधीं बौद्धिक घ्यावं, कधीं खेळावं; कधीं कवाईत घ्यावी आणि एकसारखं त्यागाचं नी आत्मनिरपेक्षतेचं शिक्षण घेत रहावं, हा त्यांचा सहजधर्म होऊन बसला. मौनाची आज्ञा निघाली कीं मौन पाळावं, शिबिराची तयारी झाली कीं पडतील ते काबाडकष्ट आनंदानं नी हंसतखेळत करून शिबिर यशस्वी करून दाखवावं, एकनिष्ठेनं संघनायकाची आज्ञा बिनविरोध पाळावी आणि संघस्थानावरच्या एका तासांत शाळेच्या पांच तासांत निर्माण होणार नाहीं अशा तऱ्हेची आत्मीयता अंगीं बाणविण्याचा ह्या बालसैनिकांचा प्रयत्न आहे. ह्या संघांतील स्वयंसेवकांची व दलांतील सैनिकांची संख्या लाखांनीं मोजण्याइतकी वाढली आहे. एक ध्येयानं प्रेरित होऊन, एक चालकानु-वर्तित्वाची धगधगीत मशाल हातीं घेऊन अखिल मानवजातीची प्रगति साधण्याचा यत्न करणाऱ्या ह्या बालवीरांना यशाची खात्री वाटूं लागली आहे. मानवीमनं तयार करण्याच्या ह्या जगड्व्याळ प्रयत्नांत कांहीं पक्षवेड्या प्रौढांचं रक्त मधून मधून उसळलेलं दिसतं. ह्यामुळं आपापसांतील दुहीला भांडणाऱ्या जालीम विषाचीं पुटं देऊन ह्या एकत्र येऊं इच्छिणाऱ्या बालमनांची पुन्हां ताटातूट होईल कीं काय अशी अंधुक

भीति वाटते आहे. जातीजातींतील वैमनस्यं, मतामतांचा गलबला, श्रेष्ठकनिष्ठतेची विषमवृत्ति पुन्हा मानवीमनाला ग्रासून त्यांतून उत्पन्न होणाऱ्या अशांत वातावरणानं आर्यावर्तांतील आर्यांच्या पायांतील निखळलेल्या दास्यशृंखला फिरून घट्ट होणार कीं काय अशी मधून मधून शंका पण येते. पण ही निष्ठावान बालमनं प्रौढांचा मान राखीत राखीत समाजमनाची बेमालूम उठावणी करीत असल्यानं सारे विरोध, साऱ्या कुत्सित भावना, सारा गलबला आपोआप नाहींसा होईल. शुद्ध सात्विकतेच्या पायावर उभारलेली ही नवी जागतिक शिकवण अखिल मानवजातीला मानसिक प्रेमानं जिंकून साऱ्या जगावर शांततेचं, समतेचं नी स्वयंपूर्णतेचं साम्राज्य निर्माण करील.

सामर्थ्य व्यक्तींत नसून संघटनेंत आहे. आजवर कित्येक व्यक्ती आल्या नी गेल्या, पण संघटना ही मात्र चिरकालीन आहे. व्यक्तीपेक्षा समाज श्रेष्ठ आहे. संघशक्तीवर अखिल समाजाचं सुख अवलंबून असून व्यक्तिमाहात्म्यानं समाजांत हालअपेष्टांचा धिंगाणा सुरू होतो. ही विचारसरणी बिनमोल नी बिनतोड आहे. अशा तऱ्हेची पुरोगामी वैदिक विचारसरणी ह्या बालमनांतून डोकावूं लागली आहे. विद्यार्थ्यांना ह्या संघटनेबद्दल जो आदर वाटतो तो आदर त्यांच्या शाळांबद्दल वाटत नाहीं, हा त्यांचाच केवळ दोष नसून शाळांचाहि आहे, शिक्षकांचाहि आहे. हे दोष कोणते ह्याचा आपण ह्यापुढं विचार करूं या. रोगाचं निदान होणं ही गोष्ट महत्त्वाची आहे. एकदां निदान अचूक झालं म्हणजे औषधयोजनेला धन्वंतरीची जरूर लागत नाहीं. म्हणून पूर्ण चिकित्सकबुद्धीनं आणि निःपक्षपातीपणानं मानवीमनाला लागलेली कीड हुडकून काढणं आपलं कर्तव्य आहे. कीड वरवर असेल तर खरडून काढूं या, फांद्या किडल्या असतील तर फांद्या तोडूं या आणि मुळापर्यंत कीड लागली असेल तर सबंध झाड तोडायलासुद्धां हरकत नाहीं. बिनकिडीचं खोड जरी नुसतं शिल्लक राहिलं तरी त्यालाच कालांतरानं पालवी फुटेल. त्या कोवळ्या पण शुद्ध पालवींतून नवीन रोप निर्माण होईल, ह्या नवीन रोपाचं पुन्हां एकदां प्रचंड फोफावलेल्या झाडांत रूपांतर होईल आणि ह्या फोफावलेल्या झाडाच्या थंड सावलीखालीं सारा मानवीसमाज फिरून सुखानं विसावा घेईल.

# १३ : आजचीं विद्यालयं

जगाच्या पाठीवर आजपर्यंत वेगवेगळ्या बऱ्याच धार्मिक संस्था अस्तित्वांत आल्या. प्रत्येक धर्मानं आपलीं तत्त्वं समाजापुढं मांडलीं. ज्या ज्या कालीं समाजाला जीं जीं तत्त्वं पटलीं त्या त्या कालीं समाजानं आपल्या आचरणावर त्या त्या धर्मतत्त्वांचीं नियंत्रणं पण घातलीं. धर्म-प्रणेत्यांनीं असह्य हालअपेष्टा सहन करूनहि आपल्या धर्मतत्त्वांवरील आत्मविश्वास प्रगट केला. कांहीं धर्मधुरीणांनीं शांततेच्या मार्गानं आपल्या धर्मतत्त्वांचा प्रसार केला. कांहींनीं आपलींच धर्मतत्त्वं श्रेष्ठ आहेत म्हणून तीं अज्ञानी समाजावर जुलूमजबरदस्तीनं लादण्याचा प्रयत्न केला. कांहींनीं आपलींच धर्मतत्त्वं समाजहितकारी आहेत हें समाजाला पटवून देऊन त्याच्या मदतीनं मानवीमनाला आपल्या नव्या धर्माची शिकवण देऊन, जुलमी धर्मप्रसाराविरुद्ध समाजमनाची अभेद्य आघाडी निर्माण केली. ह्या साऱ्या धर्मप्रसारकांच्या धर्मप्रसाराला यथायोग्य यशहि मिळालं आणि आज जगाच्या पाठीवर हीं सारीं धर्ममतं आपापल्या अनुयायांच्या रूपानं वावरत पण आहेत. पण हीं सगळीं धर्ममतं समाजाच्या उद्धाराकरितांच अस्तित्वांत आलीं हें आपल्याला विसरून भागणार नाहीं. समाजधारणेचे नियम म्हणजेच धर्म. समाजाची योग्य तऱ्हेनं जोपासना व्हावी, मानवी समाज सतत प्रगतिपथावर रहावा, मानवीमनापुढं सतत उच्च ध्येय असावं आणि अखिल मानवजातींतील श्रेष्ठ कनिष्ठ साऱ्या घटकांनीं गुण्यागोविंदानं नांदावं. बलवानांनीं दुर्बलांना पाठीशीं घालावं, बुद्धिवानांनीं आपल्या बुद्धीचा उपयोग समाजहिताकरितां करावा, भांडवलवाल्यांनीं आपल्या संपत्तीचा विनियोग रंजल्यागांजल्यांच्या दुःखनिवारणाकरितां करावा, आपल्या आनंदाचा वाटा दुःखितांना देऊन त्यांच्या दुःखांत आपण वाटेकरी व्हावं आणि अशा तऱ्हेनं समाजांतील विषमतेची झळ बरीचशी कमी करावी हा साऱ्या धर्मप्रणालींचा मुख्य उद्देश आहे.

कोणताहि धर्म घ्या, त्यांत नुस्तीं नीतिबोधपर व्याख्यानं नसून त्या त्या धर्मपंथांच्या अनुयायांनीं, कसं वागावं ह्याचं विवेचन त्यांत केलेलं असतं. नुसतं सदाचरण, नुसती आराधना किंवा नुसती प्रार्थनापद्धति हें कोणत्याच धर्माचं अधिष्ठान नाहीं. कोणत्याहि धर्माच्या मूळ ग्रंथाचा अभ्यास केल्यास, आपल्याला असं दिसून येईल कीं समाजांतील व्यक्तींनीं त्याचप्रमाणं संघटित समाजानं आणि समाजांतील शास्त्यांनीं नी नेत्यांनीं समाजहिताच्या वाढीकरितां कशा तऱ्हेनं वागावं ह्याची सांगोपांग छाननी प्रत्येक धर्मप्रणेत्यानं केली आहे. व्यक्तींचं रोजचं आचरण, राजशासन, दण्डनीति, अर्थकारण ह्या साऱ्या गोष्टींचा प्रत्येक धर्मग्रंथांत ऊहापोह केला असल्यानं समाजांतील कोणतीहि अडचण, आपल्या समाजाला मान्य असलेल्या धर्मग्रंथांतील विचारसरणीचा आधार घेऊन, दूर करण्याची प्रथा समाजांत रूढ झाली.

पण समाज जसजसा अधिकाधिक प्रगत होऊं लागला, त्या त्या प्रमाणांत जुन्या धर्मग्रंथांत दिलेल्या तत्त्वानुसारच फक्त विचार करण्याची प्रथा समाजाला अपुरी नी असमाधानकारक वाटूं लागल्यानं मानवी-धर्माच्या वेगवेगळ्या भागांचा अधिक सूक्ष्म अभ्यास करून समाजधारणेकरितां नव्या नव्या विचारसरणींचे स्वतंत्र ग्रंथ लिहिले जाऊं लागले. इथूनच धर्मग्रंथांत सामावलेल्या साऱ्या तत्त्वांचा वेगवेगळ्या तऱ्हेनं सूक्ष्म अभ्यास सुरू होऊन प्रत्येक विषयांत अभ्यासवैशिष्ट्य (Specialisation) सुरू झालं. ह्याच वेळीं धर्माचीं मुख्य दोन छकलं होऊन आध्यात्मिक उन्नति नी आधिभौतिक उन्नति ह्यांच्या फारकतीला सुरवात झाली. ही फारकत करण्यांत समाजाचा मूळ उद्देश जरी श्रमविभागणीचा होता तरी ह्या फारकतीमुळं समाजधारणेतील प्राणच नाहींसा झाला. एका मुलावर मातृत्वाचा हक्क सांगणाऱ्या दोन आया ज्या वेळीं न्यायासनासमोर आल्या त्या वेळीं खरी आई कोणती ह्याचा निकाल देणं न्यायाधिशाला अवघड वाटलं. अशा वेळीं त्यानं त्या मुलाचे दोन तुकडे करून एका आईला एक तुकडा देण्याचं ठरविलं. ह्या निकालानं त्या मुलाच्या शरीराची सारखी विभागणी निःपक्षपातीपणाची होणार असली, तरी त्या मुलाचा आत्मा मात्र तें कलेवर सोडून गेला असता.

अर्थात् खऱ्या आईनं मुलाचा मृत्यु पत्करण्यापेक्षां त्याच्यावरील आपला हक्क सोडला आणि त्या न्यायाधिशानं तीच त्या मुलाची खरी आई असं ओळखून तिच्या स्वाधीन त्या मुलाला केलं. ह्या न्यायदानाच्या कथाभागाशीं आपल्या प्रस्तुत विषयाचा संबंध नसला तरी आध्यात्मिक नी आधिभौतिक विकेन्द्रीकरणावर आधारलेल्या धर्मांच्या विभागणीनं धर्मांतील आत्मा मात्र निघून गेला आणि धर्मांचीं दोन शकलं समाजांत शिल्लक राहिलीं. ह्यानंतरचं अभ्यासवैशिष्ट्य आजच्या समाजांत इतक्या थराला पोंचलं आहे कीं आपल्या शरीराची शास्त्रशुद्ध वैद्यकीय तपासणी करावयाची झाल्यास छप्पन्न तज्ञ तरी कमींतकमी लागतील आणि एका तज्ञाची दुसऱ्या तज्ञाशीं पूर्ण फारकत झाली असल्यानं ह्या साऱ्या तज्ञांच्या सूक्ष्म तपासणीनंतर सुद्धां आपल्या शरीरांत दोष कोठें आहे ह्याचा निकाल अनिश्चित राहील. अभ्यासवैशिष्ट्याला समाजांत अवास्तव प्राधान्य आल्यानं आणि केन्द्रीकरणाचा पूर्ण विसर पडल्यानं समाजांतील बालमनविकासावर अनिष्ट परिणाम झाला.

समाजांतील आजकालचीं सारीं शास्त्रं धर्मांचींच वेगवेगळीं अंगं असल्यानं प्रचलित शिक्षणशास्त्र हें धर्मांचंच एक उपांग आहे असं मानणं बरोबर आहे. बालमनविकासावर भर देण्याकरितां ह्या शिक्षणशास्त्रांतूनच आजकालच्या शाळा अस्तित्वांत आल्या. पण आश्चर्य हें कीं ह्या शाळांतून समाजधर्मांचं आणि बालमनविकासाचं तेवढं अचूक उच्चाटन झालं आहे. सगळ्या राष्ट्रांतील सगळ्या शाळा एकाच धर्तीच्या नी सगळ्या शाळांतील शिक्षणक्रमसुद्धां एकाच मतप्रणालींतून निर्माण झालेला असा आहे. प्रथम प्रथम ह्या शाळा ज्यावेळीं अस्तित्वांत आल्या त्यावेळीं बहुतेक शाळा निरनिराळ्या धर्मगुरूंच्या देखरेखीखालीं चालत असल्यानं धर्मशिक्षण हें त्यावेळच्या शाळांचं मुख्यांग मानलं जात असे. धर्मशिक्षण म्हणजेच समाजधारणेची सर्व तऱ्हेची शिकवण असल्यानं सुरवातीसुरवातीला ह्या शाळांतून, आयुष्यांतील निरनिराळ्या व्यवसायांतून वावरणारीं पण त्याच वेळीं मानवीसमाजाचा उत्कर्ष साधण्याचा सतत यत्न करणारीं कर्तबगार माणसं उदयाला येत असत, पण पुढं पुढं ज्यावेळीं निरनिराळ्या धर्ममतांचा राष्ट्राराष्ट्रांतून संघर्ष सुरू झाला त्यावेळीं

विशिष्ट धर्मग्रंथाचं शाळांतून शिक्षण देण्याचं तत्त्व समाजाला मानवेनासं झालं, आणि त्यामुळं जगांतील साऱ्या शाळांतून धर्मशिक्षणाचं आपो-आपच उच्चाटन झालं.

आजकाल शाळाकॉलेजांतून शिकविले जाणारे निरनिराळे विषय एकत्रित केले म्हणजेच मानवीसमाजाचा धर्म बनतो ही कल्पना आज-कालच्या विद्यालयांतून नाहींशी झाली आहे. अभ्यासवैशिष्ट्य हेंच आजच्या शिक्षणाचं ध्येय झाल्यानं कुणी नुसत्या इतिहासाचाच अभ्यास करतो, तर कुणी भूगोल विषयाचं पूर्ण ज्ञान मिळवितो, कुणी गणित-शास्त्रांत पारंगत होतो, तर कुणी समाजशास्त्रांत प्रावीण्य मिळवितो. कुणी अर्थशास्त्र, कुणी भूगर्भशास्त्र, कुणी न्यायशास्त्र तर कुणी तर्कशास्त्र, अशा तऱ्हेनं अभ्यासवैशिष्ट्याच्या मागं लागलेला आजचा समाज समाजधर्माला पूर्णपणें पारखा झालेला आहे. विद्यार्थ्यांचं अभ्यासवैशिष्ट्य पूर्णतेला नेण्याकरितां त्यांना शिक्षण देणारे शिक्षक सुद्धां अभ्यासवैशिष्ट्या-करितां एकाच विषयाचा सखोल अभ्यास करूं लागले आणि म्हणूनच आजकालच्या शाळांतून नेमले जाणारे शिक्षक एकेका विषयाचेंच शाळांतून शिक्षण देऊं लागले. तत्त्वज्ञान ह्या विषयाचा अभ्यास करणारे शिक्षक नुसत्या तत्त्वज्ञानाचाच काथ्याकूट करूं लागले. तत्त्वज्ञानाचा अभ्यास हा मानवीमनाच्या प्रगतीचा अत्युच्च ध्येयतारा आहे आणि ह्या अभ्यासानं सुसंस्कृत झालेलीं मानवीमनंच समाजाला खऱ्या समाजधर्माची शिकवण देऊं शकतात ही विचारसरणी मागं पडून आधिभौतिक विष-यांच्या अभ्यासानं समाजाची खरीखुरी प्रगति होत असते अशी विचार-सरणी समाजांत प्रबल झाली. शाळाकॉलेजांतील शिक्षण सुद्धां आधि-भौतिक उन्नतीवरच आधारलं गेलं. साहजिकच शिक्षणशास्त्रांतील बाल-मनविकासाचे प्रयत्न सुद्धां आधिभौतिक उन्नतीवरच अधिष्ठित झाले.

आजकालच्या शाळांतून विद्यार्थ्यांना रोजीं चारपांच तास शिक्षण दिलं जातं. कांहीं शाळा सकाळदुपार भरतात तर कांहीं शाळा फक्त दुपारींच उघडतात. शाळांतून शिक्षण मिळण्याचे तास मात्र सर्वसाधारण तितकेच असतात. कांहीं शाळांतून विद्यार्थ्यांच्या राहण्याजेवण्याची सोय

केलेली असते. अशा शाळांतील विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा वेळ इतर शाळांतील वेळाइतकाच असतो. ह्या विद्यार्थ्यांना इतर वेळीं शिक्षकांच्या देखरेखीखालीं वावरण्याची मोकळीक असते. ह्या शाळांतून विद्यार्थ्यांचा शिक्षकांशीं चोवीस तास संबंध येत असला तरी आत्मीयतेनें साऱ्या विद्यार्थ्यांवर आपल्या पोटच्या मुलांप्रमाणं नजर ठेवणं त्यांना शक्य होत नाहीं. विद्यार्थ्यांनीं वसतिगृहाचे नियम पाळले किंवा नाहींत एवढंच पाहण्याची ह्या शिक्षकांची वृत्ति असते. वसतिगृहांतून चोवीस तास राहणारे विद्यार्थी आईबापांच्या मायेच्या ओलाव्याला पारखे झालेले असतात आणि वसतिगृहावर देखरेख करणारे पगारी शिक्षक वरून कितीहि मनाचा गोडवा दाखवीत असले तरी त्यांच्याकडं विद्यार्थ्यांची लागावी तितकी आंतरिक ओढ लागत नाहीं. त्यामुळं वसतिगृहांतून रुक्ष वातावरणच निर्माण होतं.

घरीं राहून शाळेला जाणारे विद्यार्थी शाळेच्या वेळाखेरीज इतर वेळांत पूर्ण मोकळे असतात. त्यांच्यावर शिक्षकांची नजर फक्त शाळेच्या वेळांतच असते. शाळेबाहेरील वेळांत बालमनापुढं असलेल्या समाजांतील व्यक्तींच्या चारित्र्याचे बालमनावर आघात होत असतात. आईबाप वगैरे वडील माणसांची समाजांतील भलीबुरी वागणूक बालमनापुढं सतत नाचत राहते. मानसिक अधःपाताचे प्रसंग क्षणाक्षणाला बालमनांच्या आयुष्यांत रस्ता रोखून उभे असतात. हवेंत शेंकडो, हजारो, लाखो रोगजंतू मनुष्याच्या शरीरांत शिरण्याकरितां टपून बसलेले असतात. प्रत्येक श्वासाबरोबर त्यांतील हजारो जंतू नाकावाटे आंत जातात आणि तितकेच जंतू प्रत्येक उच्छ्वासाबरोबर बाहेर येत असतात. ह्यांतील एकादा जंतु जर रोगग्राही शरीरांत ठाण मांडून बसला तर तो शरीराला हैराण तर करतोच पण क्वचितप्रसंगीं त्याचा बळीहि घेतो हें जसं मानवीजीवनांतलं एक त्रिकालाबाधित सत्य आहे त्याचप्रमाणं बालमनाला आडमार्गाला नेणाऱ्या पावलागणिक येणाऱ्या भयानक प्रसंगांचंहि आहे. रोगजंतूशीं लढत देण्याची शक्ति मानवीशरिरांत असली म्हणजे त्या जंतूंचा आपोआपच नाश होतो; त्याचप्रमाणं बालमनं जर मुळांतच खंबीर असलीं किंवा मुळांतूनच तीं खंबीर बनविण्याचा प्रयत्न

केला गेला तर त्यांच्यावर ह्या प्रसंगांचे दुष्परिणाम फारच कमी प्रमाणांत होतील. म्हणूनच मानवीसमाजांतील सत्प्रवृत्ति आज हजारो वर्षे असत्प्रवृत्तींशीं झुंजत टिकाव धरून राहिली आहे. सत्प्रवृत्तीच्या विजयाचा असा एकादा प्रसंगसुद्धां कित्येक असत्प्रवृत्तींच्या प्रसंगांवर मात करूं शकतो.

ह्या सत्प्रवृत्तीचं सामर्थ्य वाढीला लावण्याकरितां पांचपांच तास शिक्षण घेत असलेलीं बालमनं अत्यंत सामर्थ्यवान बनायला पाहिजेत. पण आजच्या आमच्या शाळांतून मानसिक सामर्थ्याची मूलभूत शिकवणच बाजूला पडली असल्यानं बालमनांची व्हावी तशी उठावणी होत नाहीं. तरी सुद्धां ह्या पांच तासांच्या अवधींत निरनिराळ्या शिक्षकांकडून वेगवेगळ्या विषयांची शिकवण घेत असतांना एकादा दुसरा क्षण सहजासहजीं असा रंगून जातो कीं त्या वेळीं शिक्षक आपला शिक्षणकपणा विसरतो, आणि विद्यार्थी आपला विद्यार्थीपणा विसरतो आणि दोघांच्याहि मनांचं विषयाशीं तादात्म्य झाल्यानं मनामनांचा जो मिलाफ होतो त्याच्या जोरावर विद्यार्थ्यांचं सामर्थ्य वाढीला लागतं. एका क्षणाच्या एकतानतेंत जर इतकं अचाट सामर्थ्य एकवटलेलं आहे तर शिक्षणकालांतील बरेचसे क्षण जर अशा मानसिक एकतानतेंत जाऊं लागले तर अलौकिक मानसिक सामर्थ्य निर्माण व्हायला कितीसा वेळ लागणार आहे? पण हल्लींच्या विद्यालयांतून अशी परिस्थिति उत्पन्न झालेली नाहीं. शाळेंतील अभ्यासकाल जरी पांच तासांचा असला तरी ह्यां पांच तासांपैकीं रोज एकादा तास सुटींत जातो. राहिलेल्या चार तासांत विद्यार्थ्यांना आठ विषयांचा अभ्यास करायचा असतो. बरेच तास परकी भाषेच्या किंवा जुन्या सांस्कृतिक भाषेच्या अभ्यासाकरितां नेमलेले असतात. वर्गांतील चाळीस चाळीस मुलांच्या गळीं ह्या भाषा उतरवितां उतरवितां शिक्षक टेकीला आलेला असतो. अशा परिस्थितींत शिक्षक–शिक्षितांच्या मनाची एकतानता साधावी कशी? ह्या भाषांचा आपल्या रोजच्या व्यवहारांत कितीसा उपयोग होणार आहे? ह्या भाषांचा गंध सुद्धां नसलेलीं माणसं जगांत मानानं जिवंत राहूं शकतातच ना? अशा तऱ्हेचे विचार बालमनांत थैमान घालीत असतांना विद्यार्थ्यांचं लक्ष शिक्षणाकडं लागावं कसं? ह्या भाषांची जी स्थिति तीच गणिताची. त्रैराशिक सम आहे कां व्यस्त

आहे, त्रिकोणाच्या तिन्ही कोनांची बेरीज दोन काटकोनाइतकी असली काय नी थोडी कमी असली काय, 'अ' ला 'क्ष' रुपये मिळाले आणि 'आ'ला 'अ' पेक्षां पांच रुपये कमी मिळाले, जोपर्यंत 'अ' चे किंवा 'आ'चे हे रुपये काल्पनिक आहेत, तोपर्यंत त्यांच्या रुपयांचा उहापोह करून फायदा कोणता असे वेगवेगळे विचार बालमनांत डोकावत असतांना मन त्या विषयावर स्थिर व्हावं कसं? इतिहासाच्या तासाला तीनशें वर्षांपूर्वीच्या नूरजहानचं शिक्षकांनीं कितीहि कौशल्यपूर्ण वर्णन केलं किंवा भूगोलाच्या तासाला आफ्रिकेंतील हवामानाचा शिक्षकांनीं कितीहि उद्‌बोधक विचार केला, रसायनशास्त्र, मातृभाषा ह्या साऱ्या विषयांचा विद्यार्थ्यांच्या मनावर कायम ठसा उमटविण्याकरितां शिक्षकांनीं कितीहि जिवापाड मेहनत घेतली तरी जोपर्यंत शिक्षणाचं निश्चित ध्येय विद्यार्थ्यांच्या नजरेपुढं चौवीस तास उभं रहात नाहीं तोपर्यंत आजकालच्या शाळांतून पोपटी आणि तुटपुंज्या विद्येचाच प्रसार होत राहील. विषयप्रतिपादन करतांना शिक्षकच जिथं, त्या त्या विषयाची जय्यत तयारी करून अधिकांत अधिक गुण मिळवून परीक्षेंत उत्तीर्ण होणं हेंच ध्येय विद्यार्थ्यांच्या नजरेपुढं ठेवितात, तिथं विद्यार्थ्यांना, हल्लींच्या शिक्षणाबद्दल, शाळांबद्दल आणि शिक्षणपद्धतींबद्दल आस्था वाटावी कशी? परीक्षा हें बालमनाची प्रगति मापण्याचं एक साधन आहे. साध्य खास नव्हे. पण दुर्दैवानं आजचा विद्यार्थी साधनालाच साध्य मानून अभ्यास करीत बसला आहे. कोणता प्रश्न परीक्षेंत येणार, त्या प्रश्नाचं उत्तर कसं लिहिलं असतां मला अधिक गुण मिळतील, ह्याच विचारांत आजकालचा विद्यार्थी घुटमळत असल्यानं त्याची मानसिक प्रगति होत नाहीं आणि मानसिक उन्नतीच्या अभावीं त्या त्या विषयाचा त्याचा अभ्यासहि कमकुवत होत जातो. परीक्षा पास झाल्यानंतर तरी निदान आपल्या आयुष्याला योग्य वळण लागेल, अमुक परीक्षा पास झाली कीं खात्रीनं आपल्याला नित्यावश्यक अन्नवस्त्राची ददात पडणार नाहीं, त्याच्यापुढची अमुक परीक्षा उत्तीर्ण झाल्यास आपल्याला अधिक वरच्या दर्जाचं आयुष्य थोड्याशा ऐषआरामांत काढतां येईल, सर्वांत उच्च परीक्षेंत आपण उत्तीर्ण झालों म्हणजे समाजांत आपल्याला उच्च दर्जा मिळेल अशी बालमनांची खात्री असती तर वाटेल त्या विषयाचा अभ्यास

त्यांनीं एकतानतेनं नी किंचित् सुद्धां चुकारपणा न करतां केला असता. पण आजकालच्या विद्यालयांतील कोणतीहि परीक्षा उत्तीर्ण झाली तरी विद्यार्थ्याला पुरेशा अन्नवस्त्राची देखील खात्री नसते. आज कित्येक विद्यार्थी मॅट्रिकच्या परीक्षेंत उत्तीर्ण होतात, कित्येक विश्वविद्यालयीन पदवीधर बनतात, पण नौकरी न मिळाल्यामुळं, व्यापारांत स्थान नसल्यामुळं रोजच्या आपल्या जीवनक्रमाला लागणाऱ्या आवश्यक वस्तू सुद्धां मिळवूं न शकल्यानं, विवंचनेंत पडलेले हे पदवीधर पाहून हल्लींच्या शाळांतील शिक्षणक्रमाबद्दल विद्यार्थी पूर्ण निरुत्साह नी निराश असतात. खेड्यांतील प्राथमिक शाळा घ्या, शहरांतील प्राथमिक किंवा दुय्यम शाळा घ्या, नाहींतर विद्यालयं घ्या, प्रत्येक ठिकाणीं विद्यार्थ्यांत निरुत्साह नी निराशाच दृष्टीस पडते.

खेडेगांवांत एकादी शाळा असते. शाळेची वेळ बहुतेक सकाळदुपारच असते. विद्यार्थी जुलूमजबरदस्तीनं शाळेंत खेंचले जातात. वास्तविक ह्या बालमनांना आपल्या वाडवडिलांच्या धंद्यांतच गोडी वाटत असते. शेतकऱ्याच्या मुलाला शेतीची आवड असते, सुताराचा मुलगा लहानपणापासून सुतारी कामांत प्रगति दाखवीत असतो, लोहाराच्या मुलाला घणाचे घाव मारण्यांतच गोडी वाटते. असं असून सुद्धां ह्या सर्व मुलांना एका दावणींत बांधून त्यांच्यावर 'बे एके बे' सारख्या पाढ्यांचा किंवा पृथ्वी कशी निर्माण झाली ह्यासारख्या अद्भुत घटनांचा, किंवा पुंकेसर नी स्त्रीकेसर ह्यासारख्या वनस्पतिशास्त्रांतील तत्त्वांचा एकटाकी मारा करीत राहणाऱ्या मास्तरांचे घाव बालमनाला घणाच्या निर्दय घावाइतकेच असह्य वाटत असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. 'हं, आतां गणिताचा तास आहे. घ्या गणित' गणित काय नी भाषा काय; ह्या साऱ्या विषयांतील अगम्य लीलांचा अभ्यास करायला मुलांचीं मनं शाळेंत असतात कुठं ! शरीरानं शाळेंत अडकलेले हे विद्यार्थी मनानं उघड्या शेतांतून स्वतंत्र पाखरांप्रमाणं भराऱ्या मारीत असतात, ह्याची शाळेंतील टेबलखुर्चीवर अधिष्ठित झालेल्या शिक्षकाला दादहि नसते. अशा तऱ्हेनं, नुसत्या शरीरानं होणाऱ्या निरनिराळ्या

विषयांच्या अभ्यासानं बालमनांची प्रगति कशी होणार ? वर्षाच्या शेवटीं परीक्षेच्या वेळीं सुद्धां हीं बालमनं उत्सुक नसतात.

तपासनीस गांवीं आले कीं साऱ्या गांवांत धावपळ करून शिक्षकांना मुलं पकडून आणावीं लागतात. परीक्षेच्या वेळीं शिक्षक अप्रामाणिकपणानं विद्यार्थ्यांना मदत करीतच असतात. परीक्षा पास झाली काय नी नापास झाली काय, विद्यार्थ्याला त्याचं शुभाशुभच नसतं. नांगर धरतां येणं, मोट हाकतां येणं, लाकडावर तासणी चालवितां येणं ह्या गोष्टींना खेडेगांवांतील बालमनं खरंखुरं महत्त्व देत असतात. परीक्षा होतात, निकाल लागतात, काळ्या तांबड्या रेघांनीं सुशोभित केलेले निकालाचे कागद शिक्षक तयार करितात, तपासनीस सह्या करितात, कांहीं विद्यार्थी पास होतात नी कांहीं नापास होतात. पास झालेल्या विद्यार्थ्याला आपल्यांत कोणताच फरक झालेला दिसून येत नाहीं, नापास झालेल्या विद्यार्थ्याला कशाची कमतरताहि वाटत नाहीं. हेच विद्यार्थी मोठे झाल्यावर आपल्या गांवांतील शाळेची इमारत, त्यावेळीं आपल्याला शिकवीत असलेले शिक्षक आणि त्यांच्या हातांतील छडी ह्याखेरीज शाळेंतील इतर सगळ्या गोष्टी विसरून जातात. गांवांत सक्तीचं शिक्षण जरी जारी केलेलं असलं, तरी गांवांतील प्रौढ जनता अखेर नव्वद टक्के निरक्षरच असते, आणि उरलेले दहा टक्के लोक आपल्या सहीपुरतेच फक्त साक्षर राहिलेले असतात. आज शाळांची संख्या कितीहि वाढली असली, शाळांतील अभ्यासक्रमासंबंधीं कितीहि छाननी झालेली असली तरी ह्या साऱ्या विषयांचा अभ्यास करण्याचं मर्म, ह्या साऱ्या शाळांचं ध्येय, ह्या अभ्यासक्रमाचं महत्त्व विद्यार्थ्यांच्या नजरेपुढं ठेवलं गेलेलं नसतं, त्यांना तें पटलेलं नसतं, व्यावहारिक जगांत त्याचा काडीइतकाहि उपयोग नसतो, असं त्यांना वाटत असतं. हें झालं शाळेंतील अभ्यासक्रमासंबंधीं.

शाळेंतील विद्यार्थ्यांची शारीरिक उन्नति साधण्याचं काम सुद्धां शाळांचंच आहे. निरनिराळ्या विषयांचा अभ्यास करतांना मनाचं सामर्थ्य वाढत असतं, हें अभ्यासाचं ध्येय असं आजकालच्या विद्यार्थ्यांच्या नजरेआड झालं आहे त्याचप्रमाणं बलवान् मन सुदृढ शरीरांतच वास करीत

असतं म्हणून आपलं शरीर सुदृढ ठेवण्याचा प्रयत्न ह्याच वयांत झाला पाहिजे ह्याचीहि दाद विद्यार्थ्याला नसते. आजकालच्या शहरी अगर खेडे-गांवी शाळांतील कोणताहि विद्यार्थी घ्या. त्याचं मन आणि त्याबरोबरच त्याचं शरीर कमकुवत झालेलंच आपल्याला दिसून येतं. ही शरीरसंपदा बाल-वयांतच फक्त मिळवितां येते ह्याची जाणीवच नसल्यानं विद्यार्थी ह्याहि बाबतींत पूर्ण निरुत्साही असतो. आजकाल शाळांतून मानसिक अभ्यासक्रमा-बरोबरच शारीरिक अभ्यासक्रमाला सुद्धां वेगळे तास नेमण्याची प्रथा सुरू झाली आहे. ह्या शारीरिक अभ्यासक्रमाकरितां विशिष्ट शिक्षक शिकवून तयार केले जातात. अशा शिक्षकांना शाळांतून नेमलेंच पाहिजे असा निर्बंधहि शाळांवर लादला जातो. पण ह्या खेळांच्या तासांबद्दल सुद्धां आजकालचा विद्यार्थी निरुत्साहीच असतो. बालमनाला खेळ प्रिय अस-ल्यानं खेळतां खेळतां बालमनाला शिक्षण दिलं पाहिजे असं शिक्षणशास्त्राचं तत्त्व असल्यानंच नाइलाज म्हणून शाळांतून खेळ घुसडले गेले आहेत असा आभास निर्माण होऊं लागतो. विद्यार्थी शारीरिक शिक्षणाकडं लक्ष देत नाहीं म्हणून परीक्षा पास होण्यांत शारीरिक शिक्षणाची सुद्धां परीक्षा असणं अत्यंत आवश्यक आहे अशी केविलवाणी स्थिति आज ह्या शारीरिक शिक्षणाची सुद्धां झालेली आहे. खेळाच्या तासाच्या वेळीं कांहीं विद्यार्थी पळून जातात, कांहीं विद्यार्थी पायाला लागलं आहे, खरूज झाली आहे, धावण्याची परवानगी नाहीं अशा प्रकारचं कांहीं ना कांहीं कारण पुढं करून शाळेत हजर असतांना सुद्धां खेळ खेळण्याचं टाळतात आणि बाकीचे जे विद्यार्थी नाइलाजानं खेळ खेळत अस-तात ते घंटा होईल केव्हां आणि आपली सुटका होईल केव्हां ह्याची वाट पहात रडत रडत खेळ खेळण्याच्या मिषानं क्रीडांगणावर वावरत असतात. मधल्या सुटीच्या वेळीं वर्गोवर्गातून स्वैर धावपळ करीत असलेले विद्यार्थी, ऐन उन्हांत क्रीडांगणावर जाऊन गोट्या, चेंडू, इटीदांडू अशा तऱ्हेचे खेळ मनापासून खेळत असलेले विद्यार्थी सुद्धां ह्या खेळाच्या तासांच्या वेळीं निरुत्साही असलेले पाहिले म्हणजे असं वाटतं कीं आपलंच कांहींतरी नी कुठं तरी चुकतं आहे. ह्या विद्यार्थ्यांपैकीं बरेचसे विद्यार्थी संघस्थानाकडं किंवा दलस्थानाकडं केव्हां

एकदां जाईन अशा उत्सुकतेनं शाळेच्या घंटेची वाट पहात असतात. संघस्थानाकडं किंवा दलस्थानाकडं धाव घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नजरेपुढं कांहीं राजकीय ध्येय ठेवलेलं असतं अशी ओरड आजकाल ऐकू येते, हें जरी थोडा वेळ गृहीत धरलं तरी आजकालच्या आपल्या शाळांतून विद्यार्थ्यांच्या नजरेपुढं आपण कोणता ध्येयवाद ठेवला आहे आणि जर नजरेपुढं निरुपयोगी परीक्षा पास होण्याखेरीज दुसरा कोणताहि ध्येयवाद नसेल तर जिथं कांहीं थोडा ध्येयवाद विद्यार्थ्यांच्या नजरेपुढं निश्चित ठेवला जातो तिकडं विद्यार्थिमनं धांव घेतात ह्यांत आश्चर्य वाटण्यासारखं कांहींच नाहीं. उत्तम मन तयार करणं, बालमनाचा योग्य विकास साधणं, तो विकास योग्य तऱ्हेनं होण्याकरितां उत्तम शरीरसंपदेची आवश्यकता असल्यानं शरीरसामर्थ्यावर भर देणं हेंच आपल्या शालेय जीवनाचं खरंखुरं ध्येय आहे ही विचारसरणी जोपर्यंत बालमनाला पटलेली नाहीं तोपर्यंत शाळांतून आंखल्या जाणाऱ्या मानसिक व शारीरिक अभ्यासक्रमाबद्दल विद्यार्थ्यांना आस्था वाटणं शक्य नाहीं.

मन आणि शरीर ह्यांच्या विकासाबरोबरच विद्यार्थ्यांचं चारित्र्य बनविण्याची शाळा हीच जागा आहे. पण हल्लींच्या शाळांच्या अभ्यासक्रमांतून चारित्र्याला कुठंच स्थान नाहीं. आजवर शाळाकॉलेजांतून फक्त मानसिक अभ्यासक्रमालाच स्थान होतं. अलीकडं शाळाकॉलेजांतून शारीरिक अभ्यासक्रमाला स्थान दिलं गेलं आहे. पण बालविकासाचं तिसरं आणि अत्यंत महत्त्वाचं ध्येय जें चारित्र्य त्याचा अद्याप शाळाकॉलेजांतून मागमूस सुद्धां नाहीं. शालेय जीवनांत विद्यार्थी अचकट विचकट शिव्या देत असतांना आपण प्रत्यहीं ऐकतो. ह्या शिव्यांना कांहीं अर्थ आहे ह्याची विद्यार्थ्यांना जाणीवहि नसते इतके हे अपशब्द विद्यार्थ्यांच्या अंगवळणीं पडत चालले आहेत. शाळेंत अगर शाळेबाहेर मारामाऱ्या करणं, एकानं दुसऱ्याला ठोसा देणं, दुसऱ्यानं पहिल्यावर चाकू उगारणं, योग्यायोग्यतेचा विचार न करितां आपल्या पाशवी शक्तीची दुसऱ्याला दहशत घालणं ह्या अनिष्ट गोष्टी विद्यार्थीजीवनांतल्या नित्याच्या व्यवहारांतल्या झाल्या आहेत. ह्या भडकलेल्या बालमनांतूनच पुढील पिढींतील समाज निर्माण होणार आहे. आपलं विद्यार्थीजीवन हा ब्रह्म-

चर्याश्रम आहे, ह्या काळांत आपण आपल्या मनावर व शरीरावर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करून त्या विजयांतून आपल्याला आपलं चारित्र्य बनवायचं आहे ह्याची अंधुक कल्पना सुद्धां विद्यार्थ्यांना नसते. आपल्या सौंदर्याची नी मोहकतेची दुसऱ्यावर छाप पाडण्याकरितां आपल्या सौंदर्यप्रदर्शनाचं शाळा हेंच स्थान आहे अशी विचित्र कल्पना विद्यार्थीविद्यार्थिनींची झालेली असते. ह्या बालवयांत विद्यार्थ्यांच्या पाहण्यांत येणाऱ्या नाटकसिनेमासारख्या शृंगारिक आणि मनं भडकावून सोडणाऱ्या करमणुकींचा बालमनावर किती अनिष्ट परिणाम होतो ह्याची कुणी दखलगिरीच घेत नाहीं. शाळाकॉलेजांतील सम्मेलनप्रसंगीं विद्यार्थ्यांनीं आणि कधीं कधीं विद्यार्थीविद्यार्थीनींनीं मिळून नाट्यप्रयोग करावे ही प्रथा आजकाल शाळांतून सर्रास रूढ झालेली आहे. अशा तऱ्हेच्या संमिश्र नाट्यप्रयोगांनीं विद्यार्थ्यांचीं मनं विचलित होतात, ह्या विचारसरणीचा आपल्याला पूर्ण विसर पडल्यासारखा दिसतो आहे. वैद्यकशास्त्राचा असा एक सिद्धांत आहे कीं शरीरांतील वीर्याची जोपासना करणं हें विशिष्ट वयोमानापर्यंतच्या तरुण तरुणींचं श्रेष्ठ कर्तव्य आहे. मानवजात अवेळीं मृत्युमुखीं पडणं ह्याचं मूळ कारण अवेळीं होणाऱ्या वीर्यनाशांत आहे. आजच्या मनोविकासाच्या आणि शरीरसंवर्धनाच्या शाळांतून ह्या गोष्टींकडं बिलकुल लक्ष दिलं जात नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट आहे. निरनिराळ्या कंटाळवाण्या विषयांचा अभ्यास नाखुषीनं विद्यार्थ्यांवर लादणं हा विद्यार्थ्यांचा आजकालच्या शाळांतील मनोविकास ! शाळेच्या वेळांत घंटेच्या ठोक्याबरोबर मुलांना क्रीडांगणावर नेऊन त्यांना जुलमानं खेळ खेळायला लावणं हें शाळांतील विद्यार्थ्यांचं शरीरसंवर्धन. शाळेच्या आवारांत विद्यार्थ्यांकरितां गलिच्छ खाण्याच्या पदार्थांची रेलचेल असलेलीं उपाहारगृहं चालविणं, विद्यार्थ्यांना नाटकसिनेमे दाखविणं हें आजकालच्या शाळांतील विद्यार्थ्यांचं शीलसंगोपन. वर्षाअखेर मुलांच्या परीक्षा घेऊन त्यांना पासनापास ठरविणं हें शालेय जीवनाचं ध्येय.

आजकाल खेडेगांवच्या शाळा लोकलबोर्डकडून चालविल्या जातात. शहरांतील प्राथमिक शाळा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हातीं असतात नी

इतर बऱ्याच प्राथमिक व दुय्यम शाळा आणि कॉलेजं ह्यांच्यावर निरनिराळ्या शैक्षणिक संस्थांचं नियंत्रण असतं. लोकलबोर्ड, स्थानिक स्वराज्य संस्था आणि शैक्षणिक संस्था ह्यांचं आजकालच्या समाजांतील धोरण आपणा सर्वांच्या परिचयाचं आहे. बालमनविकासावर नियंत्रण ठेवणाऱ्या ह्या संस्था नेहमींच पैशाच्या अडचणींत असतात. लाचलुचपतीच्या जोरावर निवडणुकांच्या वेळीं अवास्तव पैसा खर्च करून निवडून आलेल्या सभासदांच्या हातीं ह्या बालमनविकासाच्या शाळांचं भवितव्य असतं. निवडणुकांच्या वेळीं भांडवल म्हणून खर्ची टाकलेल्या पैशावर आपल्या तीन वर्षांच्या कारकीर्दीत आपल्याला जास्तींत जास्त पैसा कसा कमवितां येईल इकडं यांचं सारं लक्ष असल्यानं शाळा खात्याच्या सबकमिटीवर निवडून येण्याची प्रत्येक सभासद टाळाटाळीच करीत असतो. दुर्दैवानं ह्या सबकमिटींत आलेले सभासद कोणत्या शिक्षकाची कुठं बदली करावी, कोणत्या शिक्षिकिणीला कामावरून काढून टाकण्याचा धाक दाखवावा ह्या विचारसरणींत व्यग्र असल्यानं आपण चालविलेल्या शाळांतून उद्यांचा आदर्श समाज निर्माण कसा होईल ह्याचा विचार करायला त्यांना सवडच नसते. गांवांतील मुलं राखोळीला घालण्याकरितां गांवांतून शाळा चालविणं जरूर आहे एवढीच ह्यांची कल्पना असल्यानं कमींतकमी पगार घेऊन जास्तींत जास्त मुलं हाकणाऱ्या शिक्षकांची नेमणूक शाळेंत मास्तर म्हणून करण्याचं ह्यांचं धोरण असतं. अशा कोंडवाड्यांच्या धर्तीवर आजकालच्या बहुतेक प्राथमिक शाळा चालविल्या जात आहेत. कांहीं कांहीं शाळांतून एकाच शिक्षकाला एकाच वेळीं निरनिराळे वर्ग चालवावे लागतात. एका वर्गाला उदाहरणं सोडवायला सांग, दुसऱ्या वर्गाला अक्षर घटवायला सांग, आणि त्याच वेळीं तिसऱ्या वर्गातील विद्यार्थ्यांना सृष्टिज्ञानाची माहिती दे अशी अष्टावधानी वृत्ति शिक्षकाला आत्मसात् करावी लागते. कांहीं मुलं एकमेकांत भांडतच आहेत, शिक्षक टेबलावर छडी आपटत आपटत तमाखूची चिमूट तोंडांत टाकतातच आहेत, गांवचा पाटील शाळेंत येऊन शिक्षकाशीं तासन्‌तास गप्पा मारीत बसतोच आहे, अशा नमुनेदार पद्धतीनं खेड्यांतून चालणाऱ्या ह्या शाळा बालमनविकासाच्या संस्था

आहेत, कां गांवांतील मुलांच्याकरितां तयार केलेले कोंडवाडे आहेत कां बालमनांची कत्तल करण्याकरितां बांधलेले कत्तलखाने आहेत ?

जी स्थिति ह्या स्थानिक संस्थांनीं चालविलेल्या शाळांची तीच स्थिति शिक्षणसंस्थांनीं चालविलेल्या शाळांची. आजकाल शाळा चालवणं हा एक व्यापार होऊन बसला आहे. प्रथम मिशनऱ्यांनीं चालविलेल्या शाळांना तोडीस तोड म्हणून, परकी सरकारनं चालविलेल्या शाळांतून दिल्या जाणाऱ्या गुलामी वृत्तीला आळा पडावा म्हणून, कांहीं ध्येयवादी, स्वार्थत्यागी नेत्यांनीं ह्या शिक्षणसंस्था काढण्याचा उपक्रम केला. पण आज मात्र ह्या संस्थांना व्यापारी स्वरूप आलेलं आहे. चारदोन सुशिक्षित पदवीधर बेकार असले कीं त्यांना शिक्षणाचा व्यापार करावासा वाटतो. आपलं ज्ञान नी एकाद्या धनिकानं दिलेली देणगी हें भांडवल, अशा लक्ष्मीसरस्वतीच्या भागीदारींत ही ज्ञानदानाची संस्था सुरू होते. देणगी देणाऱ्या भांडवलवाल्याचं आपल्या नांवाकडं लक्ष असतं आणि या सुशिक्षित बेकारांचं आपल्याला मिळणाऱ्या वेतनाकडं लक्ष असतं. अशा स्वार्थी मनोवृत्तींतून आजकालच्या शिक्षणसंस्थांची स्थापना झालेली असते. ध्येयवादावर आधारलेल्या जुन्या शिक्षणसंस्था आणि व्यापारी धोरणानं सुरू झालेल्या आजकालच्या नव्या शिक्षणसंस्था ह्या दोहोंचंहि ध्येय मात्र आज एकच झालेलं आहे. धनिकांना नांव विकून त्याच्या मोबदल्यांत त्यांच्याकडून पैसा घ्यावा, समाजांतील बालगोपालांना विद्या विकून फीच्या रूपानं त्यांच्याकडून पैसा उकळावा, आपण शाळा चालवितों आहोंत असं सिद्ध करून सरकारकडून मदत घ्यावी आणि ह्या त्रिविध पैशाच्या जोरावर बालमनविकासाचे कारखाने काढावेत ही आजकालच्या शिक्षणसंस्थांची परिस्थिति आहे. गिऱ्हाइकानं आपल्याच दुकानांत माल घ्यावा म्हणून गिऱ्हाइकाला कमिशन देणं, त्याच्याशीं गोड बोलणं तो आल्या वेळीं पानसुपारी अगर लवंग वेलदोडे देऊन त्याला खूष करणं ही व्यापारी चढाओढ जशी दुकानादुकानांतून असते त्याचप्रमाणं आपल्या शाळांकडं विद्यार्थ्यांना ओढण्याचे सारे भलेबुरे प्रयत्न हे संस्थाचालक करीत असतात. आपल्या संस्थेंत शिक्षण स्वस्त दरानं विकणं, विद्यार्थ्यांना अधिक स्वातंत्र्य देणं, इतर संस्थांपेक्षां आपल्या संस्थेंत पासाचं प्रमाण अधिक ठेवणं अशा

नानातऱ्हेच्या व्यापारी धोरणांनीं ह्या संस्था चालविल्या जातात. अर्थात् संस्थेकरितां जास्तींत जास्त पैसा मिळविण्याच्या ह्या वेगवेगळ्या प्रयत्नां-बरोबरच संस्था चालविण्याकरितां लागणारा खर्च कमीकमी करीत आणणं हें दुसरं धोरणसुद्धां ह्या संस्थाचालकांच्या नजरेपुढं असतं. त्यामुळं कमींत-कमी वेतन घेऊन जास्तींत जास्त काम करण्याला तयार असणाऱ्या शिक्षकांचीच ह्या संस्थांतून नेमणूक होत असते. अर्थात् मागणी पुर-वठ्याच्या नियमाप्रमाणं ह्या संस्थांतून काम करण्याला तयार होणाऱ्या नोकरांत इतर कोठेंहि वाव मिळत नसलेल्या नाइलाज म्हणून शिक्षकाचा धंदा करायला तयार झालेल्या, अगतिक पदवीधरांचा भरणाच अधिक असतो. अशा ह्या व्यापारी मनोवृत्तीनं पछाडलेल्या शाळाकॉलेजांतून दिलं जाणारं शिक्षण त्याच दर्जाचं असतं. रजेला हपापलेले शिक्षक, विषयाची तयारी नसलेले प्राध्यापक आणि जमाखर्चाची तोंडमिळवणी करितां करितां टेकीस आलेले मुख्याध्यापक अशा ह्या त्रिवेणीसंगमावर दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची हयगय होणं अपरिहार्य आहे.

परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रमाणपत्रं मिळविणं आजकालच्या शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांचं एकमेव ध्येय आहे. हें ध्येय गांठण्याकरितां विद्यार्थी जशी योग्य अयोग्य खटपट करीत असतात त्याचप्रमाणं आपल्या शाळाकॉलेजांचं महत्त्वमापन ह्या प्रमाणपत्रांच्या कमीअधिक संख्येवर अवलंबून असल्यानं अधिकांत अधिक प्रमाणपत्रं आपल्या विद्यार्थ्यांना मिळवून देण्याकरितां साऱ्या शाळाकॉलेजच्या चालकांचे श्लाघ्य अश्लाघ्य प्रयत्न चाललेले असतात. हीं प्रमाणपत्रं देण्याचा मान विश्वविद्या-लयांचा असल्यानं ह्या विश्वविद्यालयांचं दर्शन घेतल्याशिवाय आपलं हें प्रकरण पूर्ण होणार नाहीं. हीं प्रमाणपत्रं देण्याकरितां विश्वविद्यालयांमार्फत विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेतल्या जातात. ह्या परीक्षांचं स्तोम आजकाल इतकं माजलं आहे कीं कांहीं कांहीं विश्वविद्यालयांच्या एकेका परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांची संख्या तीस ते चाळीस हजारां-पर्यंत वाढलेली आहे. ह्या परीक्षा घेण्याच्या प्रचंड कारखान्यांचा विचार मनांत आला कीं ह्या यांत्रिक युगांतील मालाची पैदास करणारे कारखाने सुद्धां ह्या बालमनकत्तलीच्या कसाईखान्यांपुढं फिके वाटूं लागतात. ह्या

विश्वविद्यालयांनीं संघटित कारखानदारी पद्धतीवर प्रमाणपत्रं विकण्याचा एक प्रचंड कारखानाच चालविला आहे, असं मनात आल्यावांचून रहात नाहीं. दोन, तीन किंवा जास्तींत जास्त चार पैसे किंमतीचं हें प्रमाणपत्र विकत घेण्याच्या प्रयत्नात आज लाखो रुपयांचा चुराडा होतो आहे, लाखो विद्यार्थ्यांच्या विद्यार्थीदशेंतील कालाचा अपव्यय होतो आहे, ह्या प्रमाणपत्रांचा फोलपणा प्रमाणपत्रं मिळविलेल्या लाखों विद्यार्थ्यांच्या प्रत्यहीं प्रत्ययाला येतो आहे. प्रमाणपत्रं विकणारीं हीं विश्वविद्यालयं मात्र कोट्यवधि रुपये आज समाजाकडून मिळवीत आहेत. ह्या विश्वविद्यालयांतून सुद्धां वशिलेबाजी आहे, पक्षपात आहे, खऱ्या-खोट्याचा बुजबुजाट आहे अनीतीच्या नी अन्यायाच्या गोष्टी प्रत्यहीं घडताहेत. परीक्षक नेमण्यापासून वशिलेबाजीला सुरवात होते, अर्ज करणाऱ्या उमेदवारांनीं कोणताहि वशिलेबाजीचा प्रयत्न करावयाचा नाहीं असा कडक निर्बंध आहे. पण एकाहि अर्जदाराला वशिल्या-शिवाय परीक्षक होतां येत नाहीं असा अनुभव आहे. परीक्षक होण्या-करितां सतत बाराबारा वर्षे प्रयत्न करीत असलेल्या प्रामाणिक आणि लायक पदवीधरांना परीक्षक होण्याच्या बाबतींत यश येत नाहीं आणि ह्याच्या उलट समतोल मनानं परीक्षक नेमण्याचा आव आणणारे हे कुलगुरू, ज्यांनीं अर्ज सुद्धां केला नसेल अशा लोकांकडून मुद्दाम अर्ज मागवून घेऊन परीक्षकांच्या यादींत त्यांचीं नांवं घुसडत असतात. कांहीं नातेवाईक म्हणून, कांहीं आपल्या विश्वविद्यालयीन निवडणुकांच्या वेळीं आपलीं मतं गोळा करतात म्हणून, आपल्या शिक्षण-संस्थेंतील आपली कुलमुखत्यारी कायम टिकविण्याकरितां कांहींच्या मतांचा उपयोग होतो म्हणून, पण कांहीं ना कांहीं कारणानं वशिला लागत नसेल तर मात्र परीक्षक होण्याचा कुणी कितीहि चंग बांधला तरी त्याला उभ्या आयुष्यांत, ओढ्याचं पाणी थांबल्यावर ओढ्यापलीकडं जाऊं इच्छिणाऱ्या मुलाप्रमाणं जन्मभर वाटच पहात बसावं लागेल. आजच्या समाजांत परीक्षांचं महत्त्व अवास्तव वाढलं असल्यानं अगदीं खालपासून वरपर्यंत एकाद्या विद्यार्थ्याला जास्त मार्क देऊन पास करून घेणं, एकाद्या विद्यार्थ्याला परीक्षेत उणांक देणं अशा हीन मनोवृत्तीचा पगडा शिक्षकापासून

तों कुलगुरूपर्यंत साऱ्यांच्याच मनावर पूर्णपणें बसला आहे; इतकंच नाहीं तर असं करण्यांत आपण अन्याय करतो आहे ह्याची कोणाच्याहि मनाला किंचित् सुद्धां बोचणी लागत नाहीं. कुणी पैशाकरितां, कुणी आपल्या शिक्षणसंस्थांचं महत्त्व वाढविण्याकरितां, कुणी विश्वविद्यालयीन नोकरशाहींत आपलं स्थान अढळ राखण्याकरितां, कुणी आपल्या आप्तेष्टांवर उपकार करण्याकरितां अशा तऱ्हेचं पक्षपाती धोरण स्वीकारतात. वर्तमानपत्रांतून ठळक शीर्षकांखालीं प्रसिद्ध होणाऱ्या ह्या साऱ्या काळ्याबेऱ्या गोष्टींचा निर्मल बालमनांवर किती अनिष्ट परिणाम होत असेल ह्याचा वाचकांनींच विचार करावा.

आपल्या शाळांतील विद्यार्थी अभ्यासाकडं लक्ष देत नाहींत, आपले विद्यार्थी शिस्तीनं वागत नाहींत, आपले विद्यार्थी आपल्या चारित्र्याकडं लक्ष देत नाहींत असा विद्यार्थ्यांच्या विरुद्ध कंठशोष करणाऱ्या ह्या शाळाचालकांना असा स्पष्ट सवाल आहे कीं, गुरुजी, प्राध्यापक महाशय, सन्मान्य कुलगुरु, श्रेष्ठ विद्यार्थ्यांच्या नांवाची हाकाटी करण्याचा आपल्याला काय अधिकार? आपला तरी आपल्या विषयाचा व्यासंग आज चालू आहे का? आपण तरी आपल्याला घालून दिलेली शिस्त पाळण्याचा प्रयत्न करताहांत का? आपलं चारित्र्य आदर्श आहे असं छातीवर हात ठेवून आपण तरी सांगूं शकतां का? मग कां उगाच कंठशोष करतां? चिखलांत दगड टाकून कां उगाच आपल्याच अंगावर चिखल उडवून घेतां? दुसऱ्याला सुधारायंच असेल तर आधीं आपल्याला सुधारा. हे सारे कत्तलखाने बंद करा. मानसिक उन्नतीकरितां निदान एक तप तरी खडतर तपश्चर्या करा आणि मग समाजमनाच्या उन्नतीकरितां बालमनांची जोपासना करायला पुढं या.

कोळसा उगाळावा तितका काळाच. हा दोष त्या कुलगुरूंचा नसून ज्या गुलामी शिक्षणप्रणालींतून हे कुलगुरू बाहेर पडले, ज्या पाश्चात्य विचारसरणीनं हे विद्वान् भारले गेले, ज्या स्वार्थी समाजांत हे एक घटक म्हणून वावरत आहेत त्या शिक्षणप्रणालीचा, त्या पाश्चात्य विचारसरणीचा आणि आजच्या समाजाचा आहे. निर्जीव शाळाकॉलेजांचे 'बोलविते धनी' जे शिक्षक, ह्या शिक्षकांना कार्यक्षम बनविण्याची ताकद

ज्या समाजांत आहे तो समाज, आणि ह्या समाजमनांत बदल घडवून आणणारी जी आपली राजसत्ता ह्या सर्वांनीं शिक्षणसंस्थांतून आमूलाग्र बदल करण्याची पराकाष्ठा करण्याचं मनांत आणल्यास साऱ्या दोषांचं निर्मूलन होईल, साऱ्या पापांचं क्षालन होईल आणि मानवीसमाजाचं आत्यंतिक ध्येय गाठण्याला कालावधि पण लागणार नाहीं.

ह्यानंतरच्या प्रकरणांत आजचा शिक्षक कसा अगतिक, कसा दुबळा आणि कसा प्रवाहपतित झाला आहे ह्याचा विचार करणं क्रमप्राप्त आहे. समाजांतील योग्य दोषाविष्कार झाल्याशिवाय प्रगतिपथावर पाऊल टाकणं अशक्य असल्यानं आज ह्या कालखंडांत मुख्यतः दोषविस्तारच होत आहे. पण हे दोष दाखविण्याचा उद्देश शिंतोडे उडविण्याचा नसून प्रगति साधण्याचा आहे. ही विचारसरणी मांडतांना ज्या ज्या समाज-घटकांवर टीका होते असें वाटते आहे त्या त्या समाजघटकांनीं ही टीका आहे का सत्यदर्शन आहे ह्याचा स्वतःशींच समतोल मनानं विचार करावा. ह्या विचारसरणीचा मूलगामी उद्देश मानवीसमाजाची सुस्थिति हाच आहे.

बाह्यगोल, अंतर्गोल आणि सत्यदर्शक असे आरशाचे तीन प्रकार आहेत. एका आरशांत पाहणाऱ्याचे बरेच दोष झांकले जातात, दुसऱ्या आरशांत पाहणाऱ्याची कुरूपता अधिक उठावदारपणानं दाखविली जाते. हे दोन्ही आरसे, आरशांत आपलं तोंड पाहणाऱ्या व्यक्तीला पटत नाहींत. समाजांत आपली कुरूपता समाजाच्या दृष्टीस पडूं नये म्हणून आपल्या कुरूपपणावर आपण रंगरंगोटीचा आणि छानछोकीचा कितीहि मारा करीत असलों तरी एकान्तांत असतांना आपण जसे आहोंत तसेच हुबे-हुब ज्या आरशांत आपण दिसूं, तोच वास्तवदर्शक आरसा आपल्याला आवडतो. कुत्सितपणानं आपल्या दोषावर बोट ठेवणाऱ्या मित्रापेक्षां, आपले दोष दाखवितांना आपल्यांत सुधारणा घडवून आणण्याच्या प्रयत्नांत असलेल्या मित्राबद्दल आपल्याला आपलेपणा वाटतो. त्याच-प्रमाणं समाजमनाला प्रगतिपथावर नेऊन सोडण्याकरितां केलेलं हें वास्तवदर्शन आपण क्षम्यच मानावं.

# १४ : आजचे शिक्षक

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥

केवढा अगाध महिमा आहे गुरूचा! समाजाचा उत्पत्तिकर्ता जो ब्रह्मा त्याचं सामर्थ्य गुरूमध्यें आहे. समाजाचा रक्षणकर्ता विष्णु त्याचंहि सामर्थ्य गुरूमध्यें प्रतीत होत आहे. समाजाचा संहारकर्ता महेश्वर त्याचंहि सामर्थ्य गुरूजवळ आहे. एवढंच नाहीं तर गुरु प्रत्यक्ष पर-ब्रह्म आहे. गुरूबद्दल केवढी आदरणीय कल्पना ही! ज्यांनीं आपल्या आध्यात्मिक नी आधिभौतिक सामर्थ्यानं आजवर समाजांत प्रचंड आंदोलनं घडवून आणिलीं त्यांचं सामर्थ्य सर्वश्रेष्ठ असलं पाहिजे ह्यांत वादच नाहीं. मानवीसमाजाच्या प्रारंभापासून आतांपर्यंत ह्या बुद्धिवाद्यांनीं समाजाला वेळोवेळीं मार्गदर्शन केलं आहे. भावी कालांत सुद्धां हेच बुद्धिवादी समाजाला मार्गदर्शन करणार आहेत. समाज दुबळा झाला असतांना त्याला उत्थापनाचा गुरुमंत्र देण्याचं सामर्थ्य, सामर्थ्यवान समाजांत सुखशांततेचं वातावरण निर्माण करण्याचं श्रेय नी मदांध समाजाच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालण्याची कला ह्यांच्यांतच आहे. वेदकालीन शास्त्यांचं अधिष्ठान आध्यात्मिक असून त्यांची नजर समाजाच्या आधिभौतिक उन्नतीवर खिळली असल्यानं त्यांनीं समाजांत आपलं स्थान स्वार्थनिरपेक्ष ठेवलं. आध्यात्मिक अधिष्ठान कायम ठेवून स्वतःचा मोठेपणा सिद्ध करण्याचा स्मृतिपुराणकालीन ऋषींचा प्रयत्न समाजाला पटला नाहीं. बुद्धकालीन भिक्षूंनीं आध्यात्मिक अधिष्ठानाला अवास्तव महत्त्व देऊन समाजाला आधिभौतिकतेबद्दल उदासीन बनविलं. शिवकालीन स्वामींनीं आधिभौतिकतेंतून आध्यात्मिकतेला उठावणी दिली. पाश्चात्य बुद्धिवाद्यांनीं समाज निर्भेळ आधिभौतिकतेवर आणून सोडला. पण वेदकालापासून आतांपर्यंतच्या कालांत आध्यात्मिकता आणि आधि-

भौतिकता यांच्या चढाओढीचं नी मधुरमिलाफाचं सूत्र मात्र ह्या बुद्धि-वाद्यांच्याच हातीं राहिलेलं आहे.

हा बुद्धिवादी समाज नेहमींच समाजाच्या अग्रभागीं असतो. वेद-कालांत ह्यांना आपण ज्ञाते म्हणत असूं. पुराणकालांत ह्यांनाच आपण ऋषी म्हणूं लागलों. बुद्धकालांत ह्यांचं भिक्षु हें नांव रूढ झालं. शिव-कालांत स्वामी हा शब्दप्रयोग अस्तित्वांत आला. पाश्चात्य संस्कृतींत ह्यांना समाजाचे पुढारी मानूं लागलों. निरनिराळ्या काळीं ह्या सर्व पुढा-र्‍यांना वेगवेगळीं नांवं दिलीं गेलीं असलीं तरी समाजाला शिकवण देण्याचं एकमेव कार्य अखिलजागतिक बुद्धिवादी आजवर करीत आले आहेत आणि पुढं सुद्धां हें कार्य तेच करीत राहणार आहेत. असा हा सर्वश्रेष्ठ बुद्धिवादी वर्ग आज समाजांत कोणत्या परिस्थितींत आहे ह्याचा आपण यापुढं विचार करूं. वेदकालापासून शिवकालापर्यंत शिक्षकाचं आध्यात्मि-कता हेंच अधिष्ठान असल्यानं आपला वैयक्तिक आधिभौतिक विकास हें ध्येय ह्या समाजशिक्षकांच्या नजरेपुढं कधींच नव्हतं. समाजांतील बालमनं कोणत्या मार्गानं तयार करतां येतील, समाजाला प्रगतीचा मार्ग कशा तऱ्हेनं दाखवितां येईल, अखिल मानवीसमाजांत सुखशांतीचं साम्राज्य स्थापन करण्याकरितां कोणकोणते निर्बंध समाजाला सुचवावे लागतील ह्या ध्येयानं प्रेरित झालेले हे समाजशिक्षक सदासर्वकाळ आपल्या बुद्धीचा उपयोग समाजसेवेंतच करीत असत. पण पाश्चि-मात्यांच्या आधिभौतिकवादाला आर्यावर्तात महत्त्व येतांच हा बुद्धिवादी स्वार्थानं भारला गेल्यामुळं समाजाच्या सुखसाधनेच्या ध्येयापेक्षां स्वतःच्या वैयक्तिक सुखसाधनेकडं आपोआपच खेचला गेला. ही पाश्चात्य आधि-भौतिकता मुख्यतः धनवादावर आधारलेली असल्यानं भारतीय बुद्धि-वाद्यांचं सुद्धां धनार्जन हेंच ध्येय झालं आणि इथूनच समाजशिक्षकांची निःस्वार्थी परंपरा लुप्त झाली.

तथापि ह्या बुद्धिवाद्यांचं समाजांतील मानाचं स्थान जरी टिकून राहिलं असतं तरी परंपरेनं मनांत आध्यात्मिकता बाणली असल्यानं त्यांनीं तेवढ्या मानाकरितां सुद्धां भिक्षावृत्तीनं म्हणजे दारिद्र्यांत राहून समाजांतील बाल-मनांना शिक्षण देण्याचं पवित्र कार्य केलं असतं. पण पाश्चिमात्य विचार-

क्षणींत आधिभौतिकतेलाच प्राधान्य असल्यानं येथील बुद्धिवादी वर्ग सुद्धां पाश्चात्यांचं अनुकरण करून मानमरातब, अधिकार नी संपत्ति ह्यांच्यामागं लागला. पहिल्या मानाच्या जागा पाश्चिमात्यांनीं ह्या बुद्धिवाद्यांनाच दिल्या. बुद्धिवाद्यांची धनेच्छा देखील ह्याच काळांत अनावर झाली. अर्थात् स्वार्थनिरपेक्षबुद्धीनं समाजाला मन, शरीर नी चारित्र्य ह्यांची शिकवण देणारा वर्ग आपोआपच कमी होऊं लागला. कांहीं काळपर्यंत आर्यावर्तांतील कांहीं बुद्धिवादी व्यक्ती समाजांतील बालमनांना शिक्षण देण्याचं कार्य करीत राहिल्या. पण शिक्षणाची दिशाच पार बदलून गेल्यामुळं ह्या शाळांतून बाहेर पडलेले विद्यार्थी सुद्धां आधिभौतिक लखलखाटानं भारले गेले. अशा तऱ्हेनं लहानापासून थोरापर्यंत सारा भारतीय समाज ह्या पाश्चात्यांच्या कच्छपीं लागला. आपल्याला समाजांत मानाचं स्थान मिळवायचं असेल तर आपण यंत्रशास्त्राचा अभ्यास केला पाहिजे, वास्तुशास्त्राचा अभ्यास केला पाहिजे, पाश्चात्य वैद्यकाचा अभ्यास केला पाहिजे, आंग्लविद्याविभूषित होण्याकरितां परदेशांत जाऊन आलं पाहिजे, अशा तऱ्हेची अहमहमिका ह्या बुद्धिवाद्यांत सुरू झाली. शिक्षणाचं कार्य करणाऱ्या व्यक्तींना महत्त्व राहिलं नसल्यानं अव्वल दर्जाच्या बुद्धिवाद्यांनीं ह्या शिक्षणशास्त्राकडं सहजच पाठ फिरविली.

आज पाश्चात्य देशांत सुद्धां समाजांत शिक्षकाचं काम करीत असलेल्या व्यक्तींना विशेष महत्त्व नाहीं. शिक्षण आणि विशेषतः बालमनाचं शिक्षण ही समाजांतील एक अत्यंत महत्त्वाची बाब आहे हें तत्त्वच समाजाच्या दृष्टिआड झालं असल्यानं वाचन, लेखन नी हिशेब ( Three Rs. ) ह्यांचं शिक्षण देण्याकरितां अव्वल दर्जाच्या बुद्धिवाद्यांची जरूरीच नाहीं असं समाजांतील नेत्यांनीं ठरविल्यानं सहजगत्या समाजांतील तिसऱ्या दर्जाच्या बुद्धिवाद्यांची शालेय जीवनांत स्थापना झाली. पाश्चात्य देशांत शिक्षकाचं काम करीत असलेल्या व्यक्तींची सांपत्तिक स्थिति सर्वसामान्य समाजाच्या सांपत्तिक स्थितीच्या मानानं बरीच खालच्या दर्जाची असते. समाजांत मानाचं स्थान पटकावायचं असेल तर शिक्षकाचा धंदा सोडला पाहिजे आणि हा धंदा सोडतांच त्याच व्यक्तींना समाजांत मानाचं स्थान मिळणं, एवढंच नव्हे तर अधिक पैसा मिळणं, आपल्या तोलाच्या वधूशीं

कम होणं, ह्या गोष्टी शिक्षणसंस्थांतून बाहेर पडल्यानंतरच साधतां येतात. पाश्चिमात्य देशांत बालमनविकासावर संशोधन करीत असलेले कांहीं ध्येयवादी शिक्षणशास्त्रज्ञ वगळले तर शिक्षणक्षेत्रांत सर्वसाधारणपणें मानसिक शिक्षणाबद्दल अनास्थाच दिसून येते.

आर्यावर्तातील समाज तर आज सर्व बाजूंनीं हतबल नी हतप्रभ झालेला आहे. आपल्या सार्वभौम सरकारानं सुरवातीला आपल्या देशांतील बालमनांना शिक्षण देणाऱ्या पाश्चात्य धर्तीच्या शाळा काढल्या. पण पुढं पुढं त्यांनीं, हा आपला व्याप हलके हलके कमी करीत आणून समाजांतील बालमन–शिक्षण समाजाच्या स्वाधीन केलं. खेड्यांतील शिक्षण लोकलबोर्डाच्या हातीं गेलं. शहरांतील प्राथमिक शिक्षण म्युनिसिपॅलिट्यांच्या हवालीं झालं. एवढयानंहि वाढत्या शिक्षणाची जबाबदारी पार पडेना म्हणून खासगी संस्थांना मदत देऊन जरूर त्या ठिकाणीं शिक्षण-प्रसाराच्या शाळा काढण्यांत आल्या. खेड्यांतील शाळा हा एक खेड्याचा विशेष आहे, आपल्या जिल्ह्यांतील अमुक खेड्यांतून साक्षरताप्रसार होतो आहे, असं वर्णन करण्यापुरतंच ह्या शाळांचं महत्त्व शिल्लक राहिलेलं आहे. त्याचप्रमाणं स्थानिक स्वराज्याच्या कारभारांत सुद्धां शाळांची स्थिति शोचनीयच झालेली आहे. शिक्षक आहेत तर विद्यार्थी नाहींत, विद्यार्थी आहेत तर शिक्षक नाहींत आणि बालमनविकासाचं तर नांवच नाहीं. अशा तऱ्हेच्या प्राथमिक शिक्षणाच्या शाळा पाहिल्या म्हणजे समाजाची अधोगति दाखवायची झाल्यास ह्या शाळांकडं बोट दाखविलं गेल्यास नवल नाहीं. आज सगळीकडं रस्तेरुंदीला जें महत्त्व आहे, आरोग्यविभागाला जें महत्त्व आहे, बांधकाम खात्याबद्दल समाजाला जितकी कळकळ वाटते तेवढी सुद्धां कळकळ बालमनविकासाबद्दल समाजाला वाटत नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. खासगी शिक्षणसंस्था तर बोलून चालून व्यापारी वृत्तींतूनच अस्तित्वांत आल्या असल्यानं समाजांतील बालमन-विकासाकरितां स्थापन झालेल्या ह्या शाळांतून काम करणारे शिक्षक हवाल-दिल झाले असल्यास नवल नाहीं. ह्या शाळांच्या वाढत्या खर्चाला तोंड देण्याकरितां शिक्षकांचं वेतन कमी झालं. त्यामुळं इतर कोठेंहि कोणत्याहि ठिकाणीं काम मिळणं अशक्य झाल्यावरच लोक शिक्षक म्हणून शाळांतून

काम करण्याला तयार होऊं लागले. खासगी संस्थांतून तर ह्या शिक्षकाची स्थिति अधिकच शोचनीय झाली. पंधरा रुपयांवर सही घेऊन हातांत फक्त आठ रुपयेच पगार ठेवणं, मध्यें फक्त तास दोन तासच सुटी देऊन सकाळपासून संध्याकाळपर्यंत शिक्षकांकडून काम घेणं, शाळा तपासणीस येण्याच्या वेळींच फक्त एक दोन महिने शिक्षकाला नोकरीवर ठेवणं अशा तऱ्हेचे अनन्वित प्रकार ह्या खासगी शाळांतून होऊं लागले. अर्जविनंत्या झाल्या, तक्रारी झाल्या, चौकशा पण झाल्या. ह्या शाळा-चालकांचे हे अनन्वित प्रकार अद्याप जसेच्या तसेच चालू आहेत. सरकारी मदत मिळविण्यापुरत्या ह्या शाळा चालत असल्याचा देखावा होतो. ग्रँट मिळून जातांच, ह्या शाळा कोंडवाड्याच्या पद्धतीवर मुलं कोंडून ठेवण्यापुरत्याच चालू असतात.

दुय्यम शाळा नी कॉलेजं ह्यांची सुद्धां हीच स्थिति. शिक्षकांना कायम न करणं, शक्य तों सुटीचा पगार न देणं, मास्तरांच्याकडून आपले खासगी शिकवण्यांचे वर्ग चालवून घेणं, अशा तऱ्हेचे कित्येक अश्लाघ्य प्रयत्न होत असतात. अशा शाळाकॉलेजांतून काम करणारे शिक्षक अगर प्राध्यापक दुसरी बरी नौकरी मिळेपर्यंत टेकण्याची जागा ह्याच कल्पनेनं ह्या संस्थांतून काम करीत असतात. महिन्याच्या महिन्याला पुरेल न पुरेल इतकं अपुरं वेतन घेऊन काम करणारे अर्धपोटी शिक्षक किती ध्येयनिष्ठेनं काम करूं शकतील हें दिसतंच आहे. सारा बुद्धिवादी समाज निरनिराळ्या वरच्या दर्जाच्या नोकऱ्या करूं लागल्यानंतर शिल्लक राहिलेले पदवीधर ह्या शिक्षणसंस्थांत नाइलाजानं काम करूं लागल्यानं त्यांना आपल्या व्यवसायांत आपलेपणा वाटत नाहीं. पोलिसखात्यांत अधिकाऱ्याची भरती करायची झाल्यास चढाओढीच्या परीक्षा घेऊन त्यांत उच्चांक गाठणाऱ्या बुद्धिवान् व्यक्तीची निवड होते. जिल्हाप्रमुखाच्या जागांकरितां विशिष्ट परीक्षा घेऊनच भरती केली जाते. वास्तुशास्त्राच्या कॉलेजांतील पहिल्या एकदोन क्रमांकांना मोठे पगार देऊं करतात. वैद्यकशास्त्रांत बुद्धीचं श्रेष्ठत्व सिद्ध करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तावडतोब सरकारी दवाखान्यांतून नेमणुका होतात. पण ह्या सर्व खात्यांच्यापेक्षांहि अधिक महत्त्वाच्या बाल-मनविकासाच्या शिक्षणखात्यांत मात्र कोणतंच वैशिष्ट्य नाहीं. आज

सन्हेनं शिक्षण हें कमी महत्त्वाचं सामाजिक अंग ठरल्यानं त्याचं समाजांतील मूल्य हलकें हलकें ओसरूं लागलं आणि आज आपल्या ह्या आर्यावर्तांत शिक्षक हा एक तोंडची सहानुभूति दाखविण्याचा अनुकंपनीय प्राणी झाला आहे.

शाळेंतील निरनिराळे विषय विद्यार्थ्यांना समजावून द्यायला आज्वल्य बुद्धिवादी लोकांची जरुरी नाहीं असंच समाजाचं मत झालेलं आहे. पाठ्यपुस्तक वाचून त्यांतील गोष्टी विद्यार्थ्यांना समजावून द्यायच्या आणि त्या विषयांत जेमतेम पसतीस चाळीस गुण मिळवून विद्यार्थ्याला पास होतां आलं म्हणजे शिक्षकाचं काम झालं एवढीच शिक्षकासंबंधीं समाजाची कल्पना असल्यानं शिक्षक वरच्या दर्जाचा बुद्धिवादी असण्याचं कारणच राहिलं नाहीं. अर्थात् ज्याला लिहिहांवाचतां येतं आणि वर्गांत विद्यार्थ्यांच्यावर हुकमत चालवितां येते अशा व्यक्तीची समाजांत शिक्षक म्हणून योजना होऊं लागली. यांत्रिक सुधारणांच्या ह्या युगांत समाजांत बेकारी माजूं लागल्यानं शिक्षकांच्या ह्या धंद्यांत सुद्धां चढाओढ सुरू झाली. कमींतकमी वेतन घेऊन जास्तींत जास्त वेळ नोकरी करण्याला शिक्षक तयार होऊं लागल्यानं शिक्षकांचं वेतन किमानवेतनावर स्थिर झालं. आज समाजांत शिक्षकाला जें वेतन मिळतं तें जीवनवेतन सुद्धां नाहीं ही गोष्ट खरी असूनहि शाळांत शिक्षकांची भरती होतेच आहे आणि समाजाचं शिक्षण पण अखंड चालू आहे.

आर्थिक परिस्थितीनं गांजलेला आजचा शिक्षक कसाबसा मासिक वेतनावर निर्वाह करून मास–तर म्हणजे जेमतेम एक महिनाभर आपल्या वेतनावर तरणारा असा मास्तर ह्या शब्दाचा विनोदी विग्रह सार्थ करीत काळ कंठतो आहे. महिन्याच्या महिन्याला पगार पुरत नसल्यानं जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याकरितां कुणाच्या दुकानांत जमाखर्च लिही, कुणाच्या घरची ने आण कर, कुणाच्या मुलाची खासगी शिकवणी कर अशा मार्गांनी आपलं उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे. सर्वच शिक्षकांना, आणि त्यांत सदसद्विवेक बुद्धीला स्मरून [illegible] वागणाऱ्या शिक्षकांना [illegible] [illegible]

जमत नसल्यानं मिळणाऱ्या वेतनावर आपल्या कुटुंबीयांना जिवंत ठेवण्याकरितां लागणारं अन्नवस्त्र त्यांना पुरविणंदेखील जड जाऊं लागलं आहे. संसारखर्चानं ग्रासलेला आणि काळजीनं ग्रासलेला असा शिक्षक बालमनांच्यापुढं आदर्श म्हणून कसा राहणार ? शाळेंत शिकवितांना तो विषयाशीं तन्मय कसा होणार ? संसारांत स्वतःची कुतरओढ होत असतांना तो आपला विद्यार्थी ध्येयवादी कसा बनविणार ? चोहोबाजूंनीं जिवाला वैतागलेल्या शिक्षकांत न्यूनगंड निर्माण झालेला असतो. समाजांतील प्रत्येक व्यक्ति आपल्यापेक्षां श्रेष्ठ आहे ह्या भावनेनं तो समाजापासून शक्य तों दूर राहण्याचा प्रयत्न करीत असतो. समाजाकडून होत असलेली आपली हेटाळणी निमूटपणें सहन करण्याशिवाय त्याला गत्यंतर नसतं. आपली खासगी शिकवणी टिकविण्याकरितां पालकांपुढं नमून असणं, त्यांच्या मुलांना परीक्षेंत अप्रामाणिकपणानं पास करून घेणं हें आजकालच्या शिक्षकाच्या आंगवळणीं पडलं आहे.

इतक्या अगतिकपणानं समाजाशीं वागत असलेल्या ह्या शिक्षकाला समाज मात्र सर्व ठिकाणीं कठोरपणानं वागवीत असतो. कलेक्टर कचेरींतल्या तीस रुपये पगार मिळविणाऱ्या कारकुनाला समाज ज्या मानानं वागवितो, कोर्टांतल्या चपराशापुढं देखील जो समाज अदबीनं वागतो, रस्त्यांतील डगलेवाल्यानं आपल्यावर हात उगारला असतां जो समाज त्याला आदरानं लवून मुजरा करतो तो समाज ह्या शिक्षकाला सदासर्वदा दूषण देण्यांतच भूषण मानीत असतो. ज्या ज्या ठिकाणीं शिक्षक भेटेल, त्या त्या ठिकाणीं तो एक चेष्टेचा विषयच होतो. शिक्षकाला व्यवहार नाहीं, शिक्षकाला चारचौघांत कसं वागावं हें समजत नाहीं, शिक्षक म्हणजे समाजांतला एक नालायख प्राणी आहे अशा तऱ्हेनं शिक्षकावर तोंडसुख घेण्यांतच समाज समाधान मानीत असतो. शिक्षणसंस्थांतून काम करणाऱ्या साध्या मराठी शाळेंतल्या शिक्षकापासून तो तहत कॉलेजांत शिक्षण देणाऱ्या प्राध्यापकापर्यंत कोणालाहि वाटेल त्या तऱ्हेनं फसविणं ही गोष्ट समाजांत सर्रास चालू असते. वर्तमानपत्रांतून येणारे शेंकडा नव्वद टक्के हास्यफवारे ह्या शिक्षकावर आधारलेले असतात. नाटकांतला विनोद नी सिनेमांतला हास्यरस मुख्यतः शिक्षकावर लादलेला

चावळटपणावर आधारलेला असतो. शिक्षकानं शाळेंत विद्यार्थ्यांना शिक्षा करणं ही गोष्ट आज समाजाला असह्य होते आहे. आपल्या मुलानं अभ्यास केला नाहीं असं एकाद्या शिक्षकानं पालकांना कळविणं हा त्या शिक्षकाचाच गुन्हा समजला जातो. परीक्षेंत विद्यार्थी नापास झाल्यास त्याचं खापर सुद्धां शिक्षकाच्या माथ्यावरच फोडलं जातं. अशा तऱ्हेनं समाज म्हणजे पालकवर्ग हा शिक्षकाला सर्व बाजूंनीं सतत नालायक ठरविण्याचा प्रयत्न करीत असतो.

शिक्षकासंबंधींच्या समाजाच्या नैतिक कल्पना फारच सोंवळ्या असतात. दारू पिऊन धुंद होणं हा पोलिस अधिकाऱ्याचा अक्षम्य गुन्हा असून तो त्या अधिकाऱ्याचा हक्क आहे असं समाज मानतो. धूम्रपान करणं, तमाशांत दौलतजादा करणं, वारयोषितांचे उंबरठे झिजविणं ह्या साऱ्या गोष्टी समाजांत उजळमाथ्यानं चाललेल्या असल्या तरी शिक्षकानं मात्र अगदीं सोवळं राहिलं पाहिजे हा समाजाचा आग्रह आहे. शिक्षकाचं आचरण शुद्ध असलं पाहिजे, शिक्षक प्रामाणिक असला पाहिजे, शिक्षक नम्र असला पाहिजे अशा पवित्र वागणुकीची शिक्षकाकडून अपेक्षा करणारा समाज शिक्षकाला त्याचं समाजांतलं मानाचं स्थान मात्र द्यायला तयार नाहीं. शिक्षकाकडून उच्च वातावरणाची अपेक्षा करणारा समाज स्वतःचं शिक्षकाबाबतचं धोरण मात्र अति हीन दर्जाचं ठेवतो ह्याचं मात्र वाईट वाटतं.

आपल्या शालेय वातावरणांत जरी शिक्षकाचं मानाचं स्थान स्थिर असतं तरी तेवढ्यावरहि शिक्षक संतुष्ट राहिला असता, पण शिक्षक त्याहि बाबतींत आज पूर्णपणें गांजला गेला आहे. विद्यार्थी नेमून दिलेला अभ्यास करीत नाहींत, शिक्षकाचा शाळेंत मान ठेवीत नाहींत, शिक्षकाला उद्धटपणानं उत्तरं देतात, इतकंच नव्हे तर विद्यार्थ्याला शासन करणं सुद्धां आजकाल शाळांतून शिक्षकाला अशक्य झालं आहे. शाळांतील विद्यार्थ्यांना आवरणं आज शिक्षकाच्या आवांक्याबाहेरची गोष्ट होऊन बसली आहे. विद्यार्थ्यांना आंजारून गोंजारून त्यांच्या पाठीवरून प्रेमानं हात फिरविणं, त्यांच्या मनांतील सुसंस्कारांचा सहजविकास करण्याचा

प्रयत्न करणं, आपण शिकवीत असलेल्या विषयांचा आविष्कार करतांना विद्यार्थ्यांचीं मनं आपल्याकडं आकर्षून घेणं हीं शिक्षणशास्त्रांतील मूलभूत तत्त्वं कितीहि आदर्श असलीं तरी आजकालच्या ध्येयशून्य शाळां-तून ह्या तत्त्वांचा उपयोग करणं आजच्या ह्या व्यापारी वृत्तीच्या शाळांतून अशक्य झालेलं आहे. शिक्षकाच्या परीक्षेच्या पाठाच्या दिवशीं विद्यार्थ्यांनीं आपल्या प्रश्नांना चांगल्या तऱ्हेनं उत्तरं द्यावीं, आपला पाठ यशस्वी करण्याकरितां विद्यार्थ्यांनीं आपल्याला मदत करावी म्हणून लिमलेटच्या गोळ्यांपासून तों परीक्षा झाल्याबद्दलच्या पेढ्यापर्यंत निरनिराळ्या आमिषांचीं विद्यार्थ्यांना वचनं देणं आज जरूर झालेलं आहे. गुरुबद्दल आदर बाळगणं, गुरूला पूज्यभावानं नमस्कार करणं, गुरूच्या आज्ञा पाळणं ह्या विद्यार्थ्यांच्या कर्तव्याची त्यांना जाणीवच नाहीं. उलट शिक्षक हा आपला शत्रु आहे, त्याला त्रास देणं हें आपलं कर्तव्य आहे, त्याच्याविरुद्ध बंड पुकारणं हें विद्यार्थ्यांचं भूषण आहे अशा आत्मघातकी कल्पनांचा विद्यार्थ्यांत प्रसार झाला असल्यानं आज शिक्षकाला वर्गांत पाय ठेवल्या-पासून खीरसलामत बाहेर पडेपर्यंत तारेवरचा नाच करावा लागतो. कॉलेजांत तर विद्यार्थ्यांच्या बेशिस्त वर्तनाचा कळस झालेला असतो. प्राध्यापक शिकवीत असतांना निरनिराळे आवाज करणं, एकदम टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करणं, प्राध्यापकांचं व्याख्यान चालू असतांना विद्या-र्थिनींच्यावर कागदाच्या बाणांचा वर्षाव करणं, वर्ग चालू असतांना केव्हांहि वर्गांतून निघून जाणं अशा ह्या विद्यालयीन वातावरणांतल्या गोष्टी पाहिल्या म्हणजे आज आपण कुणीकडे वाहवत चाललों आहोंत ह्याची स्पष्ट कल्पना येते. अशा तऱ्हेनं शिक्षकाला आज वर्गांतसुद्धां मानाचं स्थान राहिलेलं नाहीं.

शाळांतील मुख्याध्यापकांचा पारा तर सदासर्वदा कमालमर्यादेपर्यंत पोंचलेला असतो. पालकांनीं तक्रार केली विचार शिक्षकाला जाब, विद्यार्थ्यांनीं तक्रार केली कर शिक्षकाचा अपमान, शिक्षक आजारी म्हणून घरीं राहिल्यास घे त्याला शाळेंत बोलावून. हजेरी भरली नाहीं, फी भरली नाहीं, डायरी भरली नाहीं, नेमलेला अभ्यास पुरा केला नाहीं, पालकांकडे प्रगतिपुस्तकं पाठविलीं नाहींत, एक ना दोन! विचार

शिक्षक ह्या सर्व चक्रव्यूहांतून जातां जातां वर्गांत आपल्या शिकवणी कशा समरस होत असेल परमेश्वर जाणे! इतर शिक्षकांपेक्षां आपण कोणीतरी विशेष आहोंत अशा भावनेनं आपल्या हाताखालच्या शिक्षकांकडं हे मुख्या-ध्यापक नेहमीं तुच्छतेनंच पहात असतात. आजकालच्या मुख्याध्यापकांना विद्यार्थ्यांवर हुकमत गाजवणं अशक्य झालं आहे. पण गरीब बिचारा शिक्षक! महिन्याच्या महिन्याला मिळणाऱ्या जीवनवेतनावर नजर ठेवून मुख्याध्यापकाकडून होणारा वाटेल तो अपमान निमूटपणें सहन करीत असतो. हे मुख्याध्यापक, शिक्षक वर्गांत शिकवीत असतांना त्याला त्याच्या पाठांतले दोष विद्यार्थ्यांच्या देखत सांगत असतात. हल्लींच्या शिक्षणक्षेत्रांत पाठ यशस्वी करून दाखवणं कठिण जातं. मुख्याध्यापकांचा पाठ तर सर्व-साधारण शिक्षकाच्या पाठापेक्षां नेहमींच नीरस होतो. अधिकाराच्या तोऱ्यांत त्यांनीं शिक्षकाचा केलेला अपमान शिक्षकाला असह्य होतो. अशा वातावरणांत शिक्षकाचं विद्यार्थ्यांवर असलेलं थोडंबहुत वजनसुद्धां नाहींसं होत असल्यास तो दोष शिक्षकांचा नाहीं. शिवाय हल्लींच्या ह्या शिक्षणखात्यांतल्या चाकोरींत आपल्या गुणांचं चीज होण्याचा कोणताच मार्ग शिक्षकापुढं नसतो. इतर कोणत्याहि नोकरींत मन लावून काम करणाऱ्या व्यक्तीला, अगदीं खालच्या जागेपासून चढत चढत वरली मानाची जागा आपल्या कर्तबगारीवर मिळविणं शक्य असतं. पण शाळेंत शिक्षक म्हणून काम करणाऱ्यांना त्यांना मिळणाऱ्या ठरीव बढतींत कधींहि फरक होत नाहीं हें माहीत असल्यानं, कोणतीहि वरच्या अधिकाराची जागा नजरेपुढं नसल्यानं, रोजच्या कामांत विशेष उत्साहानं नी चढाओढीनं काम करण्याचं ध्येयच नसतं.

हल्लींचे शाळा तपासनीस तर 'इससे जादा!' शाळा तपासणीपेक्षां त्यांचं लक्ष शिक्षक आपली बडदास्त कशी राखतो इकडंच अधिक असतं. शिक्षकांची लायखी नालायखी ह्या तपासनिसाच्या शेऱ्यावर अवलंबून असल्यानं ह्या तपासनिसाला खूष करण्याकरितां शिक्षक आपल्या प्रयत्नांची शिकस्त करीत असतो. शिक्षक नालायख ठरविणं, सरकारी अगर स्थानिक संस्थांच्या शाळांतील शिक्षकांच्या बदल्या करणं, मदतशाळांना सरकार-कडून मिळणारी मदत कमी करणं, हे सारे अधिकार ह्या तपासनिसांच्या

हातीं असल्यानं, त्यांना शिक्षणसंस्थांतील अगदीं खालच्या दर्जाच्या शिक्षकापासून तो प्रत्यक्ष मुख्याध्यापकापर्यंत सारे लोक वचकून असतात. ह्यामुळं ह्या तपासनिसांत उत्पन्न झालेला अहंगंड अवर्णनीय असतो. शाळेची तपासणी करतांना हे तपासनीस आपल्या विद्वत्तेचं जें प्रदर्शन करितात तें पाहून हंसूच येतं. ह्या तपासनिसांचा, प्रत्यक्ष अभ्यासक्रमांतील कोणत्याच विषयाचा व्यासंग नसल्यानं शाळातपासणीच्या वेळीं त्यांनीं केलेल्या आपल्या अज्ञानाचं प्रदर्शन कींव करण्यासारखं असतं. पण हातीं अधिकार असल्यानं त्यांच्याविरुद्ध तोंडांतून ब्र काढण्याची सुद्धां सोय नसते. तपासलेल्या वह्यांतील चुका शिक्षकाला दाखीव, तो देत असलेला पाठ मध्येंच थांबवून आपणच तो पाठ पुरा करण्याचा आव आण, हा खर्च अवास्तव झाला, त्या खर्चावर सरकारी मदत मिळणार नाहीं, शाळेची प्रगति असमाधानकारक आहे, शाळेच्या विद्यार्थ्यांत शिस्त नाहीं, अशा तऱ्हेनं शाळाचालकांचे व शिक्षकांचे दोष दाखवीत बसण्यांतच हे अधिकारी सतत आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करीत असलेले दिसतात.

अशा ह्या चौफेर माऱ्यानं शिक्षकाची सर्व बाजूंनीं कुचंबणा झालेली आहे. समाधानाला कुठंच जागा नसल्यानं सभोंवतालचं वातावरण शिक्षकाला असह्य झालेलं आहे. अशा ह्या निराश वातावरणांत बालमनविकासाची आबाळ होणं अटळ आहे. आज विद्यार्थ्यांना अभ्यासाबद्दल प्रेम नाहीं, पालकांना शिक्षणाची जरुरी वाटत नाहीं, शिक्षकांना शिक्षणांत आत्मीयता निर्माण करितां येत नाहीं. शाळेला यंत्राचं स्वरूप आल्यानं शिक्षक हा ह्या विद्यादानाच्या कारखान्यांतला एक कलाहीन मजूर झाला आहे. आपल्या हिंदुस्थानांत प्राथमिक शिक्षकांचा झालेला संप हें जगाच्या पाटीवर शिक्षणक्षेत्रांतलं पहिलंच उदाहरण असावं. शिक्षकांनीं संप करून निष्पाप बालमनावर केलेल्या ह्या आघाताला जगाच्या इतिहासांत दुसरा दाखलाच नाहीं. सरकार आमची काळजी घेत नाहीं, पालक आमच्याबद्दल बेफिकीर आहेत, विद्यार्थी आमची किंमत ठेवीत नाहींत, अशा परिस्थितींत आम्ही तरी समाजाची कदर कां करावी असा त्यांचा दावा आहे. संप झाला नी गेला. ह्या संपामुळं शिक्षकांच्या वेतनांत फिसपत फरक पडला ह्याचा

विचार थोडा वेळ बाजूला ठेवला तरी असहाय परिस्थितींत शिक्षकाला दुसरा कोणताच मार्ग नसल्यानं नाइलाज म्हणून ह्या संपशस्त्राचा आधार घेणं भाग पडलं. हा संप करतांना शिक्षकांनीं, शाळेंतील आपलं काम स्वार्थनिरपेक्षतेनं चालू ठेवून, महिन्याचं वेतन उचललं नसतं आणि फक्त वेतन न घेण्यापुरताच संप पुकारला असता तर त्यांच्या त्यागी वृत्तीच्या संपाला विशेष महत्त्व आलं असतं. विद्यार्थ्यांच्या बालमनाला शिकवण देत राहून आपल्या जीवनाकरितां समाजाची मदत मागण्यांत बुद्धिवाद्यांचा परंपरागत मोठेपणा अधिकच उज्ज्वल झाला असता.

पण मजूरसंघटनेच्या पावलावर पाऊल टाकून शिक्षकांनीं घेतलेल्या ह्या मजूरभूमिकेचे दुष्परिणाम यापुढं चांगलेच जाणवणार आहेत. आज ह्या संपामुळं शिक्षक मुख्याध्यापकांना जुमानीतनासे झाले आहेत. शाळेंत जाऊन वर्गात वर्तमानपत्रं वाचीत बसावं, आपल्याला वाटेल त्यावेळीं वर्ग सोडून निघून जावं, वेळीं अवेळीं वर्ग मोकळा सोडावा, अशा तऱ्हेचे बेशिस्त प्रकार शाळांतून आतांच सुरू आहेत. अशा ह्या भयाण परिस्थितींतून आर्यावर्तातील बालमनांची उठावणी करणं अशक्य आहे. योग्य वेळींच ह्या शिक्षकांच्या धोरणांत फरक न पडल्यास शाळांना मंडईचं स्वरूप आल्याशिवाय राहणार नाहीं. कवायतीच्या मैदानावर शिपायांना शिस्तीचं पालन करायला लावणं ही सोपी गोष्ट आहे. गिरणीमजुरांकडून गिरण्यांतून काम करवून घेणं अवघड नाहीं. उसळलेला समाज आवरणं ही गोष्ट सुद्धां सशस्त्र सैनिकांना सहजसाध्य आहे. कारण वरील गोष्टींत जीवनवेतनाचा किंवा प्रत्यक्ष जीविताच्या सुरक्षिततेचा प्रश्न उत्पन्न होतो. पण शाळेंत जीवनवेतन किंवा जीविताची सुरक्षितता हे दोन्ही प्रश्न उत्पन्न होत नसल्यानं भडकलेल्या विद्यार्थ्यांच्या भावना आटोक्यांत आणणं भयंकर अवघड आहे. ही गोष्ट फक्त मनाच्या मिलाफावरच साधतां येते. बालमनांच्या उफाळलेल्या भावनांवर सत्प्रवृत्तींचा मारा करूनच त्यांना आवरणं शक्य असतं. अशा वेळीं शिक्षकांच्या मनांतच हें सामर्थ्य नसेल, ह्या बुद्धिवाद्यांची वृत्ति कामकऱ्यांच्या वृत्तीशीं एकजीव झाली असेल तर विद्यार्थीजीवनाचं तारूं अनवस्थेकडंच वाहवत जाईल आणि मग ह्या बालमनावर ताबा मिळविणं प्रत्यक्ष परमेश्वराला सुद्धां शक्य होणार नाहीं.

गुलामगिरीच्या वातावरणांत चोहोंबाजूंनीं गांजला गेलेला आजचा शिक्षक हवालदिल झालेला आहे. समाजांतील त्याचं स्थान आज निकृष्टा-वस्थेला पोंचलं आहे, महिन्याच्या महिन्याला त्याच्या हातीं पडणारा पगार पुढल्या तारखेपर्यंत कसा पुरवावा ह्या विवंचनेनं त्याची प्रकृति खाल-वलेली आहे. अशा परिस्थितींत सुद्धां आपण निस्वार्थीपणानं समाजसेवा करीत आहोंत हें समाधान जर त्याला मिळालं असतं तर आहे त्या दारिद्र्यांत त्याला थोडं तरी बरं वाटलं असतं. पण शाळांतून आपल्या-समोर बसणाऱ्या मुलांना आपण काय शिकवतों आहोंत, कशाकरितां शिकवतों आहोंत ह्याची त्याची त्यालाच पूर्ण कल्पना नसल्यानं पाय नेतील तिकडं जाणाऱ्या वाट चुकलेल्या वाटसराप्रमाणं तो मरण येईपर्यंत नाइलाज म्हणून जगतो आहे. शिक्षकाकडं पाहण्याची समाजाची दृष्टि इतकी बेमुर्वतखोर झाली आहे कीं समाजांतील कोणत्याहि व्यक्तीपुढं एक-दोन मिनिटं उभं राहून वर मान करून बोलण्याची सुद्धां शिक्षकाची छाती नाहीं. गिरणींत साच्यावर काम करणारा मजूर, टपाल वाटणारा टपाल-वाला, डोक्यावर ओझ्याच्या टोपल्या वाहणारा हमाल ह्यांना आज समा-जांत जो मान आहे तेवढा सुद्धां मान शिक्षकाला नाहीं. शाळेचे अधिकारी शिक्षकाला वाटेल तसे टाकून बोलतात, विद्या शिकण्याकरितां समोर बसलेले विद्यार्थी त्याचा अपमान करितात, मास्तरना व्यवहारज्ञान नसतं अशी साऱ्या समाजाची भावना असते. अशा परिस्थितींत शिक्ष-काला शिक्षक म्हणून जिवंत राहण्यापेक्षां मेलेलं परवडलं, असं वाटत असल्यास नवल नाहीं. बालमनाला शिक्षण देण्यांत आपल्याला आनंद होतो म्हणून नव्हे, शिक्षकाचा धंदा पवित्र आहे म्हणून नव्हे, समाजाची पुढली बलशाली पिढी निर्माण करण्याच्या ध्येयवादानं नव्हे, तर नाइलाज म्हणून जगांत इतर कोणत्याहि ठिकाणीं काम करण्याची लायखी नाहीं म्हणून, आपला जीव जगवणं जरूर आहे अशा निराश मनस्थितींत शिक्षक काम करीत असतो. अशा वेळीं शिक्षकाचं दारिद्र्य कमी करून, समाजांतील त्यांचं मानाचं स्थान परत मिळवून देऊन, त्यांना समाजानं आपल्या कर्तव्याची जाणीव दिल्यास त्यांचीं भडकलेलीं मनं स्थिर होतील आणि मग समाजांतील बालमनं सुसंस्कृत करण्याचं कार्य शांत चित्तानं त्यांनीं

आपल्या हातीं घेतल्यास शाळांचं पावित्र्य परत येईल, विद्यार्थी ध्येयवादी बनेल, आणि आपल्या आर्यावर्ताचं नष्टचर्य संपून पुढली पिढी आदर्श बनेल.

आतांपर्यंत आपण गतकालाचं संपूर्ण विवेचन केलं. आज ह्या काल-खंडांत, आर्यावर्तातील समाज कोणत्या परिस्थितींत वावरतो आहे ह्याचं यथायोग्य दिग्दर्शन झालं. आपल्या आर्यावर्ताची योग्य उठावणी करण्याकरितां यापुढं आपल्याला कोणतं दिव्य करावं लागणार आहे ह्याची निश्चित कल्पना येण्याकरितां आपलं हें विवेचन आपल्याला उपयोगी पडणार आहे. कोणत्याहि राष्ट्राचं उत्थापन त्या त्या राष्ट्रांतील बाल-गोपालांच्या मानसिक ध्येयनिष्ठेवरच अवलंबून असतं हें तत्त्व एकदां पटल्यानंतर तें साध्य करण्याकरितां कायावाचामनानं यत्न करणं आपल्या हातीं आहे. गतकालाच्या व आजच्या समाजांतील आंदोलनांच्या अभ्यासानं आपल्याला एवढं निश्चित म्हणतां येईल कीं ज्या ज्या वेळीं समाजांतील बाल-मनांकडं आणि त्यांच्या शिक्षकांकडं समाजाचं दुर्लक्ष झालं त्या त्या वेळीं समाज खालीं घसरला आणि उलट खालीं घसरलेल्या समाजाची उन्नति साधण्याचं कार्य ज्या ज्या वेळीं समाजानं हातीं घेतलं त्या त्या वेळीं बाल-मनांच्या शिस्तीच्या उठावणींतूनच समाज परत प्रगतीकडं खेचला गेला. हें बालमनविकासाचं धोरण एकदां निश्चित झाल्यानंतर यापुढं आर्यावर्ताचं स्थान मानवीसमाजाच्या इतिहासांत अढळ करण्याकरितां आपण कोणता मार्ग निश्चित केला पाहिजे हें आपल्याला ठरवायचं आहे. ह्या बालमन-विकासाकरितां उत्कृष्ट शिक्षक नेमणं, त्यांना भरपूर वेतन देणं हा मार्ग जरी सकृद्दर्शनीं डोळ्यासमोर उभा राहिला तरी पूर्ण विचाराअंतीं एवढ्यानं भागणार नाहीं, असंच आपल्याला वाटेल. कितीहि जास्त वेतन मिळालं तरी त्यानं कुणाचंच समाधान होत नाहीं. समाजाची सुस्थिति ही समाजांतील कार्यकर्त्यांच्या पगारवाढीवर अवलंबून नसून त्यांच्या आत्मनिरपेक्ष कर्तव्य-निष्ठेवरच अवलंबून असते.

समाजांत ह्या कर्तव्यजागृतीच्या ध्येयाचा योग्य मार्गानं विकास करा-यचा झाल्यास यापुढं आपण काय केलं पाहिजे ह्याची स्पष्ट कल्पना आपल्या पुढल्या म्हणजे उद्यांच्या कालखंडांत मांडली जाईल. ही कल्पना देतांना मांडली जाणारी विचारसरणी समाजानं मानलीच पाहिजे असा

बिलकुल आग्रह नाहीं. जें आवडतं तें घ्या, जें पटत नसेल तें विसरून जा. पण ध्येयनिष्ठेनं आपण सारेजण मिळून कार्याला लागूं या. राष्ट्रीय सभेची विचारसरणी बरोबर नाहीं. लीगची मांडणी हटवादीपणाची आहे. हिंदुमहासभेची वृत्ति संकुचित आहे. समाजसत्तावाद्यांचं धोरण हिंदुस्थानला रुचणार नाहीं, अशी प्रत्येक विचारसरणीवर, सहज शिळो-प्याच्या गप्पांच्या वेळीं टीका करणं सोपं आहे. समाजांतील एक साधी व्यक्ति, निरनिराळ्या स्वयंतेजानं झळाळणाऱ्या आदर्श व्यक्तींवर मन मानेल त्याप्रमाणं तोंडसुख घेत असलेली पाहिली म्हणजे त्या व्यक्तीची कींव करावीशी वाटते. आधीं बरेच दिवस परिस्थितीचा अभ्यास करून निरनिराळ्या मतप्रणालींतील श्रेष्ठ विभूतींनीं कार्याला सुरवात केली. मार्गांत अडचणींचे डोंगर उभे असतांनासुद्धां न डगमगतां आत्मविश्वासानं ते सतत कार्य करीत राहिले. वेगवेगळ्या पक्षप्रमुखांचे मार्ग वेगळे असले तरी ध्येय मात्र समाजाची सुस्थिति हेंच आहे. सर्वांनाच पक्षप्रमुख होतां येत नाहीं हें मान्य आहे. पण ह्या सर्व आदर्श विभूतींना नुसतीं नांवं ठेवीत बसण्यापेक्षां आपल्याला जी विचारसरणी खरोखर पटत असेल त्या विचारसरणीच्या अनुरोधानं आपापल्या मगदुराप्रमाणं कार्य-प्रवृत्त होऊं या. विरोधी विचारसरणीवर टीका करण्याला खरं महत्त्व नसून, पटलेल्या विचारसरणीबरहुकूम कार्य करीत राहण्याला खरं महत्त्व आहे, एवढी एकच गोष्ट आपण नजरेपुढं ठेवूं या.

---

# १५ : उद्याचा त्याग

आतां तिसऱ्या आणि सर्वांत महत्त्वाच्या कालखंडाला सुरवात होईल. पहिल्या कालखंडांत आर्यावर्तातील गतकालाचं विवेचन झालं. दुसऱ्या कालखंडांत सद्य:परिस्थितीचा सूक्ष्म अभ्यास झाला. आर्यावर्तातील आजच्या समाजानं यापुढील म्हणजे उद्याच्या कालखंडांत कसं वागायला पाहिजे ह्याचा यापुढं आपल्याला समतोल मनानं विचार करायचा आहे. विचारांची दिशा एकदां ठरल्यावर त्या दिशेच्या अनुरोधानं नवीन विचारसरणी मांडल्यास ती विचारसरणी मानवीमनाला पटल्याशिवाय राहणार नाहीं. आज मानवीमनाचा दृष्टिकोन, पाश्चात्यांच्या यंत्रनिष्ठेनं, आधिभौतिक तत्त्वज्ञानाच्या दिमाखानं आणि स्वार्थावर उभारलेल्या विचारसरणीनं अतिशय संकुचित झाला असल्यानं ही नवी विचारसरणी जरी क्षणभर अशक्यप्राय वाटण्याचा बराच संभव असला तरी मानवी-समाजाच्या अंतिम हिताच्या दृष्टीनं हीच विचारसरणी फलद्रूप होण्याची खात्री सूक्ष्म विचाराअंतीं प्रत्येक विचारवंताला वाटेल.

आज सारे पाश्चिमात्य देश आपल्या राष्ट्राचं आधिभौतिक श्रेष्ठत्व सिद्ध करण्याकरितां नव्या नव्या शोधांच्या प्राप्तीसाठीं तळमळताहेत. निरनिराळ्या राष्ट्रांतील तत्त्वसंशोधक अहमहमिकेनं, तहानभूक विसरून, नव्या सामर्थ्यवान शोधांच्या प्रयोगांत गुंगून गेले आहेत. आतां मिळा-लेला शांततेचा काळ फारच थोडा वेळ टिकणारा आहे अशी साऱ्या राष्ट्रांतील नेत्यांची बालंबाल खात्री झालेली आहे. रशियाला अणुतत्त्वाचा शोध लागला अगर रशियन शास्त्रज्ञांनीं अणुसामर्थ्यावरील एकादा उतारा शोधून काढला तर सारा युरोपखंड रशियन तत्त्वज्ञानानं भारला जाऊन रशियाच्या नेतृत्वाखालीं अमेरिकाखंडाविरुद्ध अभेद्य आघाडी उभी करील कीं काय अशी काळजी राष्ट्राराष्ट्रांतून डोकावूं लागली आहे. अशी वेळ आल्यास युरोपांतील सारीं छोटींछोटीं राष्ट्रं स्वेच्छेनं अगर अनिच्छेनं

सत्वाला, स्वातंत्र्याला आणि स्वाभिमानाला पारखीं होऊन निमूटपणें रशियन तत्त्वज्ञानापुढं मान लववितील अशी आजची परिस्थिति आहे. त्यांनीं तशी विनतक्रार मान झुकवली नाहीं तर रशियाला तीं राष्ट्रं आपल्या सामर्थ्याच्या जोरावर आत्मसात् करावीं लागतील. म्हणजे कोणत्याहि परिस्थितींत ह्या छोट्या राष्ट्रांचं पुढील दहापांच वर्षांत स्वतंत्र अस्तित्व राहणार नाहीं ही गोष्ट मात्र सत्य आहे. ह्याचा अर्थ जगाच्या पाठीवरील सारीं छोटीं छोटीं राष्ट्रं नामशेष होऊन प्रचंड प्रमाणावर खंडराज्यंच अस्तित्वांत येतील. अखेर एकछत्री सत्ता स्थापन करण्याकरितां ह्या खंडाखंडांच्या लढाया होतील. ह्या युद्धांचा शेवटसुद्धां एका खंडाचा जय व दुसऱ्याचा पराजय असाच लागणं अपरिहार्य आहे. अशा तऱ्हेनं खंडाखंडांतील युद्धांचा शेवट होऊन पृथ्वीवर कोणत्या तरी एका विचारसरणीचा विजय झाल्यावर तरी जगांत सुख नी शांतता नांदेलच अशी खात्री नाहीं. पृथ्वीवरील मानवीसमाजांत शास्ते नी शासित असे जे दोन भाग पडतील त्यांत मतभेद उत्पन्न होऊन पुन्हा मतांमतांतील भांडणं विकोपाला जातील ही भीति आज अखिल मानवजातीपुढं उभी आहे.

स्वयंपूर्ण, स्वयंशासित आणि स्वसंतुष्ट राष्ट्रांचा जगांत उदय झाल्याखेरीज हीं जगांतील सर्वसंहारक युद्धं थांबणं अशक्य आहे ह्या विचारसरणीवर आजचं आर्यावर्तातील राज्य सुरू झालं आहे. स्वतःची मानसिक उन्नति साधून जागतिक मानवजातीशीं प्रेमानं वागायचं आणि आपल्यासकट जगावरील लहानथोर ज्ञानीअज्ञानी मानवजातीला सुखी करण्याचं ध्येय आजच्या हिंदुस्थानांतील ज्ञात्यांच्या नजरेपुढं आहे. आज निःशस्त्र हिंदुस्थाननं स्वातंत्र्य मिळविलं, तें आत्मसात् केलं नी पाशवी शक्तीवर मात केली, हें जगाला स्पष्ट कळून चुकलं आहे. हें स्वातंत्र्य मिळविण्याकरितां हिंदुस्थाननं मशीनगन्सचे कारखाने काढले नाहींत, विमानांतून बॉम्बवर्षाव केला नाहीं, रॅकेटसूच्या सहाय्यानं शत्रुराष्ट्रांतील मानवतेचा अमानुषपणानं संहार पण केला नाहीं. उलट आर्यावर्तातील नेत्यांनीं शत्रूंवर प्रेमाचाच वर्षाव केला. आपल्याला ज्यांनीं आजवर गुलाम म्हणून वागविलं त्यांच्या अज्ञानाची कींव करून 'परमेश्वरा, त्यांना क्षमा कर. कारण ते काय करताहेत ह्याची त्यांनाच

जाणीव नाहीं, ' अशीच परमेश्वराजवळ आपल्या शत्रूंच्या वतीनं प्रार्थना केली. सत्याचा मात्र आग्रह धरिला. मनानं सुद्धां शत्रूची कधीं हिंसा केली नाहीं. आपल्यावर जुलूम करणाऱ्या शास्त्यांच्या मनांत बदल घडवून आणण्याकरितां स्वतः देहदंड भोगला. आत्मशुद्धीनं जेत्यांचीं मनं जिंकलीं. हा मानसिक विजय जगाच्या इतिहासांत अद्वितीय आहे. ह्याच मानसिक विजयाच्या शुद्ध भूमिकेवरून हिंदुस्थानांतील आदर्श नेते परचक्राच्या आक्रमणाला तोडीस तोड अशी स्वराष्ट्रीयांची आघाडी निर्माण करून आणि त्याचवेळीं स्वतः परराष्ट्रावर आक्रमण करण्याचं मनांत सुद्धां न आणतां त्यांना आपल्याचप्रमाणं सामर्थ्यवान बनविण्याच्या ध्येयानं, मानवजातीची अभिनव मांडणी करण्याला आज तयार झाले आहेत. ह्या नव्या तत्त्वाला तनमनधनानं हातभार लावणं हें प्रत्येक हिंदवी व्यक्तीचं आद्यकर्तव्य आहे. ही आपल्यावरील सर्वश्रेष्ठ जबाबदारी पार पाडण्याकरितां आपण सर्वांनीं काय केलं पाहिजे ह्याचा आतां विचार करूं या.

आपलं गेलेलं स्वातंत्र्य परत मिळविण्याकरितां आपल्या नेत्यांनीं घरादारावर अक्षत ठेविली, वैयक्तिक स्वार्थावर लाथ मारली, प्राणांची खैरात केली. ह्याच स्वातंत्र्याच्या प्राप्तीकरितां हिंदवीसमाजानं सुद्धां बराच त्याग केला आहे. आपण ह्या सर्व गोष्टी स्वातंत्र्यप्राप्तीकरितां केल्या. पण आज आपल्याला स्वातंत्र्य मिळालं असल्यानं यापुढं त्यागाचं निशाण हातीं घेण्याची आपल्याला जरुरी नाहीं अशी विचारसरणी, आपण स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असतांनाच आपल्यांत फोफावूं लागली. आपण आपल्या मानसिक सामर्थ्याच्या जोरावर जें स्वातंत्र्य आज मिळवूं शकलों तें स्वातंत्र्य जर आपल्याला कायम टिकवायचं असेल तर ज्या विचारसरणीच्या जोरावर आपण हें स्वातंत्र्य मिळविलं त्या विचारसरणीचा फैलाव करून, आपल्याचप्रमाणं स्वातंत्र्य मिळविण्याच्या किंवा असलेलं स्वातंत्र्य टिकविण्याच्या प्रयत्नांत असलेल्या जगांतील इतर छोट्यामोठ्या राष्ट्रांना आपल्या उदाहरणानं योग्य मार्गदर्शन करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. आपल्याला स्वातंत्र्य मिळतांच जर आपण इतर मानवजातीवर आपल्यावर पूर्वी होत असलेल्या [illegible]प्रमाणंच जुलूम करूं

लागलों तर आपली ही नवी विचारसरणी फक्त आपल्या अडीअडचणी-पुरतीच होती असा आरोप आपल्यावर केला जाईल. अखिल मानव-जातीच्या कल्याणाकरितां नव्या जागतिक तत्त्वज्ञानाची जी अभूतपूर्व उठावणी आपल्याला करावयाची आहे तिचा अंकुर दिसूं लागतो, न लागतो इतक्यांतच तो खुडून टाकण्यानं इतरांच्या हिताची आणि त्याच्या-बरोबरच स्वतःच्या हिताची सुद्धां राखरांगोळीच होणार आहे. म्हणून आज-पर्यंत चाळीस कोटि हिंदवासीयांच्या स्वातंत्र्याकरितां आपण जो त्याग केला त्या मानानं अखिल मानवजातीच्या हिताकरितां जो त्याग यापुढं आपल्याला करावा लागणार आहे तो त्याग कितीतरी पटीनं अधिक आहे.

सामर्थ्यटिकावाच्या ( Survival of the Fittest ) तत्त्वाचा आज आपल्याला नव्या अर्थानं प्रचार करावयाचा आहे. बलवान समाजच ह्या पृथ्वीवर जिवंत रहायला योग्य आहे, म्हणजे बलवान समाजानं दुर्बलां-वर अतिक्रमण करावं, त्यांना आपले गुलाम बनवावं, वेळ पडल्यास त्यांना पृथ्वीच्या पाठीवरून नामशेष करून टाकावं ह्या अर्थानं हें सामर्थ्य-टिकावाचं तत्त्व जगावर फक्त एक व्यक्ति शिल्लक राहीपर्यंत अपूर्णच राहील. ह्याच्या ऐवजीं पृथ्वीच्या पाटीवरील बलवान समाजानं, स्वतःच्या उदाहरणानं, जगांतील साऱ्या दुबळ्या समाजांना आणि व्यक्तींना बल-शाली होण्याची शिकवण देऊन त्यांनाहि आपल्याचप्रमाणं बलवान बनविण्याचं श्रेय घेतलं तर सारे समाज नी साऱ्या व्यक्ती बलवान होऊन सामर्थ्य टिकावाचं हें तत्त्व अपूर्ण न राहतां खऱ्याखुऱ्या अर्थानं पूर्ण होईल. **जें जें आपणासि ठावें। तें तें इतरांसि शिकवावें। शहाणे करूनि सोडावे। सकळजन ॥** ह्या स्वामींच्या उपदेशाप्रमाणं अखिल मानवीसमाजाला सामर्थ्यवान बनवून साऱ्यांनाच सारख्या हक्कानं ह्या पृथ्वीच्या पाठीवर प्रेमानं, बरोबरीनं, मित्रत्वाच्या नात्यानं नी गुण्या-गोविंदानं नांदतां येईल ह्या विचारसरणीची सत्यता आपल्याला जागतिक समाजाला पटवून द्यायची आहे. ह्या प्रचंड कार्याकरितां आपल्याला करावा लागणारा त्यागहि तितकाच प्रचंड असला पाहिजे.

आजच्या आर्यावर्तांतील समाजाला त्यागाचे धडे देणं म्हणजे हातीं दिवा घेऊन सूर्य दाखविण्याइतकंच हास्यास्पद आहे. तरी पण त्यागा-

संबंधींचं पुनःपुनः विवेचन केल्यानं आपल्या हिंदवासीयांचं त्यागाचं तत्त्व अधिक पक्कं होईल, अधिक उज्ज्वल होईल, अधिक सामर्थ्यवान होईल. प्रथमतः समाजांतील बुद्धिवाद्यांनीं आपल्या बुद्धीचा त्याग केला पाहिजे. बुद्धीचा त्याग करायचा मार्ग अगदीं वेगळा आहे. आधीं आपल्या बुद्धीचं सामर्थ्य जितकं वाढवितां येईल तितकं वाढवून बुद्धीचा परमोच्च बिंदु गांठायचा आणि मग ह्या बुद्धीचा उपयोग फक्त मानवीसमाजाच्या हिताकरितां, मानवीसमाजाच्या प्रगतीकरितां, मानवीसमाजाच्या सुखशांतीकरितां आमरण करायचा. हाच सर्वश्रेष्ठ त्यागाचा उत्कृष्ट नमुना आहे. हा त्याग करणं अतिशय अवघडहि आहे.

वेदकालीन कालखंड सोडल्यास आपल्याला त्यानंतरच्या प्रत्येक कालखंडांत असंच आढळून आलं आहे कीं बुद्धिवाद्यांचा समाजानं कितीहि हेवा केला, बुद्धिवाद्यांना खालीं ओढण्याचे कितीहि प्रयत्न झाले, ह्या अल्पसंख्याक बुद्धिवाद्यांचे समाजानं कितीहि हाल केले तरी ह्या मूठभर बुद्धिवादी समाजानं साऱ्या बहुसंख्य समाजावर आपलं वर्चस्व आजवर कायम ठेवलं आहे. जगांत सदासर्वकाळ बुद्धिवाद्यांचीच सत्ता नांदत आली आहे. वैदिक काळांतसुद्धां हे बुद्धिवादीच समाजाचे अग्रणी होते. पण त्यावेळच्या बुद्धिवाद्यांनीं आपण समाजसमुद्रांत मिसळून जाऊन आपल्या प्रचंड त्यागानं समाजाला योग्य वळण लावलं.

अशाच तऱ्हेचे बुद्धिवादी त्यागसम्राट विसाव्या शतकांतील नव्या हिंदवीसमाजांत निर्माण झाले पाहिजेत. आज आर्यावर्तांतील सर्व बुद्धिवाद्यांनीं प्राचीनकालच्या ऋषिमुनींप्रमाणं अलौकिक मानसिक सामर्थ्याची आराधना करून, त्या आपल्या सामर्थ्याच्या जोरावर अखिल मानवजातीला प्रगतीची पवित्र शिकवण, स्वतः बाजूला राहून, दिली पाहिजे. साऱ्या अधिकाराच्या जागा स्वखुषीनं, प्रेमानं नी नम्रपणानं समाजाच्या हवालीं करून त्यांनीं निःपक्षपाती सल्लागाराची भूमिका आपल्याकडं घेतली पाहिजे. शासनकर्त्यांना कोणतीहि अडचण आली तरी त्या अडचणींतून बाहेर पडण्याचं योग्य मार्गदर्शन करण्याचं निस्वार्थी व्रत त्यांनीं स्वीकारलं पाहिजे. साऱ्या समाजांतील बालमनं तयार करण्याचं काम निर्हेतुक बुद्धीनं त्यांनीं केलं पाहिजे. आपलं मन कोणत्याहि स्वार्थानं विचलित

होऊं नये म्हणून त्यांनीं समाजांतल्या अगदीं तळच्या वर्गाला मिळत असलेल्या अन्नवस्त्रावर तृप्त राहून आमरण समाजसेवेचं असिधाराव्रत आचरणांत आणण्याची शपथ घेतली पाहिजे. ह्या बुद्धिवाद्यांच्या कुटुंबीयांची जबाबदारी शास्त्यांनीं आपल्याकडं घेतली म्हणजे ह्या बुद्धिवाद्यांना ह्या जगांत मानसिक सामर्थ्याच्या जोरावर स्वतः अज्ञात राहून समाजसेवेचं जें कार्य करतां येईल त्या कार्याला जगाच्या पाठीवर दुसरी तोडच मिळणार नाहीं.

पैशाच्या, कीर्तीच्या, अधिकाराच्या कोणत्याहि स्वार्थी कल्पना ह्या नव्या घटनेंत शक्य नसल्यानं ह्या बुद्धिवाद्यांचा सल्ला सतत नैतिक बंधनावर आधारला जाऊन समाजाच्या अंतिम हिताला पोषकच होत राहील. बुद्धिवाद्यांच्या ह्या त्यागाबरोबर त्यांचा साधला जाणारा स्वार्थ फारच उच्च दर्जाचा आहे. मानसिक एकान्त साधण्यांत त्यांच्या सामर्थ्याची जी उठावणी होईल ती कोणत्याहि सामर्थ्याला खालीं पहायला लावील. एकदां मनाचं सामर्थ्य निर्माण झाल्यावर त्याच्या जोरावर त्यांना सारा समाज आपलासा करतां येईल, समाजावर प्रेमाची हुकमत गाजवितां येईल. सारा समाज त्यांच्याकडं सतत आदरानंच पहात राहील. याहिपेक्षां मोठा स्वार्थ म्हणजे मानसिक एकतानतेंत राहून त्यांना जें आत्यंतिक सुख मिळेल तें सुख समाजांतील कोणत्याहि सामान्य व्यक्तीच्या कधींहि अनुभवाला येणार नाहीं. एकदां कां हा बुद्धिवादी समाज ह्या आत्यंतिक सुखावर अधिष्ठित झाला कीं ह्या जगांतील सारीं सुखं, सारं ऐश्वर्य, सारा अधिकार त्याला तुच्छ वाटूं लागेल. उंची कपड्यालत्यांत जें सुख नाहीं, स्वतःच्या मालकीच्या मोटरी उडविण्यांत जें सुख नाहीं, समाजांतील ऐहिक मानमरातबांत सुद्धां जें सुख कधींहि अनुभवायला मिळणार नाहीं, अशा तऱ्हेच्या चिरंतनसुखाचा हा बुद्धिवादी समाज एकमेव भोक्ता झाल्यानं जो कधींहि कोणालाहि साधतां येणार नाहीं अशा तऱ्हेचा श्रेष्ठ स्वार्थ साधतां साधतां परार्थ म्हणजे समाजहित साधतांना ह्या बुद्धिवादी समाजाला जो आनंद होईल तो आनंद बिनतोडच राहील. ह्यानंतर समाजांतील सत्ताधारी लोकांच्या त्यागाचा आपल्याला विचार करावा लागेल. कोणत्याहि समाजांत बुद्धिवाद्यांनीं घालून दिलेल्या

शासननियमांची अम्मलबजावणी ह्या सत्ताधारी लोकांकडं असते. समाजाला असत्प्रवृत्तीपासून परावृत्त करणं, समाजानंच समाजाच्या सुस्थितीकरितां केलेले कायदे समाजाला पाळायला लावणं, निर्बंध धाब्यावर बसविणाऱ्या कोणत्याहि व्यक्तीला निर्विकारमनानं न्यायासनासमोर खेचणं हीं कामं ह्या सत्ताधाऱ्यांचीं असतात. समाजांतील सत्प्रवृत्त लोकांचं समाजांतील असत्प्रवृत्त लोकांपासून रक्षण करण्याची जबाबदारी ह्या अधिकाऱ्यांची असते. ह्या अधिकाऱ्यांना समाजावर अनिर्बंध हुकमत गाजवितां यावी म्हणून समाजाला शासन करण्याचे साध्या लाठीमारापासून तो गोळीबारापर्यंतचे सर्वाधिकार ह्यांना समाजानं दिलेले असतात.

दुर्दैवानं आजच्या समाजांत ह्या अधिकारीवर्गाकडून आपल्या सत्तेचा स्वार्थांधतेनं दुरुपयोगच केला गेलेला आढळतो. सज्जनांचा प्रतिपाळ करण्याचं आपलं व्रत पाळण्याऐवजीं हे स्वार्थी अधिकारी आमिषाच्या आशेनं नेहमीं दुर्जनांनाच पाठीशीं घालीत असलेले दृष्टीस पडतात. आजकालचा नव्वद टक्के अधिकारीवर्ग लाचलुचपतीला आळा घालण्याऐवजीं स्वतःच लाचलुचपतीला लालचावलेला असतो. जगांत होणाऱ्या अन्यायावर दडपण आणण्याऐवजीं अन्यायानं स्वार्थ साधण्याच्या प्रयत्नांत चोवीस तास डुबून गेलेले हे अधिकारी पाहिले म्हणजे समाजांत अधिकारी नसतील तर समाज अधिक सुखानं नांदेल असं वाटूं लागतं. अनीतीनं अंतर्बाह्य पोखरलेल्या ह्या अधिकाऱ्याच्या मनावरील अनीतीचं दडपण इतकं असह्य झालेलं असतं कीं ह्या मनाच्या आंतरिक बोचण्या कायमच्या गाडून टाकण्याकरितां त्याला मनावर मद्याचा मारा करावा लागतो. दारूनं धुंद असलेल्या ह्या अधिकाऱ्यांना मासमच्छराची खंत नसते. अशा तऱ्हेनं चोवीस तास अनीतीच्या खातेऱ्यांत लोळणारे आजचे स्वार्थी अधिकारी समाजाला डोईजड झालेले आहेत. ह्यांच्या अनीतीला आळा घालण्याकरितां जितके जितके कडक कायदे केले जातात तितका तितका हा अधिकारीवर्ग अधिकाधिकच बेकायदेशीर बनत जातो. न्यायान्यायाचे, धूळफेकीचे, पळवाटीचे सारे भले-बुरे कायदे ह्यांना परिपूर्ण माहीत असल्यानं कोणत्याहि कायद्याच्या कचाट्यांत न सांपडतां आपल्या वैयक्तिक मालकीची पोतडी भरभक्क-

हिरांनीं काठोकाठ भरणं ह्याच्या तळहातचा मळ आहे नुसता. दिवसा-ढवळ्या एकाद्या गृहस्थाच्या खिशांतील भारी किंमतीच्या नोटांवर डल्ला मारायला लावून त्या खिसेकापूकडून प्राप्तीचा अर्धा वाटा घेतल्यानंतर साक्षीपुराव्यानिशीं एकाद्या निर्मल मनाच्या खेडुतावर खिसेकापूपणाचा खोटा आरोप लादून त्याला समाजांतून कायमचा उठवून लावायला हेच समाजकंटक कारण होतात. एकाद्या राजपुत्राला विषप्रयोग करण्या-करितां विषाची बाटली पुरवून त्या राजपुत्राच्या प्रेताची भारंभार सुवर्णतुला इतक्या सोन्यावर डल्ला मारल्यानंतर फिरून साक्षीच्या वेळीं निःपक्षपातीपणानं हृदयाक्रियेच्या निकाल देणारे उलट्या काळ-जाचे हेच अधिकारी शरीरशास्त्रविशारद म्हणून समाजांत वर मन करून वावरत असलेले आपण प्रत्यहीं पाहतों. दारूच्या धुंदींत आपल्याच धांवत्या मोटरीखालीं अनाथ अर्भकाला चिरडून फिरून त्याच अर्भकाविरुद्ध बाजू चुकल्याच्या साक्षीपुराव्याची उठावणी करून आपणच दिवसाढवळ्या केलेल्या खुनाच्या रक्तानं रंगलेले आपले हात स्वच्छ धुवून हे बहाद्दर मोकळे होतात. ह्यांना जनमनाच्या रोषाची खंत वाटत नाहीं, आपल्या कर्तव्याची जाणीव ह्यांना अस्वस्थ करीत नाहीं, आपल्या हृद-याचे वाढते ठोके ह्यांना अमानुषपणापासून परावृत्त करूं शकत नाहींत इतके हे पाषाणहृदयी अधिकारी निर्ढावलेले असतात. ह्या अधिकाऱ्यांच्या मनावर कोणत्याहि दहशतीचा परिणाम होत नाहीं. कोणत्याहि कायद्याला हे भीक घालीत नाहींत, शासनकर्त्यांचा बदल ह्यांच्या बेडर मनाला पाझर फोडूं शकत नाहीं.

त्यागाच्या शिकवणुकीशिवाय ही रुळावरून घसरलेली गाडी फिरून रुळावर येणं शक्य नाहीं. अधिकाऱ्यांनीं स्वार्थावर लाथ मारायला शिकलं पाहिजे. समाजाला ह्यांनीं सदासर्वकाळ आपल्या पोटच्या मुलाप्रमाणं सांभाळायचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या अधिकाराचा उपयोग करण्यापूर्वी ‘ दहा गुन्हेगार सुटले तरी हरकत नाहीं, पण एकाहि निरपराध व्यक्तीला माझ्या अधिकाराची झळ लागतां कामा नये ’ हें न्यायदानाचं आद्यतत्त्व त्यांनीं सतत डोळ्यापुढं वागविलं पाहिजे. ह्यांच्या मनांत बदल घडवून आणण्याची ताकद फक्त बुद्धिवाद्यांच्या मानसिक सामर्थ्यांतच

असल्यानं त्यागी बुद्धिवाद्यांची मानसिक आघाडी ह्याच्याविरुद्ध उभी करून ह्या अधिकारीवर्गात त्यागाची मशाल सतत तेवत ठेवण्याचा कसोशीनं प्रयत्न झाला पाहिजे.

ह्यानंतरची त्यागाची शिकवण समाजांतील भांडवलदारांना दिली गेली पाहिजे. आपल्याला मिळालेला सारा पैसा समाजाच्या मालकीचा आहे ह्याची सत्यता ह्या भांडवलदारांना पटवून दिली पाहिजे. परकीय सत्तेचं जडजोखड मानेवर असतांना, ह्या परकी सत्तेला गांजण्याकरितां, परकी सत्तेचे कायदे कायदेबाजीनंच उधळून लावतां येतात हे सिद्ध करण्याकरितां, अडचणींत सांपडलेल्या परकी सत्तेला खिंडींत गाठून तिला कायमची गाडण्याकरितां ह्या भांडवलदारांनीं आपल्याच गरीब-गुरीब बांधवांची अन्नवस्त्राच्या बाबतींत केलेली नाडणूक आपल्या पूर्ण परिचयाची आहे. अस्तित्वांत असलेले कायदे पद्धतशीरपणानं मोडून आपण मिळविलेल्या उमाप संपत्तींतला कांहीं थोडा हिस्सा राष्ट्रकार्याकरितां खर्ची टाकून ह्या भांडवलवाल्यांनीं राष्ट्राकरितां केलेल्या त्यागाचा देखावा अद्याप आपल्या नजरेआड झालेला नाहीं.

पण आज जुना जमाना पालटला आहे. आज हिंदुस्थानांत हिंदुस्थानच्याच लोकांचं राज्य आहे. हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य दिल्याची विलायती घोषणा अद्याप आपल्या कानांत दुमदुमते आहे. असं असून सुद्धां ह्या भांडवलदारांच्या मनांत अद्याप बिलकुल पालट झालेला नाहीं. इतकंच नव्हे तर परकी सत्तेच्या अंमलाखालीं असतांना आपण राष्ट्रीयसभेला दिलेल्या तुटपुंज्या देणग्यांच्या भांडवलावर व्यापारी वृत्तींत पूर्वीप्रमाणंच गरीबगुरिबांची नाडणूक करण्याचा आपला हक्क प्रस्थापित करण्याचा ते आज कसोशीनं प्रयत्न करीत आहेत. निवडणुकांतून कॉंग्रेसला यश मिळवून देण्याची कर्तबगारी आपण केली असल्यानं ह्या आपल्याच लोकांच्या राजवटींत आपली व्यापारी पिळणूक पूर्वीप्रमाणंच चालू रहाणं हा आपला हक्क आहे, असा त्यांचा दावा आहे. आज आपण निवडून दिलेले लोक राज्य करताहेत तरी त्यांना मदत करण्याकरितां, त्यांची राजवट यशस्वी करण्याकरितां साऱ्या व्यापाऱ्यांनीं एकत्र येऊन आपल्या देशांत असलेल्या धान्याचा कणनूकण,

कापडाचा तुकडान् तुकडा एकत्र करून अगदीं मामुली नफ्यावर त्याची समाजांत वाटणी करण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेण्याऐवजीं काळ्या बाजाराच्या मार्गानं हे भांडवलवाले नव्वद टक्के बहुजनसमाजाच्या शिव्याशापांचे धनी होताहेत. परकी सत्तेखालीं असतांना आपल्याला मिळणाऱ्या फायद्यांतला नव्वद टक्के फायदा निमूटपणें सरकारच्या हवालीं करणारे हेच भांडवलवाले आपल्या हिंदवीसरकारनं गरीबगुरीब जनतेच्या कल्याणाकरितां भांडवलवाल्यांवर लादलेल्या नव्या कराचा निषेध करताहेत.

ह्या भांडवलदारांच्या मनांत आमूलाग्र पालट झाला पाहिजे. बहुजन-समाजाच्या सुखांतच आपलं सुख सामावलेलं आहे, ह्याची सत्यता त्यांना पटली पाहिजे. आपल्या राष्ट्रीय सरकारला तनमनधनानं मदत केल्याशिवाय हिंदुस्थानचं स्वातंत्र्य चिरस्थायी होणं शक्य नाहीं ह्याची जाणीव भांडवलवाल्यांत निर्माण झाली पाहिजे. कांहीं दिवस फायदा मिळाला नाहीं तरी हरकत नाहीं, थोडीबहुत स्वतःला झळ लागली तरी बेहत्तर, पण आमच्या देशबांधवांना आम्ही अन्नवस्त्राची तरी निदान वाण पडूं देणार नाहीं अशा हिरीरीनं सारे भांडवलवाले पुढं यायला पाहिजेत. स्वार्थ साधण्यांत जें सुख असतं त्यापेक्षां स्वार्थत्यागाचं सुख अनंतपटीनं अधिक असतं ही गोष्ट त्यांच्या मनाला जाऊन भिडली पाहिजे. हीं घरं माझीं, हीं शेतं माझीं, ह्या बागा माझ्या मालकीच्या, बँकेंत माझ्या नांवावर असलेले हे लाखो रुपये माझे आहेत असं म्हणणारा भांडवलवाला, ह्यांतील कोणत्याहि वस्तूचा खराखुरा मालक नाहीं. साऱ्या मालकीच्या वस्तू जिथल्यातिथं सोडून प्रत्येकाला एक दिवस, अनिच्छेनं कां होईना, ह्या जगाला कायमचा रामराम ठोकायचा आहे ह्याचा आपणा सर्वांनाच विसर पडलेला असतो. आपल्या मालकीचा सुतळीचा तोडा सुद्धां अखेर आपल्याबरोबर येत नाहीं ह्या उज्ज्वल विचारसरणीचा मनांत प्रकाश पडल्याशिवाय त्यागाची अवीट गोडी निर्माण होणं शक्य नाहीं. उभ्या नजरेच्या टापूंत सुद्धां येणार नाहीं इतक्या अमर्याद जागेची आपली मालकी असतांना अखेर ज्या जागेवर हा देह निश्चेष्ट पडतो ती साडेतीन हात जागा सुद्धां खरीखुरी आपल्या मालकीची रहात नाहीं ह्याची प्रत्येक व्यक्तीला खात्री पटली

असून सुद्धां मानवी हव्यासाला सीमा रहात नाहीं. आधिभौतिक पायावर उभारलेल्या पाश्चिमात्य विचारसरणींत हाच एक मुख्य दोष आहे. 'बळी तो कानपिळी' ह्या तत्त्वज्ञानाचा उगम ह्याच असीम हव्यासांतून झालेला आहे. ही असह्य विचारसरणी गाडून समतासाम्राज्याचा पाया घालायचा असेल तर ह्या भांडवलवाल्यांनीं त्यागाला तयार व्हायला पाहिजे.

उमाप संपत्तीचे मालक असलेल्या ह्या भांडवलवाल्यांची धनेच्छा कमी होत नाहीं तिथं दारिद्र्यानं चौफेर गांजलेल्या किसान-मजुरांना ही धनेच्छा सतावून सोडत असेल ह्यांत आश्चर्य नाहीं. आज हे किसान-मजूर कशावरच संतुष्ट नाहींत. कमींत कमी काम आणि जास्तींत जास्त वेतन हें त्यांचं ध्येयवाक्य झालं आहे. ह्यांची पगारवाढीची मागणी वरवर वाढतच चालली आहे. ह्या वाढीची कमाल मर्यादा कोणती ह्याचा विचारच होत नाहीं. भांडवलवाल्यांच्या नी मजुरांच्या परिस्थितींत जोपर्यंत फरक दिसत राहील तोपर्यंत ही मागणी वाढतच राहणार अशीं स्पष्ट चिन्हं, प्रत्यहीं होणाऱ्या मालकमजुरांच्या लढ्यावरून आपल्याला दिसत आहेत. आजची मागणी पुरी होते न होते तोंच दुसऱ्या मागणीला सुरवात होते. दुसऱ्या मागणींतून तिसऱ्या मागणीचीं बीजं विखुरलीं जातात, संप होतात, जाळपोळ होते, लुटालूट होते, गोळीबार होतो आणि मग अखेर ही संपाची वावटळ थंडावते. राष्ट्राराष्ट्रांतून अडचणीच्या परिस्थितींत निर्माण होणारीं युद्धं आणि आर्थिक विषमतेवर उभारलीं जाणारीं हीं वर्गयुद्धं समाजांत कधींहि न थांबणारीं आहेत असं आजच्या परिस्थितीवरून वाटतं. ही अनिवार धनेच्छा सोडून मजुरांनीं अधिक कार्यक्षम होण्याचं ध्येय आपल्या नजरेपुढं ठेविलं पाहिजे. मागणी कमी असलेल्या कालांत जो किसान आपला माल निवडून बऱ्यावाईट मालाच्या निरनिराळ्या राशी करीत असे तोच किसान, आज मालाला बेसुमार मागणी असल्यानं, वाईटांतला वाईट माल पोत्यांत भरून धान्यांत मुद्दाम मिसळलेल्या काळ्यामातीची सुद्धां धान्याच्या बरोबरीनं किंमत घेतो आहे. निढळाच्या घामावर जगांतील संपत्तीचं उत्पादन आपणच करूं शकतो हा अहंभाव ह्या किसानमजुरांच्या मनांत सतत उसळत राहिल्यानं

समाजांतील इतर कोणत्याहि व्यक्तीपेक्षां आपणच श्रेष्ठ आहोंत अशा कल्पनेनं समाजांतील इतर व्यक्तींबद्दल ह्याच्या मनांत निर्माण झालेल्या अनादर, द्वेष, तुच्छता इत्यादि भावनांचा त्याग करायला त्यांनीं शिकलं पाहिजे. भांडवलवाल्यांना प्रेमानं जिंकायचा त्यांनीं प्रयत्न केला पाहिजे. आपलं कर्तव्य कसून करण्याचं व्रत त्यांनीं स्वीकारलं पाहिजे. समाजांतील इतर कोणत्याहि व्यक्तीपेक्षां आपण श्रेष्ठ आहोंत हें सिद्ध करतांना त्यांनीं हीन नी हिणकस मोठेपणाच्या कल्पनांचा त्याग करून स्वतः उच्च भूमिकेवर उभं राहिलं पाहिजे.

यशाची गुरुकिल्ली ह्या बहुजनसमाजाच्या हातीं आहे. पण मानवी-समाजाच्या सुखाचं ध्येय आपल्याला गांठायचं असेल तर समाजांत आपल्या वाट्याला आलेली कोणतीहि लहानमोठी कामगिरी यशस्वी रीतीनं पार पाडण्याची आच प्रत्येकाला लागली पाहिजे. समाजांतील सारे घटक सारख्याच दर्जाचे आहेत हें जरी खरं असलं तरी समाजाचा गाडा सुरळीत चालायचा असेल तर समाजांतील साऱ्या खालवरच्या घटकांनीं आपल्यावर समाजानं टाकलेली जबाबदारी आपापली पायरी संभाळूनच पार पाडणं जरूर आहे ही शिकवण समाजांतील प्रत्येक व्यक्तीनं आत्मसात् केली पाहिजे. कृत्रिम सौंदर्योपासनेनं आपलं शरीर सजविण्यापेक्षां साध्या पण स्वच्छ पोषाखाआड असलेल्या त्याग, कर्तव्यनिष्ठा, समाजहित इत्यादि गुणांनीं समाजांतील प्रत्येक स्त्री-पुरुष व्यक्तीनं आपलं मन मनोहर बनविण्याचा निश्चय केल्यास समाजाचा उत्कर्ष साधायला कितीसा वेळ लागणार आहे ! इमारतीच्या पायांत गाडलेले दगड जितके महत्त्वाचे आहेत तितकेच इमारतीच्या मध्यभागीं डौलानं डोकावणारे चौकोनी चिरे महत्त्वाचे आहेत. इमारतीवर चढविलेल्या कळसामध्यें भार सोसण्याचं सामर्थ्य नसलं तरी इमारतीच्या सौंदर्याची पूर्णता साधण्याचं काम त्याचं आहे. पायांतल्या दगडांनीं आपल्याला गाडून घेतलं, मधल्या घडीव चिऱ्यांनीं आपल्याला घडवून घेऊन आपल्यांत संघटनेचं सामर्थ्य निर्माण केलं आणि कळसानं इमारतींत सौंदर्य ओतलं. साऱ्यांनीं निरपेक्षबुद्धीनं आपापली कामगिरी

बचावली म्हणूनच डौलदार इमारत चिरस्थायी झालेली दिसते. तीच स्थिति मानवीसमाजाची आहे.

समाजांतील सार्‍या व्यक्तींनीं आपल्या नजरेपुढं एक ध्येय ठेविल्या-शिवाय समाजाची योग्य उभारणी होत नाहीं. आज पाश्चिमात्य देशांतील ज्या ज्या लोकानीं समाजसुधारणा हें ध्येय आपल्या नजरेपुढं ठेविलं तीं तीं राष्ट्रं अवघ्या एका पिढीच्या कालांत बलवान बनलीं असा इतिहास आपल्या नजरेसमोर आहे. अगदीं अलीकडचीं उदाहरणं घ्यायचीं झाल्यास जपान-सारखं राजाला देव मानणारं राष्ट्र अवघ्या वीस वर्षांत आपल्या राजाच्या एकछत्री अमलाखालीं सार्‍या जपानी समाजाची प्रगति करूं शकलं. रशियासारख्या झारशाहीनं गांजलेल्या देशानं समाजवादाचं ध्येय आपल्या नजरेपुढं ठेवून पहिल्या वीस वर्षांतच झारशाहीचा समूळ नाश करून दुसर्‍या वीस वर्षांत प्रगतीचा इतका उच्चांक गाठला कीं, आज पृथ्वी-वरील पांचचार सामर्थ्यवान राष्ट्रांत त्यानं मानाचं स्थान पटकावलं आहे. जर्मनराष्ट्रानं आपल्या समाजापुढं ठेवलेलं ध्येय इतकं जाज्वल्य आहे कीं, गेल्या तीस पस्तीस वर्षांत त्या राष्ट्रानं जागतिक मानवी समाजाला दोन वेळां जबरदस्त हादरा दिला. पहिल्या लढाईत जर्मन राष्ट्राचा पुरेपूर धुव्वा उडाल्यानंतर सुद्धां एकध्येयानं प्रेरित झालेल्या जर्मन राष्ट्रांत पुन्हा पुढल्या वीस वर्षांत पहिल्यापेक्षांहि अधिक जोमदार उठावणी झाली. ह्याचं कारण त्या राष्ट्रांतील एकध्येयाची बलशाली भावना.

आज आपल्या आर्यावर्तांतील समाजानं सुद्धां एका अभिनव पद्धतीनं आपल्या राष्ट्राची उठावणी केली आहे. आधिभौतिक सामर्थ्यापेक्षांहि मानसिक सामर्थ्य अधिक श्रेष्ठ आहे आणि समाजांत मानसिक सामर्थ्य निर्माण झाल्यावर आधिभौतिक सामर्थ्यावर त्याला सहज लीलेनं दबपण आणतां येतं ही गोष्ट आज सिद्ध झाली आहे. पण ह्या नव्या मानसिक सामर्थ्याचं कार्यक्षेत्र आपल्या जमातीपुरतं, आपल्या राष्ट्रापुरतं मर्यादित नसून सारी मानवजात हें त्याचं कार्यक्षेत्र आहे. परवांच्या युद्धाच्या वेळीं आपल्या राष्ट्रीय नेत्यांनीं इंग्लंडच्या त्या वेळच्या मुख्य प्रधानांना मुद्दाम एका पत्रानं कळविलं कीं आज जगांत मानसिक सामर्थ्याची आघाडी निर्माण करण्याची वेळ आली आहे. युद्धमान राष्ट्रांत

आज आपण सामर्थ्यवान आहांत. अशा वेळीं आपण आपल्याविरुद्ध लढत असलेल्या राष्ट्रासमोर मानसिक सामर्थ्याची अभेद्य आघाडी उभी करण्याचा प्रयत्न केल्यास ह्या नव्या तत्त्वज्ञानाचा खात्रीनं विजय होईल व हा नवा विजय अखिल मानवजातीला वेगळं वळण लावून, मानवीसमाजांत चिरकालीन सुख नी शांतता प्रस्थापित करील. हें तत्त्व त्यांना त्या वेळीं पटलं नाहीं म्हणून म्हणा, ह्या नव्या तत्त्वज्ञानाचं श्रेष्ठत्व आधिभौतिक उन्नतीच्या भूमिकेवरून त्यांना आकलन करितां आलं नाहीं म्हणून म्हणा, अगर आपल्या आधिभौतिक सामर्थ्याच्या अभिमानाच्या तोऱ्यांत हें नवं तत्त्वज्ञान त्यांना तुच्छ वाटलं म्हणून म्हणा त्या वेळीं त्या कळकळीच्या पत्राचा कांहींच उपयोग झाला नाहीं.

पण आज लढाई संपल्यानंतर आपण जेत्यांनीं काय मिळविलं ह्याचा हे आधिभौतिक सामर्थ्याचे आधारस्तंभ आपल्याशींच ज्यावेळीं विचार करूं लागले त्यावेळीं त्यांच्या नजरेपुढं आपल्या समाजांत उडालेला हाहाकार, आपल्या राष्ट्राचा झालेला नाश, आपल्या राष्ट्रवीरांचीं घारातीर्थी पडलेलीं प्रेतं, आपल्या राष्ट्राला झालेलं डोईजड कर्ज, आपल्या समाजाचे विस्कटलेले संसार ह्या साऱ्या गोष्टी भेसुरपणानं उभ्या राहिल्या. समाजमनाला ह्या साऱ्या नुकसानीचा इतका भयंकर हादरा बसला कीं युद्धानंतर झालेल्या पहिल्याच निवडणुकींत ह्या युद्धपिपासू नेत्यांचं त्यानं मंत्रिमंडळांतून उच्चाटन केलं. आर्यावर्तातील एकमेव नेत्यानं केलेली मित्रत्वाची सूचना त्यावेळीं जरी विचारणीय वाटली नाहीं तरी ह्या नव्या विचारसरणीला आर्यावर्तातच वाव दिल्यास मानवीसमाजाचं कल्याण साधण्याचा प्रयोग ह्या विचारप्रवर्तकाला आपल्याच देशांत करितां येईल अशा कल्पनेनं इंग्लंडमधील नव्या नेत्यांनीं आज हिंदुस्थानला स्वातंत्र्य दिल्याचं जाहीर करून ह्या तत्त्वज्ञानाला जगाच्या इतिहासांत प्रथम मानाचं स्थान दिलं

ह्यापुढील कामगिरी आपली आहे. ह्यावेळीं आपण सारे एक होऊं या, एकविचारानं वागूं या, आणि ज्या नव्या तत्त्वज्ञानानं आपल्याला बिनशर्त आणि युद्ध न करितां इतर राष्ट्रांच्या बरोबरीला नेऊन बसविलं त्या तत्त्वज्ञानाला पूर्ण वाव देण्याचा निश्चय करूं या.

ज्या तत्त्वज्ञानानं तीनशें वर्षांची आपली गुलामगिरी रक्तपाताविना नाहींशी केली, सुसज्ज पाशवी शक्तीशीं ज्या विचारसरणीनं आपलं ध्येय गाठीपर्यंत यशस्वी टक्कर दिली ती सर्व सामर्थ्यवान विचारसरणी आपल्या पाठीशीं उभी असतांना आपल्याला परकीय आक्रमणाला भिण्याचं कारणच नाहीं. अधिकारारूढ व्यक्ति उद्दाम होऊन ती जर पाश्चात्यांच्याच पाशवी विचारसरणीचा फिरून अनुकार करूं लागली तर हें आपलं नवं तत्त्वज्ञान त्यांच्याविरुद्ध सुद्धां आपल्याला केव्हांहि उपयोगांत आणतां येईल. म्हणून कोणत्याहि मार्गांतील अडचणींना न जुमानतां स्वयंपूर्ण आर्यावर्ताची उठावणी करण्याकरितां आपल्या शक्तिसर्वस्वाचा उपयोग करण्याचा आपण दृढ निश्चय करूं या. ह्या स्वयंपूर्ण राष्ट्राच्या नव्या तत्त्वज्ञानाच्या आधारावर आर्यावर्तांत एक वेगळी मानसिक आघाडी आपण निर्माण करूं शकलों आणि हिंदुस्थानांतील नेते इतर राष्ट्रांशीं प्रेमाच्या, शांततेच्या नी समतेच्या चौथऱ्यावर उभे राहून मित्रत्वाच्या नात्यानं वागत असतां आर्यावर्तांत आदर्श अधिराज्याची स्थापना करूं शकले तर जगांतील सारीं छोटींमोठीं राष्ट्रं, सारे प्रबलदुर्बल समाज हिंदुस्थानांतील ह्या नव्या विचारसरणीला धन्यवाद देतील, तिचे गोडवे गाऊं लागतील, आपल्या राष्ट्रांतील समाजाला ह्या नव्या शिकवणुकीचं सामर्थ्य पटवून देऊन हिंदुस्थानच्या पावलावर पाऊल टाकून सुखी होण्याचा प्रयत्न करतील.

हें सारं सिद्ध करायचं असेल तर आर्यावर्तांतील समाजानं त्यागाला तयार झालं पाहिजे. यापुढं समाज विशेष त्यागाला तयार होत नाहीं याचं कारण आपले अधिकारारूढ नेते पटकन केव्हां सत्तात्याग करतील ह्याचा त्याला नेमच लागत नाहीं. आपल्या भांडवलदारांनीं, आपल्या अधिकाऱ्यांनीं, आपल्या बुद्धिवाद्यांनीं, आपल्या मजूर–किसानांनीं, आर्यावर्तांतील यच्चयावत् समाजघटकांनीं, राष्ट्राकरितां वाटेल तो त्याग केला आणि पटकन अधिकारारूढ असलेल्या आपल्या राष्ट्रीय सभेंत अधिकारत्यागाचं रणशिंग फुंकलं तर सारा हिंद्वीसमाज गुलामच्या गुलामच राहून त्यागानं मात्र अंतर्बाह्य होरपळून निघेल.

आजच्या धान्यटंचाईचं एक साधं उदाहरण आपण घेऊं. धान्यसंचय करूं नका ही आपल्या राष्ट्रधुरीणांची आज्ञा शिरसावंद्य मानून आपल्या

मालकीचा धान्याचा प्रत्येक दाणा आपण सरकारच्या स्वाधीन केला नी आपल्या राष्ट्रधुरीणांनीं कांहीं राजकीय पेचप्रसंगाकरितां अधिकारत्याग केला तर धान्यापरी धान्य नी स्वातंत्र्यापरी स्वातंत्र्य जाऊन आपल्या नेत्यांना शिव्याशाप देत टाचा घासून अन्नाविना उपाशी मरण्याची पाळी येईल. ही कल्पना नसून हें सत्य आहे. ह्याला इतिहास आहे. अधिकारी दोषी, कां आमदार दोषी, कां प्रधानमंडळ दोषी, कां राष्ट्रीयसभा दोषी, ह्या विचार मागाहून करण्याचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं. पण परकी सरकारच्या कारकीर्दीत ज्याप्रमाणं बंगालमध्यें लाखो लोक रस्तोरस्तीं, गल्लोगल्लीं, अन्नाविना तडफडून मरून पडले त्याप्रमाणं साऱ्या प्रांतांतील समाजावर उपासमारीनं तळतळून मरण्याची पाळी येईल म्हणून समाजाला भीति वाटते.

ही समाजाची भीति घालवायची असेल तर प्रथम आपल्या राष्ट्रीय सरकारनं समाजाला तसं अभय आश्वासन दिलं पाहिजे. नंतर प्रांता-प्रांतांतील प्रत्येक खेडं अन्नवस्त्राच्या बाबतींत स्वयंपूर्ण करण्याची आपल्या नेत्यांनीं खटपट केली पाहिजे. समाजाला धाकदपटशा दाखविण्यापेक्षां, समाजाला कायदेबाजीनं जेरीस आणण्यापेक्षां, गुन्हेगाराला पकडून त्याच्या मनोभावना दुखविण्यापेक्षां, समाजांत मिसळून समाजाला स्पर्श करण्याचा आपल्या नेत्यांनीं प्रयत्न केला पाहिजे. धान्य वाटपांत तांबडी ज्वारी, मका, सातू वगैरे पदार्थ समाजाला अन्नधान्य म्हणून देण्यापूर्वी एक आठवडा ह्या सर्व सत्ताधाऱ्यांनीं लोकांना देण्यांत येणाऱ्या धान्याचा स्वतः उपयोग करायला सुरवात केली पाहिजे. साऱ्या धान्याची, साऱ्या कापडाची मागणी–पुरवठ्याच्या तत्त्वावर उभारणी करून प्रत्येक माणसाला अन्नवस्त्र पुरविण्याची हमी ह्या आमदारांनीं दिली पाहिजे. हिंदुस्थानांतील गिरण्यांतून लढाईच्या काळांत अमूकच कापड निर्माण करण्याची सरकारनं सक्ती केली होती. आज आपलं सरकार असून सुद्धां गिरण्यांतून उत्पन्न होणारं निरनिराळ्या शौकी वाणांचं कापड बंद करून समाजांतील साऱ्या घटकांना जरूर असणारं ठरीव पद्धतीचं कापडच यापुढं गिरण्यांतून काढलं पाहिजे अशी खुषीची सक्ति गिरण्यांवर केल्यास वस्त्राचं दुर्भिक्ष अवघ्या तीनचार

महिन्यांत नाहींसं होईल. समाजांतील स्त्रीपुरुषांना लागणाऱ्या फक्त दोनच प्रकारच्या कापडाचं उत्पादन यापुढं कांहीं काल गिरण्यांतून होणं जरूर आहे, अशी घोषणा करून त्याच वेळीं समाजांतील लोकांना फक्त जरूर तेवढंच कापड विकत घेण्याची विनंति केल्यास आपल्या देशांत गिरण्यांची संख्या अगदीं अपुरी असून सुद्धां कापडटंचाई नाहींशी करणं विशेष अवघड जाणार नाहीं. ह्याच वेळीं शहरांतून व खेड्यांतून हातरहाट नी हातमाग ह्यांना उत्तेजन देऊन नी सूत पुरवून कापडाच्या उत्पादनाला चालना दिल्यास हा कापडटंचाईचा प्रश्न हां हां म्हणतां सुटेल.

दोष समाजाचा नाहीं, दोष नोकरशाहीचा नाहीं, दोष आमदारांचा नाहीं, दोष मंत्रिमंडळाचाहि नाहीं. ज्या स्वार्थी पाश्चिमात्य शिकवणुकींत आजवर आपण वावरतो आहोंत त्या शिकवणुकीचा हा दोष आहे. बालमनाला योग्य शिकवण न दिली गेल्यानं साचत आलेल्या पापांचं हें प्रायश्चित्त आहे. असं असूनहि अजून आपल्या राष्ट्रीय सभेचं धोरण ठरत नाहीं हें मात्र आश्चर्य आहे. प्रचंड पसरलेल्या वडाच्या झाडाच्या जाडजूड बुंध्याला आपल्या मनाप्रमाणं वळण देण्याचा हास्यास्पद प्रयत्नच अद्याप चालू आहे. बालमनाला शिक्षण देणारं शिक्षणखातं बिनमहत्त्वाचं आहे ह्या फोल विचारसरणीचा हा दुष्परिणाम आहे. आजच्या प्रौढमनांच्यापुढं कितीहि घसा कोरडा केला तरी समाजमनावर विशेष चांगला परिणाम लवकर होणार नाहीं. त्यापेक्षां आणखी कांहीं वर्षे आपल्याला जुन्या चाकोरींतूनच चालावं लागेल अशी खूणगांठ बांधून, प्रत्येक खेड्यांतील बालमनावर संघटनेचे, एकीचे, मानवजातीच्या उत्कर्षाचे आणि स्वयंपूर्ण हिंदुस्थानचे आघात करण्याकरितां हिंदुस्थानांतील साऱ्या श्रेष्ठ विभूतींनीं कार्याला लागलं पाहिजे. एकदां कां स्वयंपूर्ण हिंदुस्थानची कल्पना बालमनाला पटली, संघटनेच्या शिकवणुकीनं साऱ्या बालमनाचा एक आवाज झाला, सारा समाज त्यागाच्या चौथऱ्यावर उभा राहिला कीं सारा हिंदुस्थान देश सुख, शांति नी समाधान ह्यांचं माहेरघर बनेल आणि मग ह्या नव्या विचारसरणीची सत्यता साऱ्या मानवजातीला पटल्यानंतर मानसिक उन्नतीचं उज्ज्वल

निशाण हातीं घेऊन अखिल जगांतील मानवजात सुखी होईल. हीं बाल-मनं तयार करण्याची आर्यावर्तातील मुख्य जागा, आर्यावर्तातील बहुसंख्य समाजाचीं निवासस्थानं, हिंदुस्थानांतील सात लाख खेडीं हींच असल्यानं हिंदुस्थानचं उद्याचं आदर्श खेडं कसं असायला पाहिजे ह्याचा विचार करण्यानं स्वयंपूर्ण राष्ट्राची कल्पना अधिक स्पष्ट होईल.

—*—

# १६ : आदर्श बागखेडं

आर्यावर्तातील समाजांतून मानवीमनाची आदर्श उठावणी करावयाची झाल्यास आपल्याला खेड्याकडंच धाव घेतली पाहिजे. हिंदुस्थानांतील जवळ जवळ नव्वद टक्के समाज खेड्यांतून वावरतो आहे. खेड्यांतील समाज निरक्षर असला तरी इतर सर्व दृष्टींनीं खेडुतांची मनोभूमि शहरवासीयांच्या मनोभूमीपेक्षां अधिक साधी, अधिक शुद्ध, अधिक पवित्र असते. खेड्यांतील वातावरण चोहोंबाजूंनीं निसर्गानं वेढलेलं असल्यानं, निसर्गाशीं चोवीस तास हितगुज करणारीं खेडुतांचीं मनं निसर्गाप्रमाणंच ताजीं, रम्य नी प्रफुल्लित असतात. खेडेगांवांतील समाजमनावर शहरी वातावरणाचे छानछोकीचे, नटण्यामुरडण्याचे, सौंदर्यप्रदर्शनाचे कृत्रिम परिणाम झाले नसल्यामुळं पहिल्या दर्शनाला खेड्यांतील तरुणतरुणींच्या आकर्षणाचे आपल्या मनावर सुसंवादी परिणाम होत नसले तरी हाच मानवीसमाज आपण थोडा अधिक जवळून पाहिला तर शहरांतील युवयुवतींच्या उत्तान, उन्मादक पण निस्तेज सौंदर्यापेक्षां खेड्यांतील भाबडं, रसरशीत पण सतेज सौंदर्यंच अधिक आकर्षक, अधिक आदरणीय आणि अधिक विश्वसनीय वाटूं लागतं.

अंगांत मानेजवळ मातीनं लाल झालेली मुंडेछाट पैरण, पायांत जर लावलेल्या करकरणाऱ्या जाडजूड वहाणा, मागंपुढं सोगा सोडून कमरेवर कसलेलं पांच हाती धोतर नी डोक्यावर मागं शेमला सोडलेला फेटा अशा खेडेगावी रुबाबानं धीरगंभीरपणानं वावरणारा तरणाबांड पोऱ्या पाहिला म्हणजे त्याच्यापुढं दीडहाती घोळाची विजार घालणारा, आपल्या आंत गेलेल्या छातीचा कमीपणा लपविण्याकरितां डबल ब्रेस्टचा कोट वापरणारा, केसांचा चापूनचोपून भांग काढणारा, बिनमिशांचा सुकट शहरी तरुण एकदम फिका पडतो. डोईवर ताज्या फळांची टोपली घेऊन बेगुमानपणानं पहाटेच्या वेळीं रस्त्यानं गाणीं गात जाणारी, ढकट्या काचा मारून घोट्याभरच्या बाणाचं लुगडं नेसलेली, कपाळीं ढळढळीत

कुंकू लावणारी, तारुण्यानं बहरलेली ठसठशीत अवयवांची खेडेगावी तरुणी पाहिली म्हणजे तिच्याबरोबर, गोल नेसण नेसलेली, मुंड्या हाताची नी उपड्या छातीची, खोल डोळ्याची नी पावडरलेल्या चेहऱ्याची अकालीं वृद्ध झालेली रोगट शहरी तरुणी तुलनेला टिकणंच शक्य नाहीं.

तरी पण आज खेडेगांवांतील समाज नाइलाजानं शहराकडं धाव घेतो आहे, खेडीं ओस पडताहेत आणि शहरांत रहायला जागा मिळत नाहीं. खेड्यांत पोट भरत नाहीं म्हणून खेड्यांतला स्वतंत्र शेतकरी रोजच्या मजुरीच्या आशेनं कारखानदारीच्या कैदखान्यांत आपखुषीनं लाचारी पत्करतो आहे. आज सारा हिंदुस्थान देश पाश्चिमात्य देशांप्रमाणं कारखानदारीनं जखडला गेला नाहीं हें आपण आपलं भाग्यच समजलं पाहिजे. जवळ जवळ तीन शतकं पाश्चिमात्यांच्या कृपाछत्राखालीं वावरत असून सुद्धां आम्ही यांत्रिक भुतानं पूर्णपणें पछाडले गेलों नाहीं हें एका दृष्टीनं पाश्चिमात्य राज्यकर्त्यांचे आपल्यावर उपकारच झाले आहेत. स्वार्थांधतेनं, आपल्या राष्ट्रांतील कारखान्यांत उत्पन्न होणाऱ्या मालाला बाजारपेठ शिल्लक रहावी म्हणून पाश्चिमात्यांनीं आपल्या देशांत कारखानदारीचं विशेष प्रस्थ माजूं न दिल्यानं आपल्या नव्या स्वयंपूर्णतेच्या विचारसरणीला नकळत हातभार लावण्याचं श्रेय ह्या परकीसत्तेलाच आहे. आज आपल्या देशांतील कारखान्यांतून तयार होणारा माल हिंदुस्थानला पुरा पडत नाहीं, म्हणून हिंदुस्थानांत नवे नवे कारखाने चालू करण्याचा हिंदुस्थानांतील भांडवलवाल्यांचा विचार आहे. हिंदवी भांडवलदारांचं हें धोरण जर हल्लींच्या आपल्या राष्ट्रीय सरकारला पटलं तर हिंदुस्थानांत प्रचंड प्रमाणावर नवे कारखाने सुरू होतील हें निर्विवाद आहे. आज जनतेची ज्या मालाची मागणी आहे तो माल अल्पकाळांत जनतेला पुरवायचा असेल तर प्रचंड कारखाने हिंदुस्थानांत उभारण्याशिवाय गत्यंतर नाहीं ही विचारसरणी चटकन् मनांत भरण्यासारखी आहे. पण जालीम औषधानं एकादा रोग झटकन् बरा झाल्यावर त्या जालीम औषधापासून उत्पन्न होणारे दुष्परिणाम फारच जाचक होतात, असा आपल्या वैद्यकशास्त्राचा एक सिद्धान्त आहे. त्याचप्रमाणं ह्या कारखानदारीचं आहे.

हिंदुस्थानांत आज प्रचंड प्रमाणावर कारखाने सुरू करायचे म्हणजे हिंदुस्थानची सध्यांची कर्जाच्या रूपानं सांचलेली गंगाजळी ह्या यंत्र-सामुग्रीच्या आयातीकरितां खर्च करावी लागेल. कारखाने सुरू झाल्यावर कांहीं वर्षं हिंदुस्थानांतील सर्व बेकारांना काम मिळेल आणि यांत्रिक सुधारणांचा विजय ज्याप्रमाणं कांहीं काळ पाश्चात्यांना हितावह वाटला त्याचप्रमाणं आपल्यालाहि आपल्या देशाचा, यांत्रिक सुधारणेनं, उत्कर्ष साधल्याचं समाधान मिळेल. पण ह्या अल्पकालीन समाधानांतूनच अनिष्ट असमाधानाचा उगम होईल. वैयक्तिक कारखानदार अगर सरकार, जसं राष्ट्रीय सरकारचं धोरण ठरेल त्याप्रमाणं, ह्या कारखानदारीचे मालक होतील. कारखानदार मालक झाल्यास श्रीमंतगरिबांचीं दोन टोकं समाजांत उत्तरदक्षिणध्रुवांप्रमाणं दोन बाजूंना खेंचलीं जातील. सरकारच कारखान्यांचे मालक झाल्यास सोव्हियट रशियाच्या समाजवादी तत्त्वज्ञानाच्या धोरणाप्रमाणं कामगारांची कांहीं काल सुस्थिति साधेल. कामगार समाजांत मानानं वावरूं लागतील. त्यांच्या अन्नवस्त्राची आणि सर्व सुखसोयींनीं युक्त अशी राहण्याच्या घरांची सोय सरकारकडून केली जाईल. हिंदुस्थानांतील दरिद्री समाज सधन झाल्याचा देखावा पण निर्माण होईल. समाजाचा हा सधनपणा, समाजाची ही सुस्थिति, कामगारांच्या ह्या सुखसोयी फारच थोडा वेळ समाजाला सुखी करतील. पहिल्या पंचवार्षिक अगर दशवार्षिक योजनेप्रमाणं हिंदुस्थान, ह्या कारखान्यांच्या जलद उत्पादनाच्या जोरावर स्वयंपूर्ण झाल्यानंतर ह्या कारखान्यांतून उत्पन्न होणाऱ्या जादा मालानं कारखान्यांचीं गोदामं तुंबूं लागतील. ह्या मालाचा उठाव करण्याकरितां बाहेरच्या बाजारपेठा तरी हुडकाव्या लागतील, मजुरांना बेकार तरी ठेवावं लागेल, जादा उत्पादन जाळावं तरी लागेल नाहींतर नाइलाजानं जर्मनीप्रमाणं जागतिक युद्धं तरी सुरू करावीं लागतील. अशा तऱ्हेनं आज यांत्रिक सुधारणेनं भारलेल्या पाश्चिमात्य राष्ट्रांपुढं असलेला भयानक प्रश्नच आपणालाहि भेडसावूं लागेल. म्हणून आज आर्यावर्तांतील भांडवलवाल्यांची विचारसरणी सुरवातीला किती जरी तर्कशुद्ध वाटत असली तरी ती मयासुरी माया आपल्याला केव्हां नग्नावस्थेंत सैरा-वैरा धावायला लावील ह्याचा नेम नाहीं. नव्या वस्त्रांच्या आशेनं जुनीं वस्त्रं

टाकून दिल्यानंतर नवंहि नाहीं नी जुनंहि नाहीं अशा परिस्थितींत समाजांत फिरून अनवस्थाच दिसूं लागेल. ह्याकरितां हिंदुस्थानांतील आजच्या राष्ट्रीय सरकारनं ह्या अनिष्ट कारखानदारीपासून दूर राहूनं गांधीवादांतील विचारसरणीच्या अनुरोधानं स्वयंपूर्ण राष्ट्राचीं उभारणीं करण्याचाच चंग बांधला पाहिजे. आज पाश्चिमात्य राष्ट्रांत असलेल्या यांत्रिक सुधारणांपेक्षांहि अधिक प्रभावी यांत्रिक सुधारणांची आम्हांला पुढं जरूरी भासणार आहे. पण पायरीपायरीनं हिंदुस्थान देश जसाजसा स्वयंपूर्ण होत जाईल तशातशा जरूर त्या नी जरूर तितक्याच यांत्रिक सुधारणांचा समाजहिताच्या दृष्टीनं उपयोग करून घेणं हेंच स्वयंपूर्ण आर्यावर्ताचं धोरण राहणार आहे.

हिंदुस्थान देश स्वयंपूर्ण बनविणं म्हणजे ओघानंच हिंदुस्थानांतील सात लाख खेडीं आदर्श नी स्वयंपूर्ण बनविणं. हिंदुस्थानांत मोठीं शहरं फारच थोडीं असल्यानं आणि स्वयंपूर्ण हिंदुस्थानांत शहरांना स्वतंत्र अस्तित्वच नसल्यानं सारीं शहरं आपोआपच नाहींशीं होतील किंवा त्यांचं रूपांतर खेड्यांत होईल; म्हणून आज शहरांचा विचार करण्याची आपल्याला जरूरीच नाहीं.

आतां हिंदुस्थानांतील आदर्श खेडं कसं असावं ह्याचा आपण सर्व दृष्टींनीं विचार करूं. सर्वसाधारणपणें हिंदुस्थानांतील खेडुतांच्या सध्यांच्या गरजा फारच थोड्या आहेत. जाडीभरडी भाकर, त्या भाकरीवर थोडंसं कोरड्यास, नेसायला पांच हाती धोतर, अंगांत एकादं कुडतं, डोईवर मुंडासं आणि रहायला एक निवाऱ्याची जागा. एवढ्या सर्वसामान्य खेडुतांच्या गरजा सुद्धां आज खेडेगांवांतून भागत नाहींत. ह्या त्यांच्या किमान गरजा तर भागल्या पाहिजेतच, त्याशिवाय पिण्याच्या पाण्याची सोय आणि सांडपाण्याचा मुबलक पुरवठा, बिजलीबत्ती, बाळंतपणाच्या सोयी, एकादं औषधालय, बालमनविकासाची संस्था आणि बागखेड्याच्या मध्यभागीं एकादा रम्य ‘ विश्राम ’. इतक्या गोष्टी आपल्या ह्या आदर्श बागखेड्यांतून असणं ही मानवीसमाजाची किमान गरज आहे असं आपण गृहीत धरूं. प्रत्येक खेडेगांवच्या सभोवार त्या खेड्याच्या मर्यादेंत कांहीं जमिनी असतात. ह्या जमिनी कोणाच्याहि मालकीच्या

असोत, एकाद्या खेडुताच्या मालकीचा एकादा मोठा जमिनीचा तुकडा असेल, एकाद्या खेडुताच्या मालकीचा एकादा लहान तुकडा असेल किंवा एकाद्याच्या मालकीचा एकहि तुकडा नसेल. कांहींहि असलं तरी ह्या साऱ्या जमिनी गांवकऱ्यांनीं एकोप्यानं नांगराव्या, कुळवाव्या, पेराव्या, पिकांची कापणी करावी, आणि पिकेल तें धान्य आणि जमेल तो चारा एकत्र आणून तो सर्वांनीं त्या त्या कुटुंबांच्या वार्षिक गरजांप्रमाणं वाटून घ्यावा. प्रत्येक माणसाला कोणत्या प्रकारचं व किती अन्नधान्य लागतं, प्रत्येकाला किमान कापड किती लागतं ह्याची आकडेवारी काढून त्या त्या मानानं जरूर तें अन्नधान्य, भाजीपाला व कापूस पिकविण्याचे एकर ठरवावे. एकाद्या खेड्याच्या कक्षेंतील शेतांतून त्या खेड्यांत राहणाऱ्या साऱ्या कुटुंबांना पुरेल इतका माल पिकत नसेल तर योग्य ठिकाणीं विहिरी खोदून अगर जवळपास असलेल्या ओढ्याला अगर नदीला बंधारा घालून खेड्याला जरूर असणाऱ्या वार्षिक मालाची पैदास करण्याकडं आधीं लक्ष पुरवावं. एकाद्या खेड्याच्या आसपास अशी कोणतीच सोय होणं शक्य नसेल तर तें खेडं त्या ठिकाणाहून उठवून दुसऱ्या एकाद्या योग्य ठिकाणीं नेण्याची योजना आखावी. कांहीं ठिकाणीं अन्नवस्त्राच्या दृष्टीनं खेडं स्वयंपूर्ण होण्याला नैसर्गिक अडचणी असतील तर देवाणघेवाणीच्या तत्त्वावर इतर खेड्यांशीं त्यांचा संबंध जोडून धान्याऐवजीं जादा कापूस किंवा कापसाऐवजीं जादा धान्य असं उत्पादनाचं समीकरण मांडून प्रत्येक खेडं स्वयंपूर्ण करण्याचं धोरण कायम करावं.

शेतीच्या कामाला लागणाऱ्या साऱ्या औतकोळप्यांची जबाबदारी त्या खेड्यांत राहणाऱ्या सुतारलोहारांनीं आपल्याकडं घ्यावी. आपल्या खेड्याला साधारणपणें किती सामान लागतं ह्याची सर्वसाधारण कल्पना त्यांना असतेच. अशा प्रकारचं साऱ्या शेतीला लागणारं वर्षाचं सामान, त्याचप्रमाणं घरं बांधण्याकरितां लागणारं लाकूड, व विणकामाच्या धंद्याला लागणारं सारं लाकूडसामान तयार करण्याकरितां एकच मोठा कारखाना चालू करून खेड्यांतील सर्व सुतारलोहारांनीं त्याच कारखान्यांत काम करावं. गांवच्या बलुतेदारांनीं आपापलीं कामं संघशक्तीनं

करावी. बागखेड्यांतील एकाहि व्यक्तीला अन्नवस्त्राची वाण पडूं नये आणि एकाहि व्यक्तीला बेकार रहावं लागूं नये.

काम करूं शकणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला काम देण्याची जबाबदारी, त्याचप्रमाणं खेड्यांतील समर्थ असमर्थ साऱ्या व्यक्तींच्या पोषणाची जबाबदारी समाजानं घेतल्यानंतर खेड्यांतील माणसांत असत्प्रवृत्ति उत्पन्न होण्याचा संभव फारच कमी असतो. फाजील धनसंचयाचं कोणाला कारणच नसल्यानं चोरी करणं, खोटं बोलणं, मारामारी करणं, खून करणं अशा गोष्टींना बराच आळा बसेल. त्यांतूनहि कांहीं लोकांच्या हातून चुकून कांहीं गोष्टी झाल्या तर गांवांतील पांच वयोवृद्ध माणसांनीं, गुन्हेगाराचा दोष हुडकून काढून त्यांच्या असत्प्रवृत्तीवर प्रेमानं निर्बंध घालण्याचा प्रयत्न करावा. कोणत्याहि अन्यायाकरितां कोर्टाची पायरी न चढण्याचं सर्वांनीं मत घ्यावं. ह्यामुळं गांवांत पोलिसांची, पाटील कुलकर्ण्यांची अगर इतर कोणत्याहि अधिकाऱ्यांची जरूरच पडणार नाहीं. अशी विलोभनीय परिस्थिति प्रत्येक खेड्यांत निर्माण होऊन खेड्यांतील समाज एकत्र कुटुंबाप्रमाणं गुण्यागोविंदानं नांदूं लागेल.

प्रत्येक कुटुंबाकरितां लागणारं कापड आपल्या बागखेड्यांतच तयार झालं पाहिजे असा कटाक्ष असल्यानं खेड्यांतील स्त्रीपुरुषांनीं फावल्या वेळांत सूत कातावं. कुणी किती सूत कातणं जरूर आहे ह्याची खेड्यांतील प्रत्येक व्यक्तीला स्पष्ट कल्पना असावी. सूत काततांना मनाची जी एकतानता होते, वरचेवर सूत तुटूं लागलं असतां मनांत जी सहनशक्ति वाढूं लागते, लांबत जाणाऱ्या धाग्याबरोबर उंचावत जाणाऱ्या आपल्या बागखेड्यांतील समाजाची उन्नति मनाला जो आल्हाद देते ह्या साऱ्या गोष्टींच्या अनुभवानं समाजांतील प्रत्येक व्यक्तीचं मन स्फटिकाप्रमाणं स्वच्छ, गंगेप्रमाणं पवित्र आणि वज्राप्रमाणं बलवान होत जाईल. लोहारसुतारीच्या कारखान्याप्रमाणंच एक विणकामाचा कारखाना प्रत्येक खेड्यांत असणं आवश्यक आहे. सूत कातल्यावर त्याच्या वड्या बनवून त्या खेड्यांतच तयार केलेल्या रंगांत रंगविणं, त्याचे ताणे तयार करणं, त्याची पाखणी करणं, अडवणाकरितां कांड्या भरणं, सगळीं कामं ह्या बागखेड्यांतील

स्त्रीपुरुषसमाजानं श्रमविभागणीच्या पद्धतीनं करावीं. कांहीं एक काम न करितां मेलेल्या अन्नावर पोट मारण्याची समाजांतील प्रत्येक व्यक्तीला पहिल्या प्रथम नाहीं तरी पुढं पुढं लाज वाटूं लागेल. अशा तऱ्हेनं एकोप्यानं निरनिराळीं कामं वाटून घेऊन समाज काम करूं लागला म्हणजे खेडयांतील अन्नवस्त्राचा प्रश्न उत्तम तऱ्हेनं सुटेल.

ह्यानंतर खेडयांतील कांहीं व्यक्ती आजारी पडल्या तर त्यांची औषध-पाण्याची सोय करण्याकरितां एक छोटंसं औषधालय प्रत्येक बागखेडयांत असावं. सर्वसाधारणपणें अशा बागखेडयांतून रोगराई होणंच कठिण. शुद्ध हवा, स्वच्छ पाणी नी प्रफुल्लित मनं. कामाचा शीण नाहीं, उद्याची काळजी नाहीं, दुष्ट भावनांना वाव नाहीं. अशा निर्मल परिस्थितींत रोगराई व्हावी कशी? प्रत्येक घरांतील केरकचरा शेतीवर पोचविला, गांवांतील सांडपाणी गटारांच्या सहाय्यानं गावाबाहेर नेऊन त्याचा उपयोग शेतीकरितां केला, मुलांच्या व थोरांच्या प्रातर्विधीच्या जागा त्यांना त्यांना नेमून देऊन हें सोनखत सुद्धां वाया जाऊं दिलं नाहीं आणि प्रत्येक समाजघटकानं खेडंसफाईचं कंकण हातीं बांधलं म्हणजे प्रत्येक बागखेडं एक छोटंसं नंदनवनच होईल. तरी पण रोगराई झाल्यास किंवा कांहीं किरकोळ दोष उत्पन्न झाल्यास ह्या औषधालयाच्या चालकांनीं घरोघर जाऊन, चौकशी करून औषधं द्यावीं. खरूज, नायटे, डोळे येणं वगैरे सांसर्गिक रोग गांवांत फैलावणार नाहींत अशी खबरदारी घ्यावी. शक्य तो देशी वैद्यकाचा उपयोग करावा. औषध देणाऱ्या वैद्या-प्रमाणंच गांवच्या स्त्रियांच्या बाळंतपणाकरितां एक सुईणहि गांवांत असावी. गांवांतील साऱ्या स्त्रियांना गर्भारपणीं योग्य आहार-विहाराची माहिती देणं, त्यांच्या किरकोळ तक्रारींवर वेळींच योग्य ते निसर्गोपचार करून त्यांना गर्भारपणीं निरोगी ठेवणं आणि त्यांच्या सुखप्रसूतीकरितां सतत झटत राहणं हीं कामं त्या सुइणीनं आपलेपणानं करावीं. समाजांतील साऱ्या व्यक्तींचा दर्जा एक आहे; प्रत्येक व्यक्ति ईश्वरी अंश आहे ह्या भावनेनं सारा उच्चनीचभाव विसरून सर्वांनी समतेनं नांदावं. माझं काम श्रेष्ठ, म्हणून माझं महत्त्व

जास्त, दुसऱ्याचं काम कनिष्ठ म्हणून त्याचं महत्त्व कमी अशा भेदभावाचं समूळ उच्चाटन करण्याचं ह्या बागखेड्यांतील समाजाचं ध्येय असावं.

खेड्यांतील समाजानं हलकें हलकें खेड्यांतील निवासस्थानांची पुनर्रचना करावी. बागखेड्यांतील घरं एकाच धर्तीचीं असावींत. 'जातिभेदाचं धीरे धीरे समूळ उच्चाटन करून समाज एकाच दर्जाचा बनविण्याचं ध्येय बागखेड्यांतील प्रत्येक समाजघटकाच्या नजरेपुढं असावं.

बागखेड्याच्या मध्यभागीं एक विस्तीर्ण बागवजा ' विश्राम ' असावा. ह्या विश्रामाच्या मध्यभागीं बागखेड्यांतील सर्व प्रौढ स्त्रीपुरुषांना व मुलांमुलींना एकत्र उभं राहून प्रार्थना करितां येईल इतकं मोठं एक प्रार्थनामंदिर असावं. हें प्रार्थनामंदिर चोहोंबाजूंनीं मोकळं असून वरच्या बाजूला आच्छादित असावं. सर्वसाधारण एका बागखेड्यांतील सहाशें ते हजारापर्यंतच्या समाजाला एका वेळीं एकत्रित उभं राहतां येईल इतकं मोठं हें प्रार्थनामंदिर असावं. ह्या प्रार्थनामंदिराच्या समोंवार पसरलेल्या ह्या ' विश्रामा'च्या चारी कोपऱ्यांत एक मुलांची शाळा, एक मुलींची शाळा, एक पंचकचेरी व एक औषधालय असावं. ह्या प्रार्थनामंदिरांत रोज सकाळीं ठरलेल्या वेळीं पुढील अगर त्या तऱ्हेची प्रार्थना हिंदुस्थान नभोवाणीवरून ऐकविण्यांत यावी. ' जगांतील साऱ्या जीवमात्रांत सदैव सुख, शांतता नी सलोखा नांदो '. शिंग फुंकून अगर तास वाजवून प्रार्थनेपूर्वी पांच मिनिटं समाजाला प्रार्थनेची पहिली सूचना देण्यांत यावी. सूचना होतांच समाजांतील साऱ्या स्त्रीपुरुषांनीं आपापल्या मुलाबाळांना घेऊन रोज नियमानं प्रार्थनामंदिराकडं प्रार्थनेकरितां निघावं. ह्या प्रार्थनामंदिराच्या हमचौरस चार भागांत स्त्रिया, पुरुष, मुलं व मुली ह्यांनीं शिस्तीनं उभं रहावं. नभोवाणीवरून प्रार्थनेची सूचना मिळतांच सर्वांनीं शांत व्हावं. प्रार्थना संपतांच सूचना मिळाल्यावर सर्वांनीं रांगेनं प्रार्थनामंदिरांतून बाहेर पडून आपापल्या कामाला जावं व मुलामुलींनीं शाळेंत जावं.

शाळांतून दिलं जाणारं शिक्षण मुख्यतः मन, शरीर नी चारित्र्य ह्यांच्या विकासावर आधारलेलं असावं. सुमारें एक तास शाळेंत विद्या-

र्थ्यांना जरूर त्या विषयांचं शिक्षण देत असतांना मुलामुलींच्या ह्या त्रिविध विकासावर शिक्षकशिक्षकिणींची नजर असावी. नंतर ह्या विद्यार्थ्यांनीं आणि विद्यार्थिनींनीं आपल्या खेडयांतील कारखान्यांतून अगर शेतांतून आपल्या वडील माणसांना मदत करतां करतां कामाचं शिक्षण घ्यावं. फिरून संध्याकाळीं ह्या साऱ्या विद्यार्थीविद्यार्थिनींनीं शाळेंत जमावं आणि शिक्षकांच्या देखरेखीखालीं निरनिराळे खेळ खेळावे. खेळ जवळजवळ बिनखर्चांचे असावेत आणि प्रत्येक खेळ खेळत असतांना शिक्षकांनीं बालमनांचा विकास करण्याचा प्रयत्न करावा. अशा तऱ्हेनं फारच थोडया वेळांत विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची नवी प्रथा सुरू करावी. विद्यार्थ्यांना कंटाळा येईल अशा प्रकारच्या निरनिराळ्या विषयांच्या जाळ्यांत विद्यार्थ्यांना अडकवून परीक्षांच्या धाकानं त्यांच्या हृदयांत कंप उत्पन्न करण्यापेक्षां हौसेनं नी आनंदानं ह्या मुलांचं जें चारित्र्य बनेल तें चारित्र्यच त्यांना उभ्या आयुष्यांत योग्य मार्ग दाखवील.

ह्या विश्रामाच्या सभोंवार साऱ्या निवासस्थानांची आंखणी केलेली असावी. प्रत्येक घर अलग असून त्याला चोहोंबाजूंनीं मोकळी जागा असावी. सारीं घरं उभ्या आडव्या रांगांतून सरळ रेषेंत असावीं. ह्या विश्रामाच्या मध्यभागीं प्रार्थनामंदिराच्या शिखरावर चोहोंबाजूंनीं स्पष्ट दिसेल असा एक घड्याळाचा आणि गांवाच्या नांवाचा स्तंभ असावा. साधारणतः एक हजार वस्तीला पुरतील अशीं दोनशें लहानमोठीं घरं असावींत. लहानांत लहान घरांत दोन खोल्या व मोठ्यांत मोठ्या घरांत आठ खोल्या असाव्यात. एकाद्या कुटुंबांतील माणसं कमी झालीं अगर एकाद्या कुटुंबांतील माणसांची संख्या वाढली तर घरांची अदलाबदल करावी. पंचकचेरींत समाजांतील निरनिराळ्या व्यक्तींनीं आपापल्या तात्कालिक गरजांची नोंद करावी व पंचांनीं विचार करून त्या त्या लोकांच्या आवश्यक गरजा निःपक्षपातीपणानं भागवाव्या.

ह्या बागखेडयाच्या सभोंवतालीं जरूर ते कारखाने व गोदाम उभारावे. एक सुतारी कामाचा, एक लोहारकामाचा, एक विटामट्टीचा व एक विणकामाचा असे मुख्य चार कारखाने बागखेडयाच्या बाहेरील

चार कोपऱ्यांत असावे. धान्याचं कोठार, कापसाचं कोठार, कापडाचं गोदाम अशा जरूर त्या सर्व गोष्टींची आंखणी करून कामाला लागावं. एवढ्या सर्व गोष्टी करण्याची एक दशवार्षिक योजना आंखून साऱ्या समाजांतील व्यक्तींनीं आपल्या प्रयत्नांची शिकस्त करून आपलं आदर्श बागखेडं निर्माण करावं. अशा तऱ्हेनं अत्यंत जरुरीच्या योजना पूर्ण झाल्यानंतर इतर विशेष योजना अमलांत आणणं जरूर आहे. बागखेड्यांतील सारे रस्ते उत्तम डामरी बनवावे. प्रत्येक रस्ता सरळ असून सारे रस्ते एकमेकाला समांतर अगर एकमेकाला उभे असे तयार केल्यास बागखेड्याची रचना निर्दोष नी आकर्षक होईल. सडका डामरी झाल्यानं खेड्यांत धुळीचा त्रास होणार नाहीं. गाईम्हशींचे गौळ-वाडे नी बैलांचे गोठे एकत्रच असावेत. शेतांतून तयार झालेल्या ह्या वैरणीच्या गंजी गोठ्याजवळच रचाव्या. त्याचप्रमाणं कापसांतील सरकी काढून घेतल्यानंतर कापूस मागकारखान्याकडं व सरकी कामधेनूवाडीकडं पाठवावी. निरनिराळ्या डाळींचा कोंडा, कळणा जनावरांकरितां राखून ठेवावा. समाजांतील कांहीं लोकांनीं ह्या गौळवाड्याचीं सगळीं कामं करून गांवांतील कुटुंबांना दूधदुभतं पुरवावं. दळण्याच्या कामीं गिरण्यांचा उपयोग न करितां ज्या त्या कुटुंबांतील स्त्रियांनीं आपापल्या घरांत लाग-णारं धान्य जात्यावरच दळावं. चक्यांतून दळलेल्या धान्याच्या पिठापेक्षां घरीं दळलेलं पीठ अधिक सकस असल्यानं आणि दळणाच्या व्यायामानं स्त्रियांची प्रकृति निकोप राहते ही वैद्यकाची सूचना असल्यानं पिठाच्या चक्यांना उत्तेजन दिलं जाऊं नये. साऱ्या समाजाला सतत बारा महिने सात्त्विक व पौष्टिक अन्न मिळत राहील अशी समाजानं खबरदारी घ्यावी. शेतीपैकीं कांहीं भागांत निरनिराळ्या फळझाडांची लागवड करून त्या त्या ऋतूंत त्या त्या फळांचा पुरवठा प्रत्येक कुटुंबाला केल्यानं साऱ्या समाजांत फळांच्या सेवनानं आणि दूधदुभत्याच्या समृद्धीनं नवचैतन्य निर्माण होऊन आपल्या ह्या आदर्श बागखेड्यांतील प्रत्येक व्यक्ति आयुरारोग्याच्या बाबतींत उन्नत होऊन सुखशांततेच्या उत्तुंग शिखरावर अधिष्ठित होईल. अशा तऱ्हेच्या बागखेड्यांतील समाजाची सतत प्रग-तीच होत राहील. खेड्यांतील रोजच्या व्यवहारांत नाण्याची जरूरीच

भासणार नाहीं. कागदी पावत्यांवर सर्व व्यवहार व्यवस्थित चालतील. अशा पद्धतीनं पहिली दशवार्षिक योजना यशस्वी रीतीनं अमलांत आल्यानंतर आसपासच्या पंचवीस खेडयांचा एक गट करून त्या विशिष्ट गटापुरती आणखी कांहीं सुधारणा करण्याची दुसरी योजना ह्या गटांतील बागखेडयांच्या अधिक सुखसोयींकरितां आंखतां येईल.

पाण्याच्या नळांची आणि विजेच्या दिव्यांची योजना ह्यानंतर हातीं घेतां येईल. ह्या पंचवीस खेडयांत पाणी पुरवितां येईल असं एखादं धरण केंद्राच्या ठिकाणीं बांधून त्या ठिकाणाहून सर्व पंचवीस खेडयांतून पाणी फिरवावं किंवा प्रत्येक खेडयांत त्या त्या खेडयापुरती वेगळी पाण्याची व्यवस्था करून तें पाणी नळांच्या सहाय्यानं ह्या बागखेड्यांच्या प्रत्येक घरांतून फिरविल्यानं समाजाच्या सुखसोयी थोड्या अधिक वाढतील. त्याबरोबरच वीजपुरवठ्याची योजनाहि ह्या मुख्य केंद्रांतून अमलांत आणतां येईल. आगगाडयांची वाहतूक ह्या मुख्य केंद्रांपर्यंतच नियंत्रित असावी. ज्या ज्या ठिकाणीं हीं मुख्य केंद्रं उभारलीं जातील त्या त्या ठिकाणीं कामं करणाऱ्या लोकांची राहण्याजेवण्याची व्यवस्था ह्या मुख्य केंद्रालगत एक कामगारांचं बागखेडं वसवून करण्यांत यावी. ह्या केंद्रांत काम करणाऱ्या कामगारांची दर तीन वर्षांनीं नवी भरती करण्यांत यावी. प्रत्येक खेड्यांतून ह्या केंद्रांत काम करण्याकरितां लोक पाठविण्यांत यावे. तीन वर्षांनंतर ह्या कामगारांना कामाची माहिती होतांच पहिल्या कामगारांची सोडवणूक करून त्यांना आपल्या बागखेड्यांत परत पाठवावं व त्याबरोबरच त्या त्या खेड्यांतून पुन्हा दुसऱ्या कामगारांची पाठवणी करावी. अशा तऱ्हेनं ह्या केंद्रांत एका व्यक्तीला आयुष्यांतील जास्तींत जास्त सहा वर्षं काम करावं लागेल.

सबंध हिंदुस्थानांत अशीं दुय्यम केंद्रं सुमारें तीस हजार व मुख्य केंद्रं सुमारें एक हजार असतील. निरनिराळं यांत्रिक उत्पादन ह्या केंद्राच्या ठिकाणीं करावं लागेल. यंत्रांचा कमींत कमी फक्त जरूर तेवढाच उपयोग करण्याचं धोरण कटाक्षानं पाळलं जावं. आपल्या राष्ट्राला स्वयंपूर्ण करण्याकरितां लागणाऱ्या आवश्यक वस्तूंचं उत्पादन नाइलाजानं, व्यक्तिकारागिरांचं उत्पादन अपुरं पडत असेल तरच फक्त ह्या कारखान्यांतून

केलं जावं. आपल्या कारखान्यांतून उत्पन्न होणाऱ्या मालाला परराष्ट्राची बाजारपेठ काबीज करण्याचं त्याज्य ध्येय राष्ट्राच्या कारखानदारींत नसावं. तरी पण जगाच्या पाठीवरील एकाद्या राष्ट्रांतील मानवी समाजाला कांहीं वस्तूंची जरूरी असेल आणि त्या वस्तूंचं उत्पादन त्या राष्ट्रांत होणं शक्य नसेल तरच फक्त देवाणघेवाणीच्या तत्त्वावर त्या राष्ट्राला जरूर तो माल आपल्या राष्ट्रानं पुरवून त्याच्या बदला आपल्याला जरूर तो माल त्या राष्ट्राकडून आपण मिळवावा. पण हें धोरण फारच दूरच्या काळांतील आहे. ह्या नव्या विचारसरणीच्या अनुरोधानं आपलं राष्ट्र स्वयंपूर्ण होऊन आपल्या राष्ट्रांत सुख, समाधान नी शांतता नांदू शकते हें अगोदर आपल्याला सिद्ध करायचं असल्यानं तूर्त राष्ट्राराष्ट्रांतील देवाणघेवाणीचा विशेष साकल्यानं विचार करण्याची आपल्याला जरूरी नाहीं. आपल्या छोट्या छोट्या गटांचं ज्या तत्त्वावर केंद्रीकरण होईल त्याच तत्त्वावर राष्ट्राराष्ट्रांतील देवाणघेवाणीचा प्रश्न सोडविणं अनुभवाअंतीं अवघड जाणार नाहीं.

ह्या गटागटांतील प्रत्येक खेड्यांतून एकेक प्रतिनिधि घेऊन ह्या पंचवीस प्रतिनिधींची एक केंद्रसभा असावी. वर्षांतून कांहीं वेळा ह्या प्रतिनिधींनीं एकत्र जमून आपलं केंद्र स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीनं जरूर त्या योजना हातीं घ्याव्या. मुख्य धोरण मात्र प्रत्येक खेड्याची स्वयंपूर्णता हेंच असावं. नाइलाज असेल त्याच ठिकाणीं ह्या केंद्रसभेनं विचार करून तात्पुरता मार्ग शोधून काढावा; पण जीवनोपयोगी वस्तूंची बाध पडत असेल त्या खेड्यांतून जरूर त्या सुधारणा अमलांत आणून शक्य तितक्या लवकर त्या खेड्यांतील न्यूनता नाहींशी करण्याचं ध्येय असावं. प्रत्येक खेड्यांतून केंद्रसभेंत पाठविला जाणारा प्रतिनिधि वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध, निःस्वार्थी, निःपक्षपाती नी त्यागी असावा. ह्या साऱ्या गुणविशेषांचं मापन करणं अशक्य असल्यानं ही निवड करणं अवघड जाईल हें खरं, पण त्यांतल्यात्यांत कांहीं गोष्टींचा विचार केल्यास ही गोष्ट सहज शक्य होईल.

ही निवड करण्यांत पहिली मुख्य अट वयाची असावी. आपल्या खेड्यांतील वयोवृद्ध स्त्रीपुरुषांपैकीं पहिल्या पांच अगर तीन माणसांतूनच

ही निवड व्हावी. निवडणूक केव्हां करावी हें राष्ट्रमुख्याच्या संदेशानं प्रत्येक खेड्यांत नभोवाणीवरून कळविलं जावं. सान्या खेड्यांतून प्रार्थनेची वेळ एकच असल्यानं त्या प्रार्थनेनंतर लॅंगलीच निवडणुकीची घोषणा नभोवाणीवरूनच केली जावी. प्रार्थनेच्या वेळीं उपस्थित असणाऱ्या प्रत्येक स्त्रीपुरुषाच्या हातीं एकेक कागद द्यावा. बाहेरच्या दाराजवळ प्रत्येक कोपऱ्यांत असलेल्या पेटींत ह्या जाहीर झालेल्या नांवापैकीं एका व्यक्तीचं नांव लिहून त्या चिठ्या त्या पेटींत टाकून त्या उमेदवाराखेरीज साऱ्यांनीं आपापल्या नेहमींच्या व्यवसायाला जावं. उमेदवारांनीं एकत्र बसून त्या मतांची मोजणी करावी व ज्या व्यक्तीच्या नांवाच्या चिठ्यांची संख्या सर्वांत अधिक भरेल तो त्या बागखेड्याचा त्या वर्षीचा प्रतिनिधि समजावा. प्रार्थनेला गैरहजर असणाऱ्या लोकांना मत नाहीं हें ह्या मतदानपद्धतीवरून स्पष्टच होतं. ह्या मतदानपद्धतींत हल्लींच्या सदोष मतदानपद्धतींतील बहुतेक सारे दोष नाहींसे करून निवडणूक शक्य तों साधी नी निर्दोष करण्याचा प्रयत्न केला आहे.

पहिल्याप्रथम निवडणुकीला उभं राहण्याची कुलमुखत्यारी कोणा एका विशिष्ट व्यक्तीकडं देण्यांत आलेली नाहीं. निवडणुकीला उभं राहण्याचा मान प्रत्येक आयुरारोग्यसंपन्न व्यक्तीला मिळावा. मग ती व्यक्ति कमीअधिक बुद्धिवान असली तरी चालेल. ह्यांत मानवी जीवन उत्तम तऱ्हेनं चालविणाऱ्या व्यक्तीलाच समाज अधिक मानतो हें सिद्ध होतं. जास्त दिवस जगणाऱ्या व्यक्तीला जीवन उत्तम तऱ्हेनं कसं जगावं ही हातोटी निसर्गतः म्हणा अगर प्रयत्न करून म्हणा चांगली साधलेली असते. वयोवृद्ध माणसांना जगाचा अधिक अनुभव असल्यानं व त्यांना यापुढं जगांत जास्त दिवस जगायचं नसल्यानं त्यांच्या आशाआकांक्षांना त्यांच्या स्वार्थाला आयुष्यांत आलेल्या निरनिराळ्या कटुगोड अनुभवांनीं बरीच मुरड पडलेली असते. कोणत्याहि व्यक्तीला उभं राहण्याचा अधिकार दिल्यास अननुभवी नीं अपरिपक्व विचाराच्या तरुणांच्या हातून अविचार होण्याचा फार संभव असतो. दुसरं कारण म्हणजे ज्या व्यक्तीला पूर्ण आयुष्य कसं जगावं ही जीवनकला सुद्धां माहीत नाहीं ती व्यक्ति समाजाचं चिरंतन कल्याण साधू शकणार नाहीं. ही निवडणुकीला उभं करण्याच्या व्यक्तीची योग्यता

कोणत्याहि जातीय भेदभावांवर आधारली नसल्यानं कोणत्याहि जातींतील, कोणत्याहि धर्मांतील बहुकाल जीवन जगण्याचं सामर्थ्य उत्पन्न झालेल्या प्रत्येक व्यक्तीला हा अधिकार आहे. जातीजातींत उत्पन्न झालेली द्वेषभावना ह्या अभिनव पद्धतीनं नाहींशी होईल. फक्त निवडणुकीला उभं राहणारा प्रतिनिधि कोणत्याहि दृष्टीनं पंगू असतां कामा नये, एवढा एक नियम पाळल्यास निवडणुकीला उभं राहणाऱ्या व्यक्तीच्या दृष्टीनं ही पद्धति निर्दोष ठरेल असं वाटतं. ही निवडणुकीला उभं राहणाऱ्या व्यक्तींची संख्या लहान असल्यानं जातिमूलक अल्पसंख्याकांना सुद्धां ही पद्धति अमान्य होण्याचं कारण नाहीं. संख्याबलानं कमी असलेल्या ज्या जमातींतील लोकांना जीवन जगण्याची कला उत्तम तऱ्हेनं साधली आहे त्याच समाजांतील व्यक्तींना केंद्रसभेचा सभासद होण्याचा मान मिळेल. व्यक्ति कोणत्या जातीची आहे, कोणत्या धर्माची आहे, बुद्धीनं श्रेष्ठ आहे कां कनिष्ठ आहे ह्या साऱ्या गोष्टींना मानवीसमाजहिताच्या दृष्टीनं अधिक महत्त्व देण्यापेक्षां मानवीसमाजाचं सर्वश्रेष्ठ ध्येय जें उत्तम जीवन जगणं तें ध्येय ज्या व्यक्तीला इतरांच्यापेक्षां अधिक यशस्वी रीतीनं साधतां आलं त्या व्यक्तीलाच आपल्या बागखेड्यातर्फे बहुमानाची जागा देणं रास्त आहे, हें सर्वांनाच विचाराअंतीं पटेल. शेळी होऊन शंभर वर्षे जगण्यापेक्षां वाघ होऊन एक दिवस जगणं बरं ही म्हण सामर्थ्याच्या, धैर्याच्या, पराक्रमाच्या दृष्टीनं जरी सार्थ असली तरी वाघ हा प्राणी सुद्धां, अपघाताचं मरण वगळल्यास, अगदीं वृद्धापकाळापर्यंत जगतो. म्हणजे जीवन जगविण्याची कला ज्या व्यक्तीला साधलेली आहे, त्या व्यक्तीला जगांतील अत्यंत महत्त्वाची गोष्ट साधली आहे असंच मानावं लागेल. ह्या दृष्टीनं वयानं श्रेष्ठ असलेल्याच व्यक्तीला निवडणुकीला उभं राहूं देणं इष्ट होईल.

प्रत्येक वयोवृद्ध पण कार्यक्षम व्यक्तीनं निवडणुकीला उभं रहावं अशी खुषीची सक्ती आहे; म्हणजे, मी निवडणुकीला उभा आहे, मला मतं द्या, अशा स्वार्थी वृत्तीनं निवडणुकीकरितां व्यक्तीनं उभं राहायचं नसून, प्रत्येक व्यक्तीनं ही समाजाची प्रेमाची सक्ती समजून ती शिरसावंद्य मानली पाहिजे. ह्या तत्त्वानं व्यक्ति श्रेष्ठ नसून समाज श्रेष्ठ आहे ही कल्पना प्रामुख्यानं पुढं येते. कीर्तीची, अधिकाराची नी स्वार्थाची हाव

ज्या वयांत नसते त्या वयांत अधिकार हातीं आल्यानं त्या व्यक्तीमध्यें अधिक निःपक्षपात, अधिक निःस्वार्थीपणा प्रतीत होत असल्यानं समाजाची आज्ञा शिरसावंद्य मानून समाजसेवा करण्याला प्रवृत्त होणारी ही वयोवृद्ध व्यक्ति इतर कोणत्याहि व्यक्तीपेक्षां आपल्या अधिकाराचा उपयोग समाजहिताकरितां अधिक समतोल बुद्धीनं करूं शकेल.

निवडणूक–प्रचाराला ह्या पद्धतींत वावच नसल्यानं दडपण आणण्याच्या हल्लींच्या बेलगामी वृत्तीला बऱ्याच प्रमाणांत आळा पडेल. प्रार्थनेला हजर न राहणाऱ्या व्यक्तीला मतदानाचा अधिकारच पोचत नसल्यानं निवडणुकीच्या वेळीं मतदानाचा अधिकार असलेल्या व्यक्तीला जुलमानं आणणं वगैरे गोष्टींना प्राधान्य मिळणार नाहीं. हजर असलेल्या मुलांमुलींखेरीज साऱ्या वयांत आलेल्या साक्षर समाजाला हा मत देण्याचा अधिकार आहे, हें ह्या पद्धतीवरून सिद्ध होतं. त्यामुळं सारी जनता आपला मताधिकार अबाधित ठेवण्याकरितां म्हणून तरी निदान साक्षरतेला जागरुक राहील. मतदानाच्या वेळीं आरडाओरडा, मारामाऱ्या, लांचलुचपत वगैरे कोणत्याहि गोष्टी होण्याला सवडच नसल्यानं सारं मतदान फारच थोडया वेळांत नी व्यवस्थित रीतीनं पार पडेल. दोन व्यक्तींना सारखीं मत पडल्यास चिठ्या टाकून प्रतिनिधि ठरवायला सुद्धां हरकत नाहीं.

ह्या विश्रामाचा उपयोग ज्याप्रमाणं मतदानाकरितां, प्रार्थनेकरितां, मुलांना खेळण्याकरितां होईल त्याचप्रमाणं त्याचा उपयोग बागखेड्यांतील कोणत्याहि उत्सवाच्या, जयंतीच्या अगर पुण्यतिथीच्या वेळीं करतां येण्यासारखा आहे. ज्या ज्या दिवशीं वरील प्रकारचे उत्सव साजरे करायचे असतील त्या दिवशींची प्रार्थना झाल्यानंतर निरनिराळया विभूतींच्या आयुष्यांतील प्रसंग समाजापुढं सांगून त्यांच्या उदाहरणानं प्रत्येक व्यक्तीला आपलं मन, शरीर नी चारित्र्य कसं उज्ज्वल करितां येईल हें पटवून द्यावं. हें झाल्यानंतर प्रत्येक व्यक्तीनं नेहमींप्रमाणं आपापल्या कामाला लागावं. बागखेड्यांत कोणाकडंहि लग्न असलं तर ह्या विश्रामांतच प्रार्थनेनंतर लग्न उरकावं. लग्नाला अवास्तव खर्च करण्याची प्रथा अजि-

चाल बंद करावी. एखाद्या अनोळखी व्यक्तीची ओळख करून घेणं ही जितकी साधी गोष्ट आहे तितकाच साधेपणा ह्या लग्नव्यवस्थेंत असावा. प्रार्थनेनंतर वधूवरांनीं एकमेकांच्या गळ्यांत हार घालावे आणि समाजानं टाळ्या वाजवून त्यांना धन्यवाद द्यावे, एवढीच लग्नांतील महत्त्वाची गोष्ट ठरवावी.

बागखेड्याची सर्वसाधारण स्थूल रूपरेखा वरीलप्रमाणं आहे. अशा तऱ्हेच्या स्वयंपूर्ण खेड्यांची एकदां उभारणी झाली आणि प्रत्येक खेडं स्वावलंबी झालं कीं खेड्यांतील प्रत्येक व्यक्तींत आत्मविश्वास निर्माण होईल. मानवीमनांतील हा आत्मविश्वास म्हणजेच यशाची मुहूर्तमेढ. खेडं स्वयंपूर्ण होणं म्हणजेच प्रांत स्वयंपूर्ण होणं. प्रांत स्वयंपूर्ण होण्यावरच समतेची क्रान्ति अवलंबून आहे. आर्यावर्तातील ही विशुद्ध क्रान्ति हेंच मानवजातीचं ध्येय आहे. हें ध्येय गाठणं अगर ह्या ध्येयापासून दूर जाणं ह्या दोन्ही गोष्टी आजच्या हिंदुस्थानच्या राष्ट्रीय सरकारच्या हातीं आहेत. पाश्चिमात्यांच्या आधिभौतिक विचारसरणीला भाळून आजच्या आपल्या सरकारनं 'सोऽहं' 'तो मी' हा शब्दप्रयोग विसरून 'कोऽहं' कोण मी ह्या शब्दप्रयोगाचा पुकारा केला कीं आजवरची तपश्चर्या मातीमोल ठरण्याचा संभव आहे. आजच्या सरकारचं राज्य म्हणजे तारेवरचा नाच आहे नुस्ता! सभोंवार दाहीदिशांनीं आधिभौतिक प्रगतीचे प्रचंड वणवे पेटले आहेत. ह्या प्रचंड वणव्यांपासून आपलं संरक्षण करण्याकरितां त्यांना फक्त एकाच व्यक्तीच्या मानसिक सामर्थ्याचा आसरा आहे. ज्या समाजावर राज्य करायचं तो समाज तर आज बेरेमाप भडकलेला आहे. अशा वेळीं त्या एका नेत्यानं दाखविलेल्या समाजमनाच्या ध्येयताऱ्याची दिशा न सोडतां, भडकत जाणाऱ्या समाजाला आवरून, सभोंवार चौफेर पेटलेल्या आधिभौतिकतेच्या प्रचंड वणव्यापासून आपलं संरक्षण करून मानवीसमाजाला शिकवण देणारं स्वयंपूर्ण राष्ट्र निर्माण करण्याची जबाबदारी यशस्वी रीतीनं पार पाडणं अतिशय अवघड आहे. तरी पण त्यांनीं जर आपलं मानसिक अधिष्ठान सोडलं नाहीं, तर चौफेर उसळलेली यांत्रिक सुधारणांची आग आपोआप विझेल. लोकमनाचा वारा सुलट्या दिशेनं वाहूं लागेल आणि अखिल मानवीसमाजाच्या गुरुस्थानीं असलेल्या एका-

[illegible]ची तपश्चर्या फळाला येऊन स्वयंपूर्णतेच्या तेजानं दाही दिशा [illegible]नं उजळतील.

फक्त ह्या वेळीं आपल्या साऱ्या राष्ट्रधुरीणांनीं आपल्या शक्तिसर्वस्वाचा मारा आर्यावर्तातील बालमनावर करणं जरूर आहे. आजच्या प्रौढ हिंदवीसमाजाला त्यांनीं शांत रहा असं कितीहि आपुलकीनं, कितीहि जिव्हाळ्यानं, कितीहि कळवळ्यानं सांगितलं आणि समाजाला त्यांचं सांगणंहि कांहीं वेळ पटत असलं तरी समाजमनाचं भडकलेलं तारूं एकदम शांत होणं कठीण आहे. हल्लींच्या राष्ट्रीय सरकारच्या अगदीं आंतल्या वर्तुळांत सुद्धां बेकीचं विषारी रोप फोफावूं लागलं आहे. आपण आजवर केलेल्या स्वार्थत्यागाचं दृश्य फळ जें अखिल मानवजातीच्या शांततेचं ध्येय तें विसरून क्षणभंगुर अधिकाराच्या लालसेनं त्यांच्यांत सुद्धां अधिकाराची, मोठेपणाची, स्वार्थांधतेची संकुचित मनोवृत्ति उफाळूं लागली आहे. शांत त्यांचा दोष नाहीं. स्वराज्य हेंच आजच्या आर्यावर्तातील राष्ट्रीय सभेचं ध्येय; आज आपण तें ध्येय गांठलं आहे ह्या भ्रामक समजुतीनं, आपण आजवर केलेल्या स्वार्थत्यागाचं दृश्यफल आपल्या पदरांत पाडून घेण्याच्या प्रयत्नाला ह्या गोटांतील बऱ्याच व्यक्ती लागल्यासारख्या दिसताहेत. राष्ट्रसभेंतील पहिल्या दर्जाच्या त्यागवीरांना ह्या नव्या राज्यघटनेंत अव्वल दर्जाच्या जागा मिळाल्या आहेत तर दुय्यम प्रतीच्या देशभक्तांना राजकारणांत दुय्यम स्थान आणि तिसऱ्या दर्जाच्या देशभक्तांना तिसऱ्या दर्जाचं स्थान मिळावं ही त्यांची विचारसरणी सयुक्तिक आहे. [illegible] वेळीं आपल्या राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या धोरणाची, त्यांच्या भाषणाची, त्यांच्या काम करण्याच्या शैलीची साऱ्या पाश्चिमात्य राष्ट्रांकडून स्तुतिस्तोत्रं गाइलीं जात आहेत. तपस्व्यांचा तपोभंग करणारे हे मोह आहेत. ह्या नव्या विचारसरणीचा प्रयोग खरोखरच आर्यावर्तात यशस्वी झाला तर आपल्या आधिभौतिक सुधारणेला जगांत कुणीच विचारणार नाहींत ह्या भीतीनं हल्लींच्या हिंदवीनेत्यांची भरमसाट स्तुति करून त्यांना आपल्या कच्छपांत ओढण्याचा हा पाश्चिमात्यांचा अखेरचा प्रयत्नहि असेल कदाचित्! अशा वेळीं आपल्याला अधिकाराची [illegible] नाहीं हें सिद्ध [illegible] मंत्रिमंडळांत [illegible] स्थान मिळालेल्या [illegible]

लोकमान्य विभूतींनीं बालमनाच्या उठावणीच्या कार्याला लागण्या-करितां स्वतः शिक्षकाचा पेशा पत्करायला तयार व्हायला पाहिजे. सारी नोकरशाही आज पूर्वीप्रमाणं काम करतेच आहे. ह्या नोकरशाहीवरील मंत्रीपदाचं चालचलाऊ काम कोणत्याहि दुसऱ्या अगर तिसऱ्या दर्जाचे राष्ट्रीय पुढारी करूं शकतील. पण यापुढं खरीखुरी मानवीसमाजाची उभारणी ज्या आर्यावर्तांतील बालमनांतून करावयाची आहे, त्या आर्यावर्तांतील बालमनांच्या उठावणीच्या कार्याकरितां आपल्या राष्ट्रीय नेत्यांनीं आपलं शक्तिसर्वस्व एकवटून प्रयत्न करण्याची जरूरी आहे.

परकीय सरकारचा जुलमी अम्मल आर्यावर्तांत पाशवी थैमान घालीत असतांना त्या पाशवी शक्तीशीं टक्कर देण्याकरितां ज्यांनीं आजन्म कारावास भोगला, वेळोवेळीं सत्याग्रहाची चळवळ यशस्वी करून दाखविली, करबंदीसारखे त्यागाच्या तेजानं झळाळणारे कार्यक्रम ज्यांच्या नेतृत्वाखालीं यशस्वी झाले, अशा आपल्या नेत्यांना आपल्याच राष्ट्रीय सरकारच्या राजवटींत आर्यावर्तांतील बालमनांची उठावणी करण्याला कितीसा वेळ लागणार आहे ? अधिकारावर राहून सुद्धां हे प्रयत्न करतां येतील अशा दृष्टीनं आज प्रयत्न चालू आहेत. पण ज्या तपासनिसांना आपण आपल्या नव्या योजना समजावून देतां आहांत, ज्या अधिकारीवर्गाला ह्या नव्या शिक्षणयोजनांचा प्रसार करण्याकरितां तुम्ही नेमणार आहांत, ज्या शिक्षकांच्या हातीं आपल्या आर्यावर्तांतील बालमनं तुम्ही सुपूर्द करणार आहांत ते तपासनीस, ते अधिकारी, ते शिक्षक जुन्या परंपरेंतील आहेत हें विसरून चालणार नाहीं. ह्या लोकांकडून ह्या नव्या शिक्षणयोजनेचा सारा वरचा देखावा साधला जाईल, पण ह्या नव्या शिक्षणयोजनेचा प्राण मात्र त्यांना त्यांच्या योजनेंत आणतां येणार नाहीं. मातीच्या, दगडाच्या, सोन्या-चांदीच्या निरनिराळ्या सुबक मूर्ती घडविणं हें जरी त्यांना शक्य असलं, ह्या साऱ्या मूर्तींची रेखीव, घोटीव किंवा कलाकुसरीची सौंदर्योपासना जरी ह्या साऱ्या अधिकाऱ्यांना पूर्णत्वाला नेतां आली तरी मानसिक तळमळीचं, मानसिक एकतानतेचं, मानवीसमाजाच्या स्वयंपूर्णतेचं ह्या मूर्तींत आवाहन करण्याचा आत्मविश्वासाचा, त्यागाचा नी विश्वबंधुत्वाचा बीजमंत्र त्यांच्या परिचयाचा नसल्यानं ह्या साऱ्या रेखीव कलाकुसरीच्या मूर्तींत देवपण आणणं

त्यांना अशक्य आहे. हें काम खऱ्या त्यागवीरांचं आहे. आत्मिक बलावर अधिष्ठित झालेल्या तपस्व्यांचं आहे. अखिल मानवजातींत विश्वबंधुत्वाचं नातं निर्माण करूं शकणाऱ्या विभूतींचं हें काम आहे. ही बालमनांची उठावणी करण्याकरितां आजच्या राष्ट्रधुरीणांनीं व आजच्या आर्यावर्तातील समाजघटकांनीं आत्यंतिक प्रयत्न केले पाहिजेत हें निश्चित !

—*—

# १७ : आदर्श शिक्षण

मागील प्रकरणांत ज्या बागखेड्याची काल्पनिक उभारणी केली त्या ध्येयापर्यंत पोचणं आपल्याला शक्य आहे कां असा विचार मनांत येणं साहजिक आहे. तें आदर्श बागखेडं मानवीसमाजाचं निवासस्थान नसून कवींच्या कल्पनासाम्राज्यांतलं एक दैवी नंदनवन आहे असा भास होण्याचा संभव आहे. पण रोमन साम्राज्याच्या वेळीं ज्या इंग्लंडमधला अशिक्षित, अडाणी नी रानटी समाज रोमन साम्राज्याच्या गुलामगिरींत अन्नवस्त्राविना नग्नावस्थेंत वावरत होता त्याच रानटी समाजानं कांहीं शतकांनंतर जगाच्या पाठीवर 'जिथं कधींहि सूर्य मावळत नाहीं' असं सर्व-व्यापी साम्राज्य स्थापन केलं. कोलंबसानं किनाऱ्यावर पहिला पाय ठेवतांच अमेरिकाखंडांतील जी रानटी मानवजात त्याच्याकडं भीतीनं नी आश्चर्यानं पहात राहिली त्याच अमेरिकाखंडांतील समाजानं विसाव्या शतकांतील दोन्ही जागतिक युद्धांत जयाचा पहिला मान मिळविला, एवढंच नाहीं तर कळसाला पोचलेली त्यांची यांत्रिक सुधारणा आज साऱ्या जगाचा थरकाप करीत आहे. ही रानटी मानवजात जर इतकी आश्चर्यकारक प्रगति करूं शकली तर आर्यावर्तांतील जो समाज प्राचीन काळीं उत्कर्षाच्या उत्तुंग शिखरावर नांदत होता तोच समाज मधल्या कालांतील अवनती-नंतर फिरून आपलं गतवैभव परत मिळवूं शकेल ह्यांत कांहींच आश्चर्य नाहीं. एवढंच नव्हे तर अखिल जगांतील मानवीसमाजाला आपल्या-बरोबर वैभवशिखरावर नेण्याची ताकद आर्यावर्तांतील प्राचीन परंपरेंत आहे. यांत्रिक युगाचीं वल्हीं हातीं घेऊन, आध्यात्मिकतेच्या वाऱ्याच्या साहाय्यानं मानवतेचं जहाज वल्हवणं फारच सोपं आहे. आपल्या समा-जांतील वातावरण फारच गढूळलेलं आहे. अठरापगड जातींच्या विषम-तेनं समाज हवालदिल झाला आहे. दारिद्र्याच्या दारुण जाचणीनं समा-जाचा तोल सुटला आहे. स्वार्थांधतेनं प्रत्यक्ष सख्ख्या भावांचीं मनं एकमेकांविषयीं साशंक झालीं आहेत. अशा ह्या समाजाच्या विचित्र

मनस्थितींत त्याला मारणारा जादूगार त्याच्यापुढं उभा राहिल्याशिवाय पूर्वीचं वैभवस्थान परत मिळविणं समाजाला अशक्य आहे.

ही जबाबदारी आमच्या नेत्यांची आहे. आज हिंदवी राष्ट्राच्या गादीवर विराजमान झालेल्या आपल्या नेत्यांनीं फिरून त्यागाला तयार झालं पाहिजे. अचानकपणं एके दिवशीं नभोवाणीवरून भाषण करून आपल्याला मिळालेल्या अधिकाराच्या त्यागानं जगांतील मानवजातीला त्यांनीं आश्चर्याचा जबरदस्त धक्का दिला पाहिजे. आपल्याला मिळालेल्या बहुमानाच्या जागा खालीं करून त्या ठिकाणीं अधिकाराची हौस असलेल्या इतर लोकांना बसवून समाजांतील बालमनांची उठावणी करण्याकरितां त्यांनीं खेड्यांकडं धाव घेतली पाहिजे. मिळालेल्या पहिल्या यशाच्या गुंगींत घुटमळत न राहतां अत्युच्च ध्येय गांठण्याकरितां त्यांनीं अव्वल दर्जाचा अधिकारत्याग केला पाहिजे. योग्य वेळ येतांच महात्माजींनीं ज्याप्रमाणं मानवीमनाची उन्नति साधण्याकरितां खेड्यांतून पायीं प्रवास करण्याचा निश्चय केला त्याचप्रमाणं महात्माजींच्या पट्टशिष्यांनीं देखील खेडेगांवांतील बालमनविकासाला आपल्याला वाहून घेतलं पाहिजे. महात्माजींची तपश्चर्या अत्युच्च दर्जाची असल्यानं गुलामगिरीच्या पुटावर पुटं चढलेल्या प्रौढमनांची उठावणी करण्याचं धर्मसंस्थापकाचं अवघड व्रत त्यांनीं पत्करलं. त्यांच्या सहवासानं पावन झालेल्या त्यांच्या प्रभावळींतल्या इतर नेत्यांनीं त्यांच्या तपःसामर्थ्यावर विश्वास ठेवून, दुसऱ्या टोकाकडून म्हणजे बालमनाकडून समाजाची उठावणी करण्याकडं धांव घेतली पाहिजे. मानवीमनावर पावित्र्याचा असा चौफेर मारा झाल्यावर मानवीमनांतील सारे दोष, मानवीमनावर चढलेलीं अज्ञानाचीं सारीं पटलं, समाजमनाशीं एकजीव झालेल्या साऱ्या हिणकस मनोवृत्ती दूर होऊन, वाढून फुलाफुलून बाहेर पडलेलीं शुद्ध मनं, जागतिक मानवतेच्या मदतीच्या हांकेला ओ देऊन अखिल मानवजातीला उन्नतीचा मार्ग दाखवितील.

त्याग! त्याग! त्याग! लहानापासून थोरापर्यंत सगळ्यांनीं त्यागाचं व्रत हातीं घेतलं पाहिजे. मानाच्या अधिकाराच्या जागांवर बसून राजकारण करणं हें राष्ट्रांतील खऱ्याखुऱ्या नेत्यांचं काम नसून असले राजकारणधुरंधर निर्माण करणं हें त्यांचं काम आहे. आर्यावर्तांतील आमच्या

अव्वल दर्जाच्या नेत्यांनीं नेत्यांचे नेते झालं पाहिजे. ह्यांतच आज त्यांच्या त्यागाची खरी कसोटी आहे. त्यांचं आजचं पवित्र कर्तव्य म्हणजे हिंदुस्थानांतील बालमनांची उठावणी करणं. कॉंग्रेसचा मोठेपणा आज आर्यावर्तांतील प्रत्येक खेड्यांतील बालमनाला ऐकून माहीत आहे. ह्या बालमनांपुढं आपले नेते त्यांना योग्य तें शिक्षण देण्याकरितां उभे राहिले म्हणजे प्रत्येक बालमनाला त्यांच्याबद्दल आदर वाटेल, त्यांच्या त्यागाच्या दिव्य तेजानं साऱ्या बालमनांना प्रकाश मिळेल. आपले हे राष्ट्रीय नेते शुद्ध खादीचा पोषाख करून, चरखा फिरवीत फिरवीत, शंभर शंभर खेड्यांच्या गटांतील बालमनांच्या उठावणीची पाहणी करीत फिरूं लागले म्हणजे ह्या त्यागवीरांचीं आदर्श चरित्रं आपल्या नजरेपुढं ठेवून खेड्यांतील सारे बाळगोपाळ ह्यांच्याइतकेच किंवा ह्यांच्याहिपेक्षां अधिक जोरदार त्यागवीर बनतील. हीं मुलं विहिरी खोदायला तयार होतील, इमारती बांधायला अहमहमिकेनं पुढं येतील, समाजांतील केरकचरा—वेळीं मैला सुद्धां—नाहींसा करून खेड्याला स्वतःच्या कष्टानं नंदनवन बनवितील. पं. जवाहरलालजींसारखे तडफदार वीर, वल्लभभाईंच्यासारखे कर्तबगार कार्यकर्ते, राजेंद्रप्रसाद यांच्यासारखे कळकळीचे समाजसेवक, राजगोपाळाचारींसारखे बुद्धिवान मुत्सद्दी आणि आझादांसारखे निष्ठावान त्यागसम्राट खेड्यापाड्यांतून बालमनांची संघटना करीत, त्यांना शिकवण देत दौरे काढूं लागले कीं अवघ्या पांच वर्षांत आसेतुहिमाचल आर्यावर्तांत इतकी प्रचंड संघटना होईल कीं ह्याच बालवीरांच्या मदतीनं, ह्याच बालवीरांच्या श्रमानं, ह्याच बालवीरांच्या कर्तव्यनिष्ठेनं पुढील पांचचार वर्षांतच मागील प्रकरणांत वर्णन केलेल्या बागखेड्यासारखीं लाखों बागखेडीं आर्यावर्तांत स्वयंपूर्णतेनं नांदूं लागतील. हें गांधीवादाचं ध्येय साधण्याकरितां ह्या नेत्यांनीं अधिकाराचीं वस्त्रं समाजांतील इतर व्यक्तींना बहाल करून ह्या अधिकारमोहांतून तुडकन् बाहेर पडलं पाहिजे. ह्या प्रेमाच्या अधिकारसंक्रमणानं अचाट विद्युत्शक्तीपेक्षांहि अधिक प्रबल असं सामर्थ्य निर्माण होईल. आपले अधिकारारूढ नेते अडचणीच्या वेळीं महात्माजींकडं सल्ला मिळविण्याकरितां धांव घेत त्याचप्रमाणं, ह्यानंतर अधिकारारूढ होणारे अधिकारी ह्या नेत्यांच्या सल्लामसलतीचा अवमान करण्याचं धाडस

कधींहि करणार नाहींत. कारण त्यांना हें पक्कं माहीत आहे कीं आप-ल्याला मिळालेला हा अधिकार आपल्या हातीं ठेवणं अगर तो आपल्या हातून काढून घेणं हें सुर्वस्वी ह्या नेत्यांच्या इच्छेवर अवलंबून आहे. अधिकारावर आलेल्या लोकांनीं स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला तरी सुद्धां ह्या महात्माजींच्या प्रभावळींतील स्वयंप्रकाशित नेत्यांना भिण्याचं बिलकुल कारण राहणार नाहीं, अधिकार देणं हें ज्यांना सहज लीलेनं करतां येतं त्यांना अधिकार घेणं सुद्धां तितक्याच लीलेनं करतां येणं शक्य आहे. ह्या नव्या त्यागाच्या तेजानं उजळलेल्या ह्या विभूतींचं सामर्थ्य आजच्यापेक्षां शतपटीनं, सहस्रपटीनं अधिक वाढेल हें मात्र निश्चित. म्हणून आपल्या राष्ट्रांतील उच्चस्थानावर विराजमान झालेल्या विभूतींनीं परत समाजांत येऊन मिसळणं आजच्या घटकेला अत्यंत जरूर आहे. आपण हा नवा त्याग केल्यास आपल्याबरोबरच समाजांतील इतर घटकांना त्यागाची शिकवण देण्याचा त्यांना अधिकच अधिकार पोंचेल. ह्या प्रेमाच्या आपुलकीनं समाजांतील भांडवलदारांकडून स्वयंपूर्ण खेड्यांच्या उठावणीकरितां ते पूर्वींप्रमाणं 'कोरे चेक' घेऊं शकतील. त्यांना आपली सुवर्णतुला करायला सांगून भारंभार सोनं राष्ट्रकार्याकरितां खर्चीं टाका-यला लावण्याचं सामर्थ्य ह्याच त्यागांतून उत्पन्न होईल. कदाचित् ह्या राष्ट्रधुरीणांच्या नव्या त्यागानं दिपून जाऊन हिंदुस्थानांतील नवकोट-नारायण एका वस्त्रानिशीं आपापल्या राजेशाही बंगल्यांतून बाहेर पडून आपली सारी मत्ता ह्या त्यागवीरांच्या हवालीं करतील.

सध्यांच्या हिंदुस्थानच्या अवघड परिस्थितींत महात्माजींच्या गळ्यां-तील रत्नहारांतले हे हिरे नाइलाज म्हणून, अत्यंत जरूर म्हणून, ह्या अधिकाराच्या जागेवर विराजमान झाले असं सुरवातीला सांगण्यांत आलं. देशांत माजलेल्या अनवस्थेचं कारण देऊन यापुढं देशांत शांतता नांदेपर्यंत कांहीं काल हीं अधिकारसूत्रं ह्यांच्या हातीं राहणं अपरिहार्य आहे, असं आज सांगितलं जातं. शांतता प्रस्थापित झाल्यानंतर हिंदु-स्थानची नवी राज्यघटना बनविण्याकरितां ह्यांची जरुरी आहे असं पुढं सांग-ण्यांत येईल. राज्यघटनेनंतर स्वतंत्र हिंदुस्थानचं नवं धोरण आखायचं आहे असं म्हणत म्हणत हल्लीं अधिकारारूढ असलेल्या ह्या बुद्धिवादी नेत्यांचे अधि-

असर ह्या ना त्या कारणांनीं त्यांनाच कायम चिकटून राहणार असं वाटूं लागलं आहे. असं झाल्यास विरोधी गटांचा विरोध वाढीला लागेल. प्रबळ विरोध नाहींसा करण्याकरितां ह्या विरोधकांना कायद्याची दहशत घालावी लागेल. त्यांना तुरुंगांत डांबावं लागेल, त्यांच्यावर गोळीबार देखील करावा लागेल. समाज आज भडकलेला असल्यानं शुद्ध विचारानं नी एकदिलानं स्वातंत्र्याची उभारणी करण्याचा विचार समाजमनाला पटणं शक्य नाहीं. समाजांतील प्रत्येक घटकाला सत्ता पाहिजे आहे. अशा परिस्थितींत हातीं आलेलं स्वातंत्र्य आपण केव्हां गमवून बसूं हें कळणार देखील नाहीं. पाश्चात्य यंत्रसामुग्रीनं सज्ज असलेले आजूबाजूचे देश आपल्यांतील यादवीची वाटच पाहताहेत. यादवीनं पछाडलेल्या हिंदुस्थान देशावर कुणीहि परकीयांनीं फिरून आक्रमण करून त्यावर आपली सत्ता प्रस्थापित करावी. देशांत पसरलेल्या विरोधी वातावरणानं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातींच्या नी निरनिराळ्या जमातींच्या फलटणी नेहमींच अधिकाऱ्यांच्या आज्ञा शिरसावंद्य मानून आपल्या जातीच्या नी आपल्याच धर्माच्या देशबांधवांवर गोळ्या झाडायला तयार होतील असं वाटत नाहीं. हिंदुस्थानच्या सैनिकांत बेदिली माजली तर हल्लींच्या लोकसत्ताक सरकारला समाजाला आवरणं अशक्य होईल. हा विरोध नाहींसा करण्याकरितां स्वयंपूर्ण राष्ट्राच्या ध्येयाकडं नजर ठेवून हिंदुस्थानांतील बुद्धिवाद्यांनीं हातीं घेतलेली सत्ता सोडून, सल्लागाराचं स्थान घेतलं पाहिजे. असं केल्यानं विरोधकांचीं तोंडं एकदम बंद होतील. सत्ता क्षत्रियांच्या म्हणजे सामर्थ्यवादी माणसांच्या हातीं जाईल. ह्या सामर्थ्यवादी सत्ताधीशांवर त्यागी बुद्धिवाद्यांचं मानसिक वर्चस्व राहील. खेड्यापाड्यांतून नी शहरांतून ठिकठिकाणीं दौरे काढून ह्या बुद्धिवाद्यांना आपली स्वयंपूर्ण राष्ट्राची कल्पना समाजाला पटवून देतां येईल. समाजाच्या साऱ्या मागण्या, साऱ्या चळवळी, सारे मोर्चे ह्या अधिकारत्यागानं थांबवितां येतील. स्वयंपूर्ण आर्यावर्ताच्या उभारणीकरितां हातीं आलेल्या सत्तेचा त्याग करून आम्ही राजसंन्यास घेतला आहे असं समाजाला सांगतां येईल. ह्या वेळीं आपण सर्वांनीं एकदिल झालं पाहिजे, एकमनानं कामाला लागलं पाहिजे, सारे विरोध सोडून देऊन पुढील दहा वर्षांत स्वयंपूर्ण हिंदुस्थानकडं

संस्थापन करण्याकरितां आपण योजना आखली पाहिजे असं समाजांतील लहानथोर व्यक्तींना त्यांना अधिकारवाणीनं सांगतां येईल. गिरणी-कामगारांना संप न करण्याची विनंति करितां येईल. समाजवादी नेत्यांनी संपाच्या प्रोत्साहनाचं धोरण कांहीं काळ सोडून आपल्या खांद्याला खांदा लावून स्वयंपूर्ण खेड्यांची उभारणी करण्याकरितां आपल्याला मदत करावी अशी प्रेमाची नी आग्रहाची मागणी त्यांच्याकडं करतां येईल. व्यापारीवर्गानं कांहीं काळ आपलं उमाप पैसा मिळविण्याचं धोरण बाजूला ठेवावं असं त्याला विनवितां येईल. आत्मविश्वासाच्या नी उज्ज्वल त्यागाच्या जोरावर, फिरून एकदां समाजापुढं उभं राहून, या बालमनाच्या जोपासनेकरितां निर्माण करावी लागणारी त्यागाची भूमिका समाजानं पत्करावी असं समाजाला अधिकारवाणीनं सांगतां येईल. आजवर कित्येक वर्षे आपण गुलामगिरीची कळ सोसली आहे. हीच कळ आणखी कांहीं वर्षे आपणां सर्वांना सोसावी लागणार आहे असं समजून खेड्यांतील बालमनांची जोपासना करूं या. यश मिळालं तर अखिल मानवजात सुखी होऊन आर्यावर्ताचं नांव साऱ्या दुनियेंत जगाच्या अंतापर्यंत दुमदुमत राहील. निदान तुम्हांला त्या बाबतींत प्रयत्न करणं शक्य होत नसेल तर आम्हाला वाव द्या. प्रयत्न करणाऱ्या-इतकंच श्रेय तटस्थ राहणाऱ्यांना मिळतं, असं समजावून सांगून साऱ्या समाजाचीं मनं वळविण्याचा प्रयत्न केल्यास समाज खात्रीनं ऐकेल. भांडवलवाले पैसा पुरवितील. कलावान लोक आपल्या कलेचं शिक्षण देतील. कामकरी लोक फक्त जीवनवेतन घेऊन श्रम करतील आणि अशा तऱ्हेनं अखिल मानवजातीचं हें कार्य सहजासहजीं पूर्णतेला जाईल.

बालमनाला कोणती शिकवण द्यायची, त्यांच्या शिक्षणांत कोणत्या विषयांना प्राधान्य द्यायचं, शाळेंत मानसिक व शारीरिक शिक्षणाला दिल्या जाणाऱ्या वेळाचं प्रमाण काय असावं, बालमनविकास अंतःस्फूर्तीनं घडवून आणायचा, का तो बाहेरच्या ज्ञानानं पूर्णतेला न्यायचा, 'छडी लागे छमछम विद्या येई घमघम ' या तत्त्वाचा उपयोग करायचा, का मुलांच्या मनांत बदल घडवून आणून त्यांच्या असत्प्रवृत्तींचं निर्मूलन करायचं, त्याची ज्ञानेंद्रियांना शिक्षण द्यायचं का कर्मेंद्रियांमार्फत कर्म-

क्रियांचा विकास करायचा, खेळाकरितां खेळ का खेळांतून अभ्यास, जगांतील अफाट ज्ञानभांडार मुलांपुढं मांडून त्यांच्या मनांतील ज्ञानपिपासा जागृत करायची का आवश्यक गोष्टींचं एकत्र केलेलं ज्ञान त्यांच्या मनावर लादायचं, ज्ञानाआधीं पाठांतर हा क्रम योग्य आहे का ज्ञान मिळाल्यानंतर पाठांतर केल्यास मनावर ताण कमी पडतो, ह्या साऱ्या मनोविश्लेषणात्मक गोष्टींचा काथ्याकूट आज कमालमर्यादेपर्यंत पोंचला आहे. विद्यार्थ्यांना काय शिकवायचं नी तें कशाकरितां शिकवायचं ह्याला महत्त्व देण्याऐवजीं तें कशा तऱ्हेनं शिकवायचं ह्याला आजच्या शिक्षणशास्त्रांत अवास्तव महत्त्व आलेलं आहे. कसंहि शिकवा, कुठंहि शिकवा, केव्हांहि शिकवा पण बालमनांच्या नजरेपुढं ध्येयतारा ठेवून त्याचा पूर्ण विकास साधण्याचा प्रयत्न करा.

हिंदुस्थानांतील बालमनं तयार करण्याकरितां त्यांच्या नजरेपुढं कोणता ध्येयतारा ठेवायचा हें समाजानं अर्थात् समाजांतील नेत्यांनीं ठरवायचं आहे. तो ध्येयतारा त्यांच्या नजरेपुढं ध्रुवताऱ्याप्रमाणं स्थिर राहण्याकरितां जे प्रयत्न करायचे त्यालाच शिक्षण म्हणायचं. ही शिक्षणाची व्याख्या ठरल्यानंतर समाजाच्या नजरेपुढं शिक्षणक्षेत्रांतील दोन प्रश्न उभे राहतील. विद्यार्थ्यांचा ध्येयतारा ठरविणं आणि तो स्थिर राहण्याकरितां प्रयत्न करणं.

आज हिंदुस्थानांतील विद्यार्थ्यांच्या नजरेपुढं मानवीसमाजांतील प्रत्येक व्यक्तीचं जास्तींत जास्त सुख हेंच ध्येय ठेवणं जरूर आहे. हें ध्येय साधण्याकरितां आपण आपला देश स्वयंपूर्ण केला पाहिजे. देश स्वयंपूर्ण करण्याकरितां आपण आपलं गांव स्वयंपूर्ण केलं पाहिजे. तेवढ्याकरितां गांवांतील प्रत्येक सज्ञान व्यक्ति स्वयंपूर्ण असणं जरूर आहे. मानवजातींतील प्रत्येक स्त्रीपुरुष व्यक्ति स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीनं मानवतेचीं जीं दोन अंगं, मन आणि शरीर ह्या दोन अंगांचा पूर्ण विकास होण्याकरितां शिक्षणशास्त्रांतील प्रयत्न केंद्रीभूत झाले पाहिजेत. मनाची शक्ति वाढवून त्यांत आत्मविश्वास निर्माण करणं आणि शरीराचं सामर्थ्य वाढवून प्रत्येक व्यक्तीनं जगांत कमींत कमी शंभर वर्षे जगण्याची तयारी करणं हेंच खरं शिक्षण. आपल्या शरीराच्या निरनिराळ्या अवयवांचं सामर्थ्य वाढविण्याकरितां

त्या अवयवांना नियमित व्यायाम देणं जरूर आहे. शरीर हें एक ईश्वर-निर्मित आश्चर्य आहे. ह्या शरीराला पोषक अन्न दिलं, शरीरांत कोणत्याहि तऱ्हेचा बिघाड न होण्याची खबरदारी घेतली; कोणत्याहि अवयवाला बाजवीपेक्षां जास्त ताण न देतां योग्य व्यायामानं प्रत्येक अवयव कार्यक्षम करण्याचा प्रयत्न केला म्हणजे सर्वसाधारण मनुष्याची प्रकृति निकोप रहायला हरकत नाहीं. आयुष्यांतील अनपेक्षित आघात अपघात सोडले तर शंभर वर्षं ही मानवी आयुष्याची किमान मर्यादा आहे. अतिश्रमाचा अगर कमी श्रमाचा जसा मानवी जीवनावर अनिष्ट परिणाम होतो त्याच-प्रमाणं निकोप प्रकृतीवर मानसिक आघातांचा सुद्धां फारच भयंकर परिणाम होतो.

एका माणसाला मेदोवृद्धीची व्यथा जडलेली होती. त्यानं निरनिराळ्या वैद्यांच्या गोळ्या, भस्मं, रसायनं वगैरे मिळतील तीं औषधं घेतलीं. पण त्याच्या शरीरांतील मेद कांहीं हटेना. त्यानं आपली प्रकृति एका नामांकित वैद्याला दाखविली. त्या वैद्यानं त्याची तक्रार ऐकून घेतली आणि त्याला सांगितलं तुम्हाला औषधाची बिलकुल जरुरी नाहीं. त्यानं कारण विचारतांच दुःखी मनानं त्या वैद्यराजांनीं सांगितलं 'अहो, आम्ही वैद्य रोग बरा करूं शकतो, ह्याचा अर्थ आयुष्य संपलेल्या व्यक्तीला आम्ही वाचवूं शकतों असा नाहीं. आजपासून सत्याहत्तराव्या दिवशीं तुम्ही मरणार आहांत. प्रत्यक्ष अश्विनीकुमार सुद्धां तुम्हाला तुमच्या रोगापासून वांचवूं शकणार नाहीं. कां उगाच औषधाचा मारा करून शरीराला शीण देतां ?' त्यानं त्या वैद्याची बरीच मनधरणी केली, पण व्यर्थ ! अखेर निराश मनानं त्या रोग्यानं वैद्याचं घर सोडलं. वैद्यानं सुद्धां आपला नाइलाज असल्याबद्दल त्याला निक्षून सांगितलं. झालं. तो रोगी आपल्या आयुष्याचे दिवस मोजतां मोजतां झुरणीला लागला. सत्याहत्तर, शाहत्तर, पंचाहत्तर ! बिचारा निरवानिरव करूं लागला. देण्याघेण्याचे व्यवहार पूर्ण झाले. मृत्युपत्र झालं. सान्या नातेवाइकांना बोलावून घेऊन त्यांचा त्यानं कष्टी मनानं निरोप घेतला. त्याला अन्न गोड लागेना. तोंडांत जाणाऱ्या प्रत्येक घासाबरोबर त्याच्या मनांत धस्स होत असे. दहा दिवस, नऊ दिवस, आठ दिवस ! मरणाच्या

बोचणीनं त्याची झोप उडाली. दारुण निराशेनं तो अस्वस्थ झाला. अखेर शेवटचा दिवस उजाडला. त्या दिवशीं तर तो मरणाची वाट पहात अंथरुणावर पडून राहिला.

अचानक वैद्यराज आले. निराशेनं व्याकुळ झाल्यामुळं त्यानं त्यांचं आदरातिथ्य सुद्धां केलं नाहीं. त्याचा मरणाचा दिवस होता तो! वैद्यराजांनीं त्याची नाडी पाहून सांगितलं, 'आज तुमची प्रकृति निकोप आहे.' बिचाऱ्याचा विश्वास सुद्धां बसेना. मग वैद्यराजांनीं त्याला आपली युक्ति सांगितली 'तुमचा मेद कमी करण्याकरितां मी तुमच्या मनाला दारुण यातना दिल्या. पण ह्या मानसिक औषधानं तुमचा रोग आतां पूर्ण बरा झाला आहे.'

मनाचा नी शरीराचा इतका निकटचा संबंध आहे. खोटं बोलण्यानं, चोरी करण्यानं, दुसऱ्याच्या मनाला त्रास दिल्यानं आयुष्य कमी होतं. जी जी गोष्ट करतांना मनाला बोचणी लागते त्या त्या प्रत्येक गोष्टीचा शरीरावर नकळत परिणाम होत असतो. सिनेमा पाहिल्यानं काय होतं, कादंबऱ्या वाचायला कोणती हरकत आहे, स्त्रियांच्या सौंदर्याकडं भारावलेल्या नजरेनं पहात राहणं हा डोळ्यांचा धर्म आहे असं मानणारे कित्येक स्वैराचारवादी आहेत. ते वरून कितीहि आव आणीत असले तरी सिनेमासृष्टींतील प्रत्येक चुंबनाबरोबर, कादंबरींतील प्रत्येक काल्पनिक आलिंगनाबरोबर सुंदर स्त्रीकडं टाकल्या जाणाऱ्या प्रत्येक कटाक्षाबरोबर ह्या शब्दवीरांच्या मनाचा तोल जात असतो. उपाहारगृहांत जाऊन खमंग पदार्थांवर ताव मारणं, धूम्रपान करणं, मद्यासारखीं जळजळीत पेयं घशाखालीं उतरविणं, ह्यांनीं शरीरावर जे अनिष्ट परिणाम होतात त्यांपेक्षां सुद्धां वरील मानसिक हेलकाव्यांनीं शरीरावर अधिक अनिष्ट परिणाम होतात. मन आणि शरीर हीं मानवी जीवनाचीं दोन अंगं इतकीं एकजीव आहेत कीं मनाचा शरीरावर नी शरीराचा मनावर फारच चटकन् चांगला अगर वाईट परिणाम होतो. म्हणून मानवीजीवनात शरीराची जितकी काळजी घेणं जरूर आहे तितकीच काळजी मनाची घेणं आवश्यक आहे. मन आणि शरीर यांच्या समतोल उठवणीनंच फक्त मानवी जीवनाचं रहस्य उलगडणं शक्य आहे.

आज पाश्चात्य राष्ट्रांतील बालमनांच्या उठावणींत शरीराच्या सुस्थिती-कडेच विशेष लक्ष दिलं जातं. तिथल्या शाळांतून अभ्यासाला दिलं जाणारं महत्त्व, खेळांना दिलं जाणारं महत्त्व, स्वराष्ट्रीयांच्या उत्कर्षा-पुरतंच मर्यादित असल्यानं परकी राष्ट्रांतील मानवजातीचा द्वेष करणं हें त्यांचं बाळकडू होऊन बसलं आहे. यांत्रिक सुधारणा हें त्यांचं एकमेव ध्येय होऊन राहिलं आहे. हिंदुस्थानांतील काळा आदमी, आफ्रिकेंतील नीग्रो किंवा चीनमधील रहिवासी हीं सारीं माणसं आपल्यापेक्षां कमी दर्जाचीं आहेत, रानटी आहेत, आपले गुलाम आहेत, असा अहंगंड त्यांच्यांत बाळपणापासूनच वाढीला लागलेला असतो. आप-ल्यांत असलेलं सामर्थ्य दुर्बळांना प्रबळ करण्याकरितां नसून त्यांना पायदळीं तुडविण्याकरितांच आहे अशी विचारसरणी प्रबळ राष्ट्रांतील पाश्चिमात्य बालमनांच्यापुढं असल्यानं त्यांच्या मनोवृत्ती गर्वाच्या उद्दाम-पणानं उसळत असतात. ह्यामुळं पाश्चात्य शिक्षणक्षेत्रांत मानसिक उन्न-तीचं मानाचं स्थान नाहींसं होऊन शारीरिक उन्नतीलाच अवास्तव महत्त्व आलेलं आहे. स्वार्थी मनोवृत्ति, स्वैराचार नी भोगलालसा ह्यांना त्यांच्या जीवनांत ऊत आलेला आहे. आपण सुद्धां आजवर पाश्चात्यांचं अनुकरण करीत असल्यानं आपले विचारप्रवाह सुद्धां त्याच धारेला लागले आहेत. आपल्या विचारांची ही दिशा बदलून आध्यात्मिक उन्नति आणि आधिभौतिक उन्नति ह्यांचा मधुर मिलाफ आपल्याला साधायचा आहे.

मनाची एकाग्रता, चित्तवृत्तींचा लय, जागेपणींची झोप, ही ज्ञानाची परिसीमा आहे. दिवसभर नित्याचे शरीरधर्म झाल्यानंतर शरीराच्या स्नायूंमध्यें जी झीज होते ती झीज भरून काढण्याकरितां आपण झोप घेतों. गाढ झोप लागली असतांना शरीराचे नी मनाचे व्यापार थांबतात आणि त्या विश्रांतीनं सकाळीं उठल्याबरोबर आपण आनंदी वृत्तींतच जागे होतों आणि फिरून उत्साहानं आपापल्या कामाला लागतों. सारा दिवस प्रामाणिकपणाच्या आणि मनाला कोणत्याहि प्रकारची बोंचणी न देणाऱ्या शुद्ध नी सात्त्विक व्यवहारांत घालविल्यानंतर माणसाला जी गाढ झोप येते तशी झोप अप्रामाणिक, स्वार्थी नी अपवित्र माणसांना येत

नाहीं. म्हणून मन निर्मळ नी पवित्र ठेवून तें सामर्थ्यवान् बनविण्या-करितां आपण मन शांत ठेवण्याचा अभ्यास केला पाहिजे. ही मनाची शांतता किंवा एकाग्रता बालमनांतूनच वाढीला लागते. शुद्ध आचार नी शुद्ध विचार ह्यांची बालमनाला शिकवण दिल्यास मन आणि शरीर हीं दोन्ही बलशाली होऊं शकतात, असा मानसशास्त्रज्ञांचा अनुभव आहे.

बालमनं मुळांतच शुद्ध सात्त्विकतेनं झळाळत असल्यानं त्यांची एका-ग्रता फारच लवकर होते. हातांतील दोरी एखाद्या काठीला बांधून त्याचा चाबूक बनविण्याच्या प्रयत्नांत व्यग्र असलेल्या मुलाला बाह्यजगाचं भान रहात नाहीं. आजूबाजूला कितीहि गोंगाट होत असला तरी तिकडं त्याचं लक्ष नसतं. त्यावेळीं आईची हांक त्याला ऐकूं येत नाहीं. आपला भाऊ आपल्यासमोर बसून खाऊ खात असल्याचं त्याला भान नसतं. आपल्या चाबकाच्या विशिष्ट समाधींतून भानावर आल्याशिवाय त्याला आसपासच्या जगाची कल्पना सुद्धां येत नाहीं. आपले वडील देवाची पूजा करीत अस-तांना मुलगा एकाग्र मनानं ती पूजा पहात असतो. पूजा करणाऱ्या पित्यापेक्षां पूजा पाहणाऱ्या मुलाचं मन अधिक देवरूप झालेलं असतं. आपणहि देवाची पूजा करावी असं त्याला वाटतं. आंगणांत जाऊन तो एक दगड घेतो. त्या दगडाला तो मातीनं स्नान घालीत असतो. त्या दगडावर मातीची धार धरलेली असतांना दगडाऐवजीं देवाची मूर्ति आणि मातीऐवजीं खरीखुरी पाण्याची धार त्याच्या डोळ्यापुढं नाचत असते. गंध, फूल, अक्षता सारं पूजासाहित्य त्या मातींतच एकवटलेलं असतं. एका दगडाला दुसऱ्या दगडी निरांजनानं ओवाळत असतांना त्या दगडामातींत दिसणारी देवाची मूर्ति नी दिव्याची ज्योत त्या बालमनाला एकतानतेचा प्रकाश देतात. तितक्यांत मूल मातींत खेळत आहे हें पाहून, त्या मुलासमोरील तो दगडामातीचा खेळ उधळून लावून त्याची आई त्याला मातींत खेळल्याबद्दल रागं भरीत भरीत उचलून कडेवर घेते. तात्काळ त्या मुलाच्या समाधीचा भंग होऊन तें भानावर येतं आणि रडूं लागतं. हीच बालमनाची एकाग्रता वाढीला लावण्याकरितां शाळांतून प्रयत्न झाले पाहिजेत. खेड्यांतील प्रत्येक बालमनाला त्याच्या त्याच्या आवडत्या खेळांतून मन एकाग्र

करण्याचं शिक्षण दिलं गेलं पाहिजे. चालावं कसं, बोलावं कसं, काम कसं करावं, आपल्या शेजारच्या मुलाला त्याच्या कामांत मदत कशी करावी ह्या शारीरिक शिक्षणाबरोबरच मुलाची ज्या ज्या गोष्टींत तन्मयता होत असलेली आपल्याला दिसते, त्या त्या गोष्टींतील त्याची तल्लीनता वाढीला लावण्याचे प्रयत्न होत गेल्यास ह्या शाळां-तून तयार होणारीं बालमनं प्रत्यक्ष मृत्यूवर देखील मात करायला समर्थ होतील असा वैदिक परंपरेंतील मानसिक सामर्थ्याचा इतिहास आहे. सकाळीं उठतांच आईबापांना आणि देवाला नमस्कार करून आपले सारे प्रातर्विधी आटोपून, स्वच्छ स्नान केल्यानंतर सूर्यनमस्कार घालावे ह्या शिकवणुकींतून उत्पन्न होणारं पवित्र सामर्थ्य सूर्यनारायणाच्या तेजाइतकंच बलशाली होईल. नेमलेल्या निरनिराळ्या विषयांचा अभ्यास ही एक मामुली गोष्ट आहे. ह्या विषयांच्या अभ्यासानं मनाचं सामर्थ्य वाढतं असं बालमनाला पटल्यानंतर हेच काय, आणखी असले कितीहि विषय बालमनापुढं ठेविले तरी मनाच्या एकाग्रतेनं चमकत असलेलीं बालमनं मला आणखी अभ्यास द्या असं म्हणत अहमहमिकेनं पुढं येतील. शाळांतून पळून जाण्याची गोष्ट तर राहोच, पण एक दिवस शाळेला सुटी असेल तर प्रत्येक बालमनाला कसंसंच वाटेल. आपल्या शाळेचा वेळ आणखी वाढल्यास आपल्या मनाचं नी शरीराचं सामर्थ्य लवकर वाढेल असंच बालमनांना सतत वाटत राहील.

'मूलभूत शिक्षणाच्या' ( Basic Education ) शाळा घ्या, 'जीवन विकास' शाळांची कल्पना घ्या, पाश्चिमात्य पद्धतीच्या धंदेशिक्षणावर भर देणाऱ्या शाळा घ्या, चालू जमान्यांतील कोंडवाडेवजा मदतशाळा घ्या, किंवा आजकाल कांहीं ठिकाणीं चालू असलेल्या सक्तीच्या शिक्ष-णाच्या शाळा घ्या; शाळेंत मिळणाऱ्या शिक्षणांत प्राण असेल तर वरीलपैकीं कोणतीहि शाळा यशस्वी होऊन आर्यावर्तांतील बालमनविकासावर स्वयं-पूर्ण हिंदवी राष्ट्राची उभारणी होईल. पण शाळेची मूलगामी कल्पना आदर्श असून त्या शाळेंत बालमनविकासाची प्राणप्रतिष्ठा होत नसेल तर मात्र शाळाखात्यावर कितीहि खर्च केला, शाळेची इमारत बाहेरून

कितीहि नटविली, सक्तीच्या शिक्षणाबद्दल कितीहि प्रचंड गवगवा केला तरी ती शाळा आदर्श हिंदुस्थानचं ध्येय साधूं शकणार नाहीं.

ह्या शाळांतून सामर्थ्याचं आवाहन करण्याकरितां आपल्या राष्ट्रीय नेत्यांनीं प्रयत्नाला लागलं पाहिजे. गांधीवादाचीं तत्त्वं पूर्ण पटलीं नसलीं तरी गांधीवादाचं अद्वितीय यश आजच्या हिंदवीसमाजाच्या अनुभवाला आलेलं आहे. निवडणुकांच्या वेळीं राष्ट्रीयसभेच्या उमेदवारांनीं दिलेल्या आश्वासनाबरहुकूम देशांतील कारखाने नी जमिनी अद्याप राष्ट्रीय-सरकारच्या मालकीच्या झाल्या नाहींत. म्हणून ते आपल्या सरकारवर रुष्टच आहेत. ह्या त्यांच्या असंतुष्टतेचा फायदा घेऊन, समाजसत्तावादी नेते त्यांना पावलोपावलीं राष्ट्रीय सरकारविरुद्ध संप पुकारायला, मोर्चे न्यायला, देशांत अस्वस्थता माजवायला त्यांना प्रोत्साहन देताहेत. पण भांडवलदार जाऊन त्या ठिकाणीं कारखाने नी जमिनी ह्यांच्यावर सरकारी मालकी जरी प्रस्थापित झाली तरी सर-कारनं नेमलेले हल्लींचे अधिकारी मजूर–किसानांची पिळणूक करणार नाहींत हें कशावरून ? आज अन्नधान्याबाबत सरकारी शिधापद्धति अमलांत असतांना व्यापारी नी अधिकारी मिळून समाजाची पिळणूक करताहेतच ना ? जी स्थिति इथं तीच स्थिति सरकारी मालकींत अनु-भवाला येणार हें उघड आहे. जोपर्यंत मानवी समाजमनांत फरक झालेला नाहीं, जोपर्यंत जिकडं तिकडं स्वार्थाचा बुजबुजाट आहे, '**कर्मण्येवाधि-कारस्ते मा फलेषु कदाचन**' हें कर्मफलत्यागाचं तत्त्वज्ञान जोपर्यंत समाजाच्या रोमरोमांत भिनलं नाहीं तोपर्यंत ह्या वरवरच्या इलाजांनीं समाजाची सुस्थिति साधतां येणार नाहीं.

हें सामर्थ्य फक्त ह्या स्वयंपूर्णतावादांतच आहे. आजच्या प्रौढ समा-जाला हें तत्त्वज्ञान पटत नसलं तरी हल्लींच्या बालमनांतून ही विचारसरणी फैलावली गेली कीं उद्यांचा भांडवलवाला, उद्यांचा जमीनदार, उद्यांचा अधिकारी आपणहून समाजाच्या हिताकरितां आपल्या स्वार्थावर लाथ मारायला तयार होईल. ह्या नव्या आर्यावर्तातले किसानमजूर सुद्धां समाजाकरितां सतत मनापासून काम करीत राहून भांडवलदारांना सांग-

तील कीं, ' आम्हांला आतां मिळते ती मजुरी भरपूर आहे, आम्हांला जास्त मजुरी देण्याऐवजीं जगाच्या ज्या भागांत मानवजात उपासवनवास सहन करते आहे, त्या भागांतील लोकांच्या मदतीकरतां आपण कमावलेला जौदा पैसा पाठवून त्यांना आमच्याचप्रमाणं स्वयंपूर्ण बनविण्याला मदत करा. '

हा सोन्याचा दिवस गांधीवादाच्या आचरणांतूनच उदयाला यायचा आहे. तेवढयाकरितां आपल्या पुढील पिढीला राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या देखरेखीखालीं वाढूं देणं हें आजच्या प्रौढ समाजाचं एकच कर्तव्य आहे. त्यांच्यावर अढळ विश्वास ठेवून आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरितां बहुजनसमाजानं स्वतः वाटेल त्या हालअपेष्टा सहन करून राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या आज्ञा पाळल्या. आजवर भोगलेल्या हालअपेष्टांचं दृश्यफल म्हणजेच हिंदुस्थानचं स्वातंत्र्य. यापुढं आपापल्या गांवांतील बालमनांना नेत्यांच्या इच्छेप्रमाणं शिकवण देण्याचं व्रत समाजानं अवघीं दहाच वर्षे जर पाळलं तर आर्यावर्तांतील प्रत्येक व्यक्ति मानवीसमाजाच्या सुखशांतीकरितां अहर्निश झटत असलेली आपल्या दृष्टीस पडेल. पण राष्ट्रीय नेत्यांच्या केवळ नभोवाणीवरील भाषणावर त्यांचा विश्वास बसणार नाहीं. हल्लींच्या शाळांवर, शिक्षकांवर नी शिक्षणावर बहुजनसमाजाचा विश्वास नाहीं. शाळा चांगल्या आहेत, शिक्षण उत्तम आहे, शिक्षक सुद्धां शिकलेले आहेत. पण ह्या सर्वांची प्राणप्रतिष्ठा मात्र व्हायची आहे. प्रत्येक शाळेंत जाऊन नेत्यांनीं तिथल्या विद्यार्थ्यांना दर्शन दिलं, प्रत्येक शिक्षकाला त्यांनीं प्रेमानं समजावून सांगितलं कीं ' बाबांनो, आज तुमचा पगार कमी आहे हें खरं! पण आम्ही जशी राष्ट्राकरितां सेवावृत्ति पत्करली त्याचप्रमाणं तुम्ही सुद्धां आणखी कांहीं वर्षे आपल्या राष्ट्राच्या उन्नतीकरितां पूर्वीप्रमाणंच आणखी कांहीं दिवस दारिद्र्याचे तडाखे सहन करा. ' सारे शिक्षक आपल्या देशांतील त्यागवीरांची ही आज्ञा शिरसावंद्य मानून दिवसाचे चोवीस तास बालमनांची उठावणी करण्याचे कसोशीनं प्रयत्न करतील. त्याच वेळीं ह्या खेड्यांतील समाजाला जर ह्या विभूतींनीं सांगितलं कीं ' बाबांनो, आज आम्ही शिक्षकांना देतो तो पगार अपुरा आहे, ह्याची आम्हाला जाणीव आहे; पण इलाज नाहीं. आमची तुम्हाला एवढीच आग्र-

ह्याची विनंति आहे कीं तुमच्या गांवांतील हे शिक्षक तुमच्या बालगोपालांना आमच्या नव्या विचारसरणीप्रमाणं अत्युच्च दर्जाचं शिक्षण देताहेत. त्या शिक्षकांना अन्न द्या, वस्त्र द्या, शिक्षणाकरितां लागणाऱ्या सर्व सोयी करून द्या आणि आपल्या गांवांतली पुढली पिढी कशी तयार होते इकडं नजर ठेवा.' झोपेंतून जागा झाल्याप्रमाणं समाज खडबडून पुढं येईल. विद्यार्थ्यांना सुद्धां महात्माजी, जवाहरलाल, वल्लभभाई पटेल, बाबू राजेंद्रप्रसाद, मौलाना आझाद यांच्यासारख्या विभूतींचा उपदेश ऐकायला मिळाल्यावर त्यांच्या मनाची एकाग्रता होईल, त्यांना शाळेबद्दल नी शिक्षकांबद्दल इतका जिव्हाळा वाटेल कीं ह्या त्यागवीरांच्या दर्शनाकरितां पुढारी सांगतील तो अभ्यास, पुढारी सांगतील ते कष्ट नी पुढारी सांगतील तसं आचरण करायला ते एका पायावर तयार होतील.

# १८ : आदर्श शाळा

बागखेड्याचं वर्णन करतांना मुलांची शाळा शहराच्या मध्यभागीं असावी असा उल्लेख आलेला वाचकांच्या लक्षांत असेलच. आदर्श खेड्याची उभारणी झाल्यानंतरची शाळेची ही कल्पना अमलांत आणण्याला अद्याप कांहीं अवधि लागेल. तोपर्यंत आहेत त्या शाळांतून आपण कार्याला लागलं पाहिजे. कांहीं कांहीं खेड्यांतून शाळा नाहींत आणि शिक्षकहि नाहींत. अशा खेड्यांतून असलेलीं मारुतीचीं देवळं शाळांकरितां उपयोगांत आणतां येतील. हीं मारुतीचीं देवळं सुद्धां सगळ्या खेड्यांतून नाहींत. जिथं शाळा असतील तिथं शाळा, देवळं असतील तिथं देवळं, आणि देवळं नसतील तिथं मोकळीं पटांगणं सुद्धां आपल्या शाळांच्या कामीं उपयोगी पडतील. बालमनांची उभारणी हें आपल्या पंचवार्षिक योजनेंतील ध्येय ठरल्यावर तें ध्येय साध्य करण्याकरितां आपल्याला खेड्यांतून शाळांची उभारणी करावी लागेल. आपल्या खेड्यांत शाळा बांधण्याकरितां अर्ज, विनंत्या, शिक्षकाची मागणी, गांवकामगारामार्फत काम चालवणं, मुलांमुलींची आकडेवारी काढणं, शाळेचा नकाशा तयार करणं, सरकारी इमारत खात्यामार्फत एकाद्या मक्तेदाराला मक्ता देऊन राष्ट्राच्या पैशाचा अवास्तव व्यय करणं ह्यापेक्षां पुढाऱ्यांनीं गांवांतील वयोवृद्ध पंचांमार्फत तूर्त गावाबाहेरील एकादी सरकारी मालकीची जागा पाहून तिथं उघड्यावरच विद्यार्थ्यांना सकाळसंध्याकाळ प्रार्थनेला बोलवावं.

गावांत शिक्षक नसेल तर गावांतलाच एकादा थोडा शिकलेला, निदान राष्ट्रहिताची कळकळ असलेला उत्साही तरुण पाहून त्याच्याकडं शाळेचं काम सोपवावं. गावांतूनच दहापाच वासे गोळा करावे आणि गावांतूनच कांहीं जुनींपुराणीं पोतीं गोळा करून एकदोन दिवसांच्या संघटित प्रयत्नांनीं शाळेकरितां एक मंडप तयार करावा. आणि ह्या मंडपांत प्रार्थना घेण्याला सुरवात करावी. जरूर लागेल त्या ठिकाणीं गावांतील प्रौढ समाजाची

मदत घेऊन ह्या मंडपाच्या चोहोंबाजूनीं कमरेइतक्या किंवा खांद्याइतक्या उंचीच्या भिंती उभाराव्या. कच्च्या विटा पाडणं, माती खणणं, भिंती बांधणं हीं कामं मुलांच्याकडूनच करून घ्यावीं. सकाळसंध्याकाळच्या प्रार्थनेनंतर विद्यार्थ्यांना, श्रमाचं महत्त्व, स्वावलंबन, ह्या गोष्टींची माहिती देत देत शाळेची छोटीशी इमारत तयार करावी. जवळच एकादा आखाडा तयार करावा. आखाड्यांत कांहीं विभूतींचे फोटो लावून तिथं मुलांना खेळ खेळण्यास शिकवावं. खेळ खेळतां खेळतां त्यांना संघटनेचं महत्त्व समजावून द्यावं. सर्वांनीं मिळून एकादं काम करायचं ठरविल्यास तें काम किती झटकन होतं हें प्रात्यक्षिकानंच पटवून द्यावं. लहान मुलं मोठ्या माणसांना अवघड वाटणाऱ्या गोष्टी सुद्धां फारच थोड्या वेळांत नी अल्प श्रमानं करूं शकतात हें तत्त्व मुलांच्या मनावर बिंबवावं. शाळेच्या भिंती तयार होतांच गांवांतल्या लोकांनीं पत्र्यांची जमवाजमव करावी. तें शक्य नसल्यास मुलांनीं कुडाचीं छपरं तयार करावीं. आपली शाळा आपल्या हातांनीं तयार करीत असतांना विद्यार्थ्यांना जो अभिमान वाटेल, ही आमची शाळा असं हक्कानं म्हणतांना त्यांना त्या ओबडधोबड पण स्वतः बनविलेल्या शाळेसंबंधीं जो आपलेपणा वाटेल त्या आपलेपणांत जगांतील श्रेष्ठ सुखसमाधान ह्या खेड्यांतील बालगोपालांना मिळेल. प्रत्येक विद्यार्थी आपल्या शाळेचं सौंदर्य वाढविण्याला, आपल्या शाळेंतील पडझड दुरुस्त करण्याला, आपणहून तयार होईल.

नेत्यांनीं आपले दौरे चालू ठेवून खेड्यांतील स्वयंपूर्ण शाळा पाहून समाधान व्यक्त करावं. खेड्यांतील स्त्रीपुरुषांना शाळेच्या आवारांत एकत्र बोलवावं. मुलांनीं शाळा बांधल्याबद्दल त्यांना मानाच्या फिती बहाल कराव्या. मुलं जर इतकं काम करूं शकतात तर आपण मनांत आणल्यास आपण काय करूं शकणार नाहीं असा जमलेल्या स्त्रीपुरुषांना सवाल टाकून त्यांना चरख्याचं, हातमागाचं, सुतारलोहाराच्या कारखान्यांचं संघटित शक्तीनं स्वावलंबनाच्या जोरावर उत्पन्न होणारं सामर्थ्य पटवून द्यावं. आपले राष्ट्रीय नेते आपल्या पाठीशीं आहेत, आपल्या सुखाकरितां

ते अविश्रांत श्रम घेताहेत हें पाहून खेड्यांतील प्रत्येक व्यक्तीला संघटनेचं नी स्वार्थत्यागाचं महत्त्व आपोआप पटूं लागेल.

शाळेची इमारत तयार झाल्यानंतर शाळेच्या आसपास एक विहीर खोदण्याचं काम हातीं घ्यावं. गावांतील प्रौढांनीं जातांयेतां चार चार कुदळी मारायचं ठरवलं तर महिनापंधरा दिवसांत विहीर खोदून होईल. खेडेगावांत पाण्याच्या विहिरी खोदणं, एकाद्या देवळाचा जीर्णोद्धार करणं, गावांत एकादी धर्मशाळा बांधणं अशा गोष्टी संघटनेच्या जोरावर करण्याची जुनी प्रथा आहे. फक्त शाळा म्हटली कीं सरकारी संबंध अशी जी विचारसरणी बनली आहे ती बदलली कीं शाळेची विहीर व्हायला वेळ लागणार नाहीं. विहीर बांधवून काढण्यांत मुलांची मदत घ्यावी म्हणजे त्यांना आपोआपच बांधकामाचं शिक्षण मिळेल. विहिरीचा उपयोग मुख्यतः शाळेच्या आसपास विद्यार्थ्यांनीं तयार केलेल्या पिकांच्या वाफ्यांना पाणी देण्याकरितां करावा. शिक्षकांनीं विद्यार्थ्यांना पिकांचीं माहिती द्यावी. कुळवण, खुरपण, नांगरण ह्यांची संपूर्ण माहिती देत देत पिकं वाढीला लागतील. विद्यार्थ्यांनीं घरचीं कामं सांभाळून आपापल्या वाफ्यांवर देखरेख करावी. पिकावर कीड पडल्यास काय करावं लागतं, आलेलं धान्य कसं मापायचं, कोणत्या दरानं विकायचं ह्याकरितां जरूर असणाऱ्या हिशेबांची आणि नोंदी करण्याकरितां भाषेची जरुरी ह्या विद्यार्थ्यांना पटवून दिल्यावर त्यांना गणित, भाषा, हिशेब हे विषय जरुरीपुरते शिकविण्याचा सराव शिक्षकांनीं ठेविल्यास आपल्याला आवश्यक असलेल्या ह्या विषयांचा मुलं आनंदानं, स्वेच्छेनं नी उत्साहानं अभ्यास करूं लागतील. विद्यार्थ्यांना शेतीची, पिकांची, भाजीपाल्याची नी फळफळावळांची माहिती दिल्यानंतर विणकलेची माहिती देणं आवश्यक आहे. कापसाच्या वाफ्यांतील कापूस वेचल्यानंतर त्यांतील सरकी काढणं, तो पिंजणं, त्याचे पेळू तयार करणं, मग चरख्यावर सूत कातणं ह्याचं शिक्षण विद्यार्थ्यांना पिकं काढल्यानंतरच्या व दुसऱ्या वर्षीच्या जमीनमशागतीपूर्वीच्या काळांत दिलं जावं. ताणे तयार करणं, पाजणी करणं कांड्या भरणं वगैरे कामं विशेषतः शाळांतील मुलींना शिकवावीं. त्याचप्रमाणं स्वयंपाकपाण्यासारख्या गृहकृत्यांचं मुलींना शिक्षण देणं सुद्धा

अवघड जाणार नाहीं. विद्यार्थ्यांनीं उत्पन्न केलेल्या धान्याचा उपयोग करून विद्यार्थिनींनीं स्वयंपाक करावा आणि मधून मधून वनभोजनाचे कार्यक्रम आंखून त्या वेळीं स्वतःच्या श्रमाच्या वनभोजनांत जी आत्मीयता येईल तिचा विद्यार्थीविद्यार्थिनींनीं प्रत्यक्ष अनुभव पाहण्यासारखा आहे.

आपल्या खेड्यांतील सर्व व्यक्तींना पुरेल इतकं अन्न नी वस्त्र ह्यांचं उत्पादन आपल्या खेड्यांत होत नसेल तर आपलं खेडं स्वयंपूर्ण करण्याकरितां काय केलं पाहिजे ह्याचं उत्तर विद्यार्थ्यांकडूनच काढून घ्यावं, आणि मग सर्वांनीं संघटित शेती केल्यास आज खेडेगांवांतील कांहीं लोक जास्त सधन व इतर बाजवीपेक्षां जास्त निर्धन अशी जी विषमता दिसून येते ती नाहींशी केली पाहिजे आणि आपल्या खेड्यांत लागणारं अन्नवस्त्र आपल्याच खेड्यांत उत्पन्न होण्याकरितां जरूर त्या ठिकाणीं विहीर खोदणं, ओढे अडविणं, नद्यांना बंधारे घालणं ह्यांची आवश्यकता विद्यार्थ्यांना व त्यांच्याचबरोबर खेडुतांना पटवून द्यावी. ही कल्पना पटल्यास ह्या गोष्टी ताबडतोब करण्याचा ते कसोशीनं प्रयत्न करतील. विहिरी कोणाच्या जमिनींत खोदायच्या ह्याचा विचारच करण्याचं कारण नाहीं. ह्या विहिरींचा उपयोग कोणत्याहि जमिनींना झाला तरी उत्पन्न होणाऱ्या धान्याचा ग्रामवासीयांना सारखाच फायदा मिळणार आहे. ह्या संघटनेच्या मनोवृत्तीनं सारे तंटे नाहींसे होतील, सारे विरोध वितळून जातील आणि आपोआप समाजाच्या स्वार्थी विचारसरणींत फरक पडूं लागेल.

ह्या शाळांतूनच विद्यार्थ्यांना छोटे छोटे माग, नांगर, चरखे वगैरे जीवनोपयोगी यंत्रं तयार करण्याचं शिक्षण दिल्यास त्यांना साऱ्या आवश्यक गोष्टींची कल्पना येईल. सुतारी काम करतांना वर्तुळ काढणं, त्रिकोन–चौकोन तयार करणं वगैरे जरूर असलेल्या भूमितीची कल्पना देणं, त्याचप्रमाणं सूत रंगविण्याकरितां उपयोगांत आणल्या जाणाऱ्या रसायनांची माहिती असणं आवश्यक असल्यानं रसायनशास्त्राच्या मूलभूत ज्ञानाची विद्यार्थ्यांना जरी पटवून देणं, अशा तऱ्हेनं जरूर लागेल त्या त्या वेळीं त्या त्या विषयांचा अभ्यास सुरू केल्यानं विद्यार्थी आपोआपच अभ्यासाकडं खेचले जातील.

आपलं प्रकृतिस्वास्थ्य राखण्याकरितां आपल्या खेड्यांत स्वच्छता राखणं जरूर आहे, सांडपाण्याची व्यवस्था, केरकचरा टाकण्याची व्यवस्था, बहिर्दिशेची व्यवस्था ह्या नियमांचं उत्तम तऱ्हेनं पालन करण्यांत खेडेगांवांतील लोकांचं हित आहे असं पटवून दिल्यास सारा खेडेगांवी समाज अधिक व्यवस्थित, अधिक टापटिपीचा आणि अधिक स्वच्छताप्रिय बनेल. खेड्याचं वातावरण आनंदी बनेल. आपणच आपल्या खेड्याची सुधारणा करीत आहोंत असं पाहून प्रत्येक व्यक्तीला समाधान होईल, आणि आपल्या खेड्याची अधिकाधिक सुधारणा करण्याकरितां सारे विद्यार्थी तळमळीनं प्रयत्न करूं लागतील. एकदां विश्वास आला, कीं वाटतील ते शरीरकष्ट करायला सांगा, वाटेल तितका अभ्यास द्या, वाटतील तितके नियम घाला. सारीं बालमनं प्रत्येक गोष्ट एकनिष्ठेनं करीत राहतील.

मुलं नी मुली, शिक्षक शाळेंत येण्याची उत्सुकतेनं वाट पहात बसतील. एकाग्र मनानं आपल्याला नेमून दिलेला अभ्यास करायला लागतील. अशा वेळीं शिक्षकांनीं हलकेंच पाश्चिमात्यांचं अनुकरण करण्यानं आपलं कसं नुकसान झालं आहे ह्याची विद्यार्थ्यांना माहिती सांगावी. पाश्चिमात्य विचारसरणीनं मनुष्य दुर्बलांवर अतिक्रमण करायला तयार होतो हें विद्यार्थ्यांना समजावून द्यावं. आपल्या खेड्यांतील समाजाला स्वयंपूर्ण करण्याचा आपण प्रयत्न करतो आहोंत तो दुसऱ्यावर आक्रमण करण्याकरितां नसून आपल्याचप्रमाणं इतर राष्ट्रांतील समाज स्वयंपूर्ण बनून अखिल मानवीसमाजानं सुखासमाधानानं नांदावं म्हणून. स्वयंपूर्णतेच्या तत्त्वज्ञानाच्या अनुरोधानं आपण आपल्याला पुरेल इतकंच उत्पादन केल्यास आपल्याला परक्या लोकांवर आक्रमण करण्याची जरूरीच भासणार नाहीं. यांत्रिक उत्पादन मर्यादेबाहेर गेल्यास त्याचा दुष्परिणाम कसा होतो हें नुकत्याच झालेल्या लढाईवरून स्पष्ट करून सांगावं. आपल्याला समाज सुखी करायचा असेल तर आधीं आपण स्वयंपूर्ण, निर्मळ नी सामर्थ्यवान् बनलं पाहिजे. आपण अनत्याचारी अहिंसेचा मार्ग पत्करतो तो आमच्यांत सामर्थ्य नाहीं म्हणून नसून, आपल्यांत सामर्थ्य असून सुद्धां त्या सामर्थ्याचा दुरुपयोग करायचा नाहीं हें तत्त्व आपल्याला पटलं आहे

म्हणून, ही विचारसरणी मुलांना पटवून देतांना त्यांना इतिहासाचं महत्त्व सांगावं. गतकालांतील गोष्टींचा समाजावर कसकसा परिणाम झाला ह्या माहितीलाचं इतिहास म्हणतात. शिवाजीनं अफझुल-खानाला केव्हां मारलं, पानिपतची लढाई कोणत्या सालीं झाली ह्यांची तारीखवार जंत्री लक्षांत ठेवणं ह्या इतिहासाची जरुरी नसून समाजांत वेगवेगळ्या वेळीं कसकसे फरक पडत गेले, समाजांत अशा तऱ्हेचे फरक घडवून आणणारे त्या वेळचे नेते कोणकोण होते, त्यांनीं समाजापुढं कोणती विचारसरणी मांडली ह्याचा अभ्यास करून आज आपल्याला समाजाची संघटना कोणत्या तत्त्वावर करावी लागणार आहे हें ठर-विण्याकरितां गतकाळाच्या इतिहासाची जरुरी आहे.

हल्लींच्या शिक्षणक्रमांतील जवळ जवळ सगळे विषय आपण आतां-पर्यंत हाताळले. ह्या विषयांचा अभ्यास करून घेतल्या जाणाऱ्या परीक्षेंत कसेबसे शेंकडा पसतीस गुण मिळवून उत्तीर्ण होणं हें आपलं ध्येय नसून आपल्या रोजच्या व्यवहारांत सुखी होण्याकरितां, आपल्या बरो-बरीच्या समाजाचं सुख साधण्याकरितां, आपण निरोगीपणानं शंभर वर्षं जगण्याकरितां वरील विषयांचा अभ्यास करणं हें आपलं ध्येय आहे. व्यवहाराचे नियम, आचाराचे नियम, समाजहिताचे नियम आपल्या लक्षांत रहावेत म्हणून आपल्या मनाचं सामर्थ्य वाढविण्याकरितां सुद्धां ह्या विषयांचा अभ्यास उपयोगीं पडतो. जसजशी अभ्यासाची गोडी अधिक लागेल तसतशी मनाची प्रगति अधिकाधिक होत जाईल. ह्या मनाच्या सामर्थ्यावर मनाची एकाग्रता साधतां साधतां मन निश्चल करून आत्यंतिक सुख मिळविणं हेंहि आपलं ध्येय आहे. अशा साऱ्या गोष्टी बालमनाला धीरे धीरे पटवून दिल्यास शरीर व मन ह्या दोहोंचं सामर्थ्य वाढविण्याचा बालमनं जिवापाड प्रयत्न करूं लागतील.

फक्त मनाचं नी शरीराचं सामर्थ्य वाढविण्यानं बालमनविकासाची पूर्तता होत नाहीं. ह्या सामर्थ्याचा सदुपयोग करितां यावा म्हणून शील बनविणं ही त्यानंतरची महत्त्वाची गोष्ट आहे. शक्य तों मनांत पापी विचारांना थारा न देणं ह्याला समाजांत प्राधान्य आलं पाहिजे. मनाची

शक्ति वाढली नाहीं तरी हरकत नाहीं, शरीर सामर्थ्यवान नसेल तरी पर्वा नाहीं, पण शील जर भ्रष्ट असेल तर माणसाला माणूस म्हणतां येत नाहीं. मुलांच्या चारित्र्याबद्दल शिक्षकांनीं नेहमीं जागरूक असलं पाहिजे. मोठ्यांचीं चरित्रं सदोदित बालमनांच्यापुढं ठेविलीं पाहिजेत. ज्यांचं चारित्र्य निष्कलंक होतं अशाच लोकांना समाजांत आजवर मानाचं स्थान मिळालं आहे. विद्यार्थीदशेंतच मुख्यतः बालमनावर वाईट परिणाम होण्याचा संभव अधिक असतो. म्हणून ज्या ज्या वेळीं आपल्या टापूंत नेत्यांचे दौरे निघतात त्या त्या वेळीं सकाळच्या प्रार्थनेच्या वेळीं गांवां-तील प्रौढांना एकत्र जमवून, आपल्याला पुढील पिढींतून राष्ट्राचे खरे-खुरे आधारस्तंभ तयार करायचे असतील तर त्यांच्या हिताकरितां आपण आपसांतील दुष्टभाव, आपसांतील द्वेष, आपसांतील अनीति बालमनापुढं चव्हाट्यावर न येऊं देण्याची ह्यांना नेत्यांच्याकडून पुनः पुनः शिकवण दिली गेली पाहिजे.

प्रातःकालीं थंड पाण्यानं स्नान केल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्यानं लंगोट कसून व्यायाम करावा. आसनांवर भर द्यावा. निर्मळ मनानं सूर्योपासना करावी. आपल्या जीवनांत सूर्योपासनेला अद्वितीय प्राधान्य आहे. साऱ्या जीवसृष्टींतील जीवनाचा साठा सूर्य आहे. सूर्य आपल्या शरीराला तेज देणारा तेजोगोल आहे. शरीरांतील दोष नाहींसे करण्याचं सामर्थ्य सूर्यां-तच आहे. आपल्या बुद्धीला प्रखर करण्याचं सामर्थ्य त्याचंच आहे. सूर्याच्या तेजानंच अन्नधान्य पिकतं. सूर्याच्या तेजानंच फळांत अमृततुल्य रस उत्पन्न होतो. सूर्याच्या किरणांनीं पवित्र झालेल्या पाण्यांत विजेचं नव-चैतन्य सांठविलेलं असतं. मानवजात पृथ्वीतलावर उत्पन्न होण्याच्या फार पूर्वींच्या कालापासून सूर्य अस्तित्वांत असून सूर्याचं तेज पृथ्वीला मिळत राहीपर्यंत मानवजात पृथ्वीवर वावरणार आहे असं आजच्या शास्त्रज्ञांचे शोध आपल्याला सांगताहेत. ह्या सर्वसामर्थ्यवान् सूर्याच्या तेजानं आपल्या बुद्धीला चालना मिळावी अशी प्रत्येक मानवानं आराधना केल्यास ह्या आत्मिक उन्नतीच्या तेजद आराधनेनं मानवजात पावन होईल. ह्या सूर्याच्या आराधनेनं अशक्त लोक सशक्त होतील, बुद्धीला चालना मिळेल,

पापी विचार गाडले जातील, प्रत्येक व्यक्ति सूर्याच्या तेजानं झळाळूं लागेल आणि प्रत्येकाचं चारित्र्य सूर्याप्रमाणंच निष्कलंक होईल.

मंत्रांत सामर्थ्य असणं अशक्य आहे, मंत्र हें थोतांड आहे, मंत्रावर अंधश्रद्धा ठेवल्यानं आर्यावर्तातील मानवजातीचं अपरिमित नुकसान झालं आहे अशा अविश्वासाची लाट आज मानवीसमाजाला प्रचंड हेलकावे देत आहे. ह्या अविश्वासाच्या काळांत मंत्रांवर विश्वास ठेवणं आजच्या शास्त्रीय मनाला न पटण्यासारखं आहे. पण मंत्रांत सामर्थ्य आहे ह्याचा अर्थ मानवीमनांत सामर्थ्य सामावलेलं आहे असा घेतल्यास अंधविश्वास तात्रडतोब नाहींसा होईल. आपण जगांत वावरत असतांना मन वायुवेगानं धावत असतं. ह्याकरितां मन एकाच ध्येयावर खिळवून ठेवण्याचा प्रयत्न केल्यास मनाचा स्वैरपणा कमी कमी होत जाईल आणि हें काम सूर्याराधनेच्या मंत्रानं साधायचं आहे. ह्या एकाग्रतेच्या कल्पनेनं प्राचीन काळीं मंत्राला मोठेपणा दिला गेला. कालांतरानं ही मूलभूत विचारसरणी नाहींशी होऊन मंत्रालाच महत्त्व आल्यानं मंत्राभोंवतीं अंधविश्वासाचं एक वलय आलं. मानवी मनांतूनच हें अंधकाराचं वलय वाढीला लागलं असल्यानं हें अज्ञानाचं आवरण आपणच आपल्या शास्त्रीय विचारसरणीनं नाहींसं केल्यास मंत्रांत पूर्वीचं सामर्थ्य खास येईल. हा सूर्याराधनेचा मंत्र कोणी जपावा, कोणी जपूं नये ह्यासंबंधींचे निर्बंध बुद्धिवाद्यांच्या स्वार्थी विचारसरणींतूनच बाहेर पडले असल्यानं ह्या मंत्राचं सामर्थ्य आणखी कमी झालं. वेळींअवेळीं वाढीला लागलेले हे अन्याय्य निर्बंध नाहींसे करून, बालमनांत शुद्ध तेजाचा विकास करण्याकरितां, मनांत येणाऱ्या भल्याबुऱ्या विचारांना आळा घालण्याकरितां, रिकाम्या मनांत सैतानाचा संचार होऊं नये म्हणून, मनांत सतत सूर्याचं तेज साठविण्याचा प्रयत्न केल्यास मानवी मनाची खात्रीनं उन्नति होईल.

हा मंत्र जपण्याचा हक्क प्रत्येकाचा आहे. कोणत्याहि जातीचा, कोणत्याहि वयाचा, कोणत्याहि धर्माचा मनुष्य ज्याप्रमाणं सूर्यप्रकाशाचा संपूर्ण मालक आहे, त्याचप्रमाणं एकजात आबालवृद्धांचा ह्या मंत्रावर पूर्ण हक्क

आहे. प्रथम कांहीं दिवस, भिन्नधर्मीय संस्कारांच्या वावटळीनं वाहव-लेल्या मानवीसमाजांत ही सूर्योपासना अमान्य होण्याचा संभव आहे. अशा ठिकाणीं फक्त मंत्राचं सामर्थ्य समाजाला पटवून देऊन वागवेण्याच्या वर्णनांत सांगितलेल्या प्रार्थनेसारखी मानवीसमाजाची सुस्थिति साधणारी कोणतीहि एकादी सर्वसंमत प्रार्थना, सर्वधर्मीय लोकाग्रणींनीं तयार करून तिचा सतत जप करण्याचं महत्त्व बालमनाला नी प्रौढमनाला पटवून द्यावं. मंत्र महत्त्वाचा नसून समाजहित महत्त्वाचं आहे ह्या विचारसरणीनं प्रार्थनेचं महत्त्व फिरून समाजाला आणि विशेषतः बालसमाजाला पटवून दिल्यास पुढील पिढीचं चारित्र्य खात्रीनं उज्ज्वल बनेल.

बालमनांचं शिक्षण मुख्यतः मन, शरीर नी चारित्र्य ह्या तीन गोष्टीं-वर आधारलेलं असावं. मानवीजीवनाचीं हीं तीन दालनं आदर्श करणं हेंच शिक्षणाचं खरंखुरं ध्येय. आज जिकडं तिकडं परीक्षा, अभ्यास, परीक्षक, पास होणं, नापास होणं ह्या बालमनविकासांतील अत्यंत गौण गोष्टींना प्राधान्य आल्यानं परीक्षकांचा तांडाच्या तांडा प्रश्नपत्रिकांचे सुरे पाजळून बालमनांची बेसुमार कत्तल करण्याकरितां सैरावैरा धावत सुटलेला आपल्याला दिसतो आहे. परीक्षांचं उच्चाटन करा असं म्हणतांच ह्या परीक्षकांच्या अंगावर काटा येतो. कारण परीक्षांच्या अभावीं त्यांना विश्वविद्यालयांकडून मिळणारा जादा मलिदा तावडतोब बंद होणार आहे. शिक्षकांना आणखी वाटेल तितका पैसा द्या, आमची तक्रार नाहीं. पण त्या पैशाचा उपयोग बालमनांची कत्तल करण्याकडंच केला जाणार असेल तर हे कत्तलखाने तावडतोब बंद करा. ह्या परीक्षा-चालकांना, ह्या विश्वविद्यालयांना असा रोखठोक सवाल करा कीं आपण चालविलेल्या ह्या परीक्षासत्रांतून शीरसलामत बाहेर पडणाऱ्या किती विद्यार्थ्यांच्या मनांत आपण आत्मविश्वास निर्माण करूं शकतो, किती विद्यार्थ्यांना आपण बेडर, धाडसी नी त्यागी बनवूं शकतो, किती विद्यार्थ्यांचं सामर्थ्य कसाला लागण्याइतकं निर्दोष बनवूं शकतों ? ह्याची आत्मपरीक्षा कुणी केली आहे कां ? जास्त पैसा कसा मिळवावा ह्या धोरणानं मार्कांचा काळा बाजार करणाऱ्या ह्या परीक्षकांना ही आत्मनिरीक्षणाची बुद्धि कशी सुचणार ? प्रत्यक्ष परीक्षकांचीं मनं तरी कुठं तयार आहेत ?

परीक्षकांचं शरीर तरी आदर्श कुठं असतं ? परीक्षकांना आपल्या चारित्र्याबद्दल तरी निर्वाळा कुठं देतां येतो ? अनावश्यक विषयांच्या अभ्यासानं भारावलेले, अतिमानसिक श्रमानं खंगलेले, चारित्र्याची किंचित् सुद्धां जाणीव नसलेले हे शिक्षक, हे पगारी परीक्षक, प्रत्येक उत्तर-पत्रिकेमागं मिळणाऱ्या रुपया दोन रुपयांच्या आशेनं रातोरात जागून फत्तराच्या अंतःकरणानं बालमनावर नापासाचा म्हणजे नालायखीचा शिक्का मारीत सुटतात. हे पासनापासाचे शिक्केदार आयुष्यांत आज-कालच्या परीक्षांतून नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षां कितीतरी पटीनं स्वतः नालायक असतात.

गुरुपत्नीनं आज्ञा करतांच मुसळधार पाऊस पडत असतांना रानांत जाऊन लाकडं गोळा करून आणणाऱ्या रामकृष्णांसारख्या विद्यार्थ्यांची आज्ञापालनाची कळकळ ही खरी परीक्षा ! बापाकडून वचनभंग होऊं नये म्हणून ऐन राज्याभिषेकाच्या वेळीं राज्योपभोगांचा त्याग करून बारा वर्षं वनवास भोगण्याला हंसतमुखानं तयार होणाऱ्या प्रभु रामचंद्राचा त्यागाचा कडेलोट ही खरी परीक्षा ! शिवबाच्या केसालासुद्धां धक्का लागतां कामा नये ह्या एकाच ध्येयानं प्रेरित होऊन आपल्या शरीराची चाळण झाली असतांना, शरीरांतून रक्ताच्या धारा ओघळत असतांना, सुटकेची तोफ ऐकूं येईपर्यंत स्वतःच्या जिवाशिवाची ताटातूट न होऊं देतां खिंड अडवून धरणाऱ्या बाजीप्रभूचं मरणाला देखील ‘ थांब ’ असा पुकारा देणारं सामर्थ्य ही खरी परीक्षा ! अशा शेंकडो, हजारों, लाखों आदर्श विभूती निर्माण करणाऱ्या शाळांची पैदास करण्याऐवजीं स्वार्थाकरितां बालमनांचे कत्तलखाने उभारणाऱ्या पाषाणहृदयी परीक्षकांनो, तुम्हाला दुरूनच प्रणाम असो !

प्रश्नपत्रिकांतील प्रश्नांचीं लेखी अगर तोंडी उत्तरं देऊन परीक्षा पास होण्याची आम्हाला जरुरी नसून आयुष्यांतील यशाच्या परीक्षेंत आम्हाला पास व्हायचं आहे. मानवजातीला सुखी करण्याच्या तत्त्वांचा अभ्यास करून आम्हाला आमच्या प्रयत्नांत यश मिळवून ध्येयनिष्ठेच्या परीक्षेंत उत्तीर्ण व्हायचं आहे. जगांतील प्रत्येक व्यक्तीला जास्तींत जास्त सुखी करण्याचा

प्रयत्न करणाऱ्या स्वयंपूर्णतेच्या परीक्षेत आम्हा साऱ्यांना शंभर टक्के गुण मिळवून प्रथमश्रेणींत यायचं आहे. गुरुजी, प्राध्यापक, परीक्षकमहाशय, कुलगुरुदेव, आम्हाला शाळांतून असं शिक्षण द्या कीं ज्याच्या योगानं आमची संघटना होईल. आम्हाला असे प्रश्न विचारा कीं, ज्या प्रश्नांचीं उत्तरं आमच्या रोजच्या वागणुकींतून तुम्हाला आपोआप मिळतील. आम्हाला अशा उत्तरपत्रिका लिहायला लावा कीं ज्या लिहितांना पासनापास, कमी गुण जास्त गुण हा भेद राहणार नाहीं. इतकंच नव्हे तर परीक्षक आणि परीक्ष्य हे दोघं एकजीव होऊन जातील.

मन, शरीर नी चारित्र्य ह्यांच्या आध्यात्मिक उठावणीनं परचक्राचं आक्रमण कसं थांबवितां येईल असा एक प्रश्न नेहमींच विचारला जातो. आध्यात्मिक उन्नतीचा अर्थ आधिभौतिक उन्नतीचा ऱ्हास असा नसून आधिभौतिकतेचा निरपेक्ष उत्कर्ष म्हणजेच आध्यात्मिकता. ह्या बालमन-विकासांत अध्यात्माला जितकं महत्त्व आहे तितकंच महत्त्व आधि-भौतिकतेला पण आहे. शिक्षणांत आध्यात्मिकतेला महत्त्व नसेल तर आधिभौतिकतेचा धुमाकूळ माजेल. शिक्षणांत आधिभौतिक सामर्थ्याला स्थान नसेल तर ह्या आध्यात्मिक मनोवृत्तीच्या समाजावर आधिभौतिकता-वाद्यांचा जुलूम होईल. ह्या दोन्ही गोष्टी टाळण्याकरितां आध्यात्मिकता नी आधिभौतिकता ह्यांचं समबल मिश्रण करणं जरूर आहे. अखिल मानव-जातीची उन्नति आध्यात्मिकतेच्या पायावरच स्थिरावूं शकेल. पण ह्या आपल्या श्रेष्ठ प्रयत्नांत आपण असतांना आधिभौतिकतावाद्यांची शक्ति आपल्याविरुद्ध उपयोगांत आणण्याची कल्पनासुद्धां त्यांच्या डोक्यांत येऊं नये इतकी आधिभौतिक शक्ति आपणांत असणं जरूर आहे. आपल्या ह्या शाळांतून विद्यार्थ्यांना शिस्तीचं महत्त्व पटवून दिल्यानंतर सर्वांना लष्करी शिक्षण देणं सहजसाध्य आहे. कवाइतीचं शिक्षण पूर्ण व्हायला एक महिना सुद्धां लागत नाहीं. खरं लष्करी शिक्षण 'लेफ्ट राइट'मध्यें नाहीं. पाणबुड्यांतून शत्रूंच्या जहाजावर टॉर्पेडो मारणं ह्याला लष्करी कला म्हणत नाहींत. विमानांतून शत्रूवर बॉम्बफेक करायला मोठ्या शास्त्राची जरुरी नसते. खरं लष्करी शिक्षण सत्याकरितां छातीवर बंदुकीच्या गोळ्या झेलण्याच्या धैर्यांत आणि स्वपक्षाचं संरक्षण करण्याकरितां निश्चल मनानं

बंदुकीचा घोडा ओढण्यांत आहे. आधिभौतिक शक्तीचा कमींत कमी आणि माणुसकीचा जास्तींत जास्त उपयोग करण्यांतच खरं लष्करी सामर्थ्य आहे. मागल्या बाजूनं चोरपावलांनीं धावत येऊन गाफील नी निःशस्त्र माणसावर वार करण्याला मनाचं सामर्थ्य लागत नाहीं. पण शत्रूला त्याची चूक समजावून देऊन त्याच्या पाशवी वृत्तीला निरनिराळ्या समझोत्याच्या मार्गांनीं आळा घालण्याचा प्रयत्न करून सुद्धां कांहींहि उपयोग होत नाहीं असं स्पष्ट दिसून आल्यानंतर मनाच्या संयमानं शत्रूवर कमींत कमी जोराचा प्रहार करून आपल्या सामर्थ्याची त्याला चुणूक दाखवून त्याच्या पाशवी शक्तीवर दडपण आणणं हेंच खरं लष्करी शिक्षण. हें ध्येय आध्यात्मिकतेंतूनच साधतां येतं. मेलास तर तुझा देह पवित्र कारणीं लागेल आणि जगलास तर तुझ्या हातून समाजाचं हितच होईल, आणि म्हणून ऊठ, आणि कार्याला लाग; हीच खरी आध्यात्मिक विचारसरणी मानवी मनाला खरं लष्करी शिक्षण देऊं शकते. म्हणून मन, शरीर नी चारित्र्य ह्यांच्या अधिष्ठानावर तावून सुलाखून बाहेर पडलेलीं बालमनं प्रत्यक्ष कळिकाळाशीं सुद्धां बेडर वृत्तीनं झुंज देऊं शकतील. त्यांच्या हातून अन्याय होणार नाहीं, त्याचप्रमाणं ते अन्याय एक क्षणभर सुद्धां सहन करणार नाहींत. निष्पाप आणि निर्मळ रक्तानं त्यांचे हात कल्पांतींहि रंगणार नाहींत, त्याचप्रमाणं पापी विचारांनीं ज्यांच्या शरीरांतील रक्त काळं पडलं आहे अशा कृष्णकारस्थानी पशूंच्या हृदयाचा ठाव घ्यायला हीं बालमनं अधीर होतील. जोपर्यंत आपल्या वाटेला कुणीहि जात नाहींत तोपर्यंत समुद्राप्रमाणं शांत नी निश्चल राहणारीं हीं मनं समाजांत थोडा जरी अन्याय दिसला तरी त्या अन्यायाचा प्रतिकार करण्याकरितां खवळलेल्या समुद्राप्रमाणं केव्हां अक्राळविक्राळ स्वरूप धारण करतील ह्याचा नेम राहणार नाहीं. पदार्थविज्ञानशास्त्रांत आजहि आपल्या आर्यावर्तांतील लोक पाश्चात्य राष्ट्रांच्या बरोबरीनं वावरताहेत. कारखानदारीच्या बाबतींत आपण इतर राष्ट्रांच्या मानानं बरेच मागासलेले असलों तरी त्याचं कारण आपल्याला कारखानदारीचं ज्ञान नाहीं म्हणून नव्हे, तर गुलामगिरीच्या काळांत आपल्या कारखानदारीला वाव मिळाला नाहीं म्हणून. रोजच्या

अजवळ्याकरितां आपल्याला कारखानदारीची विशेष जरूरी नसली तरी कारखाने तयार ठेवणं, संशोधन करीत राहणं, आधिभौतिक शास्त्रांत सतत प्रगतिपथावर राहणं ह्या गोष्टींची आपल्याला जरूरी आहे. सरळ मार्ग नी वाकडा मार्ग दोन्ही बाबतींत आपण सव्यसाची असायला पाहिजे. एवढं तत्त्व नजरेपुढं ठेवून आपण बालमनांची प्रगति करीत राहिल्यास आपलं मानवी समाजसुखाचं ध्येय गांठायला आपल्याला फार दिवस लागणार नाहींत.

एवढ्याकरितां शक्य त्या मार्गांनीं आर्यावर्तांतील खेड्यांतील, शहरांतील, असतील त्या बालमनांची एकाच वेळीं उठावणी करणं हें आपल्या राष्ट्रीय सरकारचं आद्यकर्तव्य झालं पाहिजे. बालमनांना शिक्षण देणं सोपं आहे. शिक्षण घेण्याचं काम बालमनंच उत्तम तऱ्हेनं करूं शकतात. अगदीं साध्या गोष्टींचा अभ्यास करतां करतां बालमनांत विश्वास उत्पन्न होतो. आत्मविश्वास नी अभ्यास भूमितिश्रेढीनं वाढत जाऊन आत्मविश्वासाची, आधिभौतिक सामर्थ्याची नी निष्कलंक चारित्र्याची आघाडी हां हां म्हणतां उभी राहते. ह्या मांडलेल्या कल्पना शास्त्रशुद्ध नाहींत, ह्यांत प्रत्यक्ष बेरीजवजाबाकीच्या आधारानं काढलेलं अचूक उत्तर सापडत नाहीं, असं होणं शक्य नाहीं, हल्लींच्या विद्यार्थ्यांत कांहींच अर्थ नाहीं, विचार मांडणं सोपं आहे, पण प्रत्यक्ष प्रयोग करणं अशक्य आहे अशा नाना शंका घेतल्या जातील. अडचणी प्रचंड प्रमाणावर येतील, पण कोणतंहि विश्वव्यापी काम करायचं म्हणजे अडचणी ह्या यायच्याच. आधीं सुरवात करूं या. जरूर त्या ठिकाणीं नेत्यांची मदत मिळेलच. नाहीं मिळाली तरी ज्या ज्या शिक्षकांना ही विचारसरणी पटेल त्यांनीं त्यांनीं कामाला लागावं. यश ठरलेलं आहे.

आज संघांत नी दलांत बालमनंच बालमनं तयार करण्याचं कार्य अहमहमिकेनं करीत आहेत. खेड्यांत सुद्धां शाळांतून असतील त्या शिक्षकांनीं विद्यार्थ्यांच्याच साहाय्यानं विद्यार्थ्यांची उन्नति करण्याच्या मार्गाला लागावं. गटनायक तयार करण्याकरितां आधीं पांचच विद्यार्थी हाताशीं धरावेत. त्यांचीं मनं तयार झाल्यावर तीं मुलंच इतर मुलांना आपल्याकडं आकर्षून घेतील. पांचाचे पन्नास नी पन्नासाचे पांचशें झाले कीं एक

# १९ : आदर्श शिक्षक

आपल्या राष्ट्रीय नेत्यांनीं मनांत आणल्यासच ह्या गोष्टी सहज होतील, तावडतोब होतील. आपल्या प्रांताचे मुख्य प्रधान, गृहमंत्रि, उद्योगमंत्रि ह्यांनीं मिळालेल्या बहुमानाच्या जागा सोडायच्या नी करायचं काय, तर खेड्यापाड्यांतून दौरे काढून खेड्यांतील बालमनं तयार करण्याच्या बाबतींत खेड्यांतील शिक्षकांना मदत करायची! आर्यावर्तातील ह्या बुद्धि-वीरांचा उपयोग समाजहिताकरितां करण्याकरितां त्यांना मंत्रिपदं दिलीं असून त्यांनीं आपलीं मंत्रिपदं सोडून समाजाच्या अगदीं तळच्या थरांत मिसळायचं. आज सत्ता हातीं घेतल्यापासून हे पुढारी अठरा अठरा, वीस वीस तास जिवाचं रान करीत असून सुद्धां राष्ट्रांत शांतता नांदत नाहीं, राष्ट्रांतला काळा बाजार कमी होत नाहीं, खून, लुटालूट, जाळ-पोळ वगैरे अमानुष प्रकारांना आळा बसत नाहीं. ह्या बुद्धिवादी नेत्यांनीं ह्या जागा सोडल्या तर काय अनवस्थाप्रसंग येईल ह्याची कल्पना सुद्धां करवत नाहीं. बालमनाच्या शिकवणुकीला इतकं अवास्तव महत्त्व देण्या-पेक्षां बालमनविकास आहे त्याच स्थितींत सोडून ह्या नेत्यांनीं आपापलीं कामं चालू ठेविलीं तर आपोआप थोड्याच दिवसांत सारं वातावरण निवळेल आणि समाज उन्नतीच्या मार्गाकडं वळेल, असं मानणारा एक वर्ग आज समाजांत आहे. पण ह्या विचारसरणीमुळं आपण पाश्चिमात्य विचारसरणीमागंच धांवत राहणार आहोंत. आपल्याला पाश्चात्यांच्यापेक्षां फारच वेगळ्या पद्धतीनं समाजाची सर्वांगीण उन्नति साधायची असल्यानं आपल्याला वेगळ्या मार्गाचाच अवलंब करावा लागेल. राष्ट्रांत जयिष्णु वृत्तीचा पुरस्कार करून आपल्या राष्ट्राचं वर्चस्व दुसऱ्या राष्ट्रांतील मानवजातीवर प्रस्थापित करायचं असेल तर राष्ट्रांतील बुद्धिवाद्यांच्या हातीं सत्ता द्यावी लागते; पण समाजांत वर्धिष्णु-वृत्ति निर्माण करून अखिल मानवजातीवर सुखसमाधानाचा वर्षाव

करायचा असेल तर वैदिकपरंपरेंतील सल्लागाराची भूमिका, गुरूची भूमिका साऱ्या बुद्धिवाद्यांनीं घेणं जरूर आहे.

शिवाय आपल्या राष्ट्रीय नेत्यांना त्याग करणंहि कठीण नाहीं. आज-वर आपल्या नेत्यांनीं उदंड त्याग केलेले आहेत. दारीं आलेल्या लक्ष्मीला त्यांनीं परतवून लाविली. घरादारावर नी कौटुंबिक सुखावर तुळशीपत्र ठेविलं. महात्माजींच्या एका शब्दावर लाठीमार सहन केला, कारावास भोगला, वेळीं प्राणांची खैरात करण्यालाहि मागं पाहिलं नाहीं. अधिकार ही दों दिवसाची सावली आहे हें पूर्णपणें जाणून असल्यानं आपले नेते अधिकारत्यागाला तयार होणार नाहींत अशी भीति बाळगण्याचं कारण नाहीं. शिवाय आपल्या नेत्यांच्या नेत्यानं, स्वयंपूर्णतावादाच्या प्रणे-त्यानं, केलेल्या त्यागाची उज्ज्वल ज्योत त्यांच्यापुढं तेवत असतांना ते अधिकारत्यागाला तयार होणार नाहींत हें शक्यच नाहीं. तिसरी गोष्ट म्हणजे हा अधिकारत्यागच होत नाहीं. आपल्या हातीं आलेला अधिकार आपल्या अनुयायांना देऊन आपण नवीन विक्रम करायला पुढं जाणं हें अधिकार हातीं घेऊन स्वस्थ बसण्यापेक्षां अधिक महत्त्वाचं आहे. जेता जग जिंकायला निघाला म्हणजे तो जिंकलेल्या देशाची सत्ता दुय्यम अधि-काऱ्याच्या स्वाधीन करून फिरून पुढं जाऊन अधिक विक्रम करण्याच्या प्रयत्नांत असतो. त्याचप्रमाणं ह्या सत्ताधाऱ्यांनीं आज सत्तात्याग केल्यास ते पुढला विक्रम करण्याकरितां 'आगे बढो'चं निशाण हातीं घेऊन पुढं पुढं, आणखी पुढंच जाणार आहेत. अखेरची आणि सर्वांत अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे ह्या अधिकारत्यागानं त्यांचं अधिकारीपद जात असलं तरी अधिकाऱ्यांचे अधिकारी बनण्याचा मोठेपणा त्यांना मिळणार अस-ल्यानं ते अधिकाऱ्यांचेहि अधिकारी होणार आहेत.

हें सगळं जरी खरं असलं तरी हे अधिकारी आर्यावर्तांतील गुलामी वृत्तींतच लहानाचे मोठे झाले आहेत. त्यांनीं पाश्चिमात्य संस्कृतीचा नुसता अभ्यासच केला नसून ते त्या संस्कृतीचे मनानं नी अभ्यासानं कट्टे गुलाम बनले आहेत. यांत्रिक सुधारणांनीं देशांत अस्वस्थता माजते ह्याचीं उदाहरणं प्रत्यक्ष त्यांच्या नजरेसमोर असतांना सुद्धां यांत्रिक सुधारणांचा फोलपणा त्यांना अद्याप पूर्णपणें पटलेला नाहीं. लोकशाही टाकाऊ आहे, मोठ-

भांडवलशाही समाजांतील वर्गकलहाचं आदिकारण आहे, राष्ट्रवादाच्या विचार-सरणीनं राष्ट्रंच्या राष्ट्रं धुळीला मिळतात हे सारे अनर्थ त्यांना स्पष्ट दिसत असून सुद्धां रशियांतील समाजवादाची चमक अद्याप त्यांच्या डोळ्यांना दिपवीत आहे. शेवटीं सारं आयुष्य राष्ट्रसेवेकरितां खर्ची टाकतां टाकतां मध्येंच मिळालेल्या ह्या विश्रांतीचा त्यांना मोह होणं मानवी मनो-धर्माला सोडून नाहीं. सहारा वाळवंटांतून वणवण करीत फिरत असतांना मध्येंच एकादी हिरवळ आढळली तर झालेल्या श्रमांचं निराकरण करण्याकरितां थोडा वेळ विश्रांति घ्यावी असं वाटणं अस्वाभाविक नाहीं.

वेदकालापासून आतांपर्यंत बालमनांची जबाबदारी शिक्षकांनींच घेतली आहे. यापुढं सुद्धां बालमनांची उठावणी करण्याचं काम शिक्षकांनाच करावं लागणार आहे. फार प्राचीन काळापासून शिक्षक दारिद्र्यांतच रहात आलेले आहेत. प्राचीनकालच्या त्यांच्या दारिद्र्याबद्दल, त्यांच्या भिक्षावृत्तीबद्दल, त्यांच्या निर्हेतुक कार्याबद्दल समाज त्यांच्याशीं सदैव कृतज्ञ रहात असे. पण ज्या वेळीं शिक्षक वेतन घेऊं लागले, शाळांतून मिळणाऱ्या पगारावर नजर ठेवून काम करूं लागले त्या वेळीं आपल्या दारिद्र्याबद्दल त्यांना कमीपणा वाटूं लागला आणि इथूनच त्यांच्यांत एक प्रकारचा न्यूनगंड उत्पन्न झाला. पण यापुढं स्वयंपूर्ण राष्ट्राची उठावणी करण्याकरितां हल्लींचे आपले बुद्धिवादी नेते नाराज असतील तर शिक्षकांनीं फिरून आपलं बालमनविकासाचं गोत्रव्रत आपल्या हातीं घेतलं पाहिजे.

आदर्श हिंदुस्थानांतील स्वयंपूर्ण बागखेड्याचा नागरिक आपल्याला तयार करायचा आहे आणि तो फक्त दहा वर्षांतच, हें ध्येय डोळ्यापुढं आणल्यानंतर ह्या भावी आदर्श नागरिकापुढं शिक्षक म्हणून आपल्याला वावरायचं असल्यानं आपले गुरुजी स्वयंपूर्ण आहेत असा बालमनाला विश्वास वाटला पाहिजे. शिक्षकाचा दैनंदिन आचार निर्दोष असावा. रोज पहाटे उठून नित्यक्रम आटोपून शिक्षकानं स्वतः नियमित व्यायाम घ्यावा. स्वतःच्या मानसिक सामर्थ्याच्या जोरावर आपल्याला साऱ्या बाल-मनांना आपल्याकडं आकर्षून घ्यायचं असल्यानं रोज समाजसंघटनेच्या मंत्रानं आपलं मन पवित्र करण्याचा शिक्षकानं प्रयत्न करणं जरूर आहे.

स्नानानंतर व्यायाम करीत असतांना मन एकाग्र करण्याचा अभ्यास केल्यास शिक्षकाचा आत्मविश्वास दिवसेंदिवस वाढतच जाईल. शरीर-पोषणाला जरूर इतकाच साधा पण सात्त्विक आहार घेतल्यानं शिक्षकाच्या मानसिक नी शारीरिक शक्ती आपोआप विकास पावतील. शिक्षकाचं आचरण इतकं पवित्र पाहिजे कीं गांवांतील कोणत्याहि स्त्रीपुरुषाला त्याच्याबद्दल विश्वास वाटला पाहिजे. स्वयंपूर्ण खेड्यांत जरूर असलेल्या अन्नवस्त्राच्या उत्पादनाला लागणारी सारी माहिती शिक्षकाला असणं जरूर आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण देत असतांना कांहीं विषयांची आपली माहिती अपुरी असली तर त्या त्या विषयाची माहिती अभ्यासानं वाढविण्याचा प्रयत्न शिक्षकांनीं केला पाहिजे. आसपासच्या खेड्यांत काम करणाऱ्या शिक्षकांच्याबरोबर विचारविनिमय करून आपल्या अडचणी त्यांच्यापुढं मांडून व त्यांच्या अडचणींचा आपण विचार करून सहकार्यानं आपापल्या खेड्यांतील बालमनं स्वयंपूर्ण करण्याचं काम ह्या शिक्षकांचं आहे. द्रव्यसंचय करणं हें आपलं ध्येय नसून ज्ञान मिळविणं आणि तें विद्यार्थ्यांना देणं हा एकच प्रयत्न शिक्षकांनीं सतत केला पाहिजे.

निरनिराळ्या पुस्तकी विषयांचा अभ्यास करणं हें जसं शिक्षकाचं आवश्यक अंग आहे, त्याचप्रमाणं कुस्तीचे डाव, लाठीबोथाटीचे हात, लष्करी कवाईत, नेम मारणं वगैरे गोष्टींत सुद्धां शिक्षकानं तरबेज असणं जरूर आहे. थोडक्यांत सांगायचं म्हणजे समाजांतील एक स्वयंपूर्ण व्यक्ति तयार करण्यास आवश्यक असलेली सारी सामुग्री ( शिक्षणाची व्याख्या, १० मार्च १९०० चें सेल्बी साहेब यांचें भाषण ) ह्या बागखेड्यांतील उद्यांच्या शिक्षकाजवळ जय्यत पाहिजे. सर्व धर्मांचं ध्येय समाजधारणा हेंच असल्यानं धर्मांतील आचारविचारांच्या अभ्यासानं स्वयंपूर्ण होऊन त्या त्या प्रसंगाला योग्य अशा नीतितत्त्वांची शिकवण शिक्षकानं स्वतः-जवळ सतत तयार ठेवावी. धर्मांत सांगितलेला आचार व्याख्यानांतून विद्यार्थ्यांपुढं मांडत राहण्यापेक्षां स्वतःच्या आचरणावर शिक्षकांचा भर असला पाहिजे.

शिक्षकांचा पोषाख साधा असावा. आपल्या बागखेड्यांतील रहिवाशांना स्वतःच्या कर्तबगारीवर आपल्या खेड्यांत जें कापड तयार करून

शक्य असेल तेंच कापड आणि तें सुद्धां अगदीं जरूरीपुरतं शिक्षकानं वापरलं पाहिजे. जें मिळेल त्यावर उदरनिर्वाह करावा. समाज उद्यांची काळजी घेतो ह्या ब्रीदवाक्याच्या जोरावर खेड्यांत आपल्या श्रमाच्या अन्नवस्त्रावरच आपला निर्वाह व्हायला पाहिजे ही शिकवण 'बालमनाला यशस्वी रीतीनं पटवून देण्याकरितां शिक्षकांनीं स्वतः स्वयंतुष्ट असलं पाहिजे. अन्नवस्त्राच्या बाबतींत जें धोरण तेंच धोरण इतर बाबतींतहि शिक्षकांनीं पाळणं आवश्यक आहे. आपल्या खेड्यांत रॉकेलच्या खाणी नसतील तर खेड्यांतून वीजयोजना अमलांत येईपर्यंत गोडं तेल दिव्याकरितां वापरणं जरूर आहे. यंत्रावर अवलंबून परावलंबी होण्यापेक्षां शक्य तो यंत्र टाळून स्वावलंबी होणं अधिक परवडेल. गूळ होत नसेल तर गूळ तयार करावा, मीठ तयार करावं, काड्याच्या पेट्या आज आपल्याला तयार करतां येत नसतील तर चकमक वापरावी किंवा विश्रामामध्यें कायम अग्निहोत्र चालवावं. ज्यांना विस्तव पाहिजे असेल त्यांनीं त्या अग्निहोत्रांत लाकूड टाकून विस्तव न्यावा. अशा तऱ्हेच्या कांहीं जुन्या परंपरांचं पुनरुज्जीवन आणि त्याच वेळीं कांहीं नव्या गोष्टींची प्राणप्रतिष्ठा शिक्षकांनीं केल्यास खेडीं स्वयंपूर्ण होण्यास कितीसा वेळ लागणार आहे ? खेड्यांतील नागरिकांच्या साऱ्या गरजा खेड्यांतूनच भागविल्या पाहिजेत ही स्वयंपूर्णता आर्यावर्ताचं ध्येय असल्यानं यांत्रिक सुधारणेपेक्षां मानवी कलेकडं अधिक लक्ष पुरविण्याकडं शिक्षकाचा रोख असला पाहिजे. चहा आपल्या खेड्यांत होत नाहीं, शिवण्याचं यंत्र आपल्या खेड्यांत होत नाहीं, लोखंडी नांगर आपल्याला तयार करतां येत नाहीं, त्याअर्थी ह्या वस्तु वापरल्यानं आपल्या स्वयंपूर्णतेला बाध येणार आहे अशी हुरहुर बालमनांना सतत लागली पाहिजे. स्वदेशीचा प्रसार आणि परदेशी मालावर बहिष्कार ह्या राष्ट्रीय सभेच्या एकेकाळच्या घोषणेंत मुळांत स्वयंपूर्णतेची कल्पना होती आणि त्या तत्त्वावरच आजच्या खेडेगांवांतील बालमनांची उभारणी करण्याचा प्रयत्न आवश्यक आहे. परदेशी मालावर बहिष्कार पुकारणं हें आपलं धोरण नसून आपलं खेडं स्वयंपूर्ण बनविणं हा आपला उद्देश आहे ह्या तत्त्वाचा प्रचार करणारे

शिक्षक स्वयंतुष्ट, स्वयंपूर्ण आणि स्वयंशासित होऊन कार्याला लागल्यावर बालमनांची उठावणी हां हां म्हणतां होईल.

शिक्षकानं चोवीस तास समाजसेवेंत गुंगलं पाहिजे. आज एक, उद्यां दुसरी, परवां तिसरी अशा नव्या नव्या कल्पनांचा अभ्यास करीत आपलं खेडं पायरीपायरीनं स्वयंपूर्ण करण्याच्या बाबतींत शिक्षकानंच मन घातलं पाहिजे. आपली शिकवण विद्यार्थ्यांना पटवून देण्यांत आपला रोजचा किती वेळ जातो ह्याचा विचार सुद्धां मनांत येणार नाहीं, इतका शिक्षक आपल्या कार्याशीं समरस झाला पाहिजे. गांवांतील प्रत्येक मुलगी आणि प्रत्येक मुलगा आदर्श नागरिक बनण्याच्या मार्गांत आहे किंवा नाहीं ह्याचं सूक्ष्म निरीक्षण सतत करीत राहणं हें शिक्षकाचं कर्तव्य आहे. एकाद्या मुलाच्या चेहऱ्यावरचा सतेजपणा कमी होऊं लागला कीं प्रेमानं त्या मुलाच्या अंतरंगांत प्रवेश करून त्याच्या मानसिक अगर शारीरिक व्याधीचं निर्मूलन करण्याचा शिक्षकानं कसून प्रयत्न केला पाहिजे. मुलाचा अगर मुलीचा अधःपात पाहून मन कष्टी व्हावं. असाध्य रोगाला बळी पडलेल्या एकाद्या मुलाकडं नजर जातांच शिक्षकाचं हृदय कळवळलं पाहिजे, पाझरलं पाहिजे, त्याच्या डोळ्यावाटे आपोआप अश्रु ओघळले पाहिजेत. त्या दुर्दैवी मुलाला धीर देऊन त्याच्या वेदना त्याला सुसह्य होतील असा जिव्हाळ्याचा उपदेश शिक्षकाच्या मुखावाटे अमृतवर्षावाप्रमाणं सतत त्या बालमनावर ठिपकत राहिला पाहिजे. आपल्याला महिन्याच्या महिन्याला पगार मिळतो आहे म्हणून हें काम आपण नाइलाजानं करीत राहिलं पाहिजे ही कल्पना नाहींशी होऊन बालमनांची उठावणी करतांना आपला जीव जगविणं जरूर आहे, म्हणूनच आपण हा पगार घेतो अशा कल्पनेनं शिक्षक आपल्या आध्यात्मिक अधिष्ठानावर स्थिरावला पाहिजे. मुख्याध्यापकाच्या भीतीनं काम करणं वेगळं आणि अंतःस्फूर्तीनं स्वतःला समाजसेवेला वाहून घेणं वेगळं! शाळातपासनिसांना मुलांची हजेरी फुगवून दाखवून कागदोपत्री पुरावा तयार करण्यापेक्षां आपल्यासमोरील प्रत्येक विद्यार्थ्याच्या तरतरीत चेहऱ्यावरून आणि शिक्षकाच्या चेहऱ्यावर उमटलेल्या आत्म-विश्वासाच्या प्रतिबिंबावरून शाळातपासनिसांना शिक्षकाच्या कामाची, त्याच्या योग्यतेची आणि त्याच्या कळकळीची आपोआप खात्री पटली

पाहिजे. आपल्यावरील अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत यशस्वी रीतीनं धूळ टाकण्यापेक्षां त्यांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालून त्यांनाहि आपल्या-सारखे कर्तव्यक्षम बनविणं हें खऱ्या शिक्षकाचं काम आहे. अशा तऱ्हेनं शिक्षक स्वयंशासित झाला पाहिजे.

शिक्षक ध्येयनिष्ठ व्हायला शिक्षकमनाची उभारणी अध्यात्माच्या बळ-कट पायावर व्हावी लागते. तेवढ्याकरितां आचारविचारांच्या इतर गोष्टींबरोबरच मनांत आत्मविश्वास निर्माण होण्याकरितां शिक्षकानं मनाची एकतानता साधण्याचा अभ्यास करणं जरूर आहे. हा अभ्यास करून जागेपणीं मन निश्चल ठेवून मनाला स्थिरपणा आणणं हीच ज्ञानाची परिसीमा आहे. ऐहिक सुखोपभोगाबद्दल आशा वाटणं, धनसंचयाबद्दल अनिवार हाव असणं, सदसद्विवेकबुद्धीची गळचेपी करून जगांतील खोट्या मोठेपणाच्या मागं लागणं ह्या मनोवृत्तींचं प्राबल्य म्हणजेच मनाच्या स्वैरपणाला पूर्ण वाव देऊन आधिभौतिकतेचा जयजयकार करणं आहे. साखरेची गोडीच जोपर्यंत कळलेली नसते तोपर्यंतच मूल दुधाच्या गोडींत संतुष्ट असतं. पण साखरेच्या गोडीचा अनुभव येतांच सतत साखरेच्या गोडीबद्दल बालमनाला ज्याप्रमाणं आत्मीयता वाटते त्याच-प्रमाणं ज्ञानाची परिसीमा गांठण्याची गोडी मानवीमनांत निर्माण होतांच इतर सगळ्या आधिभौतिक गोष्टींबद्दल मन निरुत्साह होतं. म्हणून शिक्ष-कांनीं आध्यात्मिक उन्नतीचं ध्येय सतत आपल्या डोळ्यापुढं ठेवणं जरूर आहे.

रोज स्नानानंतर शिक्षकांनीं आसन घालून कांहीं वेळ मन स्थिर करण्याचा प्रयत्न केल्यास ह्यांतच त्यांना गोडी वाटूं लागेल. डोळे मिटून स्वस्थ बसणं जर शक्य होत नसेल तर कांहीं दिवस आपल्या नजरेसमोर भिंतीवर एकादा काळा ठिपका ठेवून त्याकडं पहात रहावं किंवा सूर्यो-दयाच्या वेळीं सूर्याकडं पहात बसण्यासारखी जागा आपल्या राहत्या घरांत अगर जवळपास असल्यास सूर्याकडं थोडा वेळ निश्चल नजरेनं पहात रहावं. कांहीं वेळ असं पहात राहिल्यानंतर डोळे मिटावे. डोळे मिटतांच आपल्या मिटलेल्या डोळ्यासमोर निळा, हिरवा, काळा, तांबडा, असे निरनिराळे रंग येतात व जातात. निळा रंग बाजूला

तांबडा रंग येतो, तांबडा जाऊन पिवळा येतो व हे रंग पहात असतांना मन त्या काल्पनिक रंगांतच रमतं. पुढं पुढं हे रंग नजरेपुढं स्थिर करण्याचा प्रयत्न करावा. अमुक एकच रंग, विशेषतः सर्व सप्तरंगांचं ज्यांत मिश्रण आहे असा पांढरा रंग आपल्यासमोर स्थिर करण्याचा प्रयत्न करावा. कांहीं दिवसांच्या अभ्यासानं आपलं मन पांढऱ्या रंगावर स्थिर होऊं लागेल. हा पांढरा रंग वाढवितां वाढवितां आपलं घर, आपला गांव, आपला प्रांत, आपला देश, सबंध पृथ्वी आणि त्यानंतर चंद्रसूर्यताऱ्यांसुद्धां सारं विश्व व्यापून राहण्याइतका मोठा करावा. अभ्यासानं हेंहि साध्य होईल. आपणासुद्धां सारं विश्व ह्या शुभ्ररंगांत सामावलं गेलं म्हणजे आपण कांहींतरी पाहतो आहोंत ही कल्पनासुद्धां नाहींशी होऊन रंग नाहीं, रूप नाहीं, पाहणारा नाहीं अशी मनाची निर्विकार स्थिति होईल. थोडक्यांत सांगायचं म्हणजे जागेपणीं पूर्ण शांततेचा आनंद आपल्याला मिळेल. आपल्या आसपासचा कोणताहि आवाज आपल्याला ऐकूं येणार नाहीं. आपण मांडी घालून बसलों आहोंत हें सुद्धां आपण विसरून जाऊं. हलकें हलकें आपण भानावर येऊं लागल्यावर पुन्हां साऱ्या गोष्टींची आपल्याला जाणीव होईल. हीच समाधि, हाच स्वात्मानुभव, हेंच अध्यात्म.

हें फार अवघड आहे, गुरुकृपेशिवाय हें साधणं शक्य नाहीं, नाममंत्राच्या जपानं हें साधणं शक्य आहे, वगैरे ज्या गोष्टी सांगितल्या जातात त्या गोष्टी फक्त प्रारंभीं विश्वास बसावा म्हणूनच सांगितल्या जातात. एकदां आत्मविश्वास वाटूं लागला म्हणजे मन आपोआप स्थिर होऊं लागेल. एखादे दिवशीं क्षणभरच जरी मन स्थिर झालं तरी त्या स्थिर मनाच्या अवस्थेंत जो आनंद होईल त्याच्यापुढं जगांतील इतर सगळीं सुखं तुच्छ वाटूं लागतील. प्रत्येक व्यक्ति तें सुख जास्तींत जास्त वेळ अनुभवण्याचा सतत प्रयत्न करीत राहील. परमेश्वराची पूजा करणं, नामसंकीर्तन करणं, मोठमोठ्या व्यक्तींचीं चरित्रं डोळ्यापुढं ठेवून आपण त्यांच्याप्रमाणं होण्याचा प्रयत्न करणं ह्या साऱ्या आचारविशेषांचं हें एकच ध्येय आहे. मानवजातीला ह्या एकाग्रतेच्या अवीट आनंदाची

गोडी वाटूं लागल्यावर मानवीमनांत प्रतीत होणारं सामर्थ्य मानवजातीला खात्रीनं सुखवील.

हें वर्णन लिहिण्याला जितका वेळ लागला, किंवा हा भाग वाचायला जितका वेळ लागेल, त्या मानानं ही ज्ञानाची परिसीमा गांठायला फार अधिक वेळ लागेल हें खरं ! पण प्रयत्नाला सुरवात केल्यापासूनच मन आनंदी झाल्यानं आपोआपच अभ्यासाची चटक लागेल आणि शिक्षक-मनांतील आध्यात्मिक सामर्थ्य वाढूं लागेल. आपल्या सात्त्विक तेजानं नी आत्मविश्वासानं प्रत्येक व्यक्तीवर आपल्या विचारसरणीची छाप पाडतां येईल आणि समाजमनांत जरूर ती सुधारणा घडवून आणणं सहजसाध्य होईल. हें साधण्याकरितां रानावनांत जाऊन तपश्चर्या करण्याची जरूरी नाहीं, योगसाधनांची पण आवश्यकता नाहीं, हें या विसाव्या शतकांतील स्वयंपूर्णताप्रणेत्यांच्या उदाहरणावरून पटण्यासारखं आहे.

असे कर्तबगार शिक्षक खेड्यांतील बालमनांची खात्रीनं उठावणी करूं शकतील. आज खेड्यांत असलेले कांहीं प्रौढ भांडवलवाले आहेत, कांहीं बडे जमीनदार आहेत, कांहीं अधिकारी आहेत आणि कांहीं कामकरी आहेत. ह्या सर्वांचीं मुलं ह्या नवीन शाळांतून शिक्षण घेणारच. ह्या बाल-मनांना मन आणि शरीर सामर्थ्यवान करण्याचं शिक्षण दिल्यास ह्यांच्यां-तील विषमता नाहींशी होऊन आपोआप बंधुभाव वाढूं लागेल. आपलं खेडं स्वयंपूर्ण करायचं, खेड्यांतील कोणत्याहि व्यक्तीला कशाचीहि ददात पडूं द्यायची नाहीं ह्या ध्येयानं हीं बालमनं प्रेरित होतील. ही समतेची नी विश्वबंधुत्वाची इमारत पुरी होण्यास कालावधि लागेल हें खरं असलं, तरी ही पायाशुद्ध इमारत चिरकाल टिकेल ह्यांत शंका नाहीं. शिक्षकांनीं कोणतीहि अधिकाराची जागा न घेतां फक्त निःपक्षपाती सल्लागाराचं काम करावं. खेडं स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीनं, खेड्यांतील बालमनांचा पूर्ण विकास करण्याच्या दृष्टीनं अगर पंचवीस, पन्नास अगर शंभर खेड्यांचे जे गट होतील त्या गटांत हलकें हलकें कोणत्या सुधारणा घडवून आणा-यच्या ह्या दृष्टीनं ह्या खेड्यांतील शिक्षकांनीं आपापल्या खेड्यापुरता वैय-क्तिक सल्ला अथवा गटयोजनेच्या दृष्टीनं योग्य तो सामुदायिक हिताचा सल्ला वेळोवेळीं खेड्यांतील निवडून दिलेल्या प्रतिनिधींना द्यावा.

ह्या पंचवीस खेड्यांच्या केंद्रांत सुरवातीला कोणत्या गोष्टींचं उत्पादन स्वयंपूर्ण गटांच्या दृष्टीनं आवश्यक आहे ह्याचा विचार खेड्यांतील प्रतिनिधींच्या बरोबरच शिक्षकांनींहि करणं जरूर आहे. अन्न, वस्त्र, औषध वगैरेंचं उत्पादन खेड्यांतच होणं जरूर असलं तरी टांचण्या, सुया, कंगवे, कागद, शिवण्याचीं यंत्रं, टाक, रंग, सीमेंट, लोखंडी तुळ्या, सळ्या, पत्रे वगैरे कित्येक जीवनोपयोगी वस्तूंची पैदास ह्या केंद्रांच्या ठिकाणीं करणं जरूर आहे. विजेचे दिवे, नळ, सायकली, मोटरी, विमानं अशा गोष्टी सुद्धां खेड्यांतील लोकांना पुरविणं जरूर वाटूं लागेल. आधुनिक सुखसोयी कमी करून हिंदुस्थानांतील स्वयंपूर्ण लोकांनीं सतत दारिद्र्यांतच रहावं हें ध्येय कोणाचंच नाहीं. आधिभौतिक शास्त्रांत जितकी कमाल प्रगति होणं शक्य आहे तितकी प्रगति हिंदुस्थानांत होणं आवश्यक आहे. पण ह्या प्रगतीच्या योगानं राष्ट्रांतील मानवजात यंत्रावलंबी होत असेल, माणसं यंत्राधीन होऊन माणुसकीला पारखीं होत असतील, तर मात्र किमान प्रगतीवर संतुष्ट राहून निसर्गाच्या सहवासांत वावरणंच हिताचं आहे.

सर्व सुधारणा हलके हलके घडून येणार आहेत. बागखेड्याच्या सांपत्तिक स्थितीला ज्या गोष्टी ज्या प्रमाणांत परवडत जातील त्या प्रमाणांत नव्या नव्या सुधारणांची आखणी करतां येईल. पण हें उत्पादन राक्षसी होऊं नये, स्वयंपूर्णता हें ह्या सुधारणांचं ध्येय असावं, परचक्रापासून आपापल्या देशाचं संरक्षण करण्यापुरती युद्धसामुग्री तयार ठेवणं हें धोरण ह्या सल्लागारांचं असावं. ह्या पंचवीस खेड्यांच्या गटाच्या हिताच्या दृष्टीनं ज्या वस्तूंचं उत्पादन करणं अत्यंत आवश्यक असेल त्याच वस्तूंचं उत्पादन ह्या केंद्रांत प्रथम हातीं घ्यावं. पत्र्यांच्या ऐवजीं कौलांचा उपयोग करावा. लोखंडी बीम्सच्या ऐवजीं लाकडी बांधकामांतच खरी स्वयंपूर्णता आहे. बालमनविकासाच्या दृष्टीनं पुस्तकांची अधिक अधिक जरुरी वाटल्यास पुस्तकं छापावीं; पण हें सुद्धां तूर्त शक्य नसेल तर प्रत्येक खेड्यांतील छापखाने शिळाछापाचे असावेत. पूर्वीच्या काळच्या कांहीं शिक्षकांचा बोरूच्या लेखण्या वापरण्यासंबंधीं कटाक्ष असे. आपल्याला ही लेखणी रानटी वाटत असली तरी तीमध्यें स्वयंपूर्ण

खेड्याचं मूलतत्त्व शंभर टक्क्यांनीं पूर्ण होत असतं. मोठं अक्षर काढायचं झाल्यास टाक तोडा, बारीक अक्षराकरितां बाजू खरडा, टोक मोडलं पुन्हा टोक करा, आणि निसर्गनिर्मित धरित्रीयंत्रांतून बोरूचं पीक काढा. ह्यांत स्वावलंबन आहे, सोय आहे, समृद्धि आहे, हिरड्याची अगर ज्वारी जाळून त्यांत डिंक, हिराकस वगैरे पदार्थ घालून काळी शाई करण्याच्या गांवठी पद्धतीमध्यें सुद्धां शिक्षकांचं स्वयंपूर्णतेचं ध्येय पूर्णांशानं साधलं जात असे. थोडक्यांत सांगायचं म्हणजे खेड्याच्या स्वयंपूर्णतेकरितां हल्लींच्या विसाव्या शतकाच्या थोडं मागं जाऊन सुद्धां केंद्राच्या ठिकाणीं किमान मालाचं यांत्रिक उत्पादन आखण्याची जबाबदारी शिक्षकांचीच आहे. याहि दृष्टीनं आपल्या ह्या बागखेड्यांत शिक्षकाचं स्थान महत्त्वाचंच राहील.

अशा तऱ्हेनं शिक्षक आपल्या उपयोगीं पडत आहे, आपल्या खेड्यांतील बालमनांची जोपासना करण्याचं व्रत त्यानं अविश्रांतपणें चालविलं आहे, खेड्याच्या स्वयंपूर्णतेच्या धोरणानं तो सतत विचार करीत आहे आणि इकडं हा विचार करीत असतांनाच खेड्यांतील उत्पादन वाढविणं, खेड्यांतील समाजाची संघटना करणं, खेड्यांतील विषमता नाहींशी करणं ह्या समाजहितवादी प्रयत्नांत शिक्षक चोवीस तास रंगून गेला आहे हें दिसून येतांच त्या शिक्षकाबद्दल आदर, अभिमान नी पूज्यभाव साऱ्या खेड्यांतील समाजमनांत दिसूं लागेल. प्रत्येक व्यक्तीला शिक्षकाबद्दल आपलेपणा वाटेल आणि आपणा सर्वांच्यापेक्षांहि शिक्षकाला अधिक सुखसोयी मिळाव्या, त्याच्या कुटुंबाची काळजी त्याला करावी लागूं नये, म्हणून समाज सतत झटत राहील. असे निर्व्यसनी, निःस्वार्थी आणि निःपक्षपाती शिक्षक प्रत्येक बागखेड्यांतून कामाला लागल्यानंच आदर्श हिंदुस्थानचं सर्वश्रेष्ठ ध्येय जें अखिल मानवजातीचं आत्यंतिक सुख, तें साधलं जाणार आहे.

आपल्या अधिकाराच्या जागा सोडून ह्या स्वयंपूर्ण खेड्यांच्या उठावणीला नेत्यांनीं आपल्याला वाहून घेणं हा उत्तम पक्ष. नेत्यांच्या उठावणीनं समाज बालमनविकासावर आपलं सामर्थ्य एकवटायला तयार होईल आणि ही उठावणी तावडतोब होईल. पण हें अगदींच अशक्य असेल, बसलेली घडी फिरून विसकटणं राष्ट्रहिताच्या दृष्टीनं घातक

ठरत असेल, महात्माजींना सुद्धां ही विचारसरणी अव्यवहार्य वाटली असेल तर नेत्यांनीं अधिकाराच्या जागीं अधिष्ठित राहूनच ही बालमनांची उठावणी करण्याचं काम राष्ट्रीय सभेतील इतर त्यागवीरांच्याकडं सोपवावं. आपलं शक्तिसर्वस्व बालमनांच्या उन्नतीवरच केंद्रित करण्याचं आश्वासन देऊन राष्ट्रीय सभेतील कार्यकर्त्यांना बालमनविकास साधण्याकरितां खेड्यांतून पाठवायला तावडतोब सुरवात करावी. बागखेड्यांच्या उत्कर्षाकडं राष्ट्रीय सभेचं लक्ष आहे, राष्ट्रीय सभेचे नेते मधूनमधून आपल्या खेड्यांना भेटी देतात असं दिसतांच बालमनांची उठावणी अधिक जलद होईल.

ह्याहि गोष्टी राष्ट्रीय सभेकडून झाल्या नाहींत तर ही स्वयंपूर्ण खेड्यांची कल्पना आहेत त्या शिक्षकांनीं वाढीला लावावी. खेड्याबरोबरच शहरांतूनसुद्धां, ज्या प्राथमिक शाळांतील शिक्षकांना, ज्या दुय्यम शाळांतील शिक्षकांना, ज्या विद्यालयांतील प्राध्यापकांना ही विचारसरणी पटेल त्यांनीं त्यांनीं, आहे त्या परिस्थितींतच बालमनावर आध्यात्मिक विचारसरणीचा ठसा उमटविण्याचा प्रयत्न करणं जरूर आहे. एका शिक्षकाला जरी ही विचारसरणी पटली तरी त्या शिक्षकानं एकदम कार्याला लागावं. विद्यार्थ्यांचीं मनं आजकाल क्रमिक अभ्यासक्रमापेक्षां नीति, ध्येय, समाजधारणा ह्यांच्या अभ्यासाला हपापलेलीं आहेत. त्यांना गुरुजनांना वंदन करायला सांगितल्यास ते त्यांना आदरानं नमस्कार करतात, त्यांना आईला नित्यनेमानं उठल्याबरोबर नमस्कार करणं आपलं कर्तव्य आहे ही गोष्ट पटवून दिल्यास हीं बालमनं आईला नमस्कार करतात. आपल्या मनांतील हीन वृत्तींचा त्याग करणं जरूर आहे ही शिकवण त्यांना दिल्यास आपल्या मनांतील सद्भावना जागृत करण्याचा हीं बालमनं अंतःकरणपूर्वक प्रयत्न करितात. आपल्या मनाची एकाग्रता साधण्याकरितां दिवसांतून एकदोन मिनिटं स्वस्थ बसण्याचा प्रयत्न करा असं सांगितल्यास मनोभावानं तीहि गोष्ट करायला तीं तयार होतात असा अनुभव आहे. शिक्षकांनीं हीं बालमनं आपल्याकडं आकर्षून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांना आध्यात्मिकतेच्या चौथऱ्यावर नेऊन उभं करण्याचं काम नेते करीत नसतील, समाज करीत नसेल तर शिक्षकांनीं पुढं झालं पाहिजे. बालमनविकासाची पाऊलवाट पडण्याचा अवकाश,

समाज आणि समाजाचे नेते शिक्षकांच्या पावलावर पाऊल टाकून कार्य करूं लागतील.

ह्याकरितां जरूर ती मनाची तयारी शिक्षकांनीं स्वतः केली पाहिजे. आपल्या मुख्याध्यापकांची मोठ्या नम्रतेनं परवानगी घेऊन शाळेच्या वेळांत अगर शाळेच्या वेळाबाहेर आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांचा आपला रोज संबंध येईल असा वेगळा कार्यक्रम शिक्षकांनीं आखला पाहिजे. त्यांच्या मनांतील सुप्त शक्ति जागृत करण्याचा मानसिक प्रयत्न शिक्षकांनींच केला पाहिजे. मनाची एकाग्रता साधतां येऊं लागली कीं त्यांना रोजचा अभ्यास अधिक चांगल्या तऱ्हेनं करितां येऊं लागेल. शिक्षकांच्या सांगण्यावर विद्यार्थ्यांची श्रद्धा बसेल आणि ह्या श्रद्धेच्या जोरावर विद्यार्थी मनानं वीर, शरीरानं वीर नी चारित्र्यानं खंबीर बनतील. शिक्षकांचे प्रयत्न यशस्वी होऊं लागले कीं मुख्याध्यापकांना आश्चर्य वाटेल, तपासनिसांना ह्या नव्या मानसिक तंत्राची सत्यता पटेल, शरीर जिंकण्यापेक्षां मन जिंकण्यानं स्वयंपूर्ण हिंदुस्थानची उठावणी होईल असा ह्या प्रयोगानं नेत्यांना सुद्धां विश्वास वाटूं लागेल आणि मग आज शाळांची, शिक्षकांची आणि त्यामुळं विद्यार्थ्यांची जी आबाळ होत आहे ती नाहींशी होऊन शिक्षक ही व्यक्ति समाजांत आज ज्या हीनदीन स्थितीला पोहोंचली आहे त्या शिक्षकाचं महत्त्व वाढेल, शिक्षकाला सुस्थितींत ठेवण्याचा सरकार आपोआप प्रयत्न करूं लागेल आणि आज शिक्षकानं समाजांतील आपलं गमावलेलं स्थान त्याला पुन्हा गौरवानं परत मिळेल.

हें काम शिक्षकांचे संघ स्थापून होणार नाहीं. फक्त अंतःस्फूर्तीनं शिक्षक जर कामाला लागले तर हां हां म्हणतां लहानमोठ्या शाळांतून शिस्त, संघटना, सामर्थ्य ह्यांची जोरदार आघाडी अस्तित्वांत येऊन अखिल मानवजातीचं आत्यंतिक सुख साधण्याचं महात्माजींचं स्वप्न खरं ठरेल. एवढ्याचकरितां शिक्षकानं कसं वागावं, शिक्षक कसा असावा, शिक्षकांनीं आपल्या मनाची परिपूर्ण तयारी कशी करावी ह्याचा ऊहापोह केला. असे आदर्श शिक्षक राष्ट्रांत तयार झाल्यावर आदर्श राष्ट्राची उभारणी करायला कितीसा वेळ लागणार?

# २० : आदर्श राष्ट्र

शिक्षकांनीं बालमनांची उठावणी केली म्हणजे शाळांतून एकदम वेगळं दृश्य दिसूं लागेल. विद्यार्थ्यांना शाळेंत या असं सांगण्याची जरुरीच पडणार नाहीं. आपले शिक्षक आपल्याला आपल्या हिताचंच शिक्षण देतात, आपल्याला ज्ञान देण्याकरितां, आपलीं मनं पवित्र बनविण्याकरितां, आपल्याला उत्तम नागरिक बनविण्याकरितां आपले शिक्षक कायावाचा-मनानं झटताहेत, शिक्षक आपले आदर्श आहेत अशी खात्री पटल्यानं शिक्षकांबद्दल त्यांना आपुलकी वाटेल. शिक्षकाप्रमाणंच त्यांच्या आई-बापांबद्दल देखील त्यांच्या मनांत पूज्यभाव उत्पन्न होईल. आईबापांची आज्ञा पाळणं हा विद्यार्थ्यांचा धर्म होईल. त्यांच्याशीं गोड बोलणं, त्यांना त्यांच्या कामांत मदत करणं, त्यांना उलट उत्तरं न देणं अशी शिकवण शाळेंत मिळाल्यानं आईबापांना सुद्धां आपल्या मुलांच्या सुधारल्या वागणुकीबद्दल अभिमान वाटूं लागेल. परीक्षा हें साध्य नसून साधन आहे ह्याची कल्पना आल्यानं आपला अभ्यास चोख करण्याकडं विद्यार्थ्यांचं लक्ष लागेल. शाळा म्हणजे एक कैदखाना आहे ही विद्यार्थ्यांची कल्पना नाहींशी होऊन आपल्याला उत्तम नागरिक बनायचं असेल, आपल्या समाजाचं आपल्याला हित करायचं असेल, आपलं खेडं स्वयंपूर्ण करायचं असेल तर आपण सर्वांनीं नित्यनेमानं शाळेंत जाणं आवश्यक आहे ही जाणीव विद्यार्थ्यांमध्यें उत्पन्न होईल. शाळेंत नेमलेले सर्व विषय एकाच समाजधर्माचे वेगवेगळे भाग आहेत; आणि ह्यांच्या अभ्यासानं आपलं मन सामर्थ्यवान झाल्यावर आपल्याला समाजाची सेवा करण्याचं वेगळं शिक्षण घेण्याची जरुरी नाहीं ह्या खात्रीनं प्रत्येक बालमनाला अभ्यासाची गोडी लागेल.

सुतार, लोहार, धोबी, न्हावी, शेतकरी, शिक्षक, राखणदार, विणकर, कुंभार वगैरे समाजांत रूढ झालेल्या जाती जन्मावर अवलंबून नसून धंद्यावर अवलंबून आहेत. आपण सारीं माणसं एकाच परमेश्वराचीं

लेकरं आहोंत. आपल्याला लागणारी प्रत्येक वस्तु आपणच तयार करायची असं ठरविल्यास तें फार अवघड जाईल म्हणून ज्यानं त्यानं आपल्याला जी गोष्ट साधेल तीच गोष्ट संघटित सामर्थ्यावर केल्यास श्रमविभागणी होऊन प्रत्येक काम कलापूर्ण होईल. कुटुंबांत ज्याप्रमाणं आईबाप, चुलता चुलती ह्यांच्यांत श्रमविभागणी होऊन कुटुंबांतील सर्व कामं चोख रीतीनं होतात त्याचप्रमाणं श्रमविभागणीच्या तत्त्वावर निरनिराळीं कामं करणारे समाजघटक कलानंदांत रंगून जाऊन आपापल्या खेड्यांतील समाज सतत पुढंच नेत राहतील. श्रमविभागणीचं तत्त्वज्ञान सर्वच विद्यार्थ्यांना पटल्यानं प्रत्येक विद्यार्थी हरएक काम करायला अहमहमिकेनं पुढं येईल. आणि त्यापैकीं ज्या विद्यार्थ्याला एकादं काम अधिक आवडूं लागेल तो विद्यार्थी त्या कलेंत अधिक प्रावीण्य मिळवून समाजांत विशिष्ट काम कलापूर्णतेनं करूं लागेल. अमुक धंदा श्रेष्ठ आहे, अमुक काम करणाऱ्याला अधिक महत्त्व आहे, अधिक अवघड काम करणारा समाजघटक अधिक महत्त्वाचा आहे असा थोडाबहुत फरक जरी समाजांत शिल्लक राहिला तरी आपल्याला साधेल तें काम मन लावून करीत राहिल्यास समाज आपल्याकडं आदरानंच पहात राहील अशी खात्री वाटल्यानं बालसमाजांतील उच्चनीचभाव नाहींसे होऊन सारा समाज एकदिलानं नी स्नेहभावानं वागूं लागेल. आपल्यापेक्षां बुद्धीनं कमी असतील त्यांच्याबद्दल आपलेपणा वाटेल, बुद्धीनं आपल्या बरोबरीचे असतील त्यांच्याबद्दल प्रेम वाटेल आणि बुद्धीनं आपल्यापेक्षां श्रेष्ठ असतील त्यांच्याबद्दल आदर वाटेल.

विद्यार्थीदशेच्या कालांत विद्यार्थी आपलं मानसिक सामर्थ्य वाढविण्याचा सतत प्रयत्न करील. मन निश्चल करण्याच्या अभ्यासानं मनाची एकाग्रता वाढूं लागेल. कोणत्याहि विषयाचा अभ्यास करतांना, कोणतंहि काम करीत असतांना, गुरुमुखांतून कोणताहि उपदेश ऐकत असतांना मन अधिकाधिक एकाग्र होत गेल्यानं आपल्या मनांत आंतूनच कांहीं तरी नवं चैतन्य उत्पन्न होत आहे असं बालमनाला सतत वाटत राहील. हें उत्पन्न होणारं आंतरिक सामर्थ्य असंच वाढीला लावलं तर ह्या सामर्थ्यांतून प्रबल मनं निर्माण होतील असं गुरुजींचं सांगणं असल्यानं

प्रत्येक बालमन आपलं मानसिक सामर्थ्य वाढविण्याच्या प्रयत्नांत कोणत्याहि तऱ्हेनं कसूर करणार नाहीं. अखिल मानवजातीचं आत्यंतिक सुख साधणं हें आजच्या आर्यावर्तांतील समाजांचं ध्येय आहे आणि हें ध्येय साधण्याकरितां आपलं खेडं स्वयंपूर्ण करणं जरूर आहे ही शिकवण पटल्यानंतर आपल्या खेड्याचं सामर्थ्य वाढविण्याकरितां प्रत्येक बालमन आपल्या मनाचं सामर्थ्य वाढविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत राहील. मार्गांत येणाऱ्या अडचणींबद्दल मोकळ्या मनानं गुरुजींना शंका विचारून योग्य मार्गानं बालमनं प्रगति करीत राहतील.

योग्य आहार, योग्य विहार आणि योग्य व्यायाम यांच्या जोडीला मनाचा खंबीरपणा आल्यावर प्रत्येक विद्यार्थी दिवसेंदिवस आत्मविश्वासाच्या जोरावर सतेज दिसूं लागेल. खेड्यांतील प्रत्येक विद्यार्थ्याकडं आणि विद्यार्थिनीकडं पाहतांच आपल्या मनाचं समाधान होईल. डोळ्यांत बुद्धीची चमक, चेहऱ्यावर आत्मविश्वासाचं हास्य, आकृतींत व्यायामाचा डौलदारपणा अशा सद्गुणांचं प्रतीक अशीच प्रत्येक बालव्यक्ति दिसूं लागल्यानं कोण श्रेष्ठ नी कोण कनिष्ठ हें ठरविणं सुद्धां जड जाऊं लागेल. विद्यार्थी कौशल्यानं दंडा पेलतो आहे, तर विद्यार्थिनी सफाईदार जम्बियाचे हात करूं शकते आहे. स्वयंपूर्ण बागखेड्यांत जरूर असलेल्या प्रत्येक धंद्यांत विद्यार्थी प्रवीण आहे, तर स्वादिष्ट नी रुचकर पदार्थ तयार करण्यांत प्रत्येक विद्यार्थिनी पटाईत आहे. नेमस्त व्यायामानं विद्यार्थ्यांच्या शरीरसौष्ठवांत उठावदारपणा दिसतो आहे, तर प्रत्येक विद्यार्थिनीची रेखीव आणि सुदृढ आकृति तिच्या नैसर्गिक सौंदर्यांत भर टाकते आहे. प्रत्येक विद्यार्थी मैदानी खेळांत तरबेज आहे, तर आयुष्यांतील प्रत्येक स्त्रीसुलभ जबाबदारी हौसेनं पार पाडण्याची तयारी प्रत्येक विद्यार्थिनींत दिसून येते आहे.

कंबर कसून विद्यार्थिनी आणि विद्यार्थी कवाइतीच्या मैदानावर कवाइतीकरितां उभे राहिले कीं कवाईत पाहतांना पाहणाराला असं वाटावं कीं दोघंहि रणमैदानावर तुल्यबळानं शत्रूशीं एकदिलानं आणि एकध्येयानं प्रेरित होऊन निकरानं झुंज द्यायला लायख आहेत. सुखी संसाराची मांडणी

करायची वेळ आली कीं आपापली जबाबदारी हसतमुखानं नी खिलाडू वृत्तीनं पार पाडणं प्रत्येकाला सहजसाध्य वाटेल. निसर्गकोपानं आपल्या नागरिकांवर एकादं संकट ओढवल्यास प्रत्येक बालमन समतोल वृत्तीनं आलेल्या संकटाला तोंड देण्याला धैर्यानं तयार होईल. काबाडकष्टांची जरुरी असेल तर प्रत्येक व्यक्ति आपल्या शरीरसुखाकडं न पाहतां कष्टाला तयार होईल. प्राणांची खैरात करायची जरुरी असेल तर प्रत्येक बालमन हसत-मुखानं नी अहमहमिकेनं समाजहिताकरितां आपल्या प्राणावर पाणी सोडायला तयार होईल. निसर्गाचा कोप झाल्यावेळीं आपल्या हातीं कोणतीच गोष्ट नसल्यास शांत आणि स्थिर मनानं एकाग्रता साधून, आरडाओरडा, पळापळ, भेकडपणा अशा कमकुवतपणाच्या कोणत्याहि गोष्टींचा देखावा न करतां आल्या संकटाकडं प्रत्येक बालमन हसतमुखानं पहात राहील. जगांत जास्तींत जास्त काल निरोगीपणानं आपल्याला निष्कलंक जीवन कसं जगतां येईल हेंच ह्या बालमनांचं सतत ध्येय राहील. उच्च विचारसरणीच्या जोरावर खोटं बोलणं, चोरी करणं ह्या असत्प्रवृत्तींना आपोआप आळा पडेल. खोटं बोलण्याचा आपल्या मनावर अनिष्ट परिणाम होतो, चोरी करतांना मन भेदरलेलं असतं, हिंसा करणाऱ्या माणसाचं मन डागळलेलं असतं, ह्याचा प्रत्यहीं अनुभव येत असल्यानं मन पवित्र ठेवण्याकरितां हीं बालमनं ह्या असत्प्रवृत्तीपासून आपलं मन सतत दूर ठेवण्याचा कसोशीनं प्रयत्न करीत राहतील. ह्या बालमनांच्या उठावणीला आध्यात्मिकतेचा पाया असल्यानं त्यांच्या गढूळलेल्या मनः-प्रवृत्ती अभ्यासानं निर्मल बनत जातील. स्वार्थी मनोवृत्तींना गाडून त्यागाचं निशाण हातीं घेतल्यानं आपल्या मनाला आनंद होतो ह्याचा अनुभव आल्यानं समाजाकरितां सतत त्याग करण्यांतच आपल्या व्यक्तिमत्वाची आदर्श उठावणी होईल असंच ह्या बालमनाला सतत वाटत राहील. राग आला असतां मनुष्याची मानवता नाहींशी होऊन मनुष्य कांहीं काळ पशु बनतो हें प्रत्यक्ष दृश्य दिसत असल्यानं शक्य तों न रागावणं आणि चुकून एकाद्या वेळीं राग आलाच तर त्यावेळीं पशुवृत्ति टाळण्या-करितां आपल्या मनावर विजय मिळविण्याच्या प्रयत्नांतच हलकें हलकें बालमनाला उल्हास वाटूं लागेल. ह्या मनोविजयाच्या प्रयत्नांत असंख्य

अधिकाधिक यश मिळत जाईल त्या त्या प्रमाणांत बालमनांत अधिकाधिक स्थैर्य निर्माण होईल.

समाजांतील अनीतीबद्दल नी अन्यायाबद्दल ह्या बालमनाला जितका तिटकारा येईल तितकंच हें बालमन दैवी आघातानं विव्हल झालेल्या समाजांतील दुर्दैवी व्यक्तींबद्दल हळूहळूं लागेल. ' ब्रह्मचर्य हेंच जीवन ' ही शिक्षकाची सतत शिकवणूक असल्यानं विद्यार्थीदशेंत ब्रह्मचर्य पाळण्याचा प्रयत्न करणं आणि त्यांत यशस्वी होणं हेंच बालमनांचं ध्येय राहील. यामुळं आजकालच्या जगांतील विषयोपभोगाच्या अतिरेकाला आळा बसून तारुण्यसुलभ विषयवासनेवर संयम राखला जाईल. मानवजातींतील स्त्रीपुरुष हे जे निसर्गनिर्मित दोन विभाग यांचं परस्परांचं नैसर्गिक आकर्षण पावित्र्याच्या आणि सुप्रजाजननाच्या पायावर स्थिर होऊन विषयोपभोगांच्या अनिर्बंध सेवनाला आळा बसून त्यांत अतिमानवता निर्माण होईल. पशुवृत्तींत विषयोपभोगावर जो संयम राखला जातो त्याहिपेक्षां अधिक संयम उद्यांच्या ह्या आदर्श मानवजातींत खात्रीनं राखला जाईल. ह्यामुळं हा नवा समाज अधिक पवित्र, अधिक निरोगी आणि अधिक कार्यक्षम होईल.

चांगली बाजू रंगवतांना समाजमनाला वाईट बाजूच नाहीं असा आभास होण्याचा संभव आहे. समाजमनांत सत्प्रवृत्ति आणि असत्प्रवृत्ति ह्यांचं एकजीव झालेलं मिश्रण जगाच्या सुरवातीपासून आतापर्यंत अस्तित्वांत आहे. हें मिश्रण जसं वेगळं करतां येत नाहीं त्याचप्रमाणं ह्या दोन्ही प्रवृत्ती आजवर तुल्यबलानं जगांत वावरताहेत. सत्प्रवृत्तींची बेसुमार वाढ झाल्यानं जसा समाजांतील समाजपणा नाहींसा होईल त्याचप्रमाणं असत्प्रवृत्तींची बेसुमार वाढ झाल्यानं सुद्धां तेंच होईल. व्यक्तींच्या आयुष्यांत सुखदुःख समतोल असेल तरच आयुष्य सुसह्य होत असतं. सुखाचा अतिरेक झाल्यानं आयुष्याचा वीट येईल आणि दुःखाचा अतिरेक झाल्यानं जीवन असह्य होईल. त्याचप्रमाणं कोणत्याहि प्रवृत्तीचा अतिरेक समाजांत टिकूंच शकत नाहीं. पाणी नेहमी आपली पातळी अबाधित राखण्याचा प्रयत्न करतें, त्याच तत्त्वावर ह्या

दोन परस्परविरुद्ध प्रवृत्ती समाजांत समपातळीवरच असतात. म्हणून अशा तऱ्हेच्या आदर्श शाळा अस्तित्वांत आल्यावर सुद्धां मानवजातींतील असत्प्रवृत्तींचा संपूर्ण नाश होणं असंभाव्य आहे. पण असत्प्रवृत्ती डोकावूं लागतांच त्यांना आळा घालणं, बालमनांवर शिकवणुकीचे सतत आघात करीत राहून, कधीं धाकानं, कधीं प्रेमानं, कधीं मानसिक सामर्थ्यानं, कधीं देहदण्डानं ह्या असत्प्रवृत्तींवर सत्प्रवृत्तींचा मारा करीत राहिल्यानं ह्या दोन तुल्यबल प्रवृत्तींच्या संघर्षांत समाजमनाचा काटा सत्प्रवृत्तींच्या बाजूला झुकता ठेवल्यास समाज सुखी होईल.

असो. बालमनविकासाचे प्रयोग आज पाश्चात्य शिक्षणपद्धतींत चालूच आहेत. समाजांतील वाईटांतले वाईट बालमनांचे नमुने एकत्र करून त्यांच्यावर चांगुलपणाचे, सत्प्रवृत्तींचे मानसिक आघात सतत करीत राहिल्यास त्यांच्यांत सुधारणा घडवून आणतां येते असं प्रयोगांनीं सिद्ध झालं आहे. पण हीं जीं मानसिक आंदोलनं यशस्वी होतात, ह्या आंदोलनांतून असत्प्रवृत्तींवर सत्प्रवृत्तींचा विजय होत असलेला जरी दृष्टोत्पत्तीस येतो तरी ह्या पाश्चिमात्यांच्या प्रयोगशाळांतून तयार होणारीं बालमनं राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेपर्यंतच जाऊन स्थिर होतात. निरनिराळे पाश्चिमात्य शैक्षणिक प्रयोग एका विशिष्ट मर्यादेपर्यंत यशस्वी होत असले तरी ह्या साऱ्या प्रयोगांत प्रत्ययाला येणाऱ्या मानसिक सुधारणे-बरोबर ज्ञानाच्या परिसीमेची आध्यात्मिकता नजरेपुढं ध्येय म्हणून ठेविली जात नसल्यानं जे प्रयोग व्हावेत तितके यशस्वी होत नाहींत ते प्रयोग आपल्या ह्या आदर्श शाळांतून यशस्वी होणार आहेत. धर्मशिक्षण किंवा नीतिशिक्षण ह्यांच्या परीक्षा कशा घ्यावा ह्या विचारानं हतबुद्ध झालेले पाश्चिमात्य शिक्षणतज्ज्ञ ज्या ठिकाणीं हात टेकतात तिथूनच आपल्या ह्या एकराष्ट्रीयत्वाचं शिक्षण देणाऱ्या शाळांच्या प्रयोगाला प्रारंभ होतो.

आयुष्य हीच बालमनांची खरीखुरी परीक्षा असून ह्या परीक्षेंत उत्तीर्ण होणं हें ध्येयच फक्त बालमनांच्या पुढं ठेविल्यास समाजाच्या आत्यंतिक सुखाकरितां झटणाऱ्या बालमनांची परीक्षा त्यांच्या जगांतील यशस्वी

जीवनांतच आपोआप घेतली जाईल. ह्या शाळांतून शिकून बाहेर पडलेलीं बालमनं समाजांत प्रौढपणानं वावरूं लागलीं कीं त्यांचा वैयक्तिक स्वार्थ नाहींसा झालेला आपल्याला दिसून येईल. मन, शरीर नी चारित्र्य यांच्या सुसंवादी बांधणीवर अधिष्ठित झालेलीं हीं बालमनं आपलं बागखेडं हेंच आपलं कुटुंब आणि हें स्वयंपूर्ण करणं हेंच आपलं ध्येय ह्या शुद्ध विचारानं कामाला लागतील. त्यामुळं व्यक्ति-व्यक्तींचा स्वार्थ मागं पडून त्या ठिकाणीं बागखेड्यांतील समाजाचा स्वार्थ हा दृष्टिकोन पुढं येईल. आपल्या खेड्यांतील प्रत्येक व्यक्तीला भरपूर आणि सात्त्विक अन्न मिळावं, आपल्या खेड्यांतील प्रत्येक व्यक्तीला वस्त्राची उणीव भासूं नये, आपल्या खेड्यांतील परावलंबी व्यक्तींच्या अन्नवस्त्राची सोय करणं आपलंच कर्तव्य आहे आणि प्रत्येक कार्यक्षम समाजघटकाला त्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणं काम देण्याची जबाबदारी आपलीच आहे हा ध्येयतारा सतत समाजापुढं राहील.

आपलं खेडं स्वयंपूर्ण करणं हें साध्य नसून साधन आहे ही शिकवणूक ह्या बालमनांना मिळालेली असल्यानं आपलं खेडं स्वयंपूर्ण झालं म्हणजे आपला कार्यभाग झाला असं धोरण न ठेवतां साऱ्या जगांतील मानव-जातींत एककुटुंबाची भावना निर्माण करण्याकरितां आपल्याला प्रयत्न करायचा आहे, ह्या कल्पनेनं खेड्यांतील ज्ञाते आणि नेते विचारविनिमय करतील. म्हणजे पहिल्या पंचवार्षिक योजनेनंतर एक खेडं हें कार्यक्षेत्र राहणार नसून पंचवीस खेड्यांचा एक गट म्हणजे एक कुटुंब ही भावना वाढीला लागेल. अशाच तऱ्हेनं एककुटुंबाची भावना वाढतां वाढतां सारी मानवजात एक आहे आणि जगाच्या पाठीवरील हें कुटुंब स्वयंपूर्ण करणं हें मानवतेचं निश्चित ध्येय आहे अशा प्रभावी तत्त्वावर सारी मानवजात अधिष्ठित झाली म्हणजे मानवतेला पूर्णत्व येणार आहे.

ह्याच्या उलट एका खेड्यांत अन्नवस्त्राचं उत्पादन वाजवीपेक्षां जास्त होत असेल तर आपलं जादा उत्पन्न शेजारच्या खेड्यांतील मानवजातीवर जुलमानं लादण्यापेक्षां आपलं उत्पादन आपल्या खेड्यापुरतंच मर्यादित ठेवून राहिलेली जमीन फळफळावळीच्या लागवडीकरितां उपयोगांत आण-

त्यानं आपल्या खेड्यांतील रहिवासी इतरांपेक्षां अधिक सुखी होतील हें जरी खरं असलं तरी त्यामुळं इतरांवर आक्रमण करण्याची इच्छा होणार नाहीं. अशा वेळीं शेजारच्या खेडयांतील मानवजातीला आपली मदत पाहिजे असेल तर मानवजातीचं आत्यंतिक सुख ह्या एकाच ध्येयानं आपलीं मनं प्रेरित असल्यानं त्यांतील कांहीं कुटुंबांना आपल्या खेडयांत सामील करून घेणं अगर ह्यांना देवाणघेवाणीचं तत्त्व मान्य असल्यास त्या तत्त्वावर ह्या दोन खेडयांचा एकजीव साधणं हिताचं होईल. म्हणजे ह्या नव्या शिक्षणांतून जुलमाच्या आक्रमणाऐवजीं प्रेमाची विभागणी वाटीला लागेल.

कोणत्याहि समाजघटकाला जमेल तें काम करण्याची मुभा असल्यानं जातीजातींचं वैशिष्ट्य कांहीं काळानं आपोआपच नाहींसं होईल. मी जातीनं माणूस आणि धंद्यानं शेतकरी अशा समाजरचनेंत वैमनस्याला वावच राहणार नाहीं. बाप धंद्यानं शेतकरी असला तरी मुलगा धंद्यानं शाता होईल. अशा विकसितवृत्तीनं सारी मानवजात एक होऊं लागली म्हणजे विवाहसंबंधांत सुद्धां संकुचितपणा राहणार नाहीं. आज समाजांतील निरनिराळ्या थरांतील लोकांच्या राहणींतच फरक असल्यानं रोटीबेटी-व्यवहाराला जो संकुचितपणा आलेला आहे तो नाहींसा होऊन समाजाचे सारे व्यवहार समपातळीवरून होऊं लागतील. प्रत्येक गावखेड्यांतील लोक एकाच दर्जाचे मानव आहेत ह्या मताचा पुरस्कार झाल्यानं श्रेष्ठकनिष्ठभावाला जागाच राहणार नाहीं. मी समाजाकरितां आणि समाज माझ्याकरितां ही आत्मीयतेची भावना अखिल मानवी-समाजांत सुख, शांति नी आनंद ह्यांचा सुकाळ करून सोडील. आज समाजांत कुणी शक्तीचा भक्त आहे, कुणी बुद्धीचा भक्त आहे, कुणी धंद्याचा दास आहे, तर कुणी द्रव्याला महत्त्व देतो; त्याचप्रमाणं निर-निराळ्या धर्ममतांच्या अनुयायांमध्यें सुद्धां धर्ममतांतील फरक हा फक्त ध्येयवादांतलाच फरक आहे ही कल्पना रूढ होऊन सर्व धर्मांचे अनुयायी सुद्धां आपल्या धर्ममतांचा कडवेपणा विसरून एका मानवी समाजधर्मांत विलीन होतील. धर्मभेदाप्रमाणंच वर्णकलहाला सुद्धां ह्या समाजांत वाव राहणार नाहीं. बुद्धिवाद्यांचा श्रेष्ठपणा, सामर्थ्यवाद्यांचं सामर्थ्य, सांपत्तिक-

दारांची संपत्ति आणि कामकऱ्यांचे श्रम हे वेगवेगळे सत्तासंप्रदाय नसून अखिल मानवजातीच्या सुखाकरितां समाजानं केलेली ही श्रमविभागणी आहे हें तत्त्व ह्या बालमनावर ठसवलं गेलं असल्यानं आजकाल अक्राळविक्राळ स्वरूप धारण करून बसलेले हे सारे प्रश्न अगदीं सुलभतेनं सुटतील.

ह्या नव्या तत्त्वज्ञानाचा उगम आर्यावर्तातील एका मानवी मनांत झालेला आहे. नदी ज्याप्रमाणं उगमस्थानीं अगदीं थेंबाथेंबानं झिरपत असते त्याचप्रमाणं ही विचारसरणी अद्याप अस्पष्ट आहे. पण ह्याच नदीला इतर पोषक प्रवाह मिळाले म्हणजे तो प्रवाह सामर्थ्यवान् होतो. त्याचप्रमाणं एका अंतःकरणांत स्फूर्त झालेल्या ह्या प्रवाहांत इतर मानवी मनांच्या पोषक प्रवाहांची भर पडल्यास त्यांतहि सामर्थ्य निर्माण झाल्यावांचून राहणार नाहीं. आर्यावर्तातील आजच्या सत्ताधाऱ्यांनीं ह्या विचारप्रणालीचं सामर्थ्य जगाच्या अनुभवाला आणून देण्याचा एकनिष्ठ प्रयत्न केला पाहिजे. ही नवी मानवसंघटना हिंदुस्थानांत प्रभावी ठरल्यावर पृथ्वीवरील अखिल मानवीसमाज ह्या तत्त्वज्ञानावर आपोआप अधिष्ठित होईल.

आध्यात्मिक नी आधिभौतिक विचारसरणींचा हा सुरेख संगम आहे. स्वयंपूर्णता हें आध्यात्मिकतेचं प्रतीक आहे, त्याचप्रमाणं समाजांतील शारीरिक सामर्थ्य हें आधिभौतिकतेचं प्रतीक आहे. हा एक मानसिक ॲटम बॉंब आहे. जग जिंकायचं सामर्थ्य ह्यांत आहे, पण अकारण नाश करण्याची ह्यांत अंधुक सुद्धां कल्पना नाहीं. परचक्र आलंच तर प्रत्येक स्वयंपूर्ण खेड्यांतून तयार असलेल्या शंभर शंभर वीरांची एकूण सात कोटींची अभेद्य आघाडी सामन्याला उभी राहील. प्रत्येक पंचवीस केंद्रांचं एक मुख्य केंद्र ह्याप्रमाणं सुमारें एकहजार कारखानी केंद्रांतून व तीसहजार दुय्यम केंद्रांतून स्वतंत्र हिंदुस्थानच्या बचावाकरितां लागणारी विपुल यांत्रिक सामुग्री सहज लीलेनं उभारतां येईल. स्वयंपूर्ण हिंदुस्थानांतील ह्या आधिभौतिक आघाडीचं अधिष्ठान आध्यात्मिकता हें असल्यानं परचक्राचं परावर्तन एवढं एकच ध्येय ही आघाडी साध्य करील. हें परावर्तन यशस्वी झाल्यावर जें आक्रमण होईल तें आधिभौतिक नसून आध्यात्मिक असेल. अखिलमानवजात एक आहे. आपण सारे एक होऊन मानवीसमाजाचं सुख साधण्याचाच एकदिलानं प्रयत्न करूं या. तुम्ही आमच्यावर आक्रमण

करूं शकत नाहीं हें आम्हीं सिद्ध केलं आहे. तुमच्यावर आक्रमण करून तुम्हाला गुलामगिरींत डांबण्याची आमची इच्छा नाहीं, कारण तें मानवतेचं ध्येय नाहीं. तुम्ही आम्ही सारे मानव एक असल्यानं आमच्याकडून तुम्हाला अगर तुमच्याकडून आम्हाला ज्या ज्या गोष्टींची अपेक्षा असेल त्या त्या गोष्टींबद्दल विचारविनिमय करून सारे सुखी होण्याच्या प्रयत्नाला लागूं या. स्नेहाचा हात शुद्ध अंतःकरणानं आम्ही तुमच्यापुढं केला आहे अशी मानवतेची हांक आपण सामर्थ्यवान झाल्यावर जगांतील अखिल मानवतेला दिल्यास त्या प्रेमाच्या हांकेला जागतिक मानवजातीकडून प्रेमाचंच प्रत्युत्तर येईल. हिंदुस्थान, चीन वगैरेसारख्या मोठ्या राष्ट्रांनाच ही गोष्ट शक्य आहे असं नसून पृथ्वीवरील साऱ्या छोट्या राष्ट्रांना सुद्धां हा स्वयंपूर्णतेचा मंत्र नवचैतन्यच देईल. प्रबळ राष्ट्रांशीं झुंज देतांना शरीरसामर्थ्य अपुरं पडत असलं तरी स्वयंपूर्ण राष्ट्रांतील असहकाराचं मानसिक सामर्थ्य अखिलजागतिक यांत्रिक सामर्थ्यापुढं यशस्वी रीतीनं टिकाव धरूं शकतं हा निःशस्त्र आर्यावर्ताचा ताजा अनुभव आहे. ह्या सामर्थ्याच्या जोरावर जगांतील सारीं छोटीं मोठीं राष्ट्रं प्रबळ बनतील. आणि मग—

साऱ्या मानवीसमाजांत आपुलकीचे, प्रेमभावाचे आणि समतेचे प्रवाह वाहूं लागतील. राष्ट्राराष्ट्रांतील भेदभाव नाहींसे होतील. समाजसुखाला पूरक एवढीच यांत्रिक सुधारणा जगाच्या पाठीवर शिल्लक राहील. साऱ्या राष्ट्रांतील साऱ्या विद्यालयांतून मानव्याचे पाठ दिले जातील. प्रत्येक व्यक्तीला आध्यात्मिकतेचं नी आधिभौतिकतेचं शिक्षण मिळत गेल्यानं सारा समाज प्रवृत्तिनिवृत्तीच्या झोल्यावर सुखानं झोके घेत राहील. पृथ्वीवरील मानवीसमाजाच्या अडचणी एकदिलानं आणि आत्मीयतेनं निवारण केल्या जातील. वेगवेगळ्या सत्तावादांचं समूळ उच्चाटन होऊन समाजाकरितां समाज ही एकच घोषणा साऱ्या पृथ्वीवर निनादत राहील.

'ह्याच समाजमनाचा ध्येयतारा'

—*—

# महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर

## —: प्रकाशन :—

गो. रा. चोळकर

१ बालसुहृद् १–०

गं. ल. देवधर

२ जांवई १–४

सौ. मालतीबाई दांडेकर

३ कथामालती २–०

४ प्रतिमा २–०

५ विद्युत्‌रेखा १–१२

६ मातृमंदीर २–८

७ तेजस्विनी ५–०

८ अमोल आहेर ३–४

९ ध्यांची कन्या ३–०

१० कृष्ण रजनी ५–०

वि. ब. सहस्रबुद्धे

११ पद्यमीमांसा १–४

१२ दुहिता ( काव्य ) २–०

व्यं. रा. खंडाळीकर

१३ आघाडीवर २–०

गणपतराव बोडस

१४ झांशीची राणी १–८

दादासाहेब मावळंकर

१५ कांहीं पाडलें २–८

श्री. वर्टीकर

१६ इच्छा ३–०

कुमारी प्रेमा कंटक

१७ अभियान ३–०

ना. वि. गुणाजी

१८ रमणप्रस्थानत्रयी १–४

श्री. रा. पोतनीस

१९ महागाई कां ? १–८

काका कालेलकर

२० जीवनसंस्कृति १–२

आय्. सी. शेख

२१ पाकिस्तानची छाया २–८

शांतिलाल रा. भंडारी

२२ तोंडचा घास १–१२

माधवराव बागल

२३ कला आणि कलावंत ३–०
भाग २ रा

वि. भ. कुलकर्णी, एम्. ए.

२४ मराठी काव्यसमीक्षा ६–०

यदुनाथ थत्ते

२५ जीवनधर्म १–४

अप्पासाहेब पटवर्धन

२६ सेवाधर्म २–०

कै. पंडित मुंडले

२७ कार्ल मार्क्स व
त्याचें कार्य २–०

ना. ल. व्हटकर

२८ अपराधी २–०

महात्मा गांधी

२९ विद्यार्थ्यांशी हितगूज २–०
३० स्त्रियांशी हितगूज २–८

पं. जवाहरलाल नेहरू

३१ आव्हान १–८
३२ काँग्रेस व समाजवाद ३–८

सौ. मालतीबाई चोळकर

३३ चित्रलेखा ३–८

टॉलस्टॉय

३४ सैतान २–०

डॉ. अष्टपुत्रे

३५ चारुमित्रा २–४

खलिल जिब्रान

३६ मानवतेचे राखणदार २–८
३७ सलमा २–८

सरदार प्रकाशित

३८ जोहार (मराठी) २–८
३९ " (हिंदी) २–०

ग. आ. लाड

४० ग्रामराज्य २–०

भारतन् कुमारअप्पा

४१ पुंजीवाद, समाजवाद की ग्रामवाद ५–०

के. रा. पालकर

४२ शाळा व शारीरिक शिक्षण २–०

मो. स. श्रीखंडे

४३ हिंदी ग्रामीण जीवनाचा प्रश्न ७–०

## आमचे सण

१ गुढी पाडवा ०–८
२ वसंत गौरी ०–४
३ सती सावित्री ०–१०
४ नागपंचमी ०–६
५ हरितालिका ०–८
६ मंगलमूर्ति ०–८
७ सोन्याचा दसरा ०–५
८ तिळगूळ घ्या गोड बोला ०–५
९ महाशिवरात्र ०–५
१० होळी ०–५
११ नाताळ ०–८

---

१ आमचे गांधीजी ०–८
२ फुलराणी ०–५
३ गुलाबकळी ०–५
४ राया अथवा बाळमूर्तिकार ०–७
५ पुण्यश्लोका कस्तुरबा ०–१०
६ पहिलें पाऊल ०–५
७ माझें पुस्तक ०–८
८ सृष्टीचा संदेश ०–१२

'समाजमनाचा ध्येयतारा' या पुस्तकावरील

## वाचकांचा अभिप्राय

वाचकाचें संपूर्ण नांव ______________________________

______________________________________________

पत्ता ________________________________________

तारीख ________________